# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
## २७ वा वार्षिक अहवाल २०११ – २०१२
# जन्मशताब्दी वर्ष



## Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai
## 27th Annual Report 2011-2012
# Birth Centenary Year




मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या शुभारंभ प्रसंगी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार, गेटवे ऑफ इंडिया येथे भाषण करतांना. सोबत मंचावर डावीकडून केंद्रीय मंत्री ना. श्री. प्रफुल्ल पटेल, श्री. विलासराव देशमुख, ओदिशाचे राज्यपाल श्री. मुरलीधर भंडारे, महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. के. शंकरनारायणन, भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे, मार्शल ऑफ दि एअरफोर्स श्री. अर्जन सिंग, त्रिपुराचे राज्यपाल, डॉ. डी. वाय. पाटील, महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील व अणुऊर्जा शास्त्रज्ञ व यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर.



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या शुभारंभ प्रसंगी गेटवे ऑफ इंडिया येथील कार्यक्रमात सहभागी झालेल्या भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील. सोबत केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरद पवार, केंद्रीय मंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे, मार्शल ऑफ दि एअरफोर्स श्री. अर्जन सिंग.

# २७ वा
# वार्षिक अहवाल
# २०११ - २०१२

**यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई**
जन. जगन्नाथराव भोसले मार्ग,
मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी क्र.: २२०२८५९८, २२०४५४६०, २२८५२३४५.
फॅक्स क्र.: २२८५२०८१, २२८५२०८२

**Email :** ybchavan100@gmail.com.

**Visit us : ybchavanpratishthan.org**

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

## वार्षिक अहवाल २०११-२०१२

### अनुक्रमणिका


| अ.क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे विश्वस्त मंडळ, कार्यकारिणी मंडळ, कार्यकारी समिती, प्रतिष्ठानचे विभाग प्रमुख, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापन | ३-५ |
| २ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम | ५-११ |
| ३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या केंद्रात झालेले महत्वाचे कार्यक्रम | ११ |
| ४ | यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर उपक्रम | ११-१२ |
| ५ | विशेष कार्यक्रम | १२-१५ |
| ६ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई - माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | १५-१७ |
| ७ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम / उपक्रम | १७-१८ |
| ८ | प्रतिष्ठानमार्फत देण्यात आलेली व मिळालेली अनुदाने | १८ |
| ९ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम | १८-५३ |
| १० | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची विभागीय केंद्रे | ५३-८३ |
| ११ | प्रतिष्ठानची प्रकाशने व व्हि.डी.ओ. कॅसेटस् | ८४ |
| १२ | प्रतिष्ठानच्या वैधानिक लेखा परीक्षकाचे प्रमाणपत्र | ८५ |
| १३ | यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानची हिशोबपत्रके व संबंधित परिशिष्टे | ८६-९६ |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

ट्रस्ट रजि.नं.एफ.१०६४३, दिनांक १७ सप्टेंबर १९८५, सोसायटी रजि.नं.एम.एम.एच/बी.ओएम-५३९/८५
यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०२१

**विश्वस्त मंडळ सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. श्री. शरदराव पवार | अध्यक्ष |
| २. | मा. डॉ. रविंद्र बापट | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. अरुण गुजराथी | कार्याध्यक्ष |
| ४. | मा. श्री. श. गं. काळे | सरचिटणीस |
| ५. | मा. श्री. हेमंत टकले | कोषाध्यक्ष |
| ६. | मा. श्री. मोहन धारिया | |
| ७. | मा. श्री. शिवाजीराव पाटील-निलंगेकर | |
| ८. | मा. श्री. हुसेन दलवाई | |
| ९. | मा. प्रा. पी. बी. पाटील | |
| १०. | मा. श्री. राम प्रधान | |
| ११. | मा. श्री. लक्ष्मण माने | |
| १२. | मा. श्री. वसंतराव कार्लेकर | |
| १३. | मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे | |
| १४. | मा. श्री. दिलीप वळसे-पाटील | |
| १५. | मा. श्री. अजित निंबाळकर | |

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

१६. मा. श्री. नितीन करीर,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.

१७. मा. श्री. वि. ल. आचालिया
प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

**कार्यकारिणी मंडळ सदस्य**

१. मा. श्री. शरदराव पवार
२. मा. डॉ. रविंद्र बापट
३. मा. श्री. अरुण गुजराथी
४. मा. श्री. श. गं. काळे
५. मा. श्री. हेमंत टकले
६. मा. श्री. जयंत पाटील
७. मा. श्री. राम ताकवले
८. मा. श्री. ना. धो. महानोर
९. मा. श्री. रा. सु. गवई
१०. मा. श्री. के. बी. आवाडे
११. मा. श्री. प्रकाश कुलकर्णी
१२. मा. श्री. श्रीनिवास पाटील
१३. मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
१४. मा.श्री.सा.रे.ऊर्फअप्पासाहेब पाटील
१५. मा. श्री. अंकुशराव टोपे
१६. मा. श्री. शामराव पा. पाटील
१७. मा.श्री.यशवंतराव गडाख - पाटील
१८. मा. श्री. चंद्रकांत घुले - पाटील
१९. मा.श्री.माणिकराव पाटील, अध्यक्ष,
महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. (पदसिध्द)

**महाराष्ट्र शासन प्रतिनिधी**

२०. मा. श्री. नितीन करीर,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव.

**कार्यकारी समिती**

१ मा. श्री. शरदराव पवार
२ मा. डॉ. रविंद्र बापट
३ मा. श्री. अरुण गुजराथी
४ मा. श्री. श. गं. काळे
५ मा. श्री. हेमंत टकले
६ मा. श्री. श्रीनिवास पाटील
७ मा. सौ. सुप्रिया सदानंद सुळे
८ मा. श्री. अजित निंबाळकर

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

**प्रतिष्ठानचे विभाग**

| | | |
|---|---|---|
| १. सृजन | सृजन प्रमुख | सौ. सुप्रिया सुळे |
| २. वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) | निमंत्रक | सौ. सुप्रिया सुळे |
| ३. कृषी व सहकार व्यासपीठ | निमंत्रक | श्री. अजित निंबाळकर |
| ४. कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम | सदस्य सचिव | श्री. म. बा. पवार |
| ५. यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी | संचालक | ब्रिगेडीअर श्री. सुशील गुप्तन |
| ६. महाराष्ट्र महिला व्यासपीठ | संयोजिका | श्रीमती रेखा नार्वेकर |
| | कार्यकारी संयोजिका | श्रीमती ममता कानडे |
| ७. नवमहाराष्ट्र युवा अभियान | संयोजक | श्री. दत्ता बाळसराफ |
| ८. सांस्कृतिक विभाग | निमंत्रक | श्री. विनय नेवाळकर |
| | | श्री. सुनिल वालावलकर |
| ९. यशवंतराव चव्हाण ग्रंथालय | ग्रंथपाल व संदर्भ अधिकारी | श्री. अनिल पाझारे |
| १०. यशवंतराव चव्हाण सभागृहे | व्यवस्थापक | श्री. विजय देसाई |
| ११. वार्तापत्र | मानद संपादक | श्री. दत्ता बाळसराफ |
| १२. शिक्षण विकास मंच | प्रमुख संयोजक | श्रीमती कुमुद बन्सल |
| १३. अपंग हक्क अभियान | समन्वयक | श्री. विजय कान्हेकर |
| १४. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई | विधी सल्लागार | श्री. एम. बी. पवार |

**प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रांचे अध्यक्ष :**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | विभागीय केंद्र कराड | अध्यक्ष | श्री. जयंत पाटील |
| २) | विभागीय केंद्र पुणे | अध्यक्ष | श्री. अजित निंबाळकर |
| ३) | विभागीय केंद्र नागपूर | अध्यक्ष | श्री. गिरीश गांधी |
| ४) | विभागीय केंद्र नाशिक | अध्यक्ष | श्री. विनायकराव पाटील |
| ५) | विभागीय केंद्र औरंगाबाद | अध्यक्ष | श्री.नंदकिशोर कागलीवाल |
| ६) | विभागीय केंद्र लातूर | अध्यक्ष | श्री. जनार्दन वाघमारे |
| ७) | विभागीय केंद्र कोंकण | अध्यक्ष | श्री. राजाभाऊ लिमये |
| ८) | विभागीय केंद्र अमरावती | अध्यक्ष | श्री. रा. सु. गवई |

**इतर**

| | | |
|---|---|---|
| १) | मानद वास्तुविशारद | मे. शशी प्रभु अँड असोशिएटस् |
| २) | संविधिक लेखा परीक्षक | मे. सी.व्ही.के. अँड असोशिएटस् |
| ३) | अंतर्गत हिशेब तपासनीस | मे. वैशंपायन आणि पाध्ये<br>चार्टर्ड अकाऊटंट |

# यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचा सन २०११-२०१२ चा वार्षिक अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

## १. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे व्यवस्थापन :

मा. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा व कार्याचा प्रसार करण्यासाठी प्रतिष्ठानतर्फे विविध प्रकारचे उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या १२ बैठका घेण्यात आल्या व विविध विषयांवर सांगोपांग चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या आर्थिक वर्षात विश्वस्त मंडळाच्या व कार्यकारिणी मंडळाच्या प्रत्येकी पुढीलप्रमाणे ३ बैठका झाल्या. दि. १८ सप्टेंबर २०११, दि. २५ नोव्हेंबर २०११ व दि. १२ मार्च २०१२.

तसेच कार्यकारी समितीच्या दिनांक २ एप्रिल २०११, ७ मे २०११, ४ जून २०११, २ जुलै २०११, ६ ऑगस्ट २०११, ३ सप्टेंबर २०११, ३ ऑक्टोबर २०११, ५ नोव्हेंबर २०११, ३ डिसेंबर २०११, ७ जानेवारी २०१२, ४ फेब्रुवारी २०१२ व ३ मार्च २०१२ अशा एकूण १२ बैठका झाल्या.

प्रतिष्ठानच्या हिशेबाची तपासणी प्रत्येक महिन्याला अंतर्गत हिशेब तपासनीस मेसर्स वैशंपायन आणि पाध्ये, चार्टर्ड अकाउटंट यांचेमार्फत करण्यात आली व त्यांचे अहवाल कार्यकारी समितीपुढे ठेवण्यात आले. वार्षिक हिशेबाची तपासणी सांविधिक हिशेब तपासनीस मेसर्स सी.व्ही.के. असोसिएटस्, चार्टर्ड अकाउटंट यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही विश्वस्त मंडळ व कार्यकारिणी मंडळासमोर ठेवण्यात आला. वार्षिक सर्वसाधारण सभेने मंजूर केलेल्या अंदाजपत्रकास आधीन राहून प्रत्येक विभागीय केंद्रासाठी व मुख्य कार्यालयातील विविध विभागांना खर्चाचे अंदाजपत्रक दिले असून त्यांच्याकडून खर्चाचे तिमाही अहवाल मागवून तपासण्यात आले व कार्यकारी समितीपुढे सादर करण्यात येऊन त्रुटींची पूर्तता करुन घेण्यात आली. प्रतिष्ठानची वेबसाईट ybchavan100@gmail.com असून ती वेळोवेळी अद्ययावत करण्यात येत आहे.

**सभासद संख्या** : यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची निरनिराळया प्रकारच्या सभासदांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | संस्थापक सदस्य | ४२ |
| २. | आजीव सदस्य | २५० |
| ३. | संस्था सदस्य | २८ |

महाराष्ट्र शासनाने मा. श्री. नितीन करीर, मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव व मा. श्री. वि. ल. आचालिया, प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग हे दोन प्रतिनिधी विश्वस्त मंडळावर नेमलेले आहेत. त्यापैकी मा. श्री. नितीन करीर, मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव यांची कार्यकारिणी मंडळावरही नियुक्ती केलेली आहे.

## २. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई केंद्रातील उपक्रम :-

### २.१ सभागृहे :

१.१ **मुख्य सभागृह** : यशवंतराव चव्हाण केंद्रातील सभागृहाचा वापर, प्रतिष्ठानने आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांसाठी तसेच निरनिराळया सामाजिक संस्था, शासनातर्फे आयोजित केलेल्या सभा, संमेलने, चर्चा, परिषदा, चित्रपट, सांस्कृतिक कार्यक्रम यासाठी करण्यात आला. सभागृहामध्ये मराठी, हिंदी, गुजराती व इंग्रजी नाटके, संगीतसभा आदि कार्यक्रमही झाले.

१.२ **सांस्कृतिक व रंगस्वर सभागृह** : सांस्कृतिक सभागृह व रंगस्वर सभागृह या दोन्ही सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येतात. ही दोन्ही सभागृहे सर्व सोयींनी युक्त व अद्ययावत करण्यात आली आहेत.

## २.२ यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय :-

२.१ **ग्रंथालयाविषयी माहिती** :- गेल्या वीस वर्षात विज्ञान व तंत्रज्ञानाने जी झेप घेतली आहे, या क्षेत्रात लक्षणीय परिवर्तन झाले आहे. सध्याचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग असून या तंत्रज्ञानाचा विकास झपाटयाने होत आहे. ग्रंथालय व माहिती केंद्रे हे माहिती तंत्रज्ञानाचे जवळचे क्षेत्र असल्याने जास्तीत जास्त प्रगत माहिती तंत्रज्ञानाचा वापर या क्षेत्रात होत आहे. सध्या सर्वत्र ग्रंथालये व माहिती केंद्रे स्थानिक, प्रादेशिक आणि जागतिक पातळीवर स्थापन झाली आहेत आणि ती ज्ञान प्रसाराच्या क्षेत्रात महत्वाची भूमिका बजावत आहेत. ग्रंथालयातून संदर्भ ग्रंथ, ग्रंथ पुस्तिका, नियतकालिके आणि इतर वाचन साहित्य विषयाप्रमाणे व्यवस्थित ठेवलेले असते. विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान युगात ग्रंथालयातून एखाद्या विषयावर विद्यार्थी विद्वान व संशोधक यांना स्थूल अथवा सुक्ष्म माहिती सेवा ग्रंथालयांना द्यावी लागते. ग्रंथालयांना माहिती जमवणे, तिचे प्रसारण व परिचलन करणे, प्रदर्शन करणे, ती माहिती सुरक्षित ठेवणे आणि प्रतिप्राप्ती करणे ही कामे करावी लागतात.

ॲटोमेशन आणि ग्रंथालयातील जाळे (नेटवर्क) यांनी ग्रंथालयातील साधन संपत्तीच्या अदान प्रदानतेला नवी दिशा दिली आहे. या अनुषंगाने वाचकांना माहिती सेवेकरिता आपल्या ग्रंथालयांनी विविध ग्रंथालयीन नेटवर्कच्या सुविधा पैकी **डेलनेट** ची (डेव्हलपिंग लायब्ररी नेटवर्क) सुविधा देण्याचा उपक्रम सुरु केला आहे.

यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये समाजशास्त्र, राज्यशास्त्र, शेती, सहकार, इतिहास, कायदा, संस्कृती इत्यादी विषयांवरील पुस्तके, चरित्रे व आत्मचरित्रे, धर्मकोष, विश्वकोष, मराठी विश्वकोष, गॅझेटियर, ॲटलॉस इअर बुक, डिक्शनरीज इत्यादी संदर्भ ग्रंथ ग्रंथालयासाठी घेण्यात येतात. ग्रंथालयामध्ये एकंदरीत असलेली २१०४० पुस्तके आणि नव्याने खरेदी करण्यात येणारी पुस्तके वाचताना सहज उपलब्ध व्हावी याकरिता **ओपॅक** कॅटलॉग सुरु केला आहे. यामध्ये लेखक, ग्रंथनाम, प्रकाशन, विषय, वर्गांक या संज्ञेच्या सहाय्याने वाचताना माहिती मिळविता येते आणि पाहिजे त्या ग्रंथाचा शोध घेता येतो.

२.२ **ग्रंथालयाचे नियम** :- यशवंतराव चव्हाण ग्रंथालयाचे सभासद होण्याकरिता नमुना अर्ज तयार केला आहे. या अर्जामध्ये स्वतःच्या हस्ताक्षरात परिपूर्ण माहिती भरुन त्यासोबत पुढीलप्रमाणे वर्गणी भरणे आवश्यक आहे.

अ) **सर्वसाधारण सभासद** : सर्वसाधारण सभासदाकरिता रु. २५०/- वार्षिक वर्गणी तसेच रु. २५०/- अनामत रक्कम.

ब) **विद्यार्थी सभासद** :- महाविद्यालयीन/उच्चशिक्षण/संशोधक विद्यार्थ्यांकरिता वार्षिक रु. ५०/- नाममात्र वर्गणी व अनामत रक्कम रुपये १००/-.

क) यशवंतराव चव्हाण ग्रंथालयामध्ये संदर्भाकरिता कांही विद्यार्थी एक दिवस ते एक आठवडा या कालावधीकरिता ग्रंथालयाचा लाभ घेतात. या विद्यार्थ्यांकडून रु. १५/- एका आठवडयाला फी आकारण्यात येते. त्यांच्याकडून फक्त एका कार्डवर त्यांची वैयक्तिक माहिती भरुन घेण्यात येते.

ड) माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनीत शिक्षण घेणारे विद्यार्थी संगणकविषयक पुस्तकांचा लाभ घेतात. त्याकरिता ग्रंथालय वेगळी फी आकारत नाही.

इ-१) **संयुक्त संस्था सभासदत्व** (Corporate Membership)

कार्पोरेट या शब्दाच्या व्याख्येत बसणारी संस्था या सभासदत्वासाठी पात्र असेल. एकावेळची वर्गणी रु. ५०,०००/- पाच वर्षांसाठी.

**अनामत रक्कम** :- सर्वसाधारणपणे अनामत रक्कम घेण्यात येणार नाही. परंतु एखाद्या दुर्मिळ व किंमती पुस्तकांसाठी प्रतिष्ठान निश्चित करेल तेवढी रक्कम घेण्यात येईल. एकाचवेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देता येतील.

इ-२) **संस्था सभासदत्व** (Institutional Membership) यासाठी शिक्षण संशोधन संस्था व सांस्कृतिक संस्था पात्र राहतील. परंतु शिक्षण व संशोधन संस्था ही युजीसी, आय.सी.एस.एस.आर., आय.सी.सी.आर. किंवा आय.सी.एच.आर. यांच्याकडून मान्यता प्राप्त झालेली असावी, तर सांस्कृतिक संस्था ही महाराष्ट्र शासन, केंद्र शासन किंवा मान्यता प्राप्त अधिघोषित विद्यापीठ यांनी मान्यता दिलेली असावी.

**संस्था सभादत्वासाठी** :- प्रवेश फी रु. १,०००/- ना परतावा

**वार्षिक वर्गणी** :- रु. ५,०००/-

**दीर्घ कालावधीसाठी संस्था सभासद** :- एकावेळी ५ वर्षांसाठी वर्गणी रु. २०,०००/-

**एका वेळी देण्यात येणारी पुस्तके** :- एकावेळी जास्तीत जास्त १० पुस्तके देण्यात येतील. इ-१ व इ-२ येथील सभासदत्व हे संबंधित संस्थेच्या प्रमुखास देण्यात येईल. त्यांना ग्रंथालयाचे ओळखपत्र देण्यात येईल. संस्थेच्या प्रमुखास आवश्यक वाटल्यास ते त्यांच्या एक किंवा दोन कर्मचा-यांना त्यांच्यावतीने पुस्तके घेण्यास / परत करण्यास नामनिर्देशित करु शकतील. नामनिर्देशन अधिकृत पत्राने करावे लागेल. मात्र पुस्तके अबाधितपणे वेळेवर परत करणे व ग्रंथालयाच्या नियमांचे पालन करणे याची जबाबदारी संस्था प्रमुखांची असेल. वरील सभासदत्व देण्याचा किंवा कारण न देता नाकारण्याचा पूर्ण अधिकार प्रतिष्ठानला राहील.

२.३ **सर्वसाधारण सभासद** :- सभासदांना एकावेळी एक पुस्तक / ग्रंथ देण्यात येईल ते आठ दिवसात परत करणे आवश्यक आहे. तसेच संदर्भग्रंथाचा उपयोग ग्रंथालयातच करता येईल. संदर्भ ग्रंथ घरी नेता येणार नाही. पुस्तकाची किंमत भरलेल्या अनामत रक्कमेपेक्षा जास्त असेल तेव्हा अधिक अनामत रक्कम किंवा त्या पुस्तकांच्या किंमती एवढी अनामत रक्कम भरुन पुस्तक घरी नेता येईल.

२.४ महाविद्यालयीन व उच्चशिक्षण घेणारे विद्यार्थी/संशोधक यांना ग्रंथ, संदर्भ ग्रंथ, नियतकालिके ग्रंथालयात बसून वाचण्यासाठी/संदर्भासाठी देण्यात येतात. घरी/ग्रंथालयाबाहेर नेण्याकरिता देण्यात येणार नाहीत.

२.५ **ग्रंथालयाच्या वेळा व सुट्ट्या** :- सकाळी ११.०० ते संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत ग्रंथालय वाचकांकरिता तसेच पुस्तके परत करणे, नवीन घेणे यासाठी उघडे राहील. दुसरा व चौथा शनिवार, सर्व रविवार आणि सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी ग्रंथालय चालू आहे.

२.६ सभासदाचे कार्ड हरविल्यास त्यांना पुस्तक / ग्रंथ देण्यात येणार नाही. सभासदत्व नियमित ठेवण्याकरिता, सभासदाने स्वतःच्या हस्ताक्षरात साध्या कागदावर अर्ज करुन ग्रंथालयास सादर करावा, त्यानंतर कार्डाची दुसरी प्रत देण्याचा विचार केला जाईल.

२.७ सभासदाकडून ग्रंथ हरविल्यास त्यांना १५ दिवसांत नवीन ग्रंथ खरेदी करुन द्यावा लागेल किंवा त्या ग्रंथाची अद्ययावत रक्कम मूल्या इतकी रक्कम अनामत रक्कमेमधून वळती करण्यात येईल व गरज पडल्यास अधिकची रक्कम सभासदास भरावी लागेल. अनामत रक्कमेतून रक्कम भरणे अनिवार्य राहील.

२.८ सभासदांनी घरी नेलेले पुस्तक खराब केल्यास / वाचण्याच्या स्थितीत नसल्यास / पाने फाटलेली आढळल्यास सभासदांनी वरीलप्रमाणे नवीन पुस्तक आणून देणे किंवा रक्कम भरणे अनिवार्य राहील.

२.९ सभासदांनी ग्रंथालयामध्ये शांतता राखावी, आपआपसामध्ये किंवा ग्रंथालयीन कर्मचा-यांबरोबर चर्चा करणे टाळावे. तसेच ग्रंथालयीन कर्मचा-यांनी सुध्दा सभासदासोबत चर्चा करणे टाळावे. धुम्रपान, थुंकणे, झोपणे याकरिता मनाई राहील. ग्रंथालयात मोबाईल फोन बंद ठेवावेत.

२.१० ग्रंथालयातून बाहेर पडताना सभासदास दिलेल्या ग्रंथाचा वर्गांक, दाखल अंक ग्रंथालयाच्या गेटवर तपासला जाईल.

२.११ सभासदास ग्रंथालयाचे सभासद रहावयाचे नसल्यास त्यांनी तसा लेखी अर्ज द्यावा. त्या सोबत कार्ड परत करावे. त्यावर निर्णय घेऊन इतर येणे नसल्यास अनामत रक्कम रु.२५०/- बिनव्याजी वजा करण्यात येईल.

सन २०११-१२ या वर्षाकरिता प्रतिष्ठानने एकूण रु.३ लाख इतकी रक्कम ग्रंथालयासाठी मंजूर केली होती व प्रत्यक्ष खर्च रु.२,०२,८६३/- इतका झाला आहे. या रकमेतून वर्तमानपत्रे, मासिके, साप्ताहिके, ग्रंथ, संदर्भ ग्रंथ खरेदी करण्यात आले.

त्यामध्ये ५०९ ग्रंथ / पुस्तके खरेदीचा समावेश आहे. दि. ३१.३.२०१२ रोजी ग्रंथालयाची सभासद संख्या पुढीलप्रमाणे आहे.

१) सन २०११-२०१२ मध्ये सभासद झालेले महाविद्यालय विद्यार्थी / संशोधक / सभासद संख्या एकून १८१ आहे व सभासद वर्गणी / अनामत रक्कम म्हणून रु.२४,२५०/- इतकी मिळाली आहे.

२) सन २०११-२०१२ सर्वसाधारण सभासद संख्या १५० आहे. या वर्षात सभासद वर्गणी व अनामत रक्कम म्हणून रु.६५,७५०/- इतकी मिळाली आहे.

२.३ **अनुबोधपट** : मा. चव्हाणसाहेबांच्या जीवनावर अनुबोधपट तयार करण्याचे काम नामवंत दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांचेकडे सोपविण्यात आलेले आहे. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवनावर चित्रपट निर्मितीसाठी महाराष्ट्र शासनाने साहाय्यक अनुदान रु.तीन कोटी एवढा निधी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईला देऊन सदर चित्रपट दोन वर्षांच्या कालावधीत पूर्ण होणे आवश्यक असल्याचे कळविले होते. त्याप्रमाणे चित्रपट वेळेत पूर्ण होणेसाठी प्रतिष्ठान प्रयत्नशील आहे. परंतु महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म दिनांक १२ मार्च १९१३ ला झाला व त्यांचे निधन दि. २५ नोव्हेंबर १९८४ ला झाले. या त्यांच्या ७१ वर्षांच्या कालावधीचा आवाका व त्यांच्या राज्य व राष्ट्रीय स्तरावरील उल्लेखनीय कारकीर्दीतील महत्त्वाच्या प्रसंगांचे व्यवस्थितपणे चित्रण होणे आवश्यक आहे. अशा प्रकारच्या चित्रपटात नायकाला न्याय मिळाला पाहिजे याची दक्षता घेत असतांनाच इतर ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाना चित्रपटात कुठेही उणेपणा येऊ नये याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. या संदर्भात पटकथेला अनन्यसाधारण महत्त्व असते. ती पटकथा सुप्रसिध्द साहित्यिक श्री. अरुण साधु यांनी लिहिली आहे. पटकथेला अंतिम स्वरुप देण्यापूर्वी श्री. अरुण साधु व दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व मा. यशवंतरावांचे निकटवर्ती मा. ना. शरद पवार यांच्याशी चर्चा केली आहे. त्यानंतर मा. चव्हाणसाहेबांच्याबरोबर काम केलेले नेते व शासकीय अधिकारी यांच्याकडून पटकथेची समीक्षा करण्यात आलेली आहे व त्यांनी पटकथेत मा. यशवंतराव चव्हाण यांच्या व्यक्तिमत्वाला व कार्याला तसेच इतर नेत्यांना न्याय मिळाल्याची भावना व्यक्त केलेली आहे. पुढील महत्त्वाचा टप्पा प्रत्यक्ष चित्रीकरणाचा आहे. प्रस्तावित चित्रपट कांही प्रमाणात अनुबोधपट असला तरी मा. चव्हाणसाहेबांच्या आयुष्यातील सर्व कालावधीचे समकालीन चित्रण उपलब्ध नसल्यामुळे त्या त्या कालखंडाच्या चित्रीकरणासाठी मा. यशवंतराव व त्या काळातील त्यांचे सोबती, कुटुंबिय, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील थोर नेते यांच्या भूमिका योग्य त्या अभिनेत्यांवर चित्रित कराव्या लागतील. मा. चव्हाणसाहेबांना पाहिलेल्या अनेक व्यक्ती आज हयात असल्यामुळे त्यांच्या भूमिकेकरिता पूर्ण अर्थाने योग्य ठरेल अशा अभिनेत्याची निवड करणे, तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती उदा. आई, भाऊ, पत्नी व इतर घरातील व्यक्ती यांच्या भूमिकांसाठी साजेशा अभिनेत्याची निवड करणे ही प्रक्रिया कालावधी लागणारी आहे. कारण त्या त्या अभिनेत्याचे केवळ दर्शनीय सादृश्य पुरेसे नसून त्या काळांतील वेषभूषा, भाषेची लकब याही बाबींकडे लक्ष द्यावे लागते. तसेच मा. यशवंतरावांच्या काळांतील अनेक वास्तु उदा. त्यांचे जन्मघर, शाळा या आज अस्तित्वात नाहीत. त्यामुळे तशा दिसणा-या दुस-या वास्तूंचीही निवड करावयाची आहे. अशा प्रकारच्या अनुबोधपटसदृश्य चित्रपटातील कांही प्रक्रिया स्वरुपतःच गुंतागुंतीच्या व वेळ घेणा-या असतात. कारण एकीकडे ऐतिहासिक वास्तव्य जपणे, ते प्रभावीपणे दृकश्राव्य माध्यमातून सादर करणे व प्रेक्षकांना त्या त्या कालखंडांत घेऊन जाणे असे बिकट कार्य पार पाडावयाचे असते. चित्रपटामध्ये समावेश करावयाच्या संगीताच्या रेकॉर्डींगचे काम जवळ जवळ पूर्ण झालेले आहे. चित्रीकरणाचे काम ३ विभागामध्ये करण्यात येणार आहे. त्यामध्ये कृष्णाकांठ - १९१३ ते १९४६, सागरतीर - १९४६ ते १९६२ व यमुनेकाठी - १९६२ ते १९८४. या ३ विभागांपैकी पहिल्या विभागाचे चित्रीकरण वाई जवळच्या ग्रामीण भागात जवळ जवळ पूर्ण झालेले आहे.

विभाग २ व विभाग ३ यांचे चित्रीकरण सुरु आहे. चित्रीकरण पूर्ण झाल्यानंतरही दुरुस्त्या, संकलन, सेन्सॉर प्रमाणपत्र वगैरे अनेक टप्पे व प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतील. हा एक ऐतिहासिक स्वरुपाचा व ऐतिहासिक महत्त्वाचा चित्रपट आहे. यामध्ये केवळ एका महान नेत्याचे जीवन चित्रित करावयाचे नसून त्या काळातील महाराष्ट्रातील व भारतातील अनेक महत्त्वाच्या

घटनांचाही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष समावेश असणार आहे. मा. यशवंतराव चव्हाण यांच्या कर्तृत्वाचे आलेखन करत असतांना त्यांच्या जीवनाशी अनिवार्यपणे संबंध असणा-या अनेक लहान मोठया व्यक्तींच्या व नेत्यांच्या कर्तृत्वाचे यथायोग्य चित्रण होणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबी विचारात घेता चित्रपट ऑक्टोबर २०१२ पर्यंत पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

२.४ **मा. यशवंतराव चव्हाण यांचे चित्ररुप चरित्र प्रकाशन** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने या वर्षात अनेक कार्यक्रम / उपक्रम हाती घेतले आहेत. त्यापैकी मा. यशवंतरावांचे सचित्र चरित्र प्रकाशित करणे हा एक महत्त्वाचा उपक्रम प्रतिष्ठानने हाती घेतला होता. या चरित्रान्वये मा. यशवंतरावांचे अष्टपैलू व्यक्तिमत्व व दैदिप्यमान कर्तृत्व पुन्हा एकदा महाराष्ट्राच्या जनतेपुढे, विशेषतः नवीन पिढीच्या पुढे यावे असा प्रतिष्ठानचा उद्देश आहे. या पुस्तकामध्ये मा. यशवंतरावांच्या जीवनातील महत्त्वाचे प्रसंग व व्यक्ती या विषयींची छायाचित्रे आहेत व विशेष महत्त्वाचे म्हणजे हे चरित्र श्री. गोविंदराव तळवलकर यांच्या सारख्या व्यासंगी साहित्यिकाने समतोल व विवेचक दृष्टीने लिहिले आहे. या चरित्राचे प्रकाशन दि. २२ एप्रिल, २०१२ रोजी प्रतिष्ठानचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते झाले. प्रकाशन प्रसंगी या ग्रंथाविषयी श्री. अरुण साधु यांनी विवेचन केले.

२.५ **मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या नावाने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक'** : भारताचे भूतपूर्व सरन्यायाधीश मा. न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान पुरस्कृत न्यायमूर्ती वाय. व्ही. चंद्रचूड पारितोषिक' प्रत्येक वर्षी देण्याचे मान्य झाले. त्यानुसार मुंबई विद्यापीठाच्या मार्चच्या एल.एल.एम.च्या अंतिम परीक्षेत विद्यापीठात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांस देण्यात येता. परंतु सन २०१० यावर्षी मुंबई विद्यापीठाने कांही तांत्रिक अडचणीमुळे वरील परीक्षेचा निकाल राखून ठेवल्यामुळे हे पारितोषिक देण्यात आलेले नव्हते. परंतु तो निकाल नंतर प्राप्त झाला. त्यामुळे सन २०१० व सन २०११ या दोन वर्षांची पारितोषिके विद्यापीठाने कळविल्यानुसार अनुक्रमे श्री. झल्मी सुनिल लक्ष्मण ललीता व श्री. वाघ ज्ञानेश्वर रायभान नेहाबाई यांना मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथीदिनी मा. अध्यक्षांच्या हस्ते देण्यात आली. रु.१०,०००/- रोख असे पारितोषिकाचे स्वरुप आहे.

२.६ **मा. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी २०१२ कार्यक्रम / उपक्रम** :- मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त घ्यावयाच्या कार्यक्रमाबाबत प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. श्री. शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १८ सप्टेंबर, २०११ रोजी झालेल्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत व विभागीय केंद्रांचे अध्यक्ष/सचीव यांच्याबरोबर झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा होऊन खालील निर्णय घेण्यात आले. या निर्णयांची कार्यवाही व देखरेख कार्यकारी समितीवर सोपविण्यात आलेली आहे.

जन्मशताब्दी वर्षातील कार्यक्रमांमध्ये साहजिकपणेच मा. यशवंतरावांची कर्मभूमी असलेले कराड हे मुख्य केंद्र राहील. या संदर्भात श्री. श्रीनिवास पाटील, कार्यकारिणी सदस्य यांनी जन्मशताब्दी वर्षात प्रत्येक महिन्यात कोणते कार्यक्रम घ्यावेत याविषयी तपशीलवार सूचना केलेल्या आहेत व त्यांनी सुचविलेल्या कार्यक्रमांना कराड केंद्राच्या समितीने तसेच विश्वस्त मंडळाने तत्त्वतः मान्यता दिलेली आहे. हे कार्यक्रम आयोजित करण्याची व कार्यान्वित करण्याची जबाबदारी श्री. श्रीनिवास पाटील, कार्यकारिणी सदस्य यांचेवर सोपविण्यात आली आहे. हे काम त्यांनी कराड केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. जयंतराव पाटील, ग्रामविकास मंत्री, आणि उपाध्यक्ष व आमदार श्री. बाळासाहेब पाटील, सचिव श्री. मोहनराव डकरे, विभागीय समितीचे इतर सदस्य व कराडमधील कार्यकर्ते यांच्या सहकार्याने पार पाडावयाचे आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक संचालनालयाच्या सहकार्याने महाराष्ट्रातील सर्व महत्त्वाच्या ठिकाणी (मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, अमरावती इ.) नाटय महोत्सव आयोजित करण्याची जबाबदारी विश्वस्त मंडळाच्या बैठकीत मा. कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे.

नवमहाराष्ट्र युवा अभियानाने खालील कार्यक्रमांची जबाबदारी स्वीकारलेली आहे.

अ) **निबंध स्पर्धा** - ही स्पर्धा राज्यस्तरावर घेण्यात येईल.

ब) **वक्तृत्व स्पर्धा** - ही स्पर्धा प्रथम विभागीय स्तरावर व नंतर विभागीय स्तरावरील विजेत्यांमध्ये राज्यस्तरावर घेण्यात येईल.

क) **संगीत स्पर्धा** - ही स्पर्धा प्रथम विभागीय स्तरावर व नंतर राज्यस्तरावर मुंबई येथे घेण्यात येईल.

ड) **ग्रंथ प्रदर्शन** - महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, साहित्य अकादमी, नॅशनल बुक ट्रस्ट वगैरे प्रतिष्ठित संस्थांच्या सहकार्याने ग्रंथ प्रदर्शने महत्त्वाच्या विभागीय केंद्रांमध्ये व राज्यस्तरावर मुंबई येथे भरविण्यात येतील. शक्यतो ही ग्रंथ प्रदर्शने सर्वत्र २५ नोव्हेंबर २०१२ या मा. यशवंतरावांच्या पुण्यतिथीच्या दिवशी आयोजित करण्यात येतील.

इ) शासनाच्या उच्च शिक्षण विभागाच्या सहकार्याने महाविद्यालयांमध्ये परिसंवाद व व्याख्याने त्या त्या विभागात तसेच मुंबई येथे आयोजित करण्यात येतील.

ई) जन्मशताब्दीच्या शुभारंभाचा वार्तापत्राचा विशेषांक १२ मार्च २०१२ रोजी प्रसिध्द करण्यात येईल.

नवमहाराष्ट्र युवा अभियानाने वरील सर्व कार्यक्रम शासनाच्या संबंधित विभागाच्या सहकार्याने व शक्यतो त्या त्या विभागीय केंद्रांशी विचार विनिमय करुन व त्यांच्या सहयोगाने आयोजित करण्याचे ठरले आहे.

विभागीय केंद्राचे अध्यक्ष/सचिव यांच्या सभेत ठरल्याप्रमाणे त्या त्या विभागास अनुरुप असे कार्यक्रम त्या त्या विभागीय केंद्रांनी आयोजित करण्याचे मान्य झाले आहे.

मार्च २०१२ रोजी संसदेत विशेष कार्यक्रम आयोजित करण्याची विनंती मा. अध्यक्षांच्या पत्रान्वये मा. लोकसभा अध्यक्ष व मा. पंतप्रधान यांना करण्यात आलेली आहे.

राज्य शासनाच्या वतीने जन्मशताब्दी वर्षात 'लोकराज्या'चा विशेषांक काढण्याबाबत महाराष्ट्र राज्य शासनाला (माहिती व जनसंपर्क महासंचालनालय) विनंती करण्यात आलेली आहे. त्यानुसार राज्य शासनाने दि. १२ मार्च २०१२ रोजी अतिशय दर्जेदार लोकराज्याचा विशेषांक प्रसिध्द केला आहे.

विधान मंडळाच्या वि. स. पागे अकादमीमार्फत संसदीय लोकशाहीच्या विविध पैलूंवर चर्चा / परिसंवाद आयोजित करणे व पंचायत राज्य व्यवस्थेतील पदाधिका-यांचे / कार्यकर्त्यांचे प्रदर्शन व प्रबोधन करणारे कार्यक्रम आयोजित करणे, याविषयी विनंती करणारे पत्र विधान सभेचे अध्यक्ष मा. श्री. दिलीप वळसे-पाटील, विधान परिषदेचे सभापती मा. श्री. शिवाजीराव देशमुख यांना पाठविण्यात आली.

मा. यशवंतरावांना मरणोत्तर भारतरत्न देण्याविषयीचा प्रस्ताव भारत सरकार व राज्य शासनास मा. अध्यक्षांच्या पत्रान्वये पाठविण्यात आला आहे.

मा. यशवंतरावांचे पत्रकारांशी स्नेहाचे संबंध होते. ते मुख्यमंत्री असतांना व नंतर केंद्रामध्ये वेगवेगळया पदांवर मंत्री म्हणून काम करीत असतांना जे पत्रकार त्यांच्या विशेष संपर्कात आलेले होते अशा पत्रकारांची एक बैठक घ्यावी अशी सूचना करण्यात आली होती. त्यानुसार मुंबई पत्रकार संघाकडून यादी मागविण्यात आली आहे.

वरील निर्णयानुसार खालीलप्रमाणे मा. चव्हाणसाहेबांची जन्मशताब्दी साजरी करण्यात आली.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष दिनांक १२ मार्च २०१२ रोजी सुरु झाले आहे. त्यांचे जन्मशताब्दी वर्ष 'स्मरणीय वर्ष' म्हणून साजरे करण्याचे महाराष्ट्र शासनाने ठरविले आहे. त्यासाठी मा. मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केलेली आहे. मा. चव्हाणसाहेबांच्या जन्मशताब्दीची सुरुवात दि. १२ मार्च २०१२ रोजी भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते गेट वे ऑफ इंडिया, मुंबई येथे झाले. सदर कार्यक्रमात यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे मा. चव्हाणसाहेबांच्या जयंतीदिनी देण्यात येणारा 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०११' मार्शल ऑफ दि इंडियन एअर फोर्स श्री. अर्जन सिंग यांना मा. राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यापूर्वी दि. १२ मार्च २०१२ रोजी दुपारी विश्वस्त / कार्यकारिणी मंडळाच्या बैठकीनंतर मार्शल ऑफ दि

इंडियन एअर फोर्सचे श्री. अर्जन सिंग सायंकाळी ४.३० वाजता चव्हाण केंद्रात आले व त्यांच्या हस्ते मा. यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य व फोटो इंटरनेटवर युनिकोड स्वरुपात उपलब्ध करण्याच्या प्रकल्पाचे उद्‌घाटन करण्यात आले. तसेच प्रतिष्ठानचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते 'सहयाद्रीचे वारे' या पुनर्मुद्रित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमास विश्वस्त मंडळ / कार्यकारिणी मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

२.७ **प्रतिष्ठानच्या कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी स्वतंत्र सेवानियम तयार करण्यासाठी कार्यकारी गटाची नियुक्ती :** दिनांक २०.९.२००८ रोजी झालेल्या प्रतिष्ठानच्या विश्वस्त मंडळाच्या बैठकीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे कर्मचारी व अधिकारी यांचेसाठी स्वतंत्र सेवा नियम तयार करावे व त्यांना प्रतिष्ठानच्या कार्यकारी समितीने अंतिम स्वरुप द्यावे असा ठराव करण्यात आलेला आहे. त्यानुसार प्रतिष्ठानचे कार्यालयीन आदेश क्र.यचप्र/२६/०८/आस्थापना, दिनांक १८.१२.२००८ अन्वये श्री. एम. बी. पवार, सदस्य सचिव, कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम व विधी सल्लागार यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी गटाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. प्रतिष्ठानच्या कर्मचारी व अधिकारी यांचेसाठीचे स्वतंत्र सेवानियम तयार झाले असून ते लवकरच कार्यकारी समितीच्या बैठकीत देण्यात येतील.

## ३. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबईच्या केंद्रात झालेले महत्त्वाचे कार्यक्रम :-

३.१ **मा. चव्हाणसाहेबांची पुण्यतिथि व जयंती :** मा. चव्हाणसाहेबांच्या २७ व्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक २५ नोव्हेंबर २०११ रोजी यशवंतराव चव्हाण केंद्र इमारतीच्या मुख्य सभागृहात झालेल्या कार्यक्रमास प्रतिष्ठानचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री मा. श्री. शरदराव पवार उपस्थित होते. या कार्यक्रमात 'यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता / विज्ञान तंत्रज्ञान राज्यस्तरीय पारितोषिक २०११' मराठी विज्ञान परिषद, मुंबई या संस्थेस प्रदान करण्यात आले व 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार २०११' मार्शल ऑफ दि एअर फोर्स श्री. अर्जन सिंग यांना देण्याचे जाहीर करण्यात आले.

आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्राचे प्रथम मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण यांचा ९९ वा जयंती समारंभ व त्यांच्या जन्मशताब्दीवर्षाच्या शुभारंभाचा गेट वे ऑफ इंडिया येथील कार्यक्रम मा. श्रीमती प्रतिभाताई पाटील, राष्ट्रपती यांच्या उपस्थितीत दि. १२ मार्च २०१२ रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमात मार्शल ऑफ दि एअर फोर्स श्री. अर्जन सिंग यांना यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार मा. राष्ट्रपती श्रीमती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. वरील दोन्ही कार्यक्रमांस प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य तसेच इतर प्रतिष्ठित मान्यवर मोठया प्रमाणावर उपस्थित होते.

## ४. यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक, राष्ट्रीय पुरस्कार व इतर कार्यक्रम :-

४.१ **यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पारितोषिक :** प्रतिष्ठानच्या उद्दिष्टांतील एक भाग म्हणून खालील क्षेत्रात भरीव कार्य करणा-या मान्यवर व्यक्ति वा संस्थेला चक्रीयपध्दतीने पारितोषिक व सन्मानपत्र देण्यात येते.

१) यशवंतराव चव्हाण कृषी औद्योगिक समाजरचना/व्यवस्थापन प्रशासन पारितोषिक
२) यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता/विज्ञान तंत्रज्ञान पारितोषिक
३) यशवंतराव चव्हाण ग्रामीण विकास/आर्थिक-सामाजिक विकास पारितोषिक
४) यशवंतराव चव्हाण मराठी साहित्य संस्कृती/कला व क्रीडा पारितोषिक

२०११ यावर्षाचे पारितोषिक 'यशवंतराव चव्हाण विज्ञान तंत्रज्ञान' या क्षेत्रासाठी होते. गेली अनेक वर्षे विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्रामध्ये मोलाची कामगिरी केलेल्या मराठी विज्ञान परिषद यांना मा. चव्हाणसाहेबांच्या २७ व्या पुण्यतिथिदिनी, २५ नोव्हेंबर २०११ रोजी केंद्रीय कृषीमंत्री व अध्यक्ष मा. श्री. शरदराव पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. २ लाख रुपये रोख व सन्मानपत्र असे या पारितोषिकाचे स्वरुप आहे.

४.२ **यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार** : मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ राष्ट्रीय पातळीवर राष्ट्रीय एकात्मता, लोकशाहीमूल्ये, सामाजिक-आर्थिक विकास या क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट कार्य करणा-या नामवंत व्यक्तीला 'यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार व सन्मानपत्र' देण्यात येते. रक्कम रुपये ५ लाख व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. सुयोग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी मा. न्यायमूर्ती (निवृत्त) श्रीमती सुजाता मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली आहे. या समितीमध्ये (१) मा. श्री. चार्ल्स कुरिआ, प्रख्यात आर्किटेक्ट व राष्ट्रीय नागरी आयोगाचे भूतपूर्व अध्यक्ष, (२) मा. डॉ. आरमायटी देसाई, माजी अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान आयोग, (३) मा. डॉ. रघुनाथ माशेलकर, माजी महानिदेशक वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद, (४) मा. डॉ. रुपा शहा, माजी कुलगुरु, एस.एन.डी.टी. विद्यापीठ (५) मा. डॉ. राजन् एम. वेळुकर, कुलगुरु, मुंबई विद्यापीठ, (६) मा. डॉ. नरेंद्र जाधव, सदस्य, योजना आयोग याचा समावेश आहे.

या निवड समितीच्या शिफारशीनुसार मा. चव्हाणसाहेबांच्या पुण्यतिथी दिनी दि. २५ नोव्हेंबर २०११ मध्ये जाहीर करण्यात आलेला यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार मार्शल ऑफ दि एअर फोर्स श्री. अर्जन सिंग यांना मा. चव्हाणसाहेबांच्या ९९ व्या जयंतीदिनी दिनांक १२ मार्च २०१२ रोजी भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभा पाटील यांच्या हस्ते तसेच प्रतिष्ठानचे विश्वस्त व सदस्य यांच्या प्रमुख उपस्थितीत गेटवे ऑफ इंडिया येथे सन्मानपूर्वक देण्यात आला. सन्मानपत्राचे वाचन श्री. प्रदीप भिडे यांनी केले.

## ५. विशेष कार्यक्रम / उपक्रम :-

५.१ **'यशवंत' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव - दिनांक २० ते २६ जानेवारी २०१२** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई तर्फे प्रत्येक वर्षी दिनांक २० ते २६ जानेवारी या दरम्यान 'यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव' आयोजित करण्याचे ठरले असून त्यानुसार दरवर्षी पुणे येथे होत असलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात जे चित्रपट दाखविले जातात त्यापैकी निवडक चित्रपटांचा यशवंत चित्रपट महोत्सवात समावेश करण्यात येतो. हे निवडक चित्रपट मुंबईतील जनतेला पहावयास मिळावेत या दृष्टीने चव्हाण केंद्रामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे चित्रपट दाखविण्यात आले. या उपक्रमास **'यशवंत' आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव** असे नांव देण्यात आलेले आहे. या चित्रपटांचा लाभ मुंबईतील रसिक प्रेक्षकांनी घेतला.

५.२ **इन्स्टिटयूट फॉर डिफेन्स स्टडीज ॲन्ड ॲनॅलिसेस, नवी दिल्ली यांच्यामार्फत मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान** :- मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांच्या स्मृतिप्रीत्यर्थ इन्स्टिटयूट फॉर डिफेन्स स्टडीज् ॲन्ड ॲनॅलिसेस्, नवी दिल्ली ही संस्था प्रत्येक वर्षी एक व्याख्यान आयोजित करते. विश्वस्त मंडळाने मान्य केल्याप्रमाणे रु.१० लाख इतकी रक्कम इन्स्टिटयूट फॉर डिफेन्स स्टडीज् ॲन्ड ॲनॅलिसेस्, नवी दिल्ली यांना दिलेली असून ती त्या संस्थेने मुदत ठेवीत गुंतवणूक केलेली असून त्यावर मिळणा-या व्याजातून दरवर्षी एका नामवंत व्यक्तीचे भाषण मा. चव्हाणसाहेबांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानमालेच्या अंतर्गत आयोजित करण्याचे ठरले आहे. त्यानुसार गेल्या वर्षी असे पहिले व्याख्यान प्रसिध्द लेखक प्रा. सुनिल खिलनानी यांनी दिले होते. या वर्षीचे व्याख्यान प्रा. कांती वाजपेयी यांनी दिले. या व्याख्यानाला प्रतिष्ठानतर्फे मा. श्री. राम प्रधान, विश्वस्त, मा. श्री. अजित निंबाळकर, विश्वस्त हजर होते. 'भारत चीन

संबंध' हा या वर्षीचा विषय होता. जम्मू काश्मिरचे राज्यपाल व माजी गृह तथा संरक्षण सचिव श्री. एन. एन. व्होरा हे अध्यक्षस्थानी होते. व्याख्यानासाठी अनेक नामवंत अधिकारी व निवृत्त अधिकारी उपस्थित होते.

५.३ **ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा - २०११ :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व फेस्कॉम यांच्या संयुक्त विद्यमाने चव्हाण केंद्राच्या मुख्य सभागृहामध्ये दिनांक २३ ऑक्टोबर २०११ रोजी (सकाळी ९.०० ते दुपारी ३.३० वाजेपर्यंत) कुलाबा ते माहिम व कुलाबा ते सायन या क्षेत्रामध्ये कार्यरत असलेल्या ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभासदांसाठी एका मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. समारंभाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे सरचिटणीस मा. श्री. शरद काळे हे होते. कार्याध्यक्ष मा. श्री. अरुण गुजराथी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अंदाजे ४०० ज्येष्ठ नागरिक समारंभाला उपस्थित होते. समारंभामध्ये खाली दर्शविलेल्या दोन महिला व दोन पुरुष ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार करण्यात आला.

१. श्रीमती मालती वामन घैसास, वय ७९ वर्षे.
२. श्रीमती साधना शरदचंद्र महाद्वार, वय ७१ वर्षे.
३. श्री. रामकृष्ण राजाराम आंबर्डेकर, वय ८१ वर्षे.
४. श्री. विष्णू रामचंद्र मराठे, वय ८६ वर्षे.

या व्यतिरिक्त प्रतिष्ठानने यापूर्वीच्या सत्कारमूर्तिना या मेळाव्यासाठी आमंत्रित केले होते. त्यानुसार पूर्वीचे सत्कारमूर्तीही मेळाव्यास उपस्थित होते.

५.४ **यशवंतराव चव्हाण विशेष युवा क्रीडा पुरस्कार २०११ :** श्री. वीरधवल खाडे यांनी जलतरण क्रीडा स्पर्धेत अभिमानास्पद कामगिरी केल्यान त्यांना या वर्षाचा विशेष पुरस्कार म्हणून रुपये ५१,०००/- सन्मानपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

५.५ **बौध्द धर्माचे व्यासंगी व जागतिक किर्तीचे विद्वान आचार्य धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य प्रतिष्ठानमार्फत इंटरनेटवर उपलब्ध :** आचार्य धर्मानंद कोसंबी यांचे समग्र साहित्य ५५०० पानांचे असून प्रत्येक पान युनिकोड तंत्राने युक्त डिजिटल मजकूराच्या स्वरुपात संकलित करुन इंटरनेटवर dharmanandkosambi.com या स्वतंत्र संकेतस्थळावर प्रतिष्ठानने उपलब्ध करुन दिले आहे. या संकेतस्थळाची मालकी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईची आहे. यासाठी रु.३,७५,०००/- इतका खर्च झाला आहे.

५.६ **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान एम्प्लॉईज को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. ची स्थापना** :- यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान एम्प्लॉईज को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि. ची नोंदणी क्र. एमयुएम/डब्ल्यूबे/आरएसआर/एसआर/४८९/२०११-१२ ने रितसर नोंदणी दि. १३ मे, २०११ नुसार करण्यात आलेली आहे. यामुळे प्रतिष्ठानच्या कर्मचा-यांना त्यांच्या आवश्यक निकडीसाठी कर्ज पुरवठा होत राहणार आहे.

५.७ **यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मंबई निर्मित चार माहितीपटांचे प्रक्षेपण हक्क 'झी मराठी' ला देण्यात आले :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई निर्मित व डॉ. जब्बार पटेल यांनी दिग्दर्शित केलेल्या चार चित्रपटांचे प्रक्षेपणाचे हक्क झी मराठीला देण्याचा निर्णय घेण्यात येऊन त्याप्रमाणे मी एस.एम. : एस. एम. जोशी यांचा जीवनपट, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट, पु.ल. वृत्तांत : पु.ल. देशपांडे यांचा जीवनपट या चार

माहितीपटांचे प्रक्षेपणाचे हक्क झी मराठीला ५ वर्षांसाठी देण्यात आले असून त्याप्रीत्यर्थ प्रत्येकी रु.५ लाख याप्रमाणे रु.२० लाख प्रतिष्ठानला मिळणार आहेत.

५.८ **मा. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी तसेच विभागीय केंद्रामार्फत कार्यक्रम आयोजित करण्यासाठी विशेष अनुदान :-** मा. यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी करण्यासाठी तसेच विभागीय केंद्रामार्फत कार्यक्रम आयोजित करण्यासाठी रु.१,००,०००/- इतके विशेष अनुदान देण्यात आले आहे. हे अनुदान अशा विशेष कार्यक्रमासाठीच देण्यात आले असून मार्च २०१३ अखेर प्रत्येक विभागीय केंद्राने तशा स्वरुपाचे उपयोगिता प्रमाणपत्र द्यावयाचे ठरले आहे.

५.९ **मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात मराठी विज्ञान परिषदेतर्फे 'संरक्षण' या विषयावर महाराष्ट्रात ११ ठिकाणी भाषणे व प्रदर्शन भरविण्यास आर्थिक मदत :-** मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात मराठी विज्ञान परिषदेतर्फे 'संरक्षण' या विषयावर महाराष्ट्रातील ११ ठिकाणी भाषणे व संरक्षण खात्यामार्फत छायाचित्रांचे प्रदर्शन भरविण्यास प्रतिष्ठानने आर्थिक अनुदान देण्याचे मान्य केले आहे, त्याची सुरुवात लवकरच करण्यात येत आहे.

५.१० **मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर यांना श्रीमती शांता शेळके पुरस्कारासाठी आर्थिक अनुदान** :- मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर यांना श्रीमती शांता शेळके पुरस्कारासाठी आर्थिक अनुदान म्हणून रु.५०,०००/- देण्यात आले.

५.११ **डॉ. श्री. व्यं. केतकरांचे 'महाराष्ट्रीय मराठी ज्ञानकोश' इंटरनेटवर उपलब्ध** :- डॉ. श्री. व्यं. केतकरांचा 'महाराष्ट्रीय मराठी ज्ञानकोश' एकूण २३ खंडांचा असून त्याची एकूण पाने १२५०० आहेत. त्यांचे हे साहित्य दुर्मिळ व ज्ञान हया निकषांवर आजही अत्यंत उपयुक्त आहे. ही वैशिष्टयपूर्ण पार्श्वभूमी असलेले डॉ. केतकरांचे खंड इंटरनेटवर युनिकोड स्वरुपात उपलब्ध करण्यात आले आहे. डॉ. श्री. व्यं. केतकरांचा 'महाराष्ट्रीय मराठी ज्ञानकोश' याची एकूण पाने सुमारे १२५०० हे युनिकोड तंत्राने युक्त अशा डिजिटल मजकूराच्या स्वरुपात संकलित करुन इंटरनेटवर www.ketkardnyankosh.com हया स्वतंत्र संकेतस्थळावर उपलब्ध केली आहेत. संपूर्ण भारतासह जगाला संदर्भासाठी इंटरनेटवर ते सहज व सतत उपलब्ध होत राहील याची सुविधा आहे. यासाठी एकूण खर्च रु.१२,००,०००/- ( रुपये बारा लाख मात्र) इतका झाला आहे. या संकेतस्थळाची तसेच त्यातील सर्व सामग्रीची संपूर्ण मालकी व अधिकार तसेच भविष्यकाळातील वरील संकेतस्थळासंबंधीचे सर्व निर्णय घेण्याचे अधिकार यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे आहेत.

५.१२ **मा. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षात प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्रामध्ये दि. १ मे १९६० च्या रेखाचित्राचे प्रदर्शन** :- मा. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षात प्रतिष्ठानच्या सर्व विभागीय केंद्रांमध्ये दि. १२ मार्च २०१२ रोजी श्री. आचरेकर यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनादिनी दि. १ मे, १९६० रोजी काढलेल्या रेखाचित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले. तसेच प्रतिष्ठानच्या प्रत्येक विभागीय केंद्राना २८ रेखाचित्रांचा संच प्रतिष्ठानने तयार करुन दिलेला आहे. विभागीय केंद्रामार्फतही प्रदर्शने भरविण्यात येत आहेत.

५.१३ **मा. यशवंतराव चव्हाण यांचे साहित्य व भाषणे इंटरनेटवर www.ybchavan.in या संकेतस्थळावर युनिकोड स्वरुपात उपलब्ध** : मा. यशवंतराव चव्हाण यांनी लिहिलेली तसेच त्यांच्यावर इतरांनी लिहिलेली पुस्तके व त्यांची भाषणे यांचा संग्रह www.ybchavan.in या संकेतस्थळावर युनिकोड स्वरुपात उपलब्ध करुन ते साहित्य यशवंतराव चव्हाण

यांच्या जन्मशताब्दी वर्षात कायम स्वरुपी जगासाठी उपलब्ध करण्यात आलेले आहे. यामध्ये खालील पुस्तकांचा समावेश आहे.

| अ.क्र. | पुस्तकांची नांवे | लेखक | एकूण पाने |
|---|---|---|---|
| १ | यशवंतराव चव्हाण विविधांगी व्यक्तिमत्व | वि. वि. पाटील | १७८ |
| २ | यशवंतराव चव्हाण : समग्र साहित्य सूची | वि. वि. पाटील | १०० |
| ३ | शब्दांचे सामर्थ्य | राम प्रधान | ४५६ |
| ४ | यशवंतराव चव्हाण (विधी मंडळातील निवडक भाषणे १९४६ ते १९६२) | यशवंतराव चव्हाण | ३७० |
| | | **एकूण पाने** | **११०४** |

त्याशिवाय खालीलप्रमाणे इंग्रजी पुस्तके

English Books

| Sr.No. | Books | Pages |
|---|---|---|
| 1 | Selected speeches in the state Legistatures (1946-62) - Dr. V. G. Khobrekar | 472 |
| 2 | Y. B. Chavan Selected Speeches in Parliament (Part I) - R. D. Pradhan | 317 |
| 3 | Y. B. Chavan Selected Speeches in Parliament (Part II) - R. D. Pradhan | 290 |
| 4 | Y. B. Chavan Selected Speeches in Parliament (Part III) - R. D. Pradhan | 298 |
| 5 | Y. B. Chavan Selected Speeches in Parliament (Part IV) - R. D. Pradhan | 316 |
| | **Total Number of Pages** | 1693 |

वरील मराठी व इंग्रजी अशी एकूण २७९७ पाने वरील संकेतस्थळावर जगातील वाचक, अभ्यासक व संशोधनासाठी कायम स्वरुपी उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे मा. चव्हाणसाहेबांच्या कार्य-कर्तृत्वाशी संबंधित विविध कार्यक्रम व अनेक प्रसंगाची छायाचित्रे उपलब्ध आहेत. त्यातील निवडक ५०० छायाचित्रे संकेतस्थळावर एका स्वतंत्र विभागात उपलब्ध करण्यात आलेली आहेत. डिजिटल युनिकोड स्वरुपातील हे मराठी व इंग्रजी साहित्य तसेच छायाचित्रे Google Search च्या पध्दतीने जगात कुठेही संदर्भ शोधासाठी Search या प्रकल्पामुळे उपलब्ध होऊन कोणालाही या मजकूराचा वापर कट-पेस्ट तंत्राने करता येईल.

## ६. यशवंतराव चव्हाण माहिती व तंत्रज्ञान प्रबोधिनी :-

6.1 General : During the year, YCP's AIT conducted several courses. Though the emphasis was on the Post Graduate Diploma In Advanced Computing (PG DAC) Course, YCP's AIT offereod several courses specially designed and developed to meet the needs of students in an emerging and fast progressing IT industry.

6.2 Training : YCP's AIT conducted following courses during the Training Year 2011-12.

a) C-DAC Course : 12

b) Special Courses : 21

c) Corporate Training : 09

6.3 Vacation Batches :s

1) Special Vacation batches for S.S.C. and H.S.C. appeared students were conducted for Basic Computers, which included Office Automation Tools and Internet.

2) Another course called Multimedia Creations was conducted for S.S.C. and H.S.C. appeared students, which included Graphics, Integration of Text and Graphs and Web designing.
3) Special Vacation Batches for Kids for Basic computers and Multimedia Creations were conducted.
4) As per the students request we conducted Crash Course for Photoshop as well as Flash.
5) Special training for Senior Citizens was also conducted for Basic Computing and Internet.
6) Certificate Course in Computer Operations was specially conducted for Mahila Vyaspeeth.

Guest Lectures were organized by YCP's AIT for DAC students :

1) A guest lecture by Mr. Amit Bhavar from ICERTIS solutions was organized for DAC students.
2) Deepali Chavan from Onmobile solutions with her two colleagues guide and counselled our DAC students.
3) YCP's AIT continued to provide training to staff and senior level Executive of Corporate houses. Some of the clients who availed of these facilities are :
   a) MSSC – Examination
   b) ESIC – Examination
   c) SIB – Training
   d) Mercator Ltd – Training
   e) CQAE - Training

6.4 Special Concessions :

1) Special concessions are available at YCP's AIT for deserving students from weaker economic strata.
2) Concessions are also available for senior citizens and disable persons.
3) For our Armed Forces personnel and dependents, as a token of appreciation for their devotion to duty and sacrifices, we provide training at special concessional rates.
4) Some deserving candidates are also given the facility of paying fees in installments.
5) Police personnel and their families are also being given specialized training as per their requirements.

6.5 Free Workshop :

1) Free workshop for Common Entrance TEst and stage II & III Training was conducted for PG DAC February 2012 batch.

6.6 Spreading Awareness :

YCP's AIT participated in seminar and Career Fairs :

1) Mumbai Education Festival : YCP's AIT participated in Mumbai Education Festival at Ravindra Natya Mandir, Prabhadevi, organized by Nationalist Students Congress. We got good response. We even marketed the Masters Program. Some asked for the basic courses. Our brand image was displayed effectively.

6.7 Visit to colleges in Mumbai :

1) Visits and presentation were organized at S.N.D.T. College, M.D. College, Dnyansadhana College, Mutha College, Saket College, Siddharth College and Thane College.

<u>Placements</u> :

1) Post Graduate Diploma In Advanced Computing (PG-DAC) course students were given ample opporotunity for interviews with prominent Recruiters. Some are listed below.

| | |
|---|---|
| • Cybage Software Ltd.<br>• HDFC Bank<br>• Financial Technologies (India) Ltd<br>• Capgemini India<br>• Aloha Technologies Pvt. Ltd. | • House of Code<br>• Godrej Info Tech<br>• Onmlobile<br>• 3i Info Tech<br>• Cognizant<br>• Smart Stream |

YCP's AIT's introducing a New Course "Certificate Course In Computerized Accounts (C3A)" in month of July 2012.

## ७. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सहकार्याने कार्यरत असलेले इतर कार्यक्रम/उपक्रम :-

७.१ **प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम** : मुंबईत शहरात झोपडपट्टीवासियांच्या मुलांना शिक्षणाची गोडी लागावी म्हणून बालवाडया चालविणे, संगणकांचे प्रशिक्षण देणे, झोपडपट्टीतील स्थानिक रहिवाशांमधून उपक्रमाकरिता शिक्षक - शिक्षिका तयार करणे इत्यादी महत्वपूर्ण कामे प्रथम - मुंबई शिक्षण उपक्रम मार्फत डॉ. माधव चव्हाण व श्रीमती फरिदा लांबे यांच्या मार्गदर्शनाखाली मोठया प्रमाणावर केली जातात. संस्थेच्या उपक्रमास प्रतिष्ठानकडून सहकार्य करण्यात येते. या संस्थेस प्रतिष्ठानने केंद्र इमारतीच्या चौथ्या मजल्यावर जागा दिली आहे.

७.२ **युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स** : युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या भारतीय विभागाचे सहकार्य प्रतिष्ठानच्या उपक्रमांना लाभत असून महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग व सहकार या सामाजिक क्षेत्रांच्या भरीव वृध्दीसाठी ते फार महत्वाचे आहे. युरोपियन युनियन चेंबर ऑफ कॉमर्स इन इंडियाद्वारे निरनिराळया क्षेत्रात प्रकल्प उभारण्यासाठी आर्थिक मदत कशी उपलब्ध करुन घेता येईल याची माहिती प्रसिध्द केली जाते. या संस्थेस प्रतिष्ठानने केंद्र इमारतीच्या तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

७.३ **महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ** : महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ या संस्थेची स्थापना प्रसिध्द अर्थशास्त्रज्ञ कै. डॉ. धनंजयराव गाडगीळ यांनी सन १९५७ मध्ये केली. ही संस्था महाराष्ट्राचा आर्थिक व औद्योगिक विकास वेगाने आणि संतुलितपणे होण्यासाठी संशोधनाचे कार्य करते. महाराष्ट्रामध्ये उद्योग सुरु करण्यासाठी इच्छुक असणा-या उद्योजकांना सांख्यिकीय माहिती पुरविणे, योग्य निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाच्या धोरणात्मक निर्णयांची माहिती देणे, चिकित्सक पध्दतीने अधिकृत आकडेवारी पुरविणे तसेच महाराष्ट्रात उपलब्ध असलेल्या उद्योगसंधीविषयी माहिती देण्याचे काम ही संस्था करते. संस्थेतर्फे उद्योजकांसाठी परिसंवाद, परिषदा व कार्यशाळा आयोजित केल्या जातात. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व सदरची संस्था परस्पर सहकार्याने काम करतात. या उपक्रमासाठी महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावरील जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

७.४ **बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन (बॉम्बे फर्स्ट) :** बॉम्बे फर्स्ट ही संस्था बॉम्बे चेंबर ऑफ कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रिज आणि बॉम्बे सिटी पॉलिसी रिसर्च फाउंडेशन या संस्थांच्या पुढाकाराने व औद्योगिक / वाणिज्य क्षेत्रातील अनेक आस्थापनांच्या आर्थिक पाठबळावर १९९५ मध्ये अस्तित्वात आली. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट मुंबई शहरातील वाढत्या लोकसंख्येचे आव्हान स्वीकारुन येथील पायाभूत सुविधामध्ये विकास करुन नागरिकांच्या राहणीमानाची पातळी उंचावणे, काम करण्याच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे आणि भांडवली गुंतवणूकदारांना आकर्षित करणे हे आहे. मुंबई शहराच्या विविध प्रश्नांवर विचार करण्यासाठी शासन, महानगरपालिका व इतर स्वयंसेवी संस्था यांचे समन्वयक म्हणून ही संस्था कार्य करते. संस्थेचा वाढता व्याप लक्षांत घेऊन प्रतिष्ठानने या संस्थेला केंद्र इमारतीतील तिस-या मजल्यावर जागा दिली आहे.

## ८. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई मार्फत देण्यात आलेले अनुदान :-

८.१ **सेंटर फॉर इंटरनॅशनल स्ट्रॅटेजिक ॲन्ड डेव्हलपमेंट स्टडीज, पुणे :-** या संस्थेने 'सेक्युलेरिझम इन इंडिया : मिनींग ॲन्ड प्रॅक्टीस' या विषयावर संमेलन दिनांक १४ मे, २०१० रोजी आयोजित केले होते. त्यानंतर त्यांनी दि. १३ जानेवारी २०११ मध्ये 'पॉवर्टी ॲलिव्हीएशन इन इंडिया' या विषयावर संमेलन घेतले. संस्थेच्या वरील कामाचा विचार करुन यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने रुपये २७,०००/- इतके अनुदान दिले आहे.

८.२ **प्राज्ञ पाठशाळा, वाई, जिल्हा सातारा :-** 'साहित्याचे तर्कशास्त्र' या मा. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या साहित्यविषयक लेख व भाषणांच्या संपादित ग्रंथात प्रकाशनास प्राज्ञ पाठशाळा, वाई यांना रु. ८८,०००/- देणगी देण्यात आली. प्रतिष्ठानच्या आर्थिक सहाय्याने छापल्याचा ठळक उल्लेख ग्रंथात केला असून ग्रंथाच्या ३० प्रती विनामूल्य प्रतिष्ठानला पाठविण्यात आल्या आहेत.

८.३ **सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली :-** सार्वजनिक उत्सव समिती, नवी दिल्ली ही संस्था मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रत्येक वर्षी नवी दिल्ली येथे यशवंतराव चव्हाण स्मृती समारोह कार्यक्रम आयोजित करीत आहे. यावर्षी त्यांनी दिनांक २५ नोव्हेंबर २०११ ते २७ नोव्हेंबर २०११ पर्यंत व्याख्याने, परिसंवाद व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमासाठी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे रुपये ६०,०००/- इतकी आर्थिक मदत केली आहे.

८.४ **इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई शाखा :-** इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, मुंबई शाखा यांच्यामार्फत दरवर्षी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यान आयोजित केले जाते. यावर्षी प्रतिष्ठानचे विश्वस्त मा. श्री. राम प्रधान यांचे 'पॉलीटिक्स ऑफ गव्हर्नन्स' या विषयावर चव्हाण सेंटरमध्ये व्याख्यान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमास महाराष्ट्र शासनातील उच्च अधिकारी तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी उपस्थित होते. यासाठी प्रतिष्ठानने वरील संस्थेस रुपये १५,०००/- आर्थिक सहाय्य दिले.

## ९. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या विभागांमार्फत झालेले कार्यक्रम / उपक्रम :-

९.१ **कृषी व सहकार व्यासपीठ पुणे :-** कृषी व सहकार व्यासपीठाचे कामकाज पुणे केंद्राचे अध्यक्ष मा. श्री. अजित निंबाळकर, माजी मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे मार्गदर्शनाखाली चालते. जरुरीनुसार पुणे केंद्राचे सचिव श्री. अंकुशराव काकडे,

मा. श्री. मोहन धारिया आणि डॉ. भागवतराव पवार यांचेही मार्गदर्शन याकामी घेतले जाते. व्यासपीठाचे दैनंदिन कामकाज श्री. शं. त्रि. भिडे व श्री. मो. प्र. परळीकर हे पहातात. त्यांना श्री. सुनिल कदम आणि श्री. रवि सरनाईक यांचे या कामात सहाय्य मिळते.

१.१ **राष्ट्रीय सहकार समिक्षा परिषद :-** दि. ८.४.२०११ रोजी वैकुंठ मेहता नॅशनल इन्स्टियटयूट फॉर को. ऑपरेटीव्ह मॅनेजमेंट, पुणे व कृषि व सहकार व्यासपीठ यांचे संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सहकार समिक्षा परिषदेचे आयोजन पुणे येथील वैकुंठ मेहता इन्स्टियटयूटच्या ज्युबिली सभागृहात करण्यात आले. उद्घाटन सभेचे अध्यक्षस्थान केंद्र शासनाच्या उच्चाधिकार समितीचे अध्यक्ष श्री. शिवाजीराव पाटील यांनी भूषविले. बीजभाषण डॉ. पद्माकर दुभाषी यांनी दिले. स्वागत वैकुंठ मेहता इन्स्टियटयूटचे डायरेक्टर श्री. गद्रे यांनी केले तर श्री. अंकुशराव काकडे यांनी आभार प्रदर्शन केले. चर्चासत्रात प्रो. नीलकंठ रथ, अध्यक्ष, इंडियन स्कूल ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी, श्रीमती लीला व्ही. प्रसाद, माजी मंत्री कर्नाटक व डॉ. जुगळे, माजी विभाग प्रमुख अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी आपले शोधनिबंध प्रसिध्द केले. त्याशिवाय अनेक विद्वानांचे २५ वर प्रबंध या परिषदेत सादर करण्यात आले. परिषदेचे आयोजक म्हणून प्रतिष्ठानतर्फे श्री. भिडे आणि वैकुंठ मेहता इन्स्टियटयूटतर्फे डॉ. मेधा दुभाषी यांनी काम पाहिले. समारोपाचे अध्यक्ष म्हणून प्रा. राम ताकवले यांनी आपले उद्बोधक भाषण केले. श्री. पंडीत यांनी आभार प्रदर्शन केले.

१.२ **सहकार कायदा दुरुस्ती :-** महाराष्ट्र शासनाने सहकारी संस्था कायद्यात तज्ज्ञ समितीची नेमणूक केली होती. त्यामध्ये कृषि व सहकार व्यासपीठाचे संयोजक श्री. शं. त्रि. भिडे यांचा समावेश होता. श्री. भिडे यांनी सदर समितीच्या सर्व सभांस हजर राहून सहभाग घेतला. सदर समितीच्या शिफारसीनुसार बिगरशेती सहकारी पतसंस्थांसाठी सहकार कायद्यात स्वतंत्र प्रकरण समाविष्ट करणेसबंधी सुचविलेली दुरुस्ती विधीमंडळात पाठवून मा. राष्ट्रपतीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आली आहे. दि. १०, ११ व १२ मे २०११ रोजी दै. अॅग्रोवनमध्ये कृषि व सहकार व्यासपीठाचे संयोजक यांचे महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा दुरुस्ती विधेयक या विषयावर सलग तीन लेख प्रसिध्द करणेत आले होते. त्याचप्रमाणे श्री. भिडे यांचे लेख सहकारी विदर्भ सहकारी महाराष्ट्र को.ऑपरेटीव्ह क्रेडीट न्यूज इत्यादी मासिकात प्रसिध्द करण्यात आले.

१.३ **मा. बापूसाहेब खैरे यांना श्रध्दांजली :-** कृषि व सहकार व्यासपीठाचे संस्थापक व सन २०१० अखेरपर्यंत व्यासपीठास वेळोवेळी मार्गदर्शन करुन व्यासपीठाचे कामामध्ये तळमळीने भाग घेणारे पुरंदरचे माजी आमदार मा. बापूसाहेब खैरे यांचे अल्पशा आजाराने व वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. व्यासपीठात दि. १७.५.२०११ रोजी झालेल्या चर्चासत्रात दोन मिनिटे स्तब्ध राहून त्यांच्या कार्याचा गौरव करणेत आला व श्रध्दांजली वाहण्यात आली.

१.४ **नागरी सहकारी बँका - आदर्श उपविधी :-** मा. सहकार आयुक्तांनी नागरी सहकारी बँकांसाठी आदर्श उपविधी शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली आहे. त्यावर दि. २८.५.२०११ रोजी कृषि व सहकार व्यासपीठामध्ये एक चर्चासत्र आयोजित केले. त्यानंतर सर्वश्री शं. त्रिं. भिडे, पी. बी. कोकरे, व्ही. जी. वर्तक, शरद भिडे, जी. एच. उमर्जी यांची एक उपसमिती स्थापन करणेत आली. सदर समितीने जुन्या व सुधारित उपविधीवर चर्चा करुन सखोल अभ्यास करुन श्री. अंकुशराव काकडे यांचे दि. २९.६.२०११ चे पत्राने एक अहवाल सहकार आयुक्त श्री. मधुकरराव चौधरी (भा.प्र.से.) यांना सादर करणेत आला आहे.

१.५ **सहकार संस्थांतील क्रियाशील सभासदत्व :-** सहकारी संस्था सभासदांनी संस्था उपलब्ध करुन देत असलेल्या सेवांचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेणे व संस्थेचे कामकाजात सहभाग घेणे अपेक्षित आहे. अशाच सभासदांना सभासदत्वाचे हक्क असावेत अशी शिफारस केंद्र शासनाचे उच्चाधिकार समितीने केली आहे. दि. १२.७.२०११ चे सहकार कायदा तज्ञ समिती सभेपूर्वी याबाबत विद्या सहकारी आयुक्तांना भेटले. श्री. अनास्कर यांनी सहकारी संस्थांतील क्रियाशील सभासदत्वाचा मुद्दा चर्चेसाठी उपस्थित करुन आपल्या बँकेचे उपविधीत तशी सुधारणा करण्याचे व त्यास खात्याची मंजुरी असावी अशी विनंती केली. उपविधीत कशाप्रकारे दुरुस्ती करावी याबाबत श्री. भिडे यांनी ॲडव्होकेट कानेटकरांशी चर्चा करुन दुरुस्तीचा तर्जूमा विद्या सहकारी बँकेच्या अध्यक्षांना दिला. त्यानंतर या विषयावर व्यासपीठातर्फे दि. १५.७.२०११ रोजी श्री. अंकुशराव काकडे यांचे सहीने एक सविस्तर टिपण मा. सहकार आयुक्तांना सादर करणेत आले.

१.६ **उपग्रह प्रतिमेवर आधारित पीक विमा योजना :-** पीक विमा योजना जास्त विश्वासार्हपणे कार्यान्वित करता यावी या दृष्टीकोनातून मा. संचालक, सुदूर संवेदन उपग्रह (प्रतिमा) यंत्रणा नागपूर यांचेशी पत्रव्यवहाराचा पाठपुरावा करण्यात आला आहे. (२५.७.२०११) याबाबत कृषि खाते, महाराष्ट्र शासन यांचेतर्फे क्रॉप कटींग एक्स्पेरीमेंटस् करतांना संबंधित कर्मचा-यांतर्फे मोबाईलने पीक कापणीचे फोटो घेण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. तसेच इस्त्रोने संशोधनावर आधारित केंद्राने याबाबत पीक पेरा अदाय या तंत्रज्ञानावर आधारित घेण्याची यंत्रणाही कार्यान्वित केल्याचे समजते.

१.७ **नाममात्र सभासदत्व :-** क्रियाशील सभासदत्वाचे पार्श्वभूमीवर नाममात्र सभासदत्वाचे इतिहास व औचित्याविषयी कांही प्रश्न उपस्थित झाले. महाराष्ट्र शासनाने विधीमंडळाच्या स्टॅन्डींग कमिटी (सहकार) मध्ये विगर शेती सहकारी पतसंस्थांचेसाठी सहकार कायद्यातील दुरुस्त्यांबाबतचे चर्चेचे वेळी त्याबाबत विचारणा झाली होती. श्री. ओऊळकर विशेष निबंधक व अतिरिक्त आयुक्त (सहकार) यांनी व्यासपीठाचे संयोजक यांचेशी यावर चर्चा केली. सदर चर्चेचे अनुषंगाने प्रो. नाडकर्णी यांचेशी संपर्क साधून या विषयावर एक सविस्तर टिपण दि. १६.८.२०११ रोजी अतिरिक्त आयुक्त यांना पाठविण्यात आले आहे.

१.८ **बिगर कृषी सहकारी पतसंस्थांसाठी नियमात सुधारणा :-** दि. २०.८.२०११ रोजी शासनाच्या सहकार कायदा तज्ञ समितीची बैठक सहकार आयुक्तांचे कार्यालयात भरली होती. त्यामध्ये बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्थांसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यात जे खास प्रकरण समाविष्ट करण्याचे बील पास करण्यात आले त्यातील कलमखाली नियम करण्याचा विचार झाला. त्यासाठी व्यासपीठाच्यावतीने एक खास टिपण करुन सर्वांना देण्यात आले. त्यावर चर्चा होऊन त्यामध्ये समिती सदस्य ॲडव्होकेट कानेटकर आणि तज्ञ समिती अध्यक्ष सहकार आयुक्त यांनी सुचविलेल्या दोन दुरुस्त्यांसह प्रतिष्ठानचे टिपणातील सुचविलेल्या नियमांना सहमती दर्शविणेत आली.

१.९ **ऊस संशोधन :-** दि. १०.९.२०११ चे बळीराजा मासिकाचे सभेमध्ये वसंतदादा शुगर इन्स्टियटयूटचे सायंटिफीक अधिकारी श्री. सुनिल दळवी यांच्या व्याख्यानामध्ये ऊस शेतीबाबत विवरण करण्यात आले. त्यावेळी झालेल्या चर्चेचे अनुषंगाने ऊस संशोधनाबाबत एक सविस्तर टिपण व्यासपीठाचे संयोजक यांनी तयार करुन ते व्यासपीठाचे अध्यक्षांचे मान्यतेने श्री. शिवाजीराव देशमुख, सरसंचालक, वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, मांजरी बुद्रूक यांना पाठविण्यात आले.

१.१० **कृषी पर्यटन परिषद (पळशीवाडी) बारामती :-** दि. २७.९.२०११ रोजी श्री. पांडुरंग तावरे कृषी पर्यटन विकास संस्था बारामती यांचेतर्फे महाराष्ट्र शासनाकडे कृषी पर्यटनाला चालना देण्यासाठी करावयाच्या मागण्यासंबंधाने सविस्तर चर्चा करण्यात आली. परिषदेला अंदाजे २०० हून जास्त सदस्य हजर होते. त्यात कांही सदस्य गोवा व कर्नाटक राज्यातूनही उपस्थित होते. परिषदेत समारोपाचे भाषण व्यासपीठाच्या संयोजकांनी दिले.

१.११ **लोकपाल आणि जनलोकपाल बील** :- सोमवार दि. २९.८.२०११ रोजी या विषयावर एक चर्चासत्र आयोजण्यात आले होते. त्यासाठी केंद्र शासनाचे पर्सोनेल पब्लिक ग्रीव्हन्सीस व पेन्शन्स मंत्रालयाने दि. ३१.५.२०११ रोजी प्रसिध्द केलेले व इंटरनेटवर उपलब्ध असलेले निवेदन चर्चेसाठी उपलब्ध करण्यात आले होते. त्याशिवाय इंडिया अगेन्स्ट करप्शन यांच्या वेबसाईटवरुन लोकपाल आणि जनलोकपाल या कायद्यांचा मसुदा तपासून व्यासपीठामध्ये या विषयावर झालेल्या चर्चेचे अनुषंगाने दि. ३०.८.२०११ रोजी एक अहवाल तयार करुन तो मा. डॉ. अभिषेक मनू सिंघवी अध्यक्ष पार्लमेंटरी स्टॅन्डींग कमिटी यांना सादर करण्यात आला. सदर कमिटीचेवतीने आपल्या सूचनांचा योग्य तो विचार केला जाईल अशा आशयाचे पत्र राज्यसभा सेक्रेटरिएटचे असिस्टंट डायरेक्टर यांचेकडून त्यांचे पत्र क्र.आर.एस. ६.२.२०११ पी. ॲन्ड एल. दि. २९.९.२०११ ने कळविणेत आले आहे.

१.१२ **हौसिंग सोसायटीजसाठी मॅन्युअल** :- मा. सहार आयुक्तांचे सूचनेनुसार संयोजक कृषि व सहकार व्यासपीठ यांनी हौसिंग सोसायटीचे मॅन्युअलचे सभेस उपस्थित राहून अनेक सूचना केल्या आहेत. गृहनिर्माण संस्थांचे लेखापरिक्षण, सदर संस्थांचे हिशोब वेळेवर न लिहिल्यामुळे होत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे ऑडिटरचे पॅनेलप्रमाणेच गृहनिर्माण संस्थांचे हिशोब लिहिण्यासाठी हिशोब लेखनिकांचे पॅनेल तयार करण्याबाबत प्रा. राम ताकवले यांचेशी चर्चा करुन सहकार आयुक्तांना प्रस्ताव सादर केला आहे.

१.१३ **डीम्ड कन्व्हेअन्स अर्थात एकतर्फी हस्तांतरण** :- मालक / बिल्डर / डेव्हलपर्स यांनी महाराष्ट्र ओनरशिप ॲक्टनुसार गृहनिर्माण सहकारी संस्था नोंदवून अगर अपार्टमेंटचे डिक्लरेशन करुन, गाळे खरेदीदारांचे या संस्थांकडे जमिनीचे हस्तांतरण करणे कायदेशीररित्या बंधनकारक होते. या कायदेशीर तरतुदीकडे दुर्लक्ष करुन, जमिनीवरील वाढीव एफ.एस.आय. अगर गाळा हस्तांतरणाचे वेळी हस्तांतरण शुल्क यांचा फायदा बिल्डर्स / डेव्हलपर्स घेत. शासनाने याबाबतीत लक्ष घालून जमीन व अन्य मालमत्तेचे हस्तांतरणासाठी एकतर्फी हस्तांतरणाचे अधिकार गेल्या चार वर्षाचे पाठयपुराव्यानंतर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांना दिले आहेत. संबंधित संस्थांचे वैधानिक ऑडिटचे वेळी हया बाबीवर फक्त शेरे मारण्याऐवजी यासंबंधीची दोष दुरुस्तीची पूर्तता वैधानिक ऑडिटर्सनी करुन घेण्याचे अधिकार त्यांना देण्यात यावेत व त्यासाठी त्यांना जादा मेहेनतानाही द्यावा. जेणेकरुन या कारवाईस गती मिळेल असा प्रस्ताव प्रतिष्ठानने दि. १०.१०.२०११ चे श्री. अंकुशराव काकडे यांचे पत्राने मा. सहकार आयुक्तांना सादर केला आहे.

१.१४ **निवृत्त सहकारी सेवक संमेलन** :- पुणे केंद्राचे अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर यांचे हस्त सहकार खात्याचे ऑडिटर्स पॅनलवरील ५ लेखा परिक्षकांना एकतर्फी हस्तांतरीत संबंधाचे शासनमान्य तक्त्यांचे संच सहकार खाते निवृत्त सेवकांचे १६ व्या वार्षिक अधिवेशनात दि. ११.१०.२०११ रोजी वाटप करण्यात आले. संमेलनातील अध्यक्षपदावरुन अधिवेशनातील सदस्यांना संबोधताना श्री. निंबाळकर यांनी कृषि व सहकार व्यासपीठाचे कार्यक्रमात सदस्यांनी आपला सहभाग द्यावा, त्यांना कांही सूचना करावयाच्या असल्यास व्यासपीठाकडे त्या जरुर कराव्यात, त्या सूचनांचा सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल असे आपल्या भाषणात विशद केले.

१.१५ **पुणे सायन्स फिल्मोत्सव** :- इ. ८ वी व त्यापुढील शास्त्रविषयाचे विद्यार्थी, त्यांचे शिक्षक, पालक यांचेसाठी विज्ञानप्रसार संस्था, नवी दिल्ली (इंडियन इन्स्टिटयूट ऑफ सायन्स एज्युकेशन ॲन्ड रिसर्च, नॅशनल फिल्म अर्काईव्हज् ऑफ इंडिया, पुणे, विश्व सायंटिफीक पुणे यांचेतर्फे विज्ञान प्रसारासाठी शास्त्रीय विषयावरील डॉक्युमेंटरिज्चे स्क्रिनिंग दि. २० ते २२ जानेवारी २०१२ या दरम्यान नॅशनल फिल्म अर्काईव्हजचे प्रेक्षागृहात करण्यात आले होते. याचा फायदा महानगरपालिका संचालित माध्यमिक शाळांना

व्हावा या हेतूने शिक्षण मंडळ, पुणे महानगरपालिका यांचेशी संपर्क साधून २५ शाळा, प्रशाळा, विद्यानिकेतने यांची यादी सदर ऑफीसकडून घेऊन या केंद्राचे योजनेचा जास्तीत जास्त फायदा महानगरपालिकेच्या शाळांचे विद्यार्थी, शिक्षक व पालक यांना घेण्यासाठी संबंधित मुख्याध्यापकांशी पत्रव्यवहार करण्यात आला. या कार्यक्रमाचे पासेस मिळवून ते कांही प्रशाळा व विद्यानिकेतन यांना वाटण्यात आले. संयोजक श्री. मोरेश्वर परळीकर यांनी या निमित्ताने IISER, IMD, C-MET या संस्थांना भेटी देऊन त्यांचे कामकाजाची माहिती करुन घेतली. सौ. सावित्रीबाई फुले प्रशाळा, भवानी पेठ, पुणे आणि मौलाना मोहम्मद अली जोहर उर्दू माध्यमिक विद्यानिकेतन, रविवार पेठ, पुणे यांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांचेशी सदर कार्यक्रमाबाबत चर्चा करुन माहिती घेणेत आली. त्यास अनुसरुन अशा प्रकारचे शास्त्रीय विषयांचे फिल्मोत्सव महानगरपालिकेच्या प्रशाला विद्यानिकेत येथे घेण्याबाबतची सूचना आलेली आहे. त्यास अनुसरुन शिक्षणाधिकारी, पुणे महानगरपालिका तसेच इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशन, विज्ञान प्रसार, नवी दिल्ली इ. संस्थांशी संपर्क साधून मान. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्षात शाळांचे मागणीस अनुसरुन फिल्मोत्सवाचे कार्यक्रम आयोजनासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

१.१६ **जलसाक्षरता व अन्य उपक्रम** :- ज्येष्ठ जलतज्ञ डॉ. चितळे यांचे सहकारी व औरंगाबादच्या बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. दत्ता देशकर यांचे सहकार्याने जलसाक्षरता संबंधी व्याख्याने आयोजित करुन विद्यार्थी, शिक्षक व पालकांमध्ये त्यासंबंधीची जाण निर्माण करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. त्या अनुषंगाने असे पहिले व्याख्यान वनराईचे सहकार्याने इकोक्लब (पर्यावरण मंडळ) असलेल्या शाळातील शिक्षकांसाठी वनराईचे सभागृहात आयोजित करणेत आले. त्यास अनुसरुन एस.एन.डी.टी., कन्याशाळा, नारायण पेठ, पुणे यामध्येही अशा प्रकारचे व्याख्यान आयोजित केले होते. त्यास व्यासपीठाचे संयोजक उपस्थित होते. त्यानंतर प्रशालेमध्ये त्यांनी दि. १४.१.२०१२ रोजी जलसाक्षरता या विषयावर विद्यार्थी व पालक यांना मार्गदर्शन केले. त्याबद्दल मनापासून धन्यवाद देणारे पत्र प्रशालेकडून व्यासपीठाला दि. ४.२.२०१२ रोजी आले आहे. मान. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी महोत्सवानिमित्ताने - १) जलसाक्षरता २) कळया उमलताना ३) हस्ताक्षर सुधार ४) आचार विचार धर्म व विज्ञान अशा विषयांवर शाळांमध्ये व महाविद्यालयांमध्ये कार्यक्रम आयोजण्याचे ठरले आहे. त्यासाठी डॉ. देशकर, राष्ट्रपतीपदक विजेत्या श्रीमती उर्मिला भिडे, श्री. जोशी व डॉ. नातू यांचे सहकार्य घेण्यात येत आहे.

१.१७ **वीज दरवाढ खुली चर्चा** :- महाराष्ट्र वीज नियामक आयोगामार्फत नियोजीत अंदाजे २२ टक्के वाढी संदर्भात ज्यांना आपले काही म्हणणे मांडावयाचे आहे त्यांचेसाठी कौन्सिल हॉल येथे आयोगाचे अध्यक्षांनी आपले म्हणणे मांडण्यासाठी नागरिक व संस्था यांना आवाहन केले होते या संबंधात एक चर्चासत्र कृषि व सहकार व्यासपीठतर्फे दि. १७.१०.२०११ रोजी आयोजण्यात आले होते. सदर चर्चासत्राचे अध्यक्षस्थान श्री. अजित निंबाळकर यांनी भूषविले होते. सदर चर्चासत्रात पुणे येथील सजग नागरीक मंचाचे सदस्य श्री. विवेक वेलणकर, प्रयास उर्जागटाचे श्री. दंतनु दिक्षित, श्री. शरद भिडे - ग्राहक पेठ, श्री. कोकरे - संचालक कॉसमॉस बँक, श्री. आनंदराव पाटील - भारती विद्यापीठ प्रशासकीय अधिकारी, श्री. बी. एच. श्रीकांत इ. मान्यवर उपस्थित होते. दि. १९.१०.२०११ रोजी आयोजित केलेल्या खुल्या चर्चेत व्यासपीठाचे संयोजक हजर राहून त्यांनी कृषि व सहकार व्यासपीठाचेवतीने झालेल्या सूचनांचे निवेदन सादर केले.

१.१८ **सेंद्रीय शेतीबाबत** :- या कार्यालयातर्फे कृषि विभागाला सेंद्रीय शेतीच्या व्याख्येसंबंधी कृषि व सहकार व्यासपीठाचे चर्चासत्रात चर्चा करुन कांही सूचना करण्यात आल्या होत्या. त्या लक्षात घेऊन दि. ८.१०.२०११ रोजी पुणे येथे डॉ. सुधीरकुमार गोयल, प्रधान सचिव (कृषि) यांचे अध्यक्षतेखाली जे चर्चासत्र आयोजण्यात आले होते त्यास संयोजकांना आमंत्रित केले होते. चर्चेमध्ये शेतीच्याबाबतीत शेत मजूरांचे कमतरतेबाबत मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. त्याबाबतीत प्रो. रथ, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ पॉलिटिकल इकॉनॉमी यांनी हा प्रश्न सोडविण्यासाठी ज्या सूचना आपल्या प्रबंधामध्ये सुचविल्या होत्या त्याचा उल्लेख संयोजकांनी केला. सदर प्रबंधाची प्रत डॉ. गोयल यांना सादर करण्यात आलेली आहे.

१.१९ **वक्तृत्व व निबंध स्पर्धा** :- दि. २४.११.२०११ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांचे पुण्यतिथीनिमित्त वक्तृत्व व निबंध स्पर्धेच्या बक्षीसाचा वितरण कार्यक्रम श्री. अजित निंबाळकर यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. वकृत्वासाठी परिक्षक म्हणून माजी प्रा. डॉ. व. कृ. नूलकर - वाडिया कॉलेज, प्रा. भिडे - माजी प्राचार्य गरवारे कॉलेज व श्री. म्हसवडे - प्राचार्य, सौ. सुशीला बहुधनी कॉलेज यांनी केले. निबंध तपासण्याचे काम राष्ट्रपती पदक विजेत्या सौ. उर्मिला भिडे व श्रीमती पुराणिक यांनी केले. हा कार्यक्रम नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानतर्फे यांचे सहकार्याने घेण्यात आला. त्यांचेवतीने श्री. शशीकुमार भिडे, अध्यक्ष व श्री. दिलीप भिडे, सचिव कार्यक्रमास उपस्थित होते. श्री. अंकुशराव काकडे यांनी सर्वांचे स्वागत केले. प्रास्ताविक श्री. शं. त्रिं. भिडे यांनी केले व आभार प्रदर्शन श्री. परळीकर यांनी केले.

१.२० **बिनभोगवटा शुल्क** :- सहकारी गृहनिर्माण संस्थांमध्ये जेव्हा एखाद्या सभासदाला कांही कारणांमुळे आपली जागा भाडयाने द्यावी लागते, त्यावेळी शासकीय आदेशाप्रमाणे बिनभोगवटा शुल्क एकूण सेवाशुल्काच्या १० टक्के रक्कम संस्थेकडे जादा भरावी लागते. याबाबत असे आढळून आले आहे की, ज्यावेळी शुल्क आकारण्यात येते त्यावेळी त्याचे पोटी काहीतरी खास सेवा द्यावी लागते. बिनभोगवटा शुल्काचेबाबतीत अशी कोणत्याही प्रकारची सेवा देण्यात येत नसल्या कारणाने अशाप्रकारे शुल्क आकारणे कितपत योग्य आहे याबाबत कृषि व सहकार व्यासपीठाचे दि. १८.१.२०१२ रोजी झालेल्या सभेत चर्चा करणेत आली.

१.२१ **चित्रकला स्पर्धा** :- मा. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी निमित्त पुणे केंद्र व कृषी व सहकार व्यासपीठातर्फे संपूर्ण वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन मा. यशवंतराव चव्हाण यांची स्मृती उज्ज्वल करण्यासाठी अनेकविध उपक्रम करण्याचे ठरविले आहे. त्यानुसार पहिला कार्यक्रम म्हणून २२ मार्च २०१२ चे जलदिनाचे औचित्य साधून यशवंतरावांचे जन्मशताब्दीचे पहिल्या सप्ताहात दि. १२ मार्च २०१२ ते १७ मार्च २०१२ या पाच दिवसांचे कालावधीत पुणे शहरातील महानगरपालिकांचे शाळेतील इ. ५ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कृषी व सहकार व्यासपीठ भारतीय जल संस्कृती मंडळ, वनराई, एकविरा प्रकाशन व यशलक्ष्मी आर्टस् यांचे संयुक्त विद्यमाने चित्रकला स्पर्धा व जलदिंडीचा कार्यक्रम पार पाडण्यात आला. पुण्यातील महानगरपालिकेच्या एकूण २५ शाळांशी केंद्रातर्फे स्पर्धेसाठी संपर्क साधण्यात आला होता. त्यापैकी १७ शाळांनी या स्पर्धेत १२ मार्च २०१२ ते १७ मार्च २०१२ या दरम्यान भाग घेतला. त्यातील ८ शाळातील १३ विद्यार्थ्यांच्या चित्रांना पारितोषिके देण्यात आली. याखेरीज पुण्यातील अहिल्यादेवी मुलींची प्रशाला, नू.म.वि. मुलांची प्रशाला यासारख्या नामवंत शाळांमध्येही केंद्राचे श्री. रवि सरनाईक यांचेकडून संपर्क साधून स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना आवाहन करण्यात आले होते. अहिल्यादेवी मुलींच्या प्रशालेच्या शेकडो विद्यार्थीनींनी स्पर्धेत सहभाग घेतला त्यापैकी १८ विद्यार्थिनींची पारितोषिकांसाठी निवड करण्यात आली. स्पर्धेसाठी तीन गट तयार करण्यात आले होते. 'अ' गट - इयत्ता ५ वी व ६ वी, 'ब' गट - इयत्ता ७ वी व ८ वी, 'क' गट - इयत्ता ९ वी व १० वी या तीन गटांनी अनुक्रमे (१) पाणी वापरातील काटकसर, (२) मुळा - मुठा नदीतील जलप्रदुषण, (३) जलपुर्नभरण असे तीन विषय देण्यात आले होते. प्रत्येक गटात प्रथम / द्वितीय / तृतीय अशी तीन पारितोषिके, अनुक्रमे रक्कम रु.२०००/-, रु.१५००/- व रु.१०००/- त्याशिवाय उत्तेजनार्थ प्रत्येक गटात २५ पारितोषिके प्रत्येकी रु.३०००/- महिंद्रा ॲन्ड महिंद्रा, मुंबई यांचेतर्फे प्रदान करण्यात आली.

१.२२ **जलदिंडी कार्यक्रम** :- या स्पर्धेचा निकाल २२ मार्च २०१२ यादिवशी घोषित करुन सकाळी शनिवारवाडा, लक्ष्मीरोड मार्गे ओंकारेश्वर मंदिर या मार्गावरुन जलदिंडीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. जलदिंडीत विविध शाळांतील सुमारे २५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. अशात-हेने दि. १२ मार्च ते २२ मार्च असा पहिला दहा दिवस हा कार्यक्रम साजरा करण्यात आला. चित्रकला स्पर्धेत एकूण १४००० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी व त्यापैकी साधारणपणे १५०० महानगरपालिका विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

१.२३ **पुष्पहार समर्पण** :- दि. १२ मार्च रोजी पुणे केंद्राचे अध्यक्ष बैठकीसाठी मुंबई येथे होते. तसेच सचिव श्री. अंकुशराव काकडे व कोषाध्यक्ष श्री. शांतिलाल सुरतवाला हे अन्य जिल्हयातील कामामुळे सकाळी ११ वाजता कार्यालयात येऊ शकले नाहीत. पुणे केंद्रातर्फे मा. यशवंतराव चव्हाण यांचे अर्धपुतळयास व प्रतिमेस सर्वश्री भिडे,परळीकर, कदम, सरनाईक, अंबिके व वाईकर यांचे उपस्थितीत पुष्पहार समर्पित करण्यात आला व कार्यक्रम संपन्न झाला.

## ९.२ महाराष्ट्र महिला व्यासपीठ :-

महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने महिलांची शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक विविध दृष्टीने सक्षमता वाढावी यासाठी विविध उपक्रम, विवध कार्यशाळा, इतर कार्यक्रम योजनांच्या माध्यमातून कृतिशील प्रयत्न केले जातात. संयोजिका श्रीमती रेखा नार्वेकर, कार्यकारी संयोजिका श्रीमती ममता रमेशचंद्र कानडे महाराष्ट्र महिला व्यासपीठाचा कारभार सांभाळत असतात. त्यांना महाराष्ट्र महिला व्यासपीठाची कार्यकर्ती श्रीमती शोभा लोंढे यांचे सहकार्य असते.

२.१ दिनांक ४.५.२०११ रोजी सकाळी १० ते ४.३० या वेळेत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथील वेगवेगळया कार्यालयामध्ये काम करणा-या सर्व कर्मचा-यांसाठी व त्यांच्या कुटुंबियांसाठी 'आरोग्य शिबीर' घेण्यात आले. हया शिबिरात खालील प्रकारची तपासणी इंडियन कॅन्सर सोसायटीच्या तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने घेण्यात आली. स्त्री पुरषांच्या शिबिरामध्ये कमीत कमी १०० लोकांनी लाभ घेतला. या शिबिरात खालील तपासण्या झाल्या.

- Chest X-Ray.
- Routine Blood test of Hemoglobin and white bolld cells.
- Complete ENT Examination including Indirect Laryngoscopy by the ENT surgeon.
- Complete Phusical Check-up with Prostate Examination by a surgeon for males.
- Gynecological Examination including Breast Check-up and Pap smear by Gynecologist for females.

२.२ दिनांक २१ एप्रिल २०११ रोजी चौथ्या मजल्यावरील रंगस्वर सभागृहामध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने 'महाराष्ट्र आणि मराठे' मा. रा. ना. चव्हाण यांच्या ग्रंथावर चर्चा कार्यक्रम सादर केला. या कार्यक्रमांचे अध्यक्ष श्री. प्रताप आसबे होते. कार्यक्रमांचे स्वागत व प्रास्ताविक सरचिटणीस मा. शरद काळे यांनी केले. श्री. रमेश चव्हाण यांनी कार्यक्रमाचे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमात चर्चेकरिता डॉ. सुधीर भोगंळे. प्रा. डॉ. प्रकाश पवार, प्रा. दिपक पवार इत्यादी उपस्थित होते.

२.३ दिनांक १४ जून २०११ रोजी तळ मजल्यावरील बेसमेंट हॉलमध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठ, मुंबई व कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु झालेल्या 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' वर्गाच्या चौथ्या बॅचचे उद्घाटन कार्यक्रम झाला. त्यानंतर चौथ्या मजल्यावरील हॉलमध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठ, नवमहाराष्ट्र युवा अभियान तसेच महाराष्ट्र सोसायटी वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापक प्रशिक्षण' वर्गाच्या चौथ्या बॅचचे प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात श्रीमती ममता कानडे यांनी प्रमुख पाहुणे यांचे स्वागत केले. महाराष्ट्र सोसायटी वेल्फेअर असोसिएशनचे अध्यक्ष श्री. रमेश प्रभु यांनी कार्यशाळेची पार्श्वभूमिका मांडली. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे सरचिटणीस व कार्यशाळेतील कार्यक्रमांचे अध्यक्ष मा. शरद काळे यांनी प्रशिक्षणार्थीना मार्गदर्शन केले आणि प्रमाणपत्राचे वितरण मा. द. ग. सुकथनकर (निवृत्त सनदी अधिकारी), निवृत्त मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमांच्या शेवटी सर्वांचे आभार मानून राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

२.४ महाराष्ट्र महिला व्यासपीठ, मुंबई व कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने चौथी बॅच १५ महिलांसाठी 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळा दि. १४ जून २०११ ते २० ऑगस्ट २०११ पर्यंत घेतली. महिलांच्या या चौथ्या बॅचमध्ये सतत ९ आठवडे मंगळवार, गुरुवार, शनिवार असे २७ दिवस दुपारी २.३० ते ५.३० या वेळेत प्रशिक्षण दिले. त्यामध्ये महिलांच्या रोजच्या जीवनांतील उपयोगी असे २७ विषय शिकविण्यात आले. स्वतःचे आरोग्य, घराची स्वच्छता, घरातील सर्व वस्तूंची निगा, प्रथमोपचार या विषयांबरोबरच वेगवेगळया प्रकारचे जेवण बनविण्याच्या पध्दतीमध्ये जवळ जवळ १५० पदार्थ शिकविण्यात आले. वरील सर्व विषय त्या त्या विषयांतील अनुभवी मार्गदर्शक व कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन कॉलेजच्या प्राध्यापिकांकडून शिकविण्यात आले. या प्रशिक्षणामुळे महिलांनी स्वतःचे घर चांगल्याप्रकारे सांभाळणे तसेच छोटया प्रमाणात डबा सर्व्हीस सुरु करणे, छोटया प्रमाणात कॅटरिंग बिझनेस सुरु करणे. तसेच दुस-यांच्या घरी जाऊन त्यांचे घर सांभाळणे याची माहिती महिलांना मिळाली व आर्थिकबाबतीत समक्ष होण्याचे मार्गदर्शन मिळाले.

२.५ दिनांक १३ जुलै २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील हॉलमध्ये चित्रपट चावडी म्हणून 'मोर देखने जंगल में' हा चित्रपट दाखवून त्या चित्रपटाबाबत लोकसंवाद साधण्यात आला.

२.६ दि. १०.८.२०११ ते ३०.८.२०११ पर्यंत एकूण २० दिवसांसाठी यशवंतराव चव्हाण सेंटरच्या बेसमेंट हॉल मध्ये येथे यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथील सर्व कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी व त्यांचे कुटुंबातील व्यक्तींकरिता 'आधार कार्ड' काढण्याची व्यवस्था करण्यात आली. एकूण ३७६ व्यक्तींनी 'आधार कार्ड' बनविण्याचा लाभ घेतला.

२.७ दिनांक १८ ऑगस्ट २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील हॉलमध्ये चित्रपट चावडी म्हणून 'वेल डन अब्बा' हा चित्रपट दाखवून त्या चित्रपटाबाबत लोकसंवाद साधण्यात आला.

२.८ दिनांक १७.९.२०११ रोजी 'युवा परिवर्तन' (व्यवसाय मार्गदर्शन केंद्र), वांद्रे येथे महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे श्रीमती ममता कानडे व श्रीमती शोभा लोंढे यांनी भेट दिली. खेरवाडी सोशल वेल्फेअर असोसिएशन या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून १) डी.टी.पी., २) हेअर कटींग, ३) टॅली, ४) कॉम्प्युटर हार्डवेअर, ५) ॲडव्हान्स मोटर मेकॅनिक, ६) मोबाईल रिपेरिंग, ७) ॲडव्हान्स ब्युटिशियन, ८) ॲडव्हान्स फॅशन डिझाईनिंग इत्यादी कोर्स सुरु होते ते पूर्ण झाल्यानंतर नोकरीकरिता मार्गदर्शन केले जाते.

२.९ दिनांक २८ सप्टेंबर २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील हॉलमध्ये चित्रपट चावडी म्हणून 'देसरु उजाला' हा चित्रपट दाखवून त्या चित्रपटाबाबत लोकसंवाद साधण्यात आला.

२.१० दिनांक २९ सप्टेंबर २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील हॉलमध्ये ग्रंथोत्सव म्हणून "Understanding Gandhi" हया पुस्तका संदर्भात लोकसंवाद साधण्यात आला.

२.११ महाराष्ट्र महिला व्यासपीठ व युवा परिवर्तन यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ ऑक्टोबर ते १६ डिसेंबर २०११ या दरम्यान 'रिटेलिंग प्रशिक्षण' कार्यशाळा युवक व युवतींसाठी घेतली. त्यांचा वयोगट १८ ते २५ व शिक्षण १० वी पास असणा-यांनी याचा लाभ घेतला. त्यांना टाटा व युवा परिवर्तन संस्थेचे प्रमाणपत्र देण्यात आले. सदर प्रशिक्षण वर्ग सोमवार ते शुक्रवार दुपारी २.३० ते संध्याकाळी ५.३० या वेळेत दिले.

२.१२ रविवार दिनांक २३ ऑक्टोबर २०११ रोजी यशवंतराव चव्हाण केंद्राच्या तळ मजल्यावरील मुख्य सभागृहात 'ज्येष्ठ नागरिकांचा आनंद मेळावा' झाला. या मेळाव्यात महिला व्यासपीठ सहभागी झाले. या मेळाव्यात महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे बचत गटातील महिलांनी ३ स्टॉल लावलेले होते. साधारणपणे लोकांना दिवाळीच्या निमित्ताने दिवाळी उपयोगी पडतील अशा घरी बनविलेल्या वस्तू विक्रीकरिता ठेवण्यात होत्या.

२.१३ दिनांक ३ नोव्हेंबर २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने लोकसंवाद कार्यक्रम चव्हाण सेंटरच्या सांस्कृतिक हॉलमध्ये घेतला. या कार्यक्रमात श्री. विठ्ठल कामत यांची मुलाखत दूरदर्शनच्या श्रीमती ज्योती आंबेकर यांनी घेतली. मुलाखतीमध्ये श्री. विठ्ठल कामत यांनी काम केलेल्या कार्यात यश मिळत गेल्याबाबत उदाहरणासहीत सांगितले. त्यांची बरीच हॉटेल असण्यामागची कारणे सांगितली.

२.१४ दि. २४ नोव्हेंबर २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण सेंटरच्या चौथ्या मजल्यावरील हॉलमध्ये चित्रपट चावडीमध्ये चौथा चित्रपट 'चिल्ड्रेन ऑफ हेवन' हा दाखवून लोकांनी संवाद साधला.

२.१५ दि. ३ डिसेंबर २०११ रोजी तळ मजला, बेसमेंट मिटींग हॉलमध्ये महाराष्ट्र महिला व्यासपीठ आणि कॉलेज ऑफ होम सायन्स निर्मला निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'गृहव्यवस्थापन प्रशिक्षण' कार्यशाळा बॅच क्र. चारचे 'प्रमाणपत्र वितरण' कार्यक्रम झाला. त्यानंतर महाराष्ट्र महिला व्यासपीठ, नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने 'सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापाक प्रशिक्षण' कार्यशाळा बॅच क्र. चारचे उद्‌घाटन झाले. या कार्यक्रमात अॅड. भिमराव बोरनाक, श्री. प्रभाकर चुरी, श्री. राजेश पवार व प्रमुख पाहुणे श्री. रवि बुध्दीराजा हे या कार्यक्रमात सहभागी होते.

२.१६ दि. १३ डिसेंबर २०११ रोजी उद्योगिनी या संस्थेचा कार्यक्रम इब्राहिम बिल्डींग, दादर (पूर्व), मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमात महिला व्यासपीठाने कार्यक्रमात सहभाग घेतला. कार्यकारी संयोजिका यांनी या कार्यक्रमात महिला व्यासपीठातर्फे सुरु असलेल्या कार्याबाबत व इतर कार्यक्रमांबाबत मार्गदर्शन केले. व्यासपीठाच्या कार्यकर्तीने बचत गट कसा स्थापन करावा, त्यांच्यापासून होणारे फायदे याबाबत माहिती दिली.

२.१७ दि. १७ डिसेंबर २०११ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ, मुंबईतर्फे सुंदर बाग फुलवा छोटयाशा जागेत. फळांनी, फुलांनी बाग सजवायच्या प्रात्यक्षिकांसह एकूण अंदाजे ६० स्त्री-पुरुष यांनी प्रशिक्षण घेतले. हे प्रशिक्षण मराठी विज्ञान परिषदेचे श्री. दिलीप हेर्लेकर यांनी दिले. या कार्यक्रमात सरचिटणीस मा. शरद काळे सहभागी होते.

२.१८ तळ मजला सभागृहात दि. ५, ६ व ७ जानेवारी २०१२ रोजी सकाळी १० ते ६ वाजेपर्यंत २०११ युवा परिवर्तन या संस्थेतर्फे 'जीवन कौशल्य' या विषयास अनुसरुन तीन दिवसांचे शिविर झाले.

२.१९ दि. ९.१.२०११ रोजी युवा परिवर्तन व महाराष्ट्र महिला व्यासपीठ यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु झालेल्या रिटेलिंग प्रशिक्षण वर्गाच्या पहिल्या बॅचचा प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात युवा परिवर्तन यांच्यातर्फे हेमा रेड्डी, मानसी गमरे, अंजुम पिरभॉय, श्वेता कांबळे व महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे कार्यकारी संयोजिका तसेच टाटा कंपनीच्या झेरेना परेरा व रोशनी मॅथ्युज इत्यादींचा सहभाग होता. प्रमाणपत्र वितरण कार्यक्रम टाटा कंपनीमधून आलेल्या वरील सन्माननीय व्यक्तींच्या हस्ते करण्यात आला.

२.२० दि. ७.२.२०१२ रोजी यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने महिलांकरिता जनजागृती कार्यक्रमानिमित्त व्यासपीठाच्या कार्यकर्तींनी रमाबाई आंबेडकर महिला बचत गट, भायखळा, मुंबई येथील महिलांची दोन वेळा प्रत्यक्ष भेट घेऊन कार्यक्रमाचे आयोजन केले. या कार्यक्रमात सिध्दीविनायक बचत गट व रमाबाई आंबेडकर महिला बचत गटच्या महिला सहभागी होत्या.

२.२१ कार्यकारी संयोजक यांनी महिला स्वतः कशाप्रकारे लघुव्यवसाय करु शकतील त्याबाबत माहिती दिली. तसेच प्रमुख वक्ते यांची थोडक्यात ओळख करुन दिली. श्रीमती कांचन शितोळे यांनी स्त्रिया विषयी केलेल्या कामाबाबत माहिती दिली. सौ. निमा शिंदे (बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा व्यवस्थापक) यांनी महिलांना लघुव्यवसाय सुरु केलेल्या महिलांच्या कामाचे अनुभव सांगितले. श्रीमती रशिदा अमीर (भारत पेट्रोलियम) यांच्यातर्फे श्री. सुधाकर पवार यांनी गॅसची सुरक्षा कशाप्रकारे घेता येते याबाबत माहिती दिली.

२.२२ दि. २२.२.२०१२ रोजी जे. जे. रुग्णालय, भायखळा, मुंबई येथे मुंबई शहर व उपनगर विभागातील अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्रे, रेल्वे सवलत प्रमाणपत्र, समाजकल्याण विभागाचे ओळखपत्र व समाजकल्याण ओळखपत्रावर एस.टी. महामंडळाची सही व शिक्का इत्यादी सवलती एकाच दिवशी, एकाच ठिकाणी उपलब्ध करुन देण्याबाबत व मोफत अपंग वैद्यकीय तपासणी शिबिर झाले. या शिबिरात साधारण २८१ अपंग व्यक्तींनी त्याचा लाभ घेतला. महाराष्ट्र महिला व्यासपीठ सहभागी होते.

२.२३ दि. २४.२.२०१२ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व नवमहाराष्ट्र युवा अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने चौथ्या मजल्यावरील हॉलमध्ये पाचवा चित्रपट चावडी यामध्ये 'अप' हा चित्रपट दाखवून त्याबाबत उपस्थित लोकांनी लोकसंवाद साधला.

२.२४ दि. २४.२.२०१२ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठ व अन्न हक्क परिषद, महाराष्ट्र यांच्या संयुक्त विद्यमाने तळमजला सभागृहात मिटींग हॉलमध्ये जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने रेशनिंगबाबत समस्यांवर निवारण शिबिर झाले. या शिबिरात अंदाजे ९० स्त्री-पुरुषांचा सहभाग होता. या कार्यक्रमात कार्यकारी संयोजिका यांनी महाराष्ट्र महिला व्यासपीठातर्फे सुरु केलेल्या कार्यशाळाबाबत माहिती दिली. श्री. रमेश कदम यांनी रेशनिंगबाबत होणा-या समस्या सांगून त्या योग्य पध्दतीने सोडविता येतील अशी माहिती दिली.

२.२५ दि. १२ मार्च २०१२ रोजी सायंकाळी ५.३० वाजता गेटवे ऑफ इंडिया, मुंबई येथे यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष शुभारंभ सोहळा कार्यक्रम झाला. या कार्यक्रमात महाराष्ट्र महिला व्यासपीठ, सहभागी झाले होते.

२.२६ दि. १४ मार्च २०१२ रोजी महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या कार्यकारी संयोजिका यांनी धनलक्ष्मी महिला मंडळ व लोकमत सखी यांच्या संयुक्त विद्यमाने भायखळा, मुंबई येथे अयोजित केलेल्या कार्यक्रमात सहभाग घेतला. या कार्यक्रमात अंदाजे ५०

महिलांचा सहभाग होता. कार्यकारी संयोजिका यांनी महिला लघुव्यवसाय स्वतः कशाप्रकारे करु शकतील त्याबाबत माहिती दिली. व महिला व्यासपीठातर्फे सुरु असलेल्या कार्यशाळेबाबत माहिती सांगितली.

२.२७ दि. ३१ मार्च २०१२ रोजी यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने महाराष्ट्र महिला व्यासपीठ व कोकणस्थ संघमेश्वरी वैश्य समाज यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांकरिता जनजागृत्ती कार्यक्रम ठरविण्याकरिता त्यांच्या पदाधिका-यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कार्यक्रमांचे आयोजन केले. कार्यक्रम गिरगांव, मुंबई येथे झाला.

## ९.३ नवमहाराष्ट्र युवा अभियान :-

३.१ नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्यावतीने प्रत्येक महिन्याला चित्रपट चावडी व लोकसंवाद या उपक्रमांतर्गत पर्यावरण, शिक्षण, अपंग किंवा इतर महत्त्वाच्या विषयांवर माहितीपट व लघुपट दाखविण्यात येतो. तसेच लोकसंवाद या उपक्रमांतर्गत मान्यवर व्यक्तींशी संवाद साधण्यात येतो. चित्रपट चावडीची 'वेल डन अब्बा' या चित्रपटापासून सुरुवात झाली.

३.२ नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि पिनॅकल क्लबतर्फे सहयाद्रीमध्ये पदभ्रमणाचे तसेच प्रस्तरावतरण / प्रस्तरारोहणाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. दि. ६ ऑक्टोबर, २० नोव्हेंबर, १५ जानेवारी रोजी कान्हेरी गुंफा येथे रॉक क्लाईबिंगचा कार्यक्रम खास तरुणांसाठी आयोजित करण्यात आला. त्याचा लाभ ६३ युवकांनी घेतला. सदर शिबिर विनामूल्य घेण्यात आले. २४ व्या वर्षी २५ ते २७ डिसेंबर २०११ रोजी किल्ले रायगडावरील टकमक टोकावरुन १००० फूट रॅपलिंग करण्याचा म्हणजेच दोरीच्या सहाय्याने खाली उतरण्याचा कार्यक्रम यशस्वीपणे आयोजित करण्यात आला. या साहसी कार्यक्रमाला महाराष्ट्रातून एकूण ११० नवगिर्यारोहकांनी उपस्थित राहून यशस्वीपणे रॅपलिंग केले. पूर्वप्रशिक्षण म्हणून कान्हेरी गुंफा, बोरीवली येथे एकूण १९९ लोकांनी रॅपलिंग केले. यशस्वीपणे रॅपलिंग केलेल्यांना दि. ७ जानेवारी रोजी देवडिगा संघ, दादर येथे प्रशस्तीपत्र देण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून श्री. प्रसाद, चिफ कमिशनर, कस्टम्स, न्हावा शेवा बंदर उपस्थित होते. प्रजासत्ताक दिनी कस्टम हाऊस, न्हावा शेवा बंदर येथील उंच इमारतीवरुन गिर्यारोहणाची प्रात्यक्षिके करुन दाखविण्यात आली. दि. ३० जानेवारी रोजी सुधागड, पाली येथे पदभ्रमण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात १९ गिर्यारोहकांनी भाग घेतला.

३.३ **व्हिजन करिअर फेअर (महाराष्ट्र):-**

३.१ कराड (दि. २२ ते २४ एप्रिल २०११) नवमहाराष्ट्र युवा अभियान, रिसोर्सेस व सनबीन एज्युकेशन व रिसर्च ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ ते २४ एप्रिल २०११ या दरम्यान लिबर्टी ग्राऊंड, सौ. वेणुताई चव्हाण सभागृहाजवळ, कराड, जिल्हा सातारा येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष मा. सारंग पाटील हे होते. या ठिकाणी प्रदर्शनामध्ये ३१ स्टॉल्स सहभागी झाले होते. एकूण तीन दिवसांमध्ये करिअर विषयक नऊ व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले. प्रदर्शनाला सुमारे दोन हजारांवर विद्यार्थी पालकांनी भेटी दिल्या.

३.२ कोल्हापूर (दि. २९ एप्रिल ते मे २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियान व रिसोर्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ एप्रिल ते १ मे २०११ या दरम्यान प्रायव्हेट हायस्कूल मैदान, कोल्हापूर येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष राज्याचे कामगार मंत्री मा. ना. हसन मुश्रीफ हे होते. या ठिकाणी प्रदर्शनामध्ये २८ स्टॉल्स सहभागी झाले होते. प्रदर्शनाला सुमारे पाच हजारांवर विद्यार्थी पालकांनी भेटी दिल्या.

३.३ सांगली (दि. ६ ते ८ मे २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियान व रिसोर्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ मे २०११ या दरम्यान नेमिनाथ नगर मैदान, नेमिनाथ नगर, सांगली येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष मा. ना. जयंत पाटील हे होते. या ठिकाणी प्रदर्शनामध्ये ८५ स्टॉल्स सहभागी झाले होते. तीन दिवसांमध्ये एकूण नऊ करिअर विषयक व्याख्याने आयोजित करण्यात आली. प्रदर्शनाला सुमारे वीसे हजारावर विद्यार्थी पालकांनी भेटी दिल्या.

३.४ चिपळूण (दि. ६ ते ८ मे २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियान व ओंकार कला व क्रिडा अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ते ८ मे २०११ या दरम्यान न्यू युनायटेड इंग्लिश स्कूल, चिपळूण, जिल्हा रत्नागिरी येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष मा. ना. भास्कर जाधव हे होते. या ठिकाणी प्रदर्शनामध्ये २६ स्टॉल्स सहभागी झाले होते. तीन दिवसांमध्ये एकूण नऊ करिअर विषयक व्याख्याने आयोजित करण्यात आली. प्रदर्शनाला सुमारे पाच हजारांवर विद्यार्थी पालकांनी भेटी दिल्या.

३.५ सोलापूर (दि. १३ ते १४ मे २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियान व शरद प्रतिष्ठान, सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ते १४ मे २०११ या दरम्यान डॉ. वा. का. किर्लोस्कर सभागृह, हिराचंद नेमिचंद वाचनालय, सोलापूर येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष श्री. महेश गादेकर हे होते. प्रदर्शनामध्ये २८ स्टॉल्स सहभागी झाले होते. प्रदर्शनाला सुमारे सात हजारांवर विद्यार्थी पालकांनी भेटी दिल्या.

३.६. ठाणे (दि. १३ ते १५ मे २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियान व समन्वय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ते १५ मे २०११ या दरम्यान घंटाळी मैदान, नौपाडा, ठाणे (प.) येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष श्री. निरंजन डावखरे हे होते. प्रदर्शनामध्ये २७ स्टॉल्स सहभागी झाले होते. तीन दिवसांमध्ये एकूण नऊ करिअर विषयक व्याख्याने आयोजित करण्यात आली. प्रदर्शनाला सुमारे दोन हजारांवर विद्यार्थी पालकांनी भेटी दिल्या.

३.७ कुडाळ (दि. १७ ते १८ मे २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियान व ध्येय प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ ते १८ मे २०११ या दरम्यान कुडाळ हायस्कूल ग्राऊंड, कुडाळ, जिल्हा सिंधुदुर्ग येथे व्हिजन करिअर फेअरचे आयोजन करण्यात आले होते. येथील प्रदर्शनाचे स्वागताध्यक्ष श्री. अमित सावंत हे होते. प्रदर्शनामध्ये ४० स्टॉल्स सहभागी झाले होते. करिअर विषयक तीन व्याख्याने आयोजित करण्यात आली. प्रदर्शनाला सुमारे पंधरा हजारांवर विद्यार्थी पालकांनी भेटी दिल्या.

३.८ बदलापूर (दि. २० ते २२ मे २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियान, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट, ग्रंथसखा वाचनालय आदि संस्थांच्या सहकार्याने व्हिजन करिअर फेअर २०११ - शैक्षणिक प्रदर्शन व व्याख्यानमाला या महत्वाकांक्षी प्रदर्शनाचे आयोजन २०, २१, २२ मे रोजी करण्यात आले होते. दि. २० मे रोजी कार्यक्रमाचे उद्घाटन महाराष्ट्र विधान परिषदेचे उपसभापती मा. श्री. वसंत डावखरे, सिने अभिनेत्री गिरीजा ओक, कोकण पाटबंधारे महामंडळाचे उपाध्यक्ष व आमदार श्री. किसन कथोरे, कार्यक्रमाचे संयोजक व कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष श्री. श्रीधर पाटील तसेच कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे नगराध्यक्ष श्री. राजेंद्र घोरपडे, ग्रंथासखा वाचनालयाचे संचालक श्री. शाम जोशी आदि मान्यवर उपस्थित होते. प्रदर्शन पाहणी, येणा-या विद्यार्थ्यांची ॲप्टीटयूड टेस्ट, व्याख्यानमाला अशा विविध उपक्रमांची सुरुवात कार्यक्रमाचे स्थळी सुरु झाली. तीन दिवस चाललेल्या या शैक्षणिक प्रदर्शनात चौदा हजार विद्यार्थी, पालक यांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला.

३.९ औरंगाबाद (दि. २० ते २२ मे २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियान, विभागीय केंद्र औरंगाबाद, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व अभ्युदय फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद येथे दि. २० ते २२ मे २०११ दरम्यान व्हिजन करिअर फेअर शैक्षणिक प्रदर्शन व करिअर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. करिअर फेअरचे उदघाटन प्रसिध्द दिग्दर्शक श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनामध्ये तिन्हीही दिवस विविध मान्यवरांनी भेट दिली. यामध्ये महाराष्ट्र राज्याचे नागरी पाणी पुरवठा मंत्री मा. ना. लक्ष्मणराव ढोबळे, क्रांतिवीर लहुजी साळवे मांतग समाज अभ्यास आयोगाचे अध्यक्ष श्री. रमेश कदम, उद्योजक श्री. पदमाकर मुळे, श्री. रणजीत मुळे यांचा समावेश होता. करिअरविषयी मार्गदर्शन करण्याकरिता तीनही दिवस विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींना व्याख्यानांसाठी आमंत्रित करण्यात आले. दि. २० मे रोजी सायंकाळी प्रा. अपर्णा अष्टपुत्रे यांचे व्यक्तिमत्व आणि करिअर, श्री. मेजर चंद्रसेन कुलथे यांचे भारतीय सशस्त्र दल संधी व तयारी, ग्रुप कॅप्टन पी. के. तिवारी यांचे भारतीय हवाई दलातील करिअर या विषयांवर व्याख्याने संपन्न झाली. दि. २१ मे रोजी सायंकाळी श्री. संदीप भाजीभाकरे यांचे आयपीएस भरती प्रक्रिया, श्री. तुकाराम जाधव यांचे एमपीएससी - यूपीएससी परीक्षांची तयारी या विषयांवर व्याख्याने आयोजित करण्यात आली. तर व्ही. बी. जी. ग्रुपचे श्री. हनुमंत गायकवाड यांची प्रकट मुलाखतीची चित्रफित दाखविण्यात आली. दि. २२ मे रोजी सायंकाळी श्री. निलेश खरे यांचे पत्रकारितेतील संधी, श्री. योगेश जाधव यांचे ॲनिमेशन क्षेत्रातील करिअर व श्री. संदीप पैठणकर यांचे ऍन्ड्रॉइड प्रणालीतील करिअर या विषयांवर व्याख्याने संपन्न झाली. प्रदर्शनामध्ये भारतीय भुदल, नौदल, हवाईदलांचे स्टॉल्स सहभागी झाले होते. ॲनिमेशन, फॅशन डिझायनिंग, कॉम्प्युटर सायन्स, बायोटेक्नॉलॉजी, स्वयंरोजगारा संदर्भात प्रशिक्षण देणा-या संस्था, नृत्य-नाटय-संगीत, एम.बी.ए., जॉब कन्सल्टन्सी, व्यावसायिक शिक्षणाशी संबंधित संस्था, शासकीय विभाग, समुपदेशन केंद्र, परकीय भाषांचे शिक्षण देणा-या संस्था, पर्यटन, कृषीविषयक संस्थांचा सहभाग होता. या प्रदर्शनामध्ये एकूण ५६ संस्था सहभागी झाल्या होत्या. प्रदर्शनाला भेट देणा-या प्रत्येक विद्यार्थी, विद्यार्थीनीची मोफत बुद्धिमापन चाचणी करण्यात आली. प्रदर्शन व व्याख्यानमालेला विद्यार्थी - विद्यार्थिनी व पालकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. व्हिजन करिअर फेअरमध्ये सुमारे २० हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेट दिली.

**३.४ युवा अभिसरण :-**

४.१ मराठवाडा ते मुंबई युवा अभिसरण (दि. २५ मे ते २ जून २०११) - नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. २५ मे ते २ जून २०११ या दरम्यान मराठवाडा ते मुंबई व उपनगर विभाग युवा अभिसरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. २५ मे रोजी मराठवाडयातील सहभागी युवा टूरिस्ट होम, औरंगाबाद येथे जमले. येथे मराठवाडयाची ओळख या संदर्भात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेमध्ये दुपारच्या सत्रात ओळख मराठवाडयाची यावर व्याख्यानाकरिता लेखक व समीक्षक प्रा. जयदेव डोळे यांना आमंत्रित करण्यात आले होते. दुस-या दिवशी दि. २६ मे २११ रोजी सर्व सहभागी युवा सकाळी ६ वाजता राष्ट्रीय मिल मजदूर संघ, परेल, मंबई येथे पोहोचले. सकाळच्या सत्रामध्ये श्री. उमेश खाडे यांनी खेळ व मागील दिवसाचा आढावा घेतला. यानंतर ओळख मुंबईची या विषयावर श्री. संदीप आचार्य यांनी युवांशी संवाद साधला. मुंबईची सामाजिक, आर्थिक, भौगोलिक, राजकीय इत्यादी पार्श्वभूमी सांगत मुंबई विषयी मराठवाडयातील युवांच्या मनात असलेल्या जाणिवा अधिक व्यापक केल्या.

दि. २७ मे ते १ जून २०११ या दरम्यान सहभागी युवांनी ६ गटांमध्ये विभागून मंबई शहर व उपनगरातील विविध ठिकाणी भेटी दिल्या. पहिल्या गटाने १२ ठिकाणी भेटी दिल्या. या दरम्यान या गटाने श्री. दिगंबर नाईक, श्री. अशोक समीळ, श्री. निरंजन डावखरे, उपजिल्हाधिकारी श्री. अमोल यादव, वसईचे तहसिलदार मा. विश्वास गुजर, ठाणे मेंटल हॉस्पिटलचे अधिष्ठाता श्री. कुमावत, शारदा एज्युकेशन सोसायटीचे श्री. प्रदीप ढवळ यांच्याशी भेटून चर्चा केली. दुस-या गटाने ६ ठिकाणांना

भेटी दिल्या. तिस-या गटाने १० ठिकाणांना भेटी दिल्या. चौथ्या गटाने १२ ठिकाणी भेटी दिल्या. या दरम्यान या गटाने श्री. शं. ना. नवरे, फयेगावचे सरपंच, कल्याण पंचायत समितीच्या उपसभापती श्रीमती मीनाक्षी बंदूर आदी मान्यवरांशी भेटून चर्चा केली. पाचव्या गटाने ५ ठिकाणी भेटी दिल्या. या दरम्यान या गटाने नगरसेवक श्री. सूरज कोळी यांची भेट घेतली. तसेच वसई मच्छिमार संघाला भेट देऊन माहिती जाणून घेतली. सहाव्या गटाने ६ ठिकाणी भेटी दिल्या. उपक्रमाच्या शेवटच्या दिवशी दि. २ जून २०११ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई येथे समारोप समारंभ संपन्न झाला. यावेळी मुंबई विभागाला भेट दिल्यानंतर आलेल्या अनुभवांचे कथनव सादरीकरण सहभागी युवांच्या गटागटांनी केले. सादरीकरणानंतर सर्वच सहभागी युवांना सरचिटणीस मा. श्री. शरद काळे यांच्या हस्ते प्रशस्तिपत्र, भारतीय घटनेचा सरनामा, यशवंत चिंतनिका आदी भेट देण्यात आले. सायंकाळी सर्व युवा आपापल्या गांवाकडे रवाना झाले. या उपक्रमांमध्ये मराठवाडयातील ४० युवा सहभागी झाले होते.

४.२ कोकण ते उत्तर महाराष्ट्र युवा अभिसरण (दि. ५ ते १३ जून २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. ५ ते १३ जून २०११ या दरम्यान कोकण ते उत्तर महाराष्ट्र विभाग युवा अभिसरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. ५ जून रोजी कोकणातील सहभागी युवा युसूफ मेहरबली सेंटर, पनवेल येथे जमले. येथे कोकणाची ओळख या संदर्भात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. कार्यशाळेमध्ये दुपारच्या सत्रात ओळख कोकणाची या व्याख्यानाकरिता पर्यावरणवादी श्री. पार्थ व श्रीमती दिप्ती बापट यांना आमंत्रित करण्यात आले होते. दुस-या दिवशी दि. ६ जून २०११ रोज सर्व सहभागी युवा सकाळी ६ वाजता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, विभागीय केंद्र, नाशिक येथे पोहोचले. ओळख खान्देशाची या विषयावर श्री. विनायकदादा पाटील यांनी सहभागी युवांशी संवाद साधला. खान्देशला लाभलेला राजकीय व सामाजिक वारसा त्यांनी उलगडून सांगितला. दुपारच्या सत्रामध्ये श्री. स्वानंद बेदरकर यांनी खान्देशला लाभलेला सांस्कृतिक व साहित्यिक वारसा उलगडून सांगितला. दि. ७ ते १२ जून २०११ या दरम्यान सहभागी युवांनी गटांमध्ये विभागून उत्तर महाराष्ट्र विभागातील २४ ठिकाणी भेटी दिल्या. या ठिकाणांना भेटी देतानाच कला, साहित्य, अर्थकारण, राजकारण, समाजकारणातील नामांकित व्यक्तींबरोबर सहभागी युवांनी संवाद साधला. उपक्रमाच्या शेवटच्या दिवशी दि. १३ जून २०११ रोजी विभागीय केंद्र, नाशिक येथे समारोप समारंभ संपन्न झाला.

४.३ विदर्भ ते पश्चिम महाराष्ट्र युवा अभिसरण (दि. १६ ते २४ जून २०११)- नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे दि. १६ ते २४ जून २०११ या दरम्यान विदर्भ ते पश्चिम महाराष्ट्र विभाग युवा अभिसरण उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. दि. १६ जून २०११ रोजी विदर्भातील सर्व युवा झुनझुनवाला धर्मशाळा, अमरावती येथे जमले. येथे विदर्भातील युवांसाठी ओळख विदर्भाची या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेच्या सुरुवातीला श्री. देवेंद्र गणवीर व श्री. महेश पवार यांनी नवमहाराष्ट्र युवा अभियानाची संकल्पना आणि अभिसरण उपक्रमा मागील भूमिका विशद केली. दुपारच्या सत्रात श्री. अविनाश सावजी यांनी ओळख विदर्भाची सत्रामध्ये युवांशी संवाद साधला. विदर्भाची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक ओळख उपस्थित युवांसमोर नव्याने मांडण्यात आली. सायंकाळी सर्व युवा पश्चिम महाराष्ट्रातील पुण्याकडे रवाना झाले. दि. १७ जून रोजी पुणे येथे निसर्ग कार्यालयात ओळख पश्चिम महाराष्ट्राची या विषयावर युवांची एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. दि. १८ ते २३ जून दरम्यान विदर्भातील युवा पश्चिम महाराष्ट्र विभागातील पुणे, सोलापूर, सांगली, सातारा या जिल्हयांमध्ये गटागटांनी रवाना झाले. पश्चिम महाराष्ट्रातील भौगोलिक, ऐतिहासिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, आर्थिक पैलूंशी युवानी ओळख करुन घेतली. या विभागातील विविध क्षेत्रांमधील मान्यवरांशी संवाद साधून जाणिवांची व्यापकता वाढविली. दि. २४ जून रोजी सर्व युवा पुणे येथे निसर्ग कार्यालयात पुन्हा एकत्र जमले. पश्चिम महाराष्ट्रातील अभिसरण उपक्रमा दरम्यान आलेल्या अनुभवांचे कथन व सादरीकरण केले. विदर्भातील युवांना समारोप समारंभात प्रशस्तीपत्र, घटनेचा सरनामा व स्थित्यंतरे हे पुस्तक भेट देऊन सन्मानित करण्यात आले.

**३.५ जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा ..... राज्यस्तरीय महाविद्यालयीन निबंध व चित्रकला (घोषवाक्यासह) स्पर्धा :-**

५.१ दि. ४ ऑगस्ट २०११ - नवमहाराष्ट्र युवा अभियान आणि उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा ... राज्यस्तरीय महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी राज्यस्तरीय निबंध व चित्रकला (घोषणावाक्यासह) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. दि. ४ ऑगस्ट २०११ रोजीपर्यंत या दोन्हीही स्पर्धांकरिता प्रवेशिका मागविण्यात आल्या होत्या. या दोन्हीही स्पर्धांना राज्यभरातून विद्यार्थी - विद्यार्थिनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

महाराष्ट्र राज्यात मुलींचा कमी होणारा जन्मदर ही गंभीर समस्या लक्षात घेता सौ. सुप्रिया सुळे यांनी जागर जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा हा उपक्रम हाती घेतला आहे. सदर स्पर्धा उच्च माध्यमिक (११ वी १२ वी) व पदवी-पदविका या दोन गटांमध्ये घेण्यात आली. चित्रकला स्पर्धेसाठी स्त्रीभ्रूण हत्या - एक अक्षम्य चूक, करुया स्त्रीजन्माचे स्वागत, हुंडाबळी व स्त्री अत्याचार - समाज व्यवस्थेला लागलेले ग्रहण हे विषय देण्यात आले. तर निबंध स्पर्धेसाठी या तीन विषयांबरोबरच स्त्रीविषयक कायदे स्त्रियांच्या संरक्षणासाठी पुरेसे आहेत काय, स्त्रियांच्या निवडणुकीतील आरक्षणाने स्त्रियांना समान संधी प्राप्त होईल का हे विषय देण्यात आले. निबंध व चित्रासोबत ४ घोषवाक्य पाठविणे बंधनकारक करण्यात आले होते. या स्पर्धेत मुंबई, विदर्भ, कोकण, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा या सहा विभागीय स्तरावर विजेते निवडण्यात आले. चित्रकला स्पर्धेत ११ वी, १२ वी गटामध्ये २० युवक-युवती, पदवी-पदविका गटामध्ये २९ युवक-युवतींनी विजेतेपद मिळविले. निबंध स्पर्धेमध्ये ११वी, १२वी गटामध्ये २१ युवक-युवती, पदवी-पदविका गटामध्ये ३० युवक-युवतींनी विजेतेपद मिळविले. या स्पर्धामधील विजेत्यांना पारितोषिक वितरण केंद्रीय कृषिमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष मा. ना. शरदराव पवार यांच्या हस्ते दि. २८ ऑगस्ट २०११ रोजी जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा .... पदयात्रेच्या समारोप कार्यक्रमामध्ये पुणे येथे करण्यात आले.

५.२ **'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा' स्त्रीभ्रूणहत्ये विरोधातील पदयात्रा व युवती परिषद दि. २५ ते २८ ऑगस्ट २०११ :-** महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात आज मुलींचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत आहे ही चिंतेची बाब आहे. महाराष्ट्रात १९९१ मध्ये दर एक हजार मुलांमागे मुलींचे प्रमाण ९४६ होते ते प्रमाण २००१ मध्ये ३३ ने कमी होऊन ९१३ झाले आणि २०११ च्या जनगणनेनुसार मुलींचे प्रमाण आणखी ३० ने कमी होऊन ते ८८३ एवढे झाले आहे. आज मुलगी जन्माला येण्याचा हक्कच हिरावून घेतला जात आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग (दुरुपयोग) करुन जन्माआधीच मुली मारल्या जात आहेत ही बाब अतिशय गंभीर आहे. त्यामुळे भविष्यात अनेक सामाजिक अडचणी निर्माण होणार आहेत.

पुरोगामी महाराष्ट्राने देशात सर्वात प्रथम म्हणजे १९८८ मध्येच लिंगनिवडीस प्रतिबंध करणारा कायदा केला होता. त्यानंतर केंद्र शासनाने २० सप्टेंबर १९९४ मध्ये हा कायदा केला. सन २००३ मध्ये या कायद्यात सुधारणा करण्यात आली. या कायद्यांतर्गत गर्भलिंग निदान करण्यावर प्रतिबंध केला आहे. फक्त कायद्याद्वारे हा प्रश्न सुटू शकेल का ? कायद्याची कठोर अंमलबजावणी तर झालीच पाहिजे. परंतु समाजाची मानसिकता वदलणे हा यावरील कायमस्वरुपी उपाय आहे म्हणूनच या संवेदनशील विषयाबद्दल, समाजातील सर्व स्तरांमध्ये जागृती व्हावी, या कायद्याची कठोर अंमल बजावणी व्हावी याकरिता यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने व प्रतिष्ठानच्या विश्वस्त सौ. सुप्रिया सुळे यांच्या संकल्पनेतून 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा' या पाच वर्षीय उपक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्र शासन तसेच केंद्र शासनाने सहकार्य केले आहे. राज्यातील अनेक मान्यवर लोकप्रतिनिधी, कलावंत यांनीही या मोहिमेला आपला पाठिंबा जाहीर केला आहे. तसेच या प्रक्रियेत इंडियन मेडिकल असोसिएशन आणि वैद्यकीय व्यावसायिकांच्या विविध संस्था यांनीही सक्रिय सहभाग घेतला. कोरो, अक्षरा, स्त्री मुक्ती संघटना, सलाम मुंबई फाऊंडेशन, महिला राजसत्ता आंदोलन, दलित महिला मंडळ (सातारा), स्माईल (पुणे), मासूम, सेहत यांचेही सहकार्य या उपक्रमास लाभले. या अंतर्गत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मगांवापासून (नायगांव, तालुका खंडाळा, जिल्हा सातारा) भव्य पदयात्रेचे आयोजन दि. २५ ते २८ ऑगस्ट २०११ या दरम्यान

नुकतेच करण्यात आले. राज्यातील हजारो युवतीं समवेत सौ. सुप्रिया सुळे यांची ही ऐतिहासिक पदयात्रा नायगांव ते पुणे अशी पार पडली. दि. २८ ऑगस्ट २०११ रोजी राज्यभरातील पाच हजारांहून अधिक युवतींच्या उपस्थितीत केंद्रीय कृषिमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष ना.श्री. शरदराव पवार यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली राज्यस्तरीय युवती परिषद संपन्न झाली.

नायगांव येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित शिल्पसृष्टीचे लोकार्पण करुन सौ. सुप्रिया सुळे यांनी जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा या उपक्रमाला सुरुवात केली. नायगांव स्त्रीभ्रूणहत्ये विरोधातील जागराने दणाणले. सावित्रीबाईंची शिल्पसृष्टी ते उद्‌घाटन समारंभाचे ठिकाण या दरम्यान महात्मा फुले व सावित्रीबाईंच्या प्रतिमेच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. यात लेझीम पथक, टाळमृदुंग वाजविणारे, गोंधळकार, भारुडकर सज्ज होते.

नायगांव गावात मुख्य रस्त्यापासून ते सातारा पुणे हायवेपर्यंत घराघरांच्या समोर सडासारवण आणि रस्त्याच्या दुतर्फा रांगोळया काढण्यात आलेल्या होत्या. त्याचबरोबर नवविचारांची गुढी प्रत्येक घरावर उभारण्यात आली होती. सावित्रीबाईंचे जन्मस्थान आणि त्या भोवतालचा सर्व परिसर स्वच्छ करुन सजविण्यात आलेला होता. सारे नायगाव चैतन्य आणि उत्साहाने न्हाऊन निघाले होते. अभिनव क्रांतीची सुरुवात आमच्या गावातून होत आहे, त्यासाठी प्रत्येकाचा सहभाग हे आपले आद्य कर्तव्य आहे असे समजून प्रत्येक गावकरी त्यात आबालवृध्द आपल्या घरातल्या एखाद्या मंगल प्रसंगी झटून कामाला लागतो त्याप्रमाणे कामाला लागले होते. यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली ती खंडाळा तालुक्याचे आमदार मकरंद पाटील, आ. शशिकांत शिंदे, जिल्हा मध्यवर्ती बँक, साताराचे चेअरमन श्री. विलासराव पाटील (वाठारकर), जिल्हा परिषद, सातारा चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. श्याम देशपांडे, जिल्हा परिषद सातार यांचे उपाध्यक्ष श्री. चंद्रकांत जाधव व नायगांवचे सरपंच श्री. राजेंद्र नेवसे यांनी प्राथमिक शाळेतील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी महापुरुष आणि विचारवंतांच्या वेषभूषेत पदयात्रचे स्वागत केले. गावचे सरपंच आणि इतर गावकरी पदयात्रा निघाल्यानंतर संपूर्ण पदयात्रेला पोचविण्यासाठी गावाच्या वेषीपर्यंत आलेले होते.

उद्‌घाटन समारंभात सार्वजनिक बांधकाममंत्री ना. श्री. छगन भुजबळ यांनी स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात कठोर कायदे करता येतील पण ज्या कायद्यांना जनमताचा पाठिंबा नाही त्या कायद्यांचा काहीही फायदा नसतो. लोकजागृती व स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात लोकशिक्षण हेच महत्वाचे साधन ठरेल असे प्रतिपादन केले. तसेच स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात अनेक वर्षे कार्य करणा-या ॲड. वर्षा देशपांडे यांनी उपस्थित युवतींना मार्गदर्शन केले. यावेळी एकाच मुलीवरती कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणा-या आदर्श मातांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार कण्यात आला. वाई तालुक्यातील अनपटवाडी ग्रामपंचायतीने जन्माला येणा-या प्रत्येक मुलीच्या नावे दहा हजार रुपयांची ठेव बँकेत ठेवण्याचा निर्णय घेतल्यामुळे ग्रामपंचायतीच्या कार्यक्रमात गौरव करण्यात आला. यावेळी स्त्री-रत्न सावित्रीबाई फुले तसेच स्त्रियांचे कायदे, आरोग्य आणि योजना या दोन पुस्तिकांचे प्रकाशन करण्यात आले.

कौन लायेगा इस देश में क्रांति, नारी शक्ती.... फूल हैं, चिंगारी हैं, हम भारत की नारी हैं... लेक वाचवा, देश वाचवा.... सावित्रींच्या लेकींनी उत्स्फूर्तपणे स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात दिलेला नारा, जोरदार घोषणांनी निर्माण झालेले चैतन्यमय वातावरण, सळसळता उत्साह आणि पुण्याच्या दिशेने पडणारी पावलं... स्त्री-जन्माचं महत्त्व सांगणारं वातावरणात पदयात्रेत सहभागी युवतींनी ही पदयात्रा म्हणजे संपूर्ण स्त्रियांच्या अस्तित्वाची लढाई आहे, अशी भावना व्यक्त केली.

घरातील हालाखीची परिस्थिती अन् बापाने कर्जाला कंटाळून केलेली आत्महत्या या परिस्थितीतही स्त्री-भ्रूणहत्ये विरोधात लोकजागृती करण्याकरिता राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या लेकीही पदयात्रेत सहभागी झाल्या होत्या. पदयात्रेत तीसहून अधिक आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या मुलींनी सहभाग घेतला. यासोबतच समाजाने उपेक्षिलेल्या, शारीरिक व्यंगामुळे इतरांपेक्षा वेगळया पडलेल्या पण जगण्याच्या जिद्दीने उभ्या ठाकलेल्या आणि आज समाजाला स्त्री-भ्रूणहत्या करु नका असा संदेश देण्यासाठी पदयात्रेमध्ये अपंग हक्क विकास मंचच्या बारा विकलांग मुली सहभागी झाल्या होत्या. संपूर्ण परदयात्रेत राज्यभरातील सुमारे आठशेहून अधिक युवतींचा सहभाग होता.

पदयात्रेत स्त्री-भ्रूणहत्येच्या विरोधात जागृती निर्माण करण्याकरिता समाजातील विविध मान्यवरही सहभागी झाले होते. यात प्रामुख्याने आदिवासी विकास मंत्री श्री. बबनराव पाचपुते, राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव, भाजपा नेते श्री. विनोद तावडे,

श्री. विकास मठकरी, सौ. सुनेत्रा पवार, सौ. शर्मिला पवार, सुनंदा पवार, शुभांगी पवार, ऋता आव्हाड, स्मृती शिंदे, डॉ. अमोल कोल्हे, भारुडकार निरंजन भाकरे आदी मान्यवरांनी सहभागी होऊन या पदयात्रेस पाठिंवा दर्शविला आणि उपक्रमाबाबत आपले विचार मांडले. माजी खा. श्रीनिवास पाटील पदयात्रेत चारही दिवस घरातील ज्येष्ठाप्रमाणे वावरत होते. पदयात्रेतील प्रत्येक मुलीला प्रोत्साहन देण्यापासून ते कात्रज घाट चढताना मुलींना चिअर-अप करण्यापर्यंत श्रीनिवास पाटील यांचा सक्रिय सहभाग होता.

पदयात्रेच्या दुस-या खेड शिवापूर येथे आयोजित सभेत श्रीमती सूर्यकांता पाटील म्हणाल्या की, स्त्रिया आज विविध क्षेत्रात आघाडीवर असून त्या पुरुषांपेक्षा अधिक क्षमतेने समाजात वावरत आहेत. स्त्रियांना सन्मान हा घरातूनच मिळत असतो त्यामुळे पुरुषांनी समान हक्क व समान अधिकार द्यायला हवेत. हजारो वर्षांपासून स्त्रिया आपली संस्कृती जतन करीत आल्या आहेत. पदयात्रेला ठिकठिकाणी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. मार्गातील गावांनी पदयात्रेचे ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करुन स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात पाठिंबा दर्शविला.

चौथ्या दिवशी दि. २८ ऑगस्ट रोजी पदयात्रा पुणे शहरातील महात्मा फुले यांच्या वाडयात पोचली. येथे डॉ. बाबा आढाव यांनी युवतींशी संवाद साधला. सौ. सुप्रिया सुळे व पदयात्रेत सहभागी युवतींनी महात्मा फुले यांच्या स्मृतींना अभिवादन केले. त्याच दिवशी पुणे शहरातील नागरिकांनीही या पदयात्रेच्या समर्थनार्थ व स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात शनिवारवाडा ते गणेश कला क्रिडा केंद्र अशी पदयात्रा काढली. पदयात्रेचे नेतृत्व ॲड. वंदना चव्हाण व श्री. अंकुश काकडे यांनी केले. पदयात्रेत सुमारे तीन हजार युवती सहभागी झाल्या होत्या. सौ. सुप्रिया सुळे यांची पदयात्रा फुलेवाडा येथून निघून श्री गणेश कला क्रीडा रंगमंच येथे पोचली. या पदयात्रेचे रुपांतर भव्य अशा राज्यस्तरीय युवती परिषदेत झाले. या प्रसंगी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसिध्द अभिनेत्री व नृत्यांगणा शर्वरी जैमनिस, गायक ऋषिकेश कामेरकर, कैलास जाधव, एंजल्स स्कूल, विद्या प्रतिष्ठान आदींनी सादरीकरण केले.

श्री गणेश कला क्रिडा रंगमंच येथे पुण्याचे महापौर श्री. मोहनसिंग राजपाल यांनी सर्वांचे स्वागत केले. या भव्य युवती परिषदेमध्ये देशाचे कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष ना. श्री. शरद पवार यांनी उपस्थित पाच हजारांहून अधिक युवतींना मार्गदर्शन केले. यावेळी विचार व्यक्त करताना ना. श्री. शरद पवार म्हणाले की, आतापर्यंत परिवर्तनाच्या विचारांचा वारसा लाभल्यामुळे राज्य कायम अग्रभागी राहिले आहे. परंतु याच राज्यात आता स्त्रीभ्रूणहत्ये सारखा अमानवी प्रकार होत असून मोठया प्रमाणात गर्भपात होत आहेत. स्त्रीभ्रूणहत्येचे प्रमाण प्रगत भागात अधिक असून त्यासाठी जागृती आणि वेळ पडल्यास स्त्रियांनी आपल्या अस्तित्वासाठी संघर्षाची तयारी ठेवावी. ना. श्री. जयंत पाटील, ना. श्री. राजेश टोपे, ना. श्रीमती फौजिया खान यांची यावेळी भाषणे झाली.

या निमित्ताने लेक वाचली, वाढली... हे जागर थीम साँग तयार करण्यात आले. श्री. दासू वैद्य यांनी हे गीत लिहिले असून उर्मिला धनगर व बेला शेंडे यांनी ते गायले आहे. तसेच चंद्रकांत कुलकर्णी यांनी या संदर्भात दिग्दर्शित केलेल्या २५ मिनिटांचा लघुपट यावेळी प्रदर्शित करण्यात आला. लघुपटाची संहिता प्रसिध्द लेखक प्रशांत दळवी यांची असून यात डॉ. अमोल कोल्हे, स्मिता तांबे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. तसेच यावेळी प्रतिष्ठानच्या वतीने तयार करण्यात आलेल्या राज्यभरातील महिलांविषयी कार्य करणा-या संस्थांची माहिती असलेल्या संवादिनी या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

महाराष्ट्र विधान मंडळातील एक अथवा दोन कन्या अपत्य असलेल्या वैद्यकीय शिक्षणमंत्री श्री. विजयकुमार गावित, राज्यमंत्री श्री. सचिन अहिर, शेकाप पक्षाचे आ. धैर्यशील पाटील, सर्वश्री जितेंद्र आव्हाड, दीपक केसरकर, लक्ष्मण जगताप, खा. संजय दिना पाटील या आमदारांचा यावेळी प्रतिष्ठाने अध्यक्ष ना. श्री. शरद पवार यांच्या हस्ते सपत्नीक सत्कार करण्यात आला. उपस्थित सर्व युवतींनी मी स्त्रीभ्रूणहत्या करणार नाही असा संकल्प केला आणि एकमेकींचा निरोप घेऊन आपापल्या गावी प्रयाण केले.

३.६ **लिंगभाव समानता राष्ट्रीय चर्चासत्र दि. ५ व ६ ऑगस्ट २०११** - नवमहाराष्ट्र युवा अभियान, आयसीआरडब्ल्यू, कोरो, टीआयएसएस यांच्या संयुक्त विद्यमाने चव्हाण सेंटर, मुंबई येथे दि. ५ व ६ ऑगस्ट २०११ या दरम्यान स्त्री-पुरुष समानता या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्राचा मुख्य विषय 'अध्ययन आणि अनुभवांचे आदानप्रदान' हा होता. या चर्चासत्रासाठी भारतातील विविध स्वयंसेवी संघटनांचे प्रतिनिधी तसेच मुंबई महानगरपालिकेच्या अनेक शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी यासह मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रवी वर्मा यांनी केले. समाजामध्ये स्त्री-पुरुष भेदभाव केला जातो. परंतु स्त्री-पुरुष समानतेविषयी विद्यार्थीदशेतच मुले व मुलींना मार्गदर्शन केले गेले तर ख-या अर्थाने समाजामध्ये लिंगभाव समानता प्रस्थापित होईल. याकरिताच 'GEMS' (Gender Equity Movement om School Project) या उपक्रमाची निर्मिती करण्यात आलेली आहे. या उपक्रमामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या ३० शाळांमधील इयत्ता ६वी व ७वीमधील विद्यार्थी विद्यार्थिनींची निवड करण्यात आलेली असल्याचे त्यांनी सांगितले.

दुस-या दिवशी दि. ६ ऑगस्ट रोजी सकाळच्या सत्रामध्ये गटचर्चा आयोजित करण्यात आली होती. या सत्रामध्ये शालेय शिक्षण राज्यमंत्री श्रीमती फौजिया खान उपस्थित होत्या. उपस्थित प्रतिनिधींची सहा गटांमध्ये विभागणी करण्यात आली. चर्चेसाठी विषय, रचना व कार्यपध्दती, समता आणि समानता, मूल्यमापन आणि नियंत्रण या विषयांवर चर्चा करण्यात आली. दुपारच्या सत्रामध्ये गोवंडीच्या शाळा क्र. १ मधील मुलांनी स्त्री-पुरुष समानतेविषयी पथनाटय सादर केले. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संयोजक यांनी मनोगत व्यक्त करतांना हा उपक्रम नागरी तसेच ग्रामीण भागातही राबविला गेला पाहिजे यावर भर दिला. चर्चासत्रामध्ये सहभागी मुख्याध्यापक, शिक्षक, विद्यार्थी तसेच समन्वयकांनी मनोगते व्यक्त केली.

३.७ **स्त्रीभ्रूणहत्येविषयी जनजागृतीसाठी अहमदनगरमध्ये रॅली दि. १२ ऑगस्ट २०११** - नवमहाराष्ट्र युवा अभियान व उन्नती फाऊंडेशन, अहमदनगर यांच्यातर्फे दि. १२ ऑगस्ट २०११ रोजी अहमदनगर शहरात स्त्रीभ्रूणहत्ये विरोधी जनजागृती करण्यासाठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. पत्रकार चौक, अप्पू हत्ती, लालटाकी, तोफखाना, बागडपट्टी, सर्जेपुरा, एम.जी. रोड, जिल्हाधिकारी कार्यालय, माणिक चौक, दाळमंडई, कापड बाजार, घासगल्ली, नेता सुभाष चौक या भागांतून पदयात्रा काढण्यात आली. पदयात्रेत विविध सामाजिक व वैद्यकीय क्षेत्रातील संघटना, क्रिडा मंडळे व शहरातील नागरिक मोठया संख्येने सहभागी झाले होते. लेक वाचवा, लेक जगवा, स्त्रीजन्माचे स्वागत करा आदी घोषणांमुळे रॅलीने लक्ष वेधून घेतले होते. पदयात्रेचा समारोप गांधी मैदान येथे चौक सभेने झाला. यावेळी पोलीस अधिक्षक श्री. कृष्णप्रकाश, मनपा आयुक्त श्री. संजय काकडे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. देविदास आठवले, डॉ. सुधा कांकरिया, डॉ. रविंद्र साताळकर, आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगेख, ॲड. शारदा लगड, श्री. गुलाबराव काळे आदींची प्रमुख उपस्थिती होती. समारोप प्रसंगी मुलीच असणा-या आणि त्यानंतर कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केलेल्या दोन कुटुंबियांचा प्रातिनिधिक स्वरुपात श्री. कृष्णप्रकाश यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच 'मी स्त्रीभ्रूणहत्या करणार नाही आणि करुही देणार नाही' अशी सामूहिक शपथ घेण्यात आली. प्रास्ताविक नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे अहमदनगर जिल्हा संघटक यांनी केले.

३.८ **राखी पौर्णिमेनिमित्त केडगाव उपनगरात (अहमदनगर) स्त्रीभ्रूणहत्ये विरोधी जनजागृती पदयात्रा दि. १३ ऑगस्ट २०११** - नवमहाराष्ट्र युवा अभियान, उन्नती फाऊंडेशन, अहमदनगर व महाराणी ताराबाई कन्या विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ ऑगस्ट २०११ रोजी केडगाव उपनगरात (अहमदनगर) राखी पौर्णिमेचे औचित्य साधून स्त्रीभ्रूणहत्ये विरोधी जनजागृती पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. अंबिकानगर, केडगाव वेस, शाहू नगर आदी भागातून ही पदयात्रा मार्गस्थ झाली. यात सुमारे ८५० युवती सहभागी होत्या. पदयात्रेचा समारोप शाहूनगर बस स्थानक परिसरात चौक सभेने झाला. यावेळी डॉ. सुधा कांकरिया म्हणाल्या की, स्त्रियांची घटती संख्या ही सार्वजनिक चिंतेची बाब झाली

आहे. अशीच परिस्थिती राहिली तर राखी बांधण्यासाठी आगामी काळात बहीण शोधावी लागेल. तेव्हा स्त्रीजन्माचे स्वागत करुन बहिणीला जगण्याची संधी द्या. यावेळी नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे अहमदनगर जिल्हा संघटक यांनी पदयात्रे मागील भूमिका विशद केली. प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती प्रमिला कार्ले यांनी केले. आभार श्रीमती छाया शेळके यांनी मानले.

३.९ **युवा स्वातंत्र्यज्योत रॅली दि. १४ ऑगस्ट, २०११** - नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे रविवार दि. १४ ऑगस्ट २०११ रोजी राज्यातील विविध शहरांमध्ये युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. मुंबई, नवी मुंबई, बदलापूर, नाशिक, सोलापूर, औरंगाबाद, बुलढाणा, नागपूर, अंबाजोगाई, यवतमाळ, नांदेड, चिपळूण, लांजा आदी ठिकाणी दि. १४ ऑगस्ट २०११ रोजी मध्यरात्री रॅली काढण्यात आली. सर्वच ठिकाणी रॅलीला युवांनी, नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

३.१० **स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात चित्रप्रदर्शन (अहमदनगर), दि. १६ व १७ ऑगस्ट २०११** - नवमहाराष्ट्र युवा अभियान व उन्नती फाऊंडेशन, अहमदनगर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १६ व १७ ऑगस्ट रोजी अहमदनग नगरपालिकेच्या सभागृहात दोन दिवसीय स्त्रीभ्रूणहत्ये विरोधी जनजागृतीसाठी चित्रप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनाचे उद्घाटन महापौर मा. शीला शिंदे यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमहापौर मा. गीतांजली काळे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. देविदास आठवले, मनपा आरोग्य अधिकारी डॉ. अनिल बोरगे, आयएमएचे अध्यक्ष डॉ. रविंद्र साताळकर, श्री. गुलाबराव काळे, डॉ. सुधा कांकरिया, मा. निर्मला मालपाणी आदींची उपस्थिती होती. सदर प्रदर्शनास शहरातील १७ शाळांमधील सुमारे १६०० विद्यार्थी-विद्यार्थिनींनी भेट दिली. तसेच शहरातील नागरिकांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

३.११ **जागर महाविद्यालयीन संवाद कार्यक्रम (औरंगाबाद) दि. २९ सप्टेंबर, २०११**- नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्यावतीने देवगिरी केला महाविद्यालय, औरंगाबाद येथे दि. २९ सप्टेंबर रोजी जागर हा जाणिवांचा महाविद्यालयीन संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमास प्राचार्य प्रदीप जब्दे यांची उपस्थिती होती. यावेळी स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात व आगामी जागर हा जाणिवांचा पदयात्रेसंदर्भात माहिती देणारे प्रा. महेश अचिंतलवार यांचे व्याख्यान झाले. व्याख्यानानंतर चंद्रकांत कुलकर्णी दिग्दर्शित स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात जनजागृती करणारा लघुपट दाखविण्यात आला. तसेच नायगांव ते पुणे पदयात्रेचे फोटो स्लाईड शोद्वारे दाखविण्यात आले. कार्यक्रमाच्या आवारात स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात जनजागृती करणारे पोस्टर्सचे प्रदर्शन उभारण्यात आले होते. या पोस्टर्स प्रदर्शनाला विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमासाठी सुमारे २०० विद्यार्थी - विद्यार्थिनीनी उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने आयोजित जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा .... या उपक्रमांतर्गत सिंदखेडराजा ते औरंगाबाद पदयात्रेचे अयोजन करण्यात आले होते. या उपक्रमाची माहिती देण्याकरिता व आगामी पदयात्रेसंबंधी तरुण वर्गाचा सहभाग व सहकार्य वाढविण्यासाठी विविध औरंगाबाद, बुलढाणा, जालना आदी शहरांमध्ये जागर महाविद्यालयीन संवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. जागर हा जाणिवांचा उपक्रम व स्त्रीभ्रूणहत्या या सामाजिक समस्येसंदर्भात व्याख्यान व गटचर्चा, माहितीपट व पोस्टर्स प्रदर्शने असे या कार्यक्रमाचे स्वरुप आहे.

३.१२ **यशवंत युवा फेलोशिप** : नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे निसर्ग व मानवी जीवनामध्ये भेडसावणा-या विविध मुलभूत प्रश्नांची तीव्रता जाणून सामाजिक क्षेत्रात रचनात्मक कार्य सुरु केलेल्या युवांना प्रोत्साहन, तज्ज्ञांचे मार्गदर्शन व आर्थिक पाठबळ देण्याकरिता २०१० सालापासून यशवंत युवा फेलोशिप हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. उपक्रमाच्या दुस-या वर्षामध्ये वेगवेगळया विभागातील स्थानिक सामाजिक संस्थांना बरोबर घेऊन फेलोशिप उपक्रम राबविला जात आहे. यानुसार कोकण, उत्तर महाराष्ट्र व विदर्भ या तीन विभागांमधून एकूण चार युवा कार्यकर्त्यांची १ वर्षाकरिता फेलो म्हणून निवड केलेली आहे. सदर

फेलोंनी या एका वर्षामध्ये निश्चित ध्येय ठेवून त्या त्या संस्थांतर्गत त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये फेलोंकरिता नियमितपणे प्रशिक्षण व अभ्यासदौरेही आयोजित केले जाणार आहेत.

या फेलोशिप अंतर्गत कोकण विभागातील साहिला कुडाळकर (सहभागी संस्था - सहयाद्री निसर्ग मित्र, चिपळूण) यांचा विषय-जैव विविधता संवर्धन (स्थानिक समाजघटकांच्या सहभागाने चिपळूण भागातील जैव विविधतेचे संवर्धन, वेगवेगळया कृतिकार्यक्रमांच्या साहाय्याने जैव प्रजातींचे संरक्षण आणि सहभागी समाजघटकांना त्याचा लाभ मिळवून देणे) हा असून पर्यावरण तज्ज्ञ श्री. भाऊ काटदरे हे त्यांचे मेंटॉर म्हणून कार्य पाहत आहेत. उत्तर महाराष्ट्र विभागातील श्री. अजय होले (प्रगती अभियान, नाशिक) यांचा विषय-रोजगार हमी योजना प्रभावी अंमलबजावणी (रोहयो तरतुदी, वैशिष्ट्ये, यंत्रणा, अंमलबजावणीचे तंत्र, येणा-या अडचणी तसेच बांधकामासंबंधी घटकांचा अभ्यास करणे आणि रोहयोच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी कृतिकार्यक्रम आखणे) हा असून त्यांचे मेंटॉर म्हणून श्रीमती अश्विनी कुलकर्णी कार्य पाहत आहेत. विदर्भ विभागातून श्री. लालसू नागोटी (सहभागी संस्था - सृजन, नागपूर) यांचा विषय-आदिवासी वन हक्क कायदा (या कायद्यातील तरतुदी, याची यंत्रणा, अंमलबजावणी, केसेस, सध्याची जनजागृती अभ्यासणे आणि याविषयी पुढाकार घेऊन कृतिकार्यक्रम आखणे) हा असून श्री. अजय डोळके हे त्यांचे मेंटॉर म्हणून कार्य पाहत आहेत. विदर्भ विभागातील श्रीमती स्नेहा धांडे (सहभागी संस्था - धरामित्र, अमरावती) यांचा विषय जंगली भाज्यांचे (रानभाज्या) संवर्धन (स्थानिक समाजघटकांच्या सहभागाने मेळघाट परिसरातील जंगली भाज्यांचे संवर्धन, वेगवेगळया कृतिकार्यक्रमांच्या साहाय्याने या जैव प्रजातींचे दस्तावेजीकरण, प्रयोगशालीय पृथःकरण करुन पोषणमूल्य ठरविणे आणि सहभागी समाजघटकांना त्याचा लाभ मिळवू देणे) हा असून पर्यावरण तज्ज्ञ श्री. तारक काटे हे त्यांचे मेंटॉर म्हणून कार्य पाहत आहेत.

३.१३ **ना. श्रीमती फौजिया खान यांची अहमदनगर जिल्हयातील ग्रामपंचायतीना भेट** : स्त्रीभ्रूणहत्ये विरोधात ग्रामसभांमध्ये ठराव मंजूर (दि.२ ऑक्टोबर २०११) नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या पुढाकाराने अहमदनगर जिल्हयातील सारोळा कासार ग्रामपंचायतीच्यावतीने गांधी जयंतीनिमित्त दि. २ ऑक्टोबर २०११ रोजी जाहीर विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. प्रतिष्ठानच्या विश्वस्त सौ. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा .... या उपक्रमाच्या जनजागृतीकरिता ग्रामीण भागात या ग्रामसभांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आरोग्य व शिक्षण राज्यमंत्री ना. श्रीमती फौजिया खान, आदिवासी विकास मंत्री ना. श्री. बबनराव पाचपुते, अहमदनगर जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. सिताराम देशमुख, सरपंच श्रीमती अर्चना धामणे, उपसरपंच श्री. गुलाबराव काळे, यशस्विनी अभियानाच्या उत्तर महाराष्ट्र समन्वयिका श्रीमती निर्मला मालपाणी, नगरसेविका श्रीमती क्रांतिकला अनुभुले, परिक्रमाच्या श्रीमती प्रतिभा पाचपुते, श्रीमती शारदा लगड, श्री. हानिफ जरिवाला यांसह महिला व बालकल्याण, आरोग्य व शिक्षण विभागाचे अधिकारी, ग्रामस्थ आदी यावेळी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

यावेळी ना. श्रीमती फौजिया खान म्हणाल्या की, ग्रामपंचायत व ग्रामसभा हे पंचायतराज व्यवस्थेतील अत्यंत महत्वपूर्ण असे घटक आहेत. तेव्हा प्रत्येक गावाने याविषयीची चळवळ गावागांवामधून हाती घेऊन समाजाची मानसिकता बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. गांवामधील आंगणवाडी सेविका व प्राथमिक आरोग्य केंद्राच्या आरोग्य सेविका यांचाही याकामी एक सक्षम यंत्रणा म्हणून सहभाग घेणे गरजेचे आहे. या दोन घटकांनी समुपदेशनाद्वारे मुलींच्या जन्माचे महत्व गांवक-यांना पटवून द्यायला हवे. ना. श्री. पाचपुते म्हणाले की, महिला बचतगटांच्या माध्यमातून आज मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती झाली आहे. महिला आता स्वावलंबी झाल्या असून सन्मानाने जगत असल्याचे चित्र आहे. तेव्हा महिला बचतगटानेही मुली वाचविण्यासाठी समाजामध्ये जनजागृती केली पाहिजे. यासाठी सारोळा कासार ग्रामपंचायतीने घेतलेला पुढाकार अभिनंदनीय असून याचे अनुकरण इतर ग्रामपंचायतींनी करावे असे त्यांनी आवाहन केले.

या जाहीर विशेष ग्रामसभेत उपसरपंच श्री. गुलाबराव काळे यांनी गावात स्त्रीभ्रूणहत्ये विरोधी जनजागृती अभियान

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या साहाय्याने राबविण्याचा ठराव ग्रामस्थांसमोर मांडला. सदर ठरावास श्री. संजय धामणे यांनी अनुमोदन दिले. उपस्थित सुमारे तीन हजार ग्रामस्थांनी दोन्ही हात उंचावून ठरावास मंजुरी देत टाळयांच्या कडकडात ठरावाचे स्वागत केले. यावेळी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या पुढाकाराने सारोळा कासार ग्रामपंचायतीच्यावतीने एकूण निधीपैकी १० टक्के निधी महिला व बाल विकासासाठी राखीव ठेवण्याबाबतचा निर्णय यावेळी घेण्यात आला. या अंतर्गत ना. श्रीमती फौजिया खान यांच्या हस्ते पहिल्या किंवा दुस-या स्त्री-अपत्यास जन्म देणा-या गावातील १२ मातांना त्यांच्या मुलींच्या नावे रोख रक्कम रु.२,०००/- चा धनादेश वीस वर्षांच्या मुदत ठेवीसाठी देण्यात आला. त्याचबरोबर गावातील ज्या जोडप्यांना एक किंवा दोन स्त्री अपत्य आहेत आणि त्यावर त्यांनी कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया केली आहे अशा ९ कुटुंबांचा यावेळी ना. श्री. बबनराव पाचपुते यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. ग्रामसभेपूर्वी स्त्रीभ्रूणहत्ये विरोधी जनजागृती पदयात्रा व पथनाटय आयोजित करण्यात आले.

तत्पूर्वी ना. श्रीमती फौजिया खान यांनी नगर तालुक्यातील अरणगाव, खंडाळा, अकोळनेर व सोनेवाडी या गांवाना भेटी दिल्या. या भेटी दरम्यान प्रत्येक गांवातील ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात गावाचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, तलाठी व ग्रामस्थांशी ना. श्रीमती फौजिया खान यांनी अनौपचारिक संवाद साधून यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्यावतीने विश्वस्त सौ. सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित स्त्रीभ्रूणहत्येविरोधी अभियानात सहभागी होण्याची विनंती केली. या दरम्यान प्रतिष्ठानच्यावतीने तयार करण्यात आलेला ठरावाचा नमुना सरपंचांकडे सुपूर्द करण्यात आला. तसेच उपरोक्त सर्वच ग्रामपंचायत निधीतून स्त्री अपत्यास जन्म दिलेल्या २३ मातांच्या नांवे रु.२,०००/- रकमेचा धनादेश मुलींच्या नांवे वीस वर्षांच्या मुदतठेव पावती करण्यासाठी ना. श्रीमती फौजिया खान यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा ..... उपक्रमांतर्गत अहमदनगर व पारनेर तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीना लेखी पत्र लिहून दि. २ ऑक्टोबर रोजी आयोजित ग्रामसभेत स्त्रीभ्रूणहत्येविरोधी जनजागृती अभियान राबविण्यासंदर्भात ठराव मंजूर करावा असे आवाहन करण्यात आले. यास प्रतिसाद देत नगर तालुक्यातील ६२ तर पारनेर तालुक्यातील ७९ ग्रामपंचायतीनी तसे ठराव मंजूर केले आहेत.

३.१४ **युथ फॉर पीस सायकल रॅली समारोप, दि. २ ऑक्टोबर २०११-** युथ फॉर पीस व नवमहाराष्ट्र युवा अभियानाच्या संयुक्त विद्यमाने सेंद्रीय शेती जनजागृतीकरिता सेवाग्राम आश्रम, वर्धा ते यशवंतराव चव्हाण प्रतिठान, मुंबई अशी सायकल यात्रा आयोजित करण्यात आली. या यात्रेत १५ युवक - युवती सहभागी झाल्या होत्या. या सायकल रॅलीचा समारोप दि. २ ऑक्टोबर रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या सांस्कृतिक सभागृहामध्ये करण्यात आला. नवमहाराष्ट्र दिवाळी अंक स्पर्धा निवड प्रक्रिया यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आयोजित नवमहाराष्ट्र दिवाळी अंक स्पर्धेकरिता निवड प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली आहे. स्पर्धेकरिता विविध दिवाळी अंक प्राप्त झाले असून त्याची छाननी करण्यात येत आहे. यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धा निवड प्रक्रिया यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आयोजित यशवंतराव चव्हाण महाविद्यालयीन नियतकालिक स्पर्धेकरिता निवड प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली आहे. स्पर्धेकरिता विविध महाविद्यालयांचे नियतकालिक अंक प्राप्त झाले असून त्याची छाननी करण्यात येत आहे.

३.१५ **अभिसरण २१ ते २९ डिसेंबर २०११ खान्देश ते कोकण** : विभागीय केंद्र, नाशिक येथे श्री. विश्वास ठाकूर व प्रा. देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. अमित नागरे यांनी अभिसरण उपक्रमाबद्दल माहिती दिली. अभिसरणाच्या पहिल्या दिवशी पनवेलला पोहोचल्यानंतर युसूफ अली सेंटरला भेट दिली, त्यानंतर पर्यावरण तज्ज्ञ श्री. पार्थ बापट यांच्याशी भेट घेतली. एकूण ३५ युवक युवतींना या अभिसरणांमध्ये भाग घेतला. यामध्ये ७-७ चे गट तयार करण्यात आले व गटप्रमुख नेमून नियोजित कार्यक्रम झाले.
दि. २९ डिसेंबर रोजी नाशिक येथील विभागीय केंद्रात या अभिसरण उपक्रमाची सांगता झाली. या कार्यक्रमा मध्ये प्रत्येक गटाने

आपले अनुभव सर्वांसमोर मांडल. कोकण शेतीचा विकास आपल्या आदिवासी भागात नक्कीच करु अशा प्रतिक्रिया सहभागी युवकांनी दिल्या.

## ९.४ कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम :-

१९८७ च्या विधी सेवा प्राधिकरण अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेली मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना राबविण्याचे काम यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मार्फत केले जाते. या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिष्ठानने 'यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम' या विभागाची निर्मिती केली आहे. या विभागामध्ये अंदाजे ३५ वकील व समाजसेवक काम करीत असून ते आपली सेवा या योजनेसाठी देत आहेत.

४.१ **फोरममार्फत सर्वसाधारणपणे खालील प्रकारचे काम केले जाते :-**

१. समाजातील गोर-गरीब व तळागाळातील लोकांना कसल्याही प्रकारचा भेदभाव न करता मोफत तोंडी सल्ला देणे.
२. प्रसंगी गुंतागुंतीच्या प्रश्नांसंबंधी सखोल अभ्यास करुन गरजू लोकांना कायदेविषयी सल्ला देणे.
३. काही वेळा पत्रव्यवहाराद्वारे गरजू लोकांना कायदेविषयक सल्ला देणे.
४. पक्षकारांच्या तंटयामध्ये सामोपचाराने तडजोड घडवून आणणे.
५. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यांमध्ये सुधारणा सूचविणे किंवा नवीन कायद्याचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
६. विधी विषयामध्ये संशोधन करुन प्रचलित कायद्यानुसार बनविण्यात आलेल्या नियमांमध्ये सुधारणा सुचविणे किंवा नवीन नियमांचे प्रारुप तयार करुन वैधानिक प्रस्ताव राज्य शासनाला किंवा केंद्र शासनाला पाठविणे.
७. कायद्यांची विशेष माहिती करुन देण्यासाठी तज्ज्ञांची विशेष व्याख्याने आयोजित करणे.
८. सामान्य लोकांना कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी (Legal Awareness) विधी साक्षरता कार्यशाळांचे आयोजन करणे.
९. विधी शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी मूट कोर्ट स्पर्धा, निबंध स्पर्धा व वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करणे. तसेच अशा विद्यार्थ्यांसाठी वकिलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर परिसंवादांचे आयोजन करणे.
१०. न्यायालयामध्ये मराठी भाषेचा जास्तीत जास्त वापर होण्यासाठी प्रयत्न करणे.

४.२ **फोरमच्या बैठका** :- कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजनेच्या अंमलबजावणीबाबत विचार करुन धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी झालेल्या कार्यक्रमांचा आढावा घेण्यासाठी, पुढील कार्यक्रमांची आखणी करण्यासाठी आणि कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी दरमहा दुस-या शुक्रवारी फोरमच्या मासिक बैठका घेतल्या जातात. १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ या आर्थिक वर्षामध्ये फोरमच्या १२ मासिक बैठका झाल्या. १२ बैठकीमध्ये एकूण अंदाजे १७५ विषयांसंबंधी चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले. या बैठकीना एकूण १३४ सदस्य उपस्थित होते.

४.३ **फोरमच्या उपसमित्या** :- वेळोवेळी विविध विषयांचा सखोल अभ्यास करण्यासाठी फोरमच्या उपसमित्या घटित केल्या जातात. या समित्यामध्ये सक्रीय सदस्यांचा समावेश केला जातो. अशा उपसमित्यांनी दिलेल्या अहवालानुसार फोरमचे निर्णय घेण्यात येतात.

४.४ **कायदेविषयक सल्ला केंद्र** :- गोरगरीब व गरजू लोकांना कायदेविषयक तोंडी सल्ला देण्यासाठी दर शुक्रवारी सायंकाळी ५.३० च्या नंतर प्रतिष्ठानच्या ग्रंथालयामध्ये कायदेविषयक मोफत सल्ला केंद्र चालविले जाते. गेल्या आर्थिक वर्षामध्ये सल्ला केंद्राच्या एकूण ४८ बैठका झाल्या. या बैठकामध्ये एकूण ८६ लोकांना (महिला व पुरुष) तोंडी सल्ला देण्यात आला. सल्ल्याचे

विषय अंदाजे विवाह, घटस्फोट, हुंडा, पोटगी, वारसा हक्क, भागिदारी, कामगार कायदा, माहितीचा अधिकार, सेवा नियम, सहकारी कायदा, पंजीकरण, मुद्रांक, फौजदारी, कौटुंबिक अत्याचार, ग्राहक संरक्षण, भाडे नियंत्रण, मोफा कायदा, गृहनिर्माण या विषयासंबंधी होते. आपली प्रकरणे न्यायालयामध्ये चालविण्यासाठी मोफत वकीलाची सेवा मागणा-या लोकांना संबंधित विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठविण्यात आले.

४.५ **मोफत समुपदेशन व तडजोड केंद्र** :- दर मंगळवारी सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळांत समुपदेशन व समेट केंद्राचे आयोजन केले जाते. दोन वादग्रस्त पक्षकारांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये तडजोड घडवून आणण्याचा प्रयत्न या केंद्रामध्ये केला जातो. या कामाला गती देण्यासाठी विशेष प्रयत्न चालू आहेत.

**आपल्या कायद्याची माहिती करुन घ्या (Know your Law Lecture Series)** :- या व्याख्यानमाले अंतर्गत दरमहा किंवा तीन महिन्यांतून एकदा कायदे पंडितांच्या विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात येते. सध्या इमारतींचे पुनर्विकास व माहितीचा अधिकार या कायद्यावर व्याख्याने आयोजित करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

४.६ **वकीलांची व्यावसायिक नीतिमत्ता या विषयावर चर्चासत्र** :- विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबविले जातात. त्यापैकी वकीलांच्या व्यावसायिक नीतिमत्ता (Professional Ethics of Lawyers) या विषयाबाबत जाणीव करुन देण्यासाठी चर्चासत्राचे आयोजन केले जाते. विधी शाखेतील विद्यार्थ्यांना याचा चांगला उपयोग होतो. सध्या फोरम व न्यू विधी महाविद्यालय, माहिम येथे अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे प्रयत्न चालू आहेत.

४.७ **विधी साक्षरता कार्यशाळा** :- लोकांना सामाजिक किंवा त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधीत असलेल्या कायद्यांची माहिती करुन देण्यासाठी विविध प्रकारच्या विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. यासाठी समाजाच्या वेगवेगळया घटकांसाठी वेगवेगळे प्रकल्प तयार करण्यात आले आहेत. उदाहरणार्थ - पौगंडावस्थेतील मुले व मुली, महाविद्यालयीन विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला, सहकारी गृहनिर्माण संस्थांचे सदस्य, सार्वजनिक न्यासाचे विश्वस्त, सार्वजनिक संस्थांचे सदस्य आणि सर्वसामान्य जनता इत्यादी घटकांसाठी विधी साक्षरता कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. या वर्षात खालीलप्रमाणे कार्यक्रम झाले.

(१) फोरम व मैत्री संस्था व सावली शिक्षण प्रकाशन मंडळ आणि युसूफ मेहरअली सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने जगदीश अजमेरा रेल्वे सभागृह, ग्रॅन्ट रोड (पश्चिम), मुंबई येथे महिला व पुरुषांसाठी रविवार दिनांक ३१ जुलै, २०११ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. १०० पेक्षा जास्त स्त्री व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते.

(२) फोरम व स्त्री मुक्ती संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने सिडको कम्युनिटी सेंटर, सेक्टर नं. ३, वाशी, नवी मुंबई येथे महिला व पुरुषांसाठी रविवार दिनांक ७ ऑगस्ट, २०११ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. १०० पेक्षा जास्त स्त्री व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते.

(३) फोरम व पंचायत समिती, उरण यांच्या संयुक्त विद्यमाने पंचायत समिती कार्यालय, उरण, नवी मुंबई येथे महिला व पुरुषांसाठी रविवार दिनांक २१ ऑगस्ट, २०११ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. १०० पेक्षा जास्त स्त्री व पुरुष कार्यक्रमाला उपस्थित होते.

(४) फोरम व बोधिसत्व प्रतिष्ठान, नालासोपारा (पूर्व), जिल्हा ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने त्या संस्थेच्या सभागृहामध्ये महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रविवार दिनांक ९ ऑक्टोबर, २०११ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. श्री. संदीप जाधव हे समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुले व मुली) कार्यक्रमाला उपस्थित होते.

(५) फोरम व रोटरी क्लब ऑफ लिंक टाऊन, ऐरोली, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी (मुले व मुली) त्या संस्थेच्या ऐरोली येथील सभागृहामध्ये रविवार दिनांक १९ ऑक्टोबर, २०११ रोजी (सकाळी १० ते

सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. समारंभाचे अध्यक्ष म्हणून डॉ. प्रकाश देशमुख हे उपस्थित होते. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी कार्यक्रमाला उपस्थित होते.

(६) फोरम व केशव गोरे स्मारक ट्रस्ट, गोरेगांव, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुषांसाठी त्यांच्या गोरेगांव येथील सभागृहामध्ये रविवार दिनांक १३ नोव्हेंबर, २०११ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला १५० पेक्षा जास्त स्त्री व पुरुष उपस्थित होते. सामान्य लोकांच्या जीवनाशी निगडीत असलेल्या कायद्यासंबंधी ७ व्याख्याने देण्यात आली.

(७) फोरम व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी, तालुका शहापूर, जिल्हा ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने त्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी त्या महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये रविवार दिनांक २० नोव्हेंबर, २०११ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुले व मुली) कार्यक्रमाला उपस्थित होते.

(८) फोरम व कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, वाशी, नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी त्या महाविद्यालयाच्या सभागृहामध्ये रविवार दिनांक १८ डिसेंबर, २०११ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. १०० पेक्षा जास्त विद्यार्थी (मुले व मुली) कार्यक्रमाला उपस्थित होते.

(९) फोरम व मैत्री संघटना, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महिला व पुरुषांसाठी जगदीश अजमेरा रेल्वे सभागृह, ग्रॅन्ट रोड (पश्चिम), मुंबई येथे रविवार दिनांक २५ डिसेंबर, २०११ रोजी (सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत) एक दिवशीय विधी साक्षरता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

४.८ **शपथविधी** :- वर दर्शविलेल्या सर्व विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये उपस्थित सर्व अविवाहित तरुण तरुणींना आपल्या विवाहाच्या वेळी हुंडा न घेण्यासंबंधी व हुंडा न देण्यासंबंधी शपथा घेतल्या. तसेच भारतीय संविधानातील नागरिकांच्या मुलभूत कर्तव्य पालनासंबंधी सर्व उपस्थित स्त्री पुरुष व विद्यार्थ्यांनी शपथा घेतल्या. त्याचप्रमाणे संविधानाच्या प्रास्ताविकेचे सांघिक वाचन करण्यात आले.

४.९ **व्याख्यात्यांचे पॅनेल** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये वेगवेगळया कायद्यासंबंधी व्याख्याने देण्यासाठी फोरमने नामवंत वकील, प्राध्यापक, प्राचार्य व विधीज्ञ यांची एक तालीका (पॅनेल) बनविले आहे. त्यामध्ये पुढील मान्यवरांचा समावेष होता. (१) सर्वश्री म. बा. पवार, (२) निलेश पावसकर, (३) नारायण राजाध्यक्ष, (४) प्रमोद ढोकळे, (५) हेमंत केंजाळकर, (६) अजय केतकर, (७) जगन्नाथ पाटील, (८) प्रकाश देशमुख, (९) भूपेश सामंत व (१०) श्री. दिलीप तळेकर.

४.१० **निबंधांना बक्षिसे** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये भाग घेणा-या विद्यार्थ्यांसाठी फोरमची एक खास योजना आहे. त्या योजनेनुसार झालेल्या कार्यशाळेबाबत अथवा कार्यशाळेत शिकविण्यात आलेल्या एका किंवा अनेक विषयाबाबत विद्यार्थ्यांना निबंध लिहिता येतात व त्या निबंधाच्या गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या स्वरुपात बक्षिसे दिली जातात.

४.११ **कार्यशाळेमध्ये शिकविलेले कायदे** :- विधी साक्षरता कार्यशाळेमध्ये अंदाजे ५० ते ६० कायद्यासंबंधी माहिती करुन देण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील कायद्यांचा समावेश होता. (९) (१०) (११) (१२) मुस्लीम कायदा, (१३) पोटगी संबंधीचे कायदे, (१४) महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकाबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री, व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३, (१५) हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६, (१६) हिंदू दत्तक व निर्वाह अधिनियम १९५६, (१७) संपत्ती हस्तांतरण अधिनियम १८८२, (१८) विशेष विवाह अधिनियम १९५४, (१९) बाल विवाह बंदी अधिनियम २००५, (२०) महाराष्ट्र विवाह मंडळ नियमन व विवाह नोंदणी अधिनियम १९८८, (२१) न्यायालयांची बहुस्तरीय व्यवस्था (तालुका न्यायालयापासून सर्वोच्च न्यायालयापर्यंतची माहिती), (२२) स्त्रियांचे असभ्य प्रतिरुपण (प्रतिबंध) अधिनियम १९८६, (२३) विकलांग व्यक्तीसाठी (समान संधी, हक्काचे संरक्षण आणि पूर्ण सहभाग) अधिनियम १९९५, The Persons with Disabilities (Equal opportunities, Protection of Rights and Full

Participation) Act, 1995 (२४) स्वमग्न असलेल्या, मस्तिष्क घात झालेल्या, मतिमंद व बहुविध विकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय न्यास अधिनियम १९९९, (The National Trust for Welfare of Persons with Autism, Cerebral Palsy, Mental Retardation and Multiple Disabilities Act, 1999) (२५) अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम, १९५६ (The Immoral Traffic (Prevention) Act, 1956 (२६) राष्ट्रप्रतिष्ठा अवमान प्रतिबंध अधिनियम १९७१, (२७) महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४, (२८) महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम १९८७, (२९) महाराष्ट्र रँगिंग प्रतिबंध अधिनियम १९९९, (३०) महाराष्ट्र विद्यापीठाच्या, मंडळाच्या व इतर विनिर्दिष्ट परीक्षांमध्ये होणा-या गैरप्रकारास प्रतिबंध करण्याबाबत अधिनियम १९८२, (३१) मुंबई विद्यापीठाचे अध्यादेश क्रमांक २२० (अनुचित प्रथा प्रतिबंध), (३२) मुस्लिम स्त्रिया (घटस्फोटानंतर अधिकार संरक्षण) अधिनियम १९८६, (३३) महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन आणि पुनर्रविकास) अधिनियम १९७१, (३४) भारतीय वारसा हक्क कायदा १९२५, (३५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, (३६) मुंबई मुद्रांक कायदा १९५८, (३७) गृहनिर्माण संस्थांचे विनियम, (३८) अनुसूचित जाती आणि जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, (३९) मुस्लिम व्यक्ती विषयक विधी (शरियत) प्रयुक्ती अधिनियम १९३७, (४०) नागरी हक्क संरक्षण अधिनियम १९५५, (४१) भारतीय मुद्रांक कायदा १८९९, (४२) भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, (४३) प्रसूती विषयक लाभ अधिनियम १९६१, (४४) सोसायटी नोंदणी अधिनियम १८६०, (४५) अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५, (४६) मोटर वाहन अधिनियम १९८८, (४७) जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९, (४८) मानवी हक्क संरक्षण अधिनियम १९९३, (४९) महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम १९९९, (५०) महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, (५१) माता पिता व ज्येष्ठ नागरिक यांची पोटगी व कल्याण अधिनियम २००७, (५२) मुंबई पोलीस अधिनियम, १९५०.

**९.५ रंगस्वर - सांस्कृतिक विभाग :-** प्रतिष्ठानच्या रंगस्वरतर्फे नाटय, चित्रपट, गायन आदि कार्यक्रम होतात. रंगस्वरची वार्षिक वर्गणी पती-पत्नीसाठी रु. २०००/-, वैयक्तिक रु. १२००/-, अपंगासाठी रु. ५००/- भरुन रंगस्वरचे सभासद होता येते. रंगस्वरच्या सदस्यांना तसेच प्रतिष्ठानच्या आजीव सदस्यांनाही कार्यक्रमाचा आस्वाद घेता येतो. सांस्कृतिक विभागासाठी सरचिटणीस श्री. शरद काळे, उपाध्यक्ष डॉ. रविंद्र बापट यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे नियोजन करण्यात येते. श्री. विजय देसाई, व्यवस्थापक, सभागृह कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रयत्नशील असतात.

जानेवारी २०१२ मध्ये 'यशवंत आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले. यशवंतराव चव्हाण सेंटरच्या मुंबई येथील सभागृहात विविध सांस्कृतिक कार्यक्रम रंगस्वरच्या वतीने नियमितपणे सादर केले जातात. सर्व सभासद व रसिकांसाठी विनामूल्य प्रवेश दिला जातो. रंगस्वरसाठी सभासद नोंदणी सुरु आहे.

**९.६ सृजन :-** यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या सृजन विभागातर्फे शालेय विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास आणि विविध कलांची तोंडओळख करुन त्याचे विद्यार्थी जीवन समृध्द व्हावे याकरिता सृजनचा हा अभिनव उपक्रम चालविण्यात येतो. सर्जनशीलतेचा अविष्कार विद्यार्थ्यांसोबत घडवून त्यांच्यामधील सुप्त कलागुणांना वाव देण्याचा हा प्रयत्न आहे. सृजनची संकल्पना आणि संयोजन मा. सौ. सुप्रियाताई सुळे यांची असून यामध्ये सुप्रसिध्द चित्रकार श्री. डग्लस जॉन आणि सुलेखनकार श्री. शुभानंद जोग सन्माननीय सल्लागार म्हणून काम पहातात. श्री. विद्याधर खंडे या कार्यशाळेचे समन्वयक म्हणून काम करीत आहेत.

एप्रिल २०११ ते मार्च २०१२ या कालावधीत सृजनमार्फत विविध विषयांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे. मार्च ते मे या महिन्यात परिक्षेचा आणि सुट्टीचा कालावधी असल्यामुळे सृजनची कार्यशाळा जून महिन्यात आयोजित करण्यात येते.

१२ जून २०११ रोजी श्री. अनंत देशमुख यांनी ॲनिमेशन या विषयावर आयोजित केलेल्या कार्यशाळेत ॲनिमेशन फिल्म

कशी तयार करतात यांचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले.

३ जुलै २०११ रोजी नाटयनुभव श्री. आशुतोष आपटे यांनी या कार्यशाळेत मुलांचे वेगवेगळे ग्रुप तयार करुन त्यांच्याविविध भूमिमा करुन घेतल्या. ७ ऑगस्ट २०११ रोजी श्रीमती स्वाती गांगल यांनी क्ले वर्क या कार्यशाळेत मुलांना मातीपासून विविध प्रकारची वस्तू बनविण्याचे प्रशिक्षण दिले. ४ सप्टेंबर २०११ रोजी श्रीमती सम्यका अहिरे यांनी मुलांना आरोगामी शिकवली यामध्ये कागदाचा वापर करुन वस्तूंची निर्मिती कशी करता येईल हे शिकविले.

२ ऑक्टोबर २०११ रोजी नागरिक संरक्षण दला विषयी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेत नैसर्गिक आपत्तीच्या काळात नागरिकांनी कोणत्याही संकटाला धीराने कसे तोंड द्यावे हे गोष्टीरुपाने, फिल्म दाखवून आणि प्रात्यक्षिकाद्वारे दाखविण्यात आले.

६ नोव्हेंबर २०११ रोजी नोव्हेंबर महिन्यात प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे यांनी वाचन कसे करावे, मुलांनी सामान्यज्ञान कसे वाढवावे याची माहिती मुलांना रंजकपणे सांगितली. मुलांशी विविध विषयांवर गप्पा गोष्टी केल्या.

सृजनची वार्षिक कार्यक्रमाची सांगता ४ डिसेंबर २०११ रोजी श्री. राजीव राणे यांच्या कार्यक्रमाने करण्यात आली. या कार्यक्रमात जादूचे प्रयोग मुलांकरिता सांघिक कार्यक्रम घेतले. या कार्यक्रमात मुलांचे छोटे छोटे गट तयार करुन त्यांचे खेळ घेतले. या कार्यक्रमात १७५ मुलांनी सहभाग घेतला आणि २०११ च्या सृजनची कार्यक्रमांची सांगता झाली.

## ९.७ शिक्षण विकास मंच :-

७.१ **दत्तक शाळा** :- शिक्षण विकास मंचने पुणे जिल्हयातील बारामती तालुक्यातील मुर्टी आणि भोर तालुक्यातील भुतोंडे या दोन केंद्रातील अनुक्रमे १३ आणि ९ अशा २२ जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळा दत्तक घेतल्या आहेत. भुतोंडे केंद्रातील सर्वच शाळा डोंगरी भागात आहेत. या भागातील शिक्षकांना अतिशय प्रतिकूल परिस्थितीत काम करावे लागते. शिक्षणबाहय असेही अनेक प्रश्न या भागात आहेत. हे प्रश्न शिक्षणबाहय असले तरी शालेय शिक्षणावर विपरीत परिणाम घडवून आणतात. उदा. कांही गावांमध्ये बस जात नाही. पावसाळयात तर तेथे होडीने प्रवास करण्याशिवाय पर्याय नसतो. होडी नादुरुस्त झाली तर या गावांचा बाहेरच्या गावांशी संपर्कच तुटतो. प्राथमिक आरोग्य केंद्राची सोय नसेल, तर साध्या आजारांवर सुध्दा उपचार करायला कोणी मिळत नाही. मुलांच्या किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींच्या आजारपणाचा परिणाम विद्यार्थ्यांच्या शाळेतील नियमित उपस्थितीवर आणि पर्यायाने शैक्षणिक प्रगतीवर होतो. गावात एखादी एस.टी. बस आहे, पण तिचा मार्ग आणि वेळा गावक-यांच्या, विशेषतः गावात माध्यमिक शाळा नसल्यामुळे परिसरातील माध्यमिक शाळा असलेल्या गावात जाण्यासाठी सोईच्या नसतात. शिक्षणाशी निगडीत शिक्षण विभागाचे किंवा इतर विभागांचे असे अनेक प्रश्न त्या त्या विभागांच्या संबंधित अधिका-यांशी किंवा पदाधिका-यांशी चर्चा करुन सोडवण्याचा शिक्षण विकास मंचचा प्रयत्न असतो.

'दत्तक शाळा प्रकल्प' शिक्षण विकास मंचने हाती घेतल्यानंतर पूर्वीपासून माहित असलेली गोष्टच प्रकर्षाने जाणवायला लागली. ती म्हणजे जिल्हा परिषदांचे अनेक प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांचा सर्वांगीण शैक्षणिक विकास नजरेसमोर ठेवून उत्कृष्ट असे काम करतात, परंतु त्यांच्या या प्रयत्नांना योग्य ती प्रसिध्दी मिळत नाही. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांचे काम त्यांच्या परिसरातील खासगी शाळांपेक्षा किती तरी पटींनी चांगले असते. परंतु या चांगल्या कामाची दखल क्वचितच घेतली जाते. त्यांच्या वाटयाला टीकाच जास्त येते. टीका करणारे लोकही बहुदा ज्यांची मुले जिल्हा परिषद शाळांमध्ये जात नाहीत असेच असतात. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये काम करणा-या चांगल्या शिक्षकांचे काम अंधारातच राहते. करत असलेले काम योग्य पध्दतीने मांडण्याचे कौशल्य बहुतेक जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांकडे नसते. तसेच आपण केलेल्या कामात कोणत्या शैक्षणिक तत्त्वांचा वापर झाला तेही अनेक शिक्षकांना माहित नसते किंवा त्याचा अर्थ त्यांना लावता येत नाही, पण आपल्या विद्यार्थ्यांची

शैक्षणिक प्रगती कोणत्या गोष्टींमुळे होईल हे या शिक्षकांना चांगले माहित असते. दत्तक शाळांमधील सर्व शिक्षकांना प्रोत्साहन देण्याचे काम शिक्षण विकास मंच प्रामुख्याने करत आहे.

या शाळांची वाचनासाठीच्या पुस्तकांची गरज लक्षात घेऊन प्रत्येक शाळेसाठी ६९ मराठी आणि २२ इंग्रजी अशा ९१ पुस्तकांची खरेदी शिक्षण विकास मंचने केली आहे.

७.२ **प्रकाशित करण्यात आलेली पुस्तके (Appraising Schools):-** काही शाळा खूप वेगळया आणि चांगल्या का असतात? या शाळांमधून बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांना एखाद्या नावाजलेल्या कंपनीच्या उत्पादनाच्या छापाप्रमाणे महत्त्व का असते? काही मोजक्या शाळांनाच प्रचंड प्रमाणात मागणी असते, अनेक उत्साही पालक त्यांच्या मुलांना या शाळांमध्ये प्रवेश मिळावा म्हणून कोणत्याच मार्गाचा अवलंब करायचे शिल्लक ठेवत नाहीत. या उलट इतर अनेक शाळांमध्ये केव्हाही प्रवेश मिळू शकतो असे का ? कोठारी आयोग ते शिक्षण हक्क कायदा आणि राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानापर्यंतची सर्व धोरणे आणि दस्तऐवज यांनी शाळांच्या गुणवत्तेवर भर दिला असल्याचे दिसून येते. शाळेच्या गुणवत्तेचे मापन करण्याचे सर्वात उपयुक्त साधन म्हणजे शाळेची परिणामकारकता. राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त ११ नोव्हेंबर २०११ रोजी 'शाळांची परिणामकारकता' या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत वापरलेले लेख आणि इतर साहित्य यांचा संग्रह Appraising Schools या पुस्तकात आहे. या पुस्तकाचे प्रकाशन ११ नोव्हेंबर २०११ रोजी श्रीमती कुमुद बन्सल, व्ही. राधा, श्री. शरद काळे, सौ. सुप्रिया सुळे, डॉ. वसंत काळपांडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईने शिक्षणविषयक कार्यासाठी शिक्षण विकास मंचाची स्थापना केली असून गेल्या चार वर्षांपासून हा मंच कार्यरत आहे. सौ. सुप्रिया सुळे या शिक्षण विकास मंचाच्या निमंत्रक म्हणून, डॉ. कुमुद बन्सल या प्रमुख संयोजक म्हणून काम पाहतात. डॉ. वसंत काळपांडे हे विशेष सल्लागार, श्री. दत्ता बाळसराफ हे संयोजक म्हणून काम करतात. तसेच श्रीमती बसंती रॉय, श्री. माधव सूर्यवंशी हे सदस्य आहेत. शिक्षण विकास मंचाच्या कार्यात वेळोवेळी राज्यातील शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची मदत घेण्यात येते.

१) शनिवार दि. ३० एप्रिल २०११ - शिक्षण विकास मंचची 'एज्यु. संवादची' पहिली बैठक आयोजित करण्यात आली होती. शिक्षण क्षेत्रात काम करणारे शिक्षक, शिक्षण तज्ज्ञ, शिक्षणाधिकारी, पालक, पत्रकार तसेच इतर मान्यवर या बैठकीसाठी उपस्थित राहिले होते.

२) बुधवार दि. ८ जून २०११ - शिक्षण विकास मंचची बैठक सौ. सुप्रियाताई सुळे, मा. श्री. जयंत पाटील, मा. श्री. राजेश टोपे इतर मान्यवर तसेच मंचाचे प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत झाली होती.

३) शनिवार दि. २३ जुलै २०११, सोमवार दि. १ ऑगस्ट २०११, मंगळवार दि. १८ ऑगस्ट २०११ - शिक्षण विकास मंचची बैठक श्रीमती कुमुद बन्सल, डॉ. वसंत काळपांडे यांच्या उपस्थितीत घेण्यात आली होती.

४) दि. २६ ऑगस्ट २०११ - शिक्षण विकास मंचच्यावतीने प्रतिवर्षी राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त एका परिषदेचे आयोजन करण्यात येते. ११ नोव्हेंबर हा दिवस देशाचे पहिले शिक्षण मंत्री मा. मौलाना आझाद यांचा जन्म दिवस असून केंद्र शासनाच्यावतीने तो दरवर्षी राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो.

५) दिनांक ११ नोव्हेंबर २०११ रोजी शिक्षण विकास मंच आणि महाराष्ट्र शासन यांच्यावतीने 'माध्यमिक स्तरावर व्यवसाय शिक्षण' या विषयावर परिषद घेण्यात येणार असून यासाठी पूर्वतयारी विशेष बैठक श्रीमती कुमुद बन्सल यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली होती.

६) दि. १७ सप्टेंबर २०११ - शिक्षण कट्टयाची बैठक श्रीमती बसंती रॉय यांच्या अध्यक्षतेखाली झाली. ही बैठक २ ते ५ यावेळेत घेण्यात आली होती. या बैठकीसाठी शिक्षण तज्ज्ञ, शिक्षक व इतर मान्यवर उपस्थित होते.

७) मंगळवार दि. १३ सप्टेंबर २०११ - शिक्षण विकास मंचाची बैठक डॉ. कुमुद बन्सल, डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय तसेच इतर मान्यवर यांच्या उपस्थितीत पार पडली.

८) शनिवार दि. १ ऑक्टोबर २०११ - शिक्षण विकास मंचाच्यावतीने राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त घेण्यात येणा-या परिषदेच्या पूर्वतयारीसाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. ही बैठक डॉ. कुमुद बन्सल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली. यावेळी डॉ. वसंत काळपांडे, श्रीमती बसंती रॉय, श्री. ज. द. भूतांगे, श्री. योगेश कुलकर्णी इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

९) शुक्रवार दि. ७ ऑक्टोबर २०११ - शिक्षण विकास मंचाच्यावतीने राष्ट्रीय शिक्षण दिनानिमित्त पूर्वतयारी बैठक डॉ. कुमुद बन्सल, डॉ. वसंत काळपांडे तसेच श्रीमती बसंती रॉय यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडली.

१०) शनिवार दि. २२ऑक्टोबर २०११ - शिक्षण विकास मंचाच्यावतीने राज्यभरातील संस्था चालक, मुख्याध्यापक, शिक्षक यांच्यासाठी 'शिक्षण कट्टा' या नावाचा एक उपक्रम राबविला जातो. या व्यासपीठावर अनौपचारिक गप्पांच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्राला भेडसावणा-या प्रश्नांवर मोकळेपणाने चर्चा केली जाते. दि. २२ ऑक्टोबर रोजी आयोजित केलेल्या शिक्षण कट्टयाच्या कार्यक्रमात 'अनुदानित शाळांचे प्रश्न' यावर चर्चा करण्यात आली.

११) शनिवार दि. ५ नोव्हेंबर २०११ - शिक्षण विकास मंचाची विशेष आढावा बैठक डॉ. कुमुद बन्सल यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. देशाचे पहिले शिक्षण मंत्री मा. मौलाना अब्दुल कलाम आझाद यांच्या जयंतीनिमित्त दि. ११ नोव्हेंबर २०११ रोजी शालेय अभ्यासक्रमात व्यवसाय कौशल्यांचा समावेश या विषयावर परिषद आयोजित करण्यात आली.

१२) दि. ११ नोव्हेंबर २०११ - ११ नोव्हेंबर हा दिवस देशाचे पहिले शिक्षण मंत्री मा. मौलाना आझाद यांचा जन्म दिवस असून केंद्र शासनाच्यावतीने तो दरवर्षी राष्ट्रीय शिक्षण दिन म्हणून साजरा केला जातो. सदर दिवशी शिक्षण विषयक परिषदेचे आयोजन केले जाते आणि उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथाच्या लेखकास तसेच संपादकास पुरस्काराने सन्मानित करण्यात येते.

१३) यावर्षी राष्ट्रीय शिक्षक दिनाचे औचित्य साधून 'शालेय अभ्यासक्रमात व्यवसाय कौशल्याचा समावेश' या विषयावर परिषद घेण्यात आली होती. ही परिषद सकाळी १० ते सायंकाळी ५ यावेळेत पार पडली. यावेळी शिक्षण विकास मंचचे निमंत्रक खासदार सौ. सुप्रिया सुळे, मुख्य संयोजक डॉ. कुमुद बन्सल, सर्वशिक्षा अभियानाच्या व्ही. राधा, श्री.मा. ज. द. भूतांगे, श्री. योगेश कुलकर्णी तसेच इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते. यावेळी उत्कृष्ट शैक्षणिक ग्रंथास पुरस्कार देण्यात आले. उत्कर्ष प्रकाशन, पुणे यांनी २०११ या वर्षी 'उच्च शिक्षण : समस्या आणि प्रवाह' हे डॉ. अरुण निगवेकर लिखित श्री. अशोक नांदगावकर यांनी संपादीत पुस्तकास पुरस्कार देण्यात आला. आजच्या ज्ञानाधिष्ठित शतकात सर्वांनाच उपयुक्त शिक्षण मिळण्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. एका बाजूला शिक्षणसंस्थांना शासनाकडून मिळणारी तुटपुंजी मदत, तर दुस-या बाजूला शिक्षणाचे जागतिकीकरण आणि व्यापारीकरण यामुळे शिक्षणाच्या क्षेत्रात अभूतपूर्व अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. वाढत आकडा आणि कौशल्यपूर्ण शिक्षणाची निकड भागविण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर आणि आंतरराष्ट्रीय आकृतीबंधाचा स्वीकार करण्याची गरज त्यातून निर्माण झाली आहे. या सर्व पैलूंचा या पुस्तकात ऊहापोह केला आहे.

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांनी २०११ यावर्षी संपादित केलेले 'आठवणीतील शाळा आणि शिक्षक' याही पुस्तकास पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. फेब्रुवारी २००७ पासून परिषदेच्या 'जीवन शिक्षण' या मासिकात प्रकाशित झालेल्या याच शिर्षकाच्या लेखमालेचे हे संकलन आहे. या लेखमालेची संकल्पना महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे तत्कालीन उपसंचालक श्री. शिवाजी तांबे यांची महाराष्ट्रातील सर्व विभागातील स्वातंत्र्यसेनानी, सामाजिक कार्यकर्ते, वैज्ञानिक, उद्योजक, शिक्षण तज्ज्ञ, पत्रकार, चित्रकार, खेळाडू, साहित्यिक, नाटयचित्रपट कलावंत अशा अनेक विविध नामवंतांच्या लेखांचा या लेखमालेत समावेश आहे. त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या जडणघडणाची बिजे त्यांनी लिहिलेल्या लेखांतील अनेक प्रसंगातून जाणवतात. आठवणींचा हा ठेवा आजच्या आणि उद्याच्या पिढीला प्रेरक ठरणारा आणि शिकवण्याच्या आणि शिकण्याच्या नानाविध पध्दतींची ओळख शिक्षकांना करुन देणारा आणि त्यांना प्रेरक ठरणारा आहे. सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे.

१४) शुक्रवार दि. ९ डिसेंबर २०११ - शिक्षण विकास मंचाची विशेष आढावा बैठक डॉ. कुमुद बन्सल यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. या बैठकीत दि. ११ नोव्हेंबर रोजी झालेल्या परिषदेचा आढावा घेण्यात आला.

१५) शनिवार दि. २१ जानेवारी २०१२ - शिक्षण विकास मंचाच्या 'शिक्षण कट्टा' या उपक्रमांतर्गत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या कट्टयावर 'शिक्षक प्रशिक्षण' या विषयावर चर्चा झाली. सदर चर्चासत्र डॉ. कुमुद बन्सल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.

## ९.८ अपंग हक्क विकास मंच :-

अपंग हक्क विकास मंचाच्या संयोजक खासदार सौ. सुप्रिया सुळे या असून समन्वयक म्हणून श्री. विजय कान्हेकर हे काम पाहतात.

८.१ **औरंगाबाद दि. २७ एप्रिल, २०११ -** आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, जिल्हा रुग्णालय, औरंगाबाद, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र औरंगाबाद, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद, अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद जिल्हयातील १५० गरजू अपंगांना मोफत कृत्रिम अवयव व साधने (जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर्स, कुवडया, श्रवणयंत्र, अंधकाठी) वाटप करण्यात आले. या कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी असलेले जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. डी. एन. पाटील यांनी अपंगांना संबोधित करताना असे सांगितले की, अपंगांनी आपल्या मनातील न्युनगंड झुगारुन समाजाच्या मुख्य प्रावाहात सहभागी व्हावे, यापुढेही सातत्याने प्रयत्न करुन आरोग्य विभागामार्फत कृत्रिम अवयव व साधनांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला जाईल. अपंगांनी आपल्याला मिळालेल्या या कृत्रिम अवयव व साधनांचा पुरेसा वापर करावा. यावेळी व्यासपीठावर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अस्थिव्यंग विभाग प्रमुख डॉ. सी. आर. थोरात, तसेच सतीश निर्मळ, संतोष राठोड आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मंचाचे समन्वयक सुहास तेंडुलकर तर उपस्थित मान्यवरांचे स्वागत व आभार प्रदर्शन जिल्हा पुनर्वसन केंद्राचे श्री. राजाभाऊ गोकुळाष्टमी यांनी केले.

८.२ **पाचोड, औरंगाबाद दि. २२ मे २०११** - सामाजिक न्याय एवम अधिकारिता मंत्रालय - भारत सरकार, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद, अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद जिल्यातील पाचोड येथे ग्रामीण रुग्णालयात ८० अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. गरजू अपंगांना मोफत जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर्स, कुवडया, श्रवणयंत्र, अंधकाठी इत्यादी कृत्रिम अवयव व साधनांचे वाटप करण्यात आले.

८.३ **पुणे, दि. ४ ते ६ जून २०११** - आरोग्य विभाग महाराष्ट्र राज्य, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद व बाल कल्याण संस्था, पुणे - अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने अपंगांसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन पुणे जिल्हयात करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ३१४ लाभार्थ्यांची नोंदणी होऊन १०३ लाभार्थ्यांना जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर्स, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर १३० अपंगांना विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली. यावेळी नोकर भरती विषयक असणा-या अडचणी, तीन टक्के आरक्षणाचा मुद्दा आदी विषयांवर अपंगांनी चर्चा केली. या शिबिरात एकूण २११ अपंग लाभार्थी अजून प्रतिक्षा यादीवर आहेत. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बाल कल्याण संस्थेच्या विश्वस्त भारतीताई पवार, अपंग हक्क विकास मंचाच्या निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे, सहाय्यक आयुक्त श्री. दळवी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. बिलोलीकर तसेच बाल कल्याण संस्थेच्या श्रीमती मिनिता पाटील, कार्यक्रम संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, मंचाचे संयोजक विजय कान्हेकर, समन्वयक सुहास तेंडुलकर व निलेश राऊत, भैय्यासाहेब खैरे, डॉ. सचिन जाधव, श्रीधर पाटील यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

८.४ **औरंगाबाद, दि. ८ व ९ जून २०११** - आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, महात्मा गांधी सेवा संघ, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई - अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हयातील अपंग व्यक्तींसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २१५ अपंग लाभार्थ्यांची नोंदणी करुन १६५ लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यात आली. जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर्स, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. डी. एन. पाटील, डॉ. चंद्रकांत थोरात, मंचाचे समन्वयक आदी उपस्थित होते.

८.५ **जालना, दि. १२ व १३ जून २०११** - सामाजिक न्याय एवम् अधिकारिता मंत्रालय - भारत सरकार, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद व मत्स्योदरी शिक्षण संस्था, जालना, अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने जालना जिल्हयात अपंगांसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २३५ लाभार्थ्यांची नोंदणी होऊन ८५ लाभार्थ्यांना जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर्स, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. तर १०० अपंगांना विविध शासकीय योजनांची माहिती, कायदेविषयक सल्ला व मार्गदर्शन करण्यात आले. या शिबिरात एकूण १२५ अपंग लाभार्थी अजून प्रतिक्षा यादीवर आहेत. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे, श्री. आ. अरविंद चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी, राधाकृष्णन, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. प्रताप जाधव, समाज कल्याण अधिकारी श्री. शेख, अपंग वित्त आणि विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक सुहास काळे, मंचाचे संयोजक , समन्वयक, संस्थेचे प्राचार्य डॉ. राजेंद्र गायकवाड आदी उपस्थित होते.

८.६ **धुळे, दि. २४ व २५ जून २०११** - धुळे जिल्हयातील विविध प्रवर्गातील अपंग लाभार्थ्यांना सामाजिक न्याय एवम् अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद, अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने अपंगांसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण १४५ लाभार्थ्यांना जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर्स, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपायुक्त श्री. अरविंद वळवी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, श्रीमती वैशाली हिंजे-देवरे, डॉ. दिपक खलाणे, डॉ. अरुण साळुंखे, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ते श्री. विजय पाटील, श्रीमती अनघा ओक, मंचाचे संयोजक व इतर मान्यवरांसह जिल्हयातील अपंग लाभार्थी व त्यांचे पालक मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी फिरत्या बहुविध पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून अपंगांच्या पुनर्वसनासाठी संस्था राबवित असलेल्या उपक्रमाचे कौतुक केले.

८.७ **हिंगोली, दि. २८ व २९ जून, २०११** - हिंगोली जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्रातर्फे विविध प्रवर्गातील अपंगांसाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक न्याय एवम् अधिकारीता मंत्रालय, भारत सरकार, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र - अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. बाळासाहेब आटकोरे, समाज कल्याण सभापती श्रीमती पुष्पाताई थोरात, जिल्हा परिषद सदस्य मा. अनंतराव जगताप, समाज कलयाण अधिकारी श्रीमती संगीता मकरंद, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक बोल्डे, डॉ. मनीष वागडीया, डॉ. कुलकर्णी, मंचाचे संयोजक, समन्वयक आदी उपस्थित होते. यावेळी विविध प्रवर्गातील १५० लाभार्थ्यांची नोंदणी करुन ८० लाभार्थ्यांना साहित्य व साधने वाटप करण्यात आले.

८.८ **वाशिम, दि. १ व २ जुलै २०११** - वाशिम येथे सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, महात्मा गांधी सेवा संघ, हिंगोली, अपंग हक्क विकास मंच, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जिजाऊ सांस्कृतिक सभागृह येथे अपंग व्यक्तींसाठी मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात एकूण २२१ लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव साधने वाटप करण्यात आली. जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर्स, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी समाज कल्याण विभागाच श्री. पुंड व मंचाचे समन्वयक उपस्थित होते.

८.९ **सोलापूर, दि. २२ जुलै ते ७ ऑगस्ट २०११** - समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद सोलापूर, महात्मा गांधी सेवा संघ, अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ जुलै ते ७ ऑगस्ट या दरम्यान सोलापूर जिल्हयातील अपंगांसाठी तालुकानिहाय शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात सर्व प्रवर्गातील अपंगांची नोंदणी करुन त्यांना वैद्यकीय प्रमाणपत्रे, रेल्वे सवलत प्रमाणपत्र, अपंग ओळखपत्र देऊन या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींतर्फे त्यांना विविध विषयाची माहिती देण्यात आली. तसेच गरजू अपंगांची कृत्रिम अवयव व साधनांसाठी नोंदणी करण्यात आली. या जिल्हयातील मेळाव्यात एकूण ७५० अंध, ७७७ कर्णबधीर, १६१४ अस्थिव्यंग व ४४८ मतीमंद अशा एकूण ३५८९ विशेष व्यक्तींनी सहभाग घेतला.

८.१० **नंदुरबार, दि. २९ ते ३१ जुलै** - नंदुरबार येथे सामाजिक न्याय एवंम् अधिकारीता मंत्रालय भारत सरकार, महात्मा गांधी सेवा संघ, शाखा धुळे, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद नंदुरबार, अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने नंदुरबार जिल्हयातील अपंग व्यक्तींसाठी महात्मा फुले विद्यालय, कोरीट रोड येथे मोफत तपासणी व कृत्रिम अवयव वाटप शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात एकूण २१० लाभार्थ्यांनी नोंदणी होऊन १९० लाभार्थ्यांना कृत्रिम अवयव व साधने वाटप करण्यात आली. यात जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर्स, तीन चाकी सायकल, ब्रेलकीट गॉगल, ब्लाईंड स्टीक, वॉकर, क्रचेस, श्रवणयंत्र आदी साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी मंचाचे समन्वयक उपस्थित होते.

८.११ **उस्मानाबाद व लातूर दि. २६ ते २९ डिसेंबर २०११** - उस्मानाबाद व लातूर येथे अपंगत्व नियंत्रण व पुनर्वसन कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमात जिल्हयातील सर्व प्रवर्गातील अपंगांना आवश्यक असणारे कृत्रिम अवयव व साधने आदीची तपासणी करण्यात आली. सदर शिबीर जिल्हा अपंग विभाग व महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद, अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात सर्व प्रवर्गातील अपंगांची मोफत तपासणी करण्यात आली. या शिबीरात एकूण ७० गरजू अपंगांची मोजमाप करुन त्यांना आवश्यक असणा-या कृत्रिम अवयव व साधनांची नोंदणी करण्यात आली. यात जयपूर फूट, जयपूर हॅन्ड, कॅलिपर्स, कुबडी (जोड) व सर्जिकल शूज आदी साहित्य देण्यात आले. या शिबीरासाठी अपंगांचे तपासणी व मोजमाप वसीम खान व चांदोबा बिरगड या तज्ञांनी घेतले. या शिबीरात जिल्हा शल्य चिकित्सक श्री. कोरे साहेब, जिल्हा समाजकल्याण अधिकारी मा. श्री. कावभे, जीवन विकास प्रतिष्ठानचे सचिव श्री. रामानुज रांदड, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे प्रकल्प समन्वयक श्री. बाबूराव सोमवंशी व मंचाचे समन्वयक आदी उपस्थित होते.

८.१२ **नागपूर, दि. १ ते ३ फेब्रुवारी २०१२** - अपंग हक्क विकास मंच, अखिल भारतीय मूकबधीर क्रिडा परिषद नवी दिल्ली, महाराष्ट्र मूकबधीर क्रीडा परिषद, पुणे आणि इंडिया डेफ क्लब नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने मूकबधिरांच्या सहाव्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेचे आयोजन दि. १ ते ३ फेब्रुवारी २०११ पर्यंत नागपूर सुधार प्रन्यास जलतरण तलाव, अंबाझरी रोड, नागपूर येथे करण्यात आले होते. मूकबधीरांच्या सहाव्या राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत यजमान महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी २१ सुवर्णासह ४९ पदके जिंकून सर्वसाधारण विजेतेपदाचा बहुमान पटकाविला. सागर बडवे आणि नागपूरची राधा टाकोणे या स्पर्धेतील उत्कृष्ट



यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार विजेते मार्शल ऑफ दि एअरफोर्स श्री. अर्जन सिंग यांचा सत्कार करतांना प्रतिष्ठानचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार.



मा. यशवंतराव चव्हाण यांच्या 'सहयाद्रीचे वारे' या पुनर्मुद्रित पुस्तकाचे विमोचन करतांना प्रतिष्ठानचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार. सोबत मार्शल ऑफ दि एअरफोर्स श्री. अर्जन सिंग, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील, राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर.



मार्शल ऑफ दि एअरफोर्स श्री. अर्जन सिंग पुरस्काराची रक्कम रु.५ लाखाचा धनादेश प्रतिष्ठानचे अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरद पवार यांना परत करतांना. सोबत केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे.



यशवंतराव चव्हाण केंद्रात आगमन झाल्यानंतर मार्शल ऑफ दि एअरफोर्स श्री. अर्जन सिंग यांचे स्वागत करतांना अणुऊर्जा शास्त्रज्ञ व यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर. सोबत प्रतिष्ठानचे सरचिटणीस श्री. शरद काळे.



दि. १२ मार्च २०१२ रोजी केंद्र इमारतीत लावण्यात आलेले मा. यशवंतराव व श्री. अर्जन सिंग यांचे छायाचित्र प्रदर्शन पाहताना स्वतः श्री. अर्जन सिंग. सोबत श्री. शरद काळे व डॉ. अनिल काकोडकर.



दि. १२ मार्च २०१२ रोजी केंद्र इमारतीत लावण्यात आलेले मा. यशवंतराव व अर्जन सिंग यांचे छायाचित्र प्रदर्शन पाहताना स्वतः श्री. अर्जन सिंग. सोबत कार्याध्यक्ष श्री. अरुण गुजराथी, सरचिटणीस श्री. शरद काळे.



महाराष्ट्र राज्याच्या स्थापना समारंभाच्या श्री. आचरेकर यांनी काढलेल्या रेखाचित्रांच्या प्रतिकृतीचे प्रतिष्ठानच्या समिती सभागृहातील प्रकाशन करतांना केंद्रीय कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शरद पवार, महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील, प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष श्री. अरुण गुजराथी, कोषाध्यक्ष श्री. हेमंत टकले व विश्वस्त श्री. वसंतराव कार्लेकर.




अणुऊर्जा शास्त्रज्ञ व यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर यांच्याशी हस्तांदोलन करतांना केंद्रीय कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शरदराव पवार सोबत खासदार सौ. सुप्रिया सुळे व महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील.



श्री. धर्मानंद कोसंबी यांची नात डॉ. मीरा कोसंबी यांचे स्वागत करतांना केंद्रीय कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शरदराव पवार.

मराठी विज्ञान परिषदेचे
श्री. अ. पां. देशपांडे यांच्याशी बोलताना
केंद्रीय कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष
श्री. शरदराव पवार.





विभागीय केंद्र कराड यांचेवतीने
मा. यशवंतराव चव्हाण यांच्या
जन्मशताब्दी शुभारंभ प्रसंगी
'यशवंत ज्योत' विरंगुळा बंगल्यातून
घेऊन जात असतांना
मा. उपमुख्यमंत्री श्री. अजित
पवार. सोबत श्री श्रीनिवास पाटील.

विभागीय केंद्र पुणे यांचे वतीने
दिवाळी पहाट कार्यक्रमातील
कलाकारांचा सत्कार करतांना केंद्राचे
अध्यक्ष श्री. अजित निंबाळकर,
सोबत श्री. अंकुशराव काकडे व
श्री. शांतीलाल सुरतवाला.






विभागीय केंद्र लातूरच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या आनंद मेळाव्या प्रसंगी स्वागतगीत सादर करतांना कुमारी जाधव सोबत डावीकडून केंद्राचे सचीव श्री. हरिभाऊ जवळगे व अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे.




विभागीय केंद्र रत्नागिरी जागतिक महिला दिनानिमित्त कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना ग्रुप जयगडचे उपाध्यक्ष श्री. राजीव लिमये सोबत केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये व उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर.



विभागीय केंद्र नाशिक 'जागर मनाचा' या कार्यक्रमाप्रसंगी बोलताना श्री. शंतनु गुणे, सोबत केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर.

विभागीय केंद्र औरंगाबाद यांचे वतीने आयोजित केलेल्या युवक मेळाव्यात भारताचा सरनामा भेट म्हणून देण्यात येत असतांना संघटक श्री. निलेश राऊत सोबत विभागीय केंद्र नाशिकचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर.





विभागीय केंद्र नागपूर यांचे वतीने मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षात 'अस्तित्व खुणा' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ.

अपंग हक्क विकास मंचच्या वतीने अपंगांना साहित्य वाटप करतांना बालकल्याण संस्थेच्या विश्वस्त सौ. भारतीताई पवार. सोबत सौ. सुप्रिया सुळे व श्री. विजय कान्हेकर.





महाराष्ट्र महिला व्यासपीठाच्या वतीने सहकारी गृहनिर्माण संस्था व्यवस्थापन प्रशिक्षण वर्गाचे प्रमाणपत्र वितरण समारंभ प्रसंगी महाराष्ट्राचे माजी मुख्य सचिव श्री. शरद उपासनी. सोबत कार्यकारी संयोजक श्रीमती ममता कानडे.




कायदेविषयक सहाय्य व सल्ला फोरम विधी साक्षरता कार्यशाळेप्रसंगी श्री. प्रमोद ढोकळे व ॲड. भूपेश सामंत.



अपंग हक्क विकास मंचातर्फे अपंगांना सायकलीचे वाटप करतांना उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. राजेश टोपे.

खेळाडू ठरले. महाराष्ट्राच्या जलतरणपटूंनी २१ सुवर्ण, १७ रौप्य आणि ११ कांस्य पदके जिंकून अव्वल स्थान पटकाविले. दुस-या स्थानावर राहिलेल्या पश्चिम बंगालने ३ सुवर्णासह ३० पदके आणि तामिळनाडूने ३ सुवर्ण व १ रौप्यपदक जिंकून सर्वांचे लक्ष वेधून स्पर्धेचं आकर्षण ठरलेल्या सागर बडवे आणि राधा टाकोणे यांनी प्रत्येकी ५ सुवर्ण व १ रौप्यपदक जिंकून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शेवटच्या दिवशी राधा टाकोणेने ५० मिटर फ्रिस्टाईल, १०० मीटर बॅकस्ट्रोक आणि ४ बाय ५० मिटर रिले शर्यतीत ३ सुवर्ण पदके जिंकली. याशिवाय पश्चिम बंगालने २ आणि कर्नाटकने १ सुवर्णपदक मिळविले.

दि. ३ फेब्रुवारी २०१२ रोजी दुपारी ४ वाजता डॉ. अमित सैनी, (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नागपूर यांच्या संयुक्त उपस्थितीत समारोपिय कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला कार्यक्रम संयोजक, नवमहाराष्ट्र युवा अभियानचे संघटक, जिल्हा परिषद नागपूरचे समाज कल्याण अधिकारी, श्री. सुरेंद्र पवार तसेच श्री. जयप्रकाश दुबळे क्रिडा उपसंचालक, नागपूर श्री. माधव जोशी, सचिव, महाराष्ट्र मूकबधीर क्रिडा परिषद, पुणे श्री. उरय भोयर, सचिव इंडियन डेफ क्लब, नागपूर श्री. साठे, सचिव महाराष्ट्र स्पोर्टस् कौन्सिल ऑफ द डेफ, पुणे यांच्या उपस्थितीत समारोप व बक्षिस वितरण कार्यक्रम संपन्न झाला.

८.१३ **अकलुज, जिल्हा सोलापूर, दि. ९ ते १२ फेब्रुवारी २०१२** - जिल्हा रुग्णालय, अकलूज येथे ९ ते १२ फेब्रुवारी २०१२ या कालावधीत सोलापूर जिल्हयातील अपंगांसाठी अपंग हक्क विकास मंच व जिल्हा रुग्णालय, अकलुज यांच्या संयुक्त विद्यमाने शिबीराचे आयोजन करण्यात आले. या शिबीरात एकूण ३८० अपंग व्यक्तींची तपासणी करुन १५२ गरजू अपंगांना आवश्यक कृत्रिम अवयव व साधनांचे वाटप करण्यात आले. २५ जयपूर फूट, २ कॅलिपर, २५ कुबडी जोडी, १०० श्रवणयंत्र वाटप करण्यात आले असून २२८ अपंग अजून प्रतिक्षा यादीवर असल्याचे निदर्शनास आले.

८.१४ **मुंबई, दि. २२ फेब्रुवारी २०१२** - सर जे. जी. समूह रुग्णालये, भायखळा, मुंबई आणि अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने अस्थिव्यंग, कर्णबधीर, मतिमंद व अंध इत्यादी प्रवर्गातील अपंग व्यक्तींना अपंगत्व प्रमाणपत्र, रेल्वे सवलत प्रमाणपत्र, समाजकल्याण विभागांचे अपंग ओळखपत्र मिळवून देण्यासाठी दि. २२ फेब्रुवारी २०१२ रोजी सकाळी ९ वाजता स्थळ सर जे.जे. रुग्णालय, भायखळा, मुंबई येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर आयोजन करण्यात आले. या शिबीरात एकूण ५५० अपंग व्यक्तींनी प्रत्यक्ष लाभ घेतला. शिबीराची सुरुवात करताना सर जे. जी. समूह रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. तात्याराव लहाने व रुग्णालयाचे डॉक्टरांचे पथक तसेच मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर, समन्वयक श्री. विजय कस्बे, संघटक श्री. शमीम खान उपस्थित होते.

८.१५ **जिल्हा तालुका नंदूरबार, दि. ११ मार्च २०१२** - अपंग कल्याण आयुक्त, पुणे, महात्मा गांधी सेवा संघ, औरंगाबाद संचलित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र (घाटी) औरंगाबाद, जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, अपंग हक्क विकास मंच यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ११ मार्च २०११ रोजी ता. जि. नंदुरबार अपंगत्व नियंत्रण / पुनर्वसन कार्यक्रम व साहित्य वाटप शिवीर नंदुरबार कृषी बाजार समिती येथे घेण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन वैद्यकीय शिक्षण व फलोत्पादन मंत्री मा. ना. डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती कुमुदिनी गावित, राष्ट्रवादी पक्षाच्या जिल्हा अध्यक्षा डॉ. कमलाताई मराठे, डॉ. हिना गावित, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. रविकिरण चव्हाण, जिल्हा समाजकल्याण अधिकारी जिल्हा परिषद नंदुरबार श्री. राकेश पाटील, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक श्री. विजय कान्हेकर आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबीरात एकूण २११ लाभार्थ्यांची तपासणी करुन ७८ गरजू अपंग लाभार्त्यांना साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये तीन चाकी सायकल २८, व्हिलचेअर १४, कुवडी जोडी १८, कॅलिपर ८, जयपूर फूट ३, श्रवणयंत्र १६ इत्यादी कृत्रिम साधनांचे वाटप करण्यात आले.

८.१६ **शहादा व धडगांव, दि. ११ मार्च २०१२** - अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे, अपंग हक्क विकास मंच महात्मा गांधी सेवा संघ संचलित अपंग पुनर्वसन केंद्र (घाटी) औरंगाबाद, जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, नंदुरबार यांचे संयुक्त विद्यमाने दि. ११ मार्च २०११ रोजी नंदुरबार जिल्हा अपंगत्व नियंत्रण / पुनर्वसन कार्यक्रम व साहित्य वाटप शिबीर शहादा ग्रामीण रुग्णालय येथे घेण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन वैद्यकीय शिक्षणमंत्री, मा. ना. डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते झाले. दीड महिन्यापूर्वी शहादा ग्रामीण रुग्णलयात मुंबई, औरगाबाद, पुणे, नागपूर येथील तज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी केली होती. अपंगांसाठी मोफत कृत्रिम अवयव / साधने वाटप करण्यात आले. या शिबीरात एकूण १४० अपंग लाभार्थ्यांची तपासणी करुन ७६ गरजू अपंग लाभार्थ्यांना साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये तीन चाकी सायकल २७, व्हिलचेअर १३, कुबडी जोडी २, कॅलिपर १०, जयपूर फूट ३, श्रवणयंत्र २१ इत्यादी कृत्रिम साहित्यांचे वाटप करण्यात आले. तसेच एकूण ६५७ अपंगांना अपंगत्वाचे वैद्यकीय प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हा परिषद उपाध्यक्ष श्री. जयपाल सिंह रावल, कृषी सभापती श्री. भगवान पाटील, डॉ. अजय चंदनवाल, पंचायत समिती सभापती डॉ. सुरेश नाईक, उपसभापती श्री. सुनिल पाटील, श्री. ईश्वर पाटील, समाज कल्याण अधिकारी श्री. राकेश पाटील, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे समन्वयक आदी मान्यवर उपस्थित होते.

८.१७ **तालुका तळोदा व अक्कलकुवा दि. १२ मार्च** २०१२ - अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे, महात्मा गांधी सेवा संघ संचलित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र (घाटी) औरंगाबाद, जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, नंदुरबार, अपंग हक्क विकास मंच यांचे संयुक्त विद्यमाने दि. १२ मार्च २०११ रोजी ता. अक्कलकुवा व ता. तळोदा या दोन्ही तालुक्यांचे नंदुरबार जिल्हा अपंगत्व नियंत्रण / पुनर्वसन कार्यक्रम व साहित्य वाटप शिबीर तालुका तळोदा ग्रामीण रुग्णालय येथे घेण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन वैद्यकीय शिक्षणमंत्री व फलोत्पादन मंत्री, मा. ना. डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते झाले. यावेळी जिल्हा परिषद अध्यक्षा कुमुदिनी गावित, मा. ना. डॉ. हिना गावित, जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद नंदुरबार श्री. राकेश पाटील, श्री. साखरे दादा, अपंग हक्क विकास मंचाचे संयोजक, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्राचे समन्वयक आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबीरात तळोदा व अक्कलकुवा तालुक्यातील १४८ अपंग लाभार्थ्यांची नोंद झाली. अक्कलकुवा व तळोदा तालुक्यातील ५७ अपंग लाभार्थ्यांना कृत्रिम साहित्य वाटप करण्यात आले. यामध्ये तीन चाकी सायकल १३, व्हिलचेअर ४, कुबडी जोडी १४, कॅलिपर १३, जयपूर फूट ३, श्रवणयंत्र १० इत्यादी साधनांचा समावेश होता.

८.१८ **ता. नवापूर साहित्य वाटप शिबीर अहवाल दि. १२ मार्च २०१२** - अपंग कल्याण आयुक्तालय, पुणे, महात्मा गांधी सेवा संघ संचलित जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र (घाटी) औरंगाबाद, जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग, नंदुरबार, अपंग हक्क विकास मंच यांचे संयुक्त विद्यमाने दि. १२ मार्च २०११ रोजी नंदुरबार जिल्हा अपंगत्व नियंत्रण / पुनर्वसन कार्यक्रम व साहित्य वाटप शिबीर शहादा ग्रामीण रुग्णालयात घेण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन वैद्यकीय शिक्षणमंत्री व फलोत्पादन मंत्री, मा. ना. डॉ. विजयकुमार गावित यांच्या हस्ते झाले. अपंगांना विविध कृत्रिम अवयव, सायकली व इतर आवश्यक साहित्य वाटप करुन त्यांपा स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करण्यात आला. एका दुर्लक्षित घटकाला मदत करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत आहे असे मनोगत मा. डॉ. विजयकुमार गावित यांनी व्यक्त केले. जिल्हयातील अपंग लाभार्थ्यांनी विविध शिबीरांचा लाभ घेण्याचे आवाहनही त्यांनी या प्रसंगी केले. या शिबीरात तीन चाकी सायकल १०, व्हिलचेअर ७, कुबडी जोडी ६, कॅलिपर ३, जयपूर फूट ४, श्रवणयंत्र ९ इत्यादी प्रकारचे साहित्य वाटप करण्यात आले.

८.१९ **मुंबई, दि. २५ मार्च २०१२** - अपंग हक्क विकास मंच आणि अपंग कल्याणकारी संस्था, अर्नाळा यांच्या संयुक्त विद्यमाने

दि. २५ मार्च २०१२ रोजी अपंग रोजगार स्वयंरोजगार माहिती मेळावा स्थळ यंग स्टार्स क्रिडा संकुल, विरार (प.) येथे आयोजित करण्यात आला. या मेळाव्याचे उद्घाटन श्री. राजीव पाटील, महापौर, वसई विरार महानगरपालिका यांच्या हस्ते करण्यात आले. श्री. सुहास काळे, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य आर्थिक विकास महामंडळ, विशेष अतिथी श्री. पांडुरंग वैती, अधिक्षक औद्योगिक प्रशिक्षण संस्था, पनवेल तसेच मंचाचे संघटक श्री. शमीम खान उपस्थित होते. या कार्यक्रमात शासकीय योजने अंतर्गत अपंगांना स्वयंरोजगाराच्या संधी, राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्था, अलीयावर जंग, वांद्रा, मुंबई, फेलोशिप ऑफ दि फिजिकल हॅंडिकॅप, महालक्ष्मी, मुंबई विकलांग व्यावसायिक पुनर्वसन केंद्र, चुनाभट्टी, मुंबई, जिल्हा अपंग रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, ठाणे, महाराष्ट्र राज्य अपंग आर्थिक विकास महामंडळ, नॅशनल असोसिएशन फॉर दि ब्लाइंड, मुंबई, जिल्हा अपंग पुनर्वसन केंद्र, नासिओ, चेंबूर, मुंबई, अपंगांचे बचतगट इत्यादी शासकीय, निमशासकीय संस्थांमार्फत उपस्थित अपंग व्यक्तींना रोजगार व स्वयंरोजगार विषयी मार्गदर्शन करण्यात आले. जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार केंद्र, ठाणे, विकलांग व्यवसायिक पुनर्वसन केंद्र, चुनाभट्टी, मुंबई यांनी अपंगांची नोंदणी करुन घेतली.

## ९.९ वसुंधरा कक्ष (पर्यावरण संवर्धन अभियान) :-

९.१ **हवामान बदलविषयक शिक्षण आणि कृती प्रकल्प** : वसुंधरा पर्यावरण संवर्धन अभियान आणि सृष्टीज्ञान संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सन २०११-१२ या वर्षात जून ते फेब्रुवारी महिन्यात हवामान बदलविषयक शिक्षण आणि कृती प्रकल्प राबविण्यात आला. यामध्ये मुंबईतील दहा शाळांतील जवळ जवळ एक हजार विद्यार्थ्यांचा सहभाग होता. हवामान बदलाच्या समस्येचा पर्यावरणातील जैवविविधता, पाणी, माती, ऊर्जा, स्थानिक बियाणांचे संवर्धन, घनकचरा व्यवस्थापन अशा विविध विषयांवर संवादी पध्दतीचे कार्यक्रम घेण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये स्लाईड शो, पोस्टर प्रदर्शन, प्रश्न मंजुषा, पाणी वाचवा खेळ, ऊर्जा बचतीबाबत सर्व्हे, क्षेत्र अभ्यास इ. कार्यक्रमांचा समावेश होता.

जलसंवर्धनाबाबत घेण्यात आलेल्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी पाण्याचा होणारा अपव्यय समजून घेतला. त्यासाठी पाणी कशा पध्दतीने वाया घालविले जाते याचे दर्शन घडविणारा खेळ घेण्यात आला. प्रत्यक्ष अनुभवातून विद्यार्थ्यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी शाळेत आणि वैयक्तिक जीवनात पाणी वाया जाणार नाही याबाबत दक्ष राहण्याचा संकल्प जाहीर केला. वृक्षराजीचे कार्बनडाय ऑक्साईड शोषून घेण्याचे महत्त्व लक्षात आणून देणारा स्लाईड शो विद्यार्थ्यांना दाखविण्यात आला. वृक्षांचे घटणारे प्रमाण लक्षात आल्यावर विद्यार्थ्यांनी त्यांच्या पातळीवर वृक्षसंवर्धन करण्याचा मनोदय व्यक्त केला. त्याप्रमाणे प्रत्येक शाळेत विद्यार्थ्यांनी मैदान किंवा गच्चीवरील जागेत विविध प्रकारच्या रोपांची लागवड केली. या रोपांमध्ये प्रामुख्याने कडुनींब, अडुळसा, तुळस, शतावरी, पानफुटी, ओवा, जास्वंद अशा स्थानिक प्रजातींचा समावेश आहे. गोरगावमधील प्रज्ञाबोधिनी शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेले कार्य अत्यंत उल्लेखनीय आहे. त्यांनी शाळेच्या संपूर्ण गच्चीवर फळझाडे, औषधी वनस्पती, फुलपाखरांना आकर्षित करणारी रोपे तसेच दैनंदिन वापरातील भाज्यांची लागवड करुन वातावरण हिरवेगार करुन टाकले.

शाळांच्या जवळपास असणा-या जैवविविधता संपन्न परिसरात विद्यार्थ्यांच्या क्षेत्रभेटी आयोजित करण्यात आल्या. यासाठी शाळेजवळील बाग, मैदान, समुद्र किनारा, खारफुटीचे जंगल, रोपवाटीका अशा विविध स्थळांची निवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी या ठिकाणच्या जीवसृष्टीचे निरीक्षण करुन रीतसर अहवाल तयार केले. त्याचबरोबर जैविविधता, पाणी, ऊर्जा अशा विविध विषयांवर शाळांनी प्रकल्प तयार करुन प्रकल्पाच्या समारोप प्रसंगी यशवंतराव चव्हाण केंद्र येथे मांडले. फेब्रुवारी महिन्यात या प्रकल्पाचा समारोप यशवंतराव चव्हाण केंद्रात पार पडला. मा. श्री. शरद काळे यांच्या हस्ते या प्रकल्पातील सर्वोत्कृष्ट तीन शाळांना पारितोषिक प्रदान करण्यात आले.

९.२ **अहमदाबाद बीआरटीएस प्रकल्पाला भेट** : विश्वस्त सौ. सुप्रिया सुळे यांच्या पुढाकाराने प्रतिष्ठानच्या अभ्यासगटाने दि. ३० सप्टेंबर २०११ रोजी अहमदाबाद बीआरटीएस प्रकल्पाला भेट दिली. बस रॅपिड ट्रांझिट सिस्टम (बीआरटीएस) अर्थात राखीव मार्गावरील सार्वजनिक बस वाहतूक व्यवस्था हा एका वाक्यात बीआरटीएसचा अर्थ आहे. गुजरात राज्यातील अहमदाबाद शहरामध्ये दोन वर्षापूर्वी हा प्रकल्प सुरु झाला आणि दिल्ली व पुणे शहरातील बीआरटीएस प्रकल्पांपेक्षा सरस अंमलबजावणी करीत या प्रकल्पाने आंतरराष्ट्रीय पातळीवरील पारितोषिके मिळविली. याच प्रकल्पाचा आदर्श धरुन चेन्नई आणि बंगळुरु शहरातील बीआरटीएस प्रकल्पांचा विकास करण्यात येत आहे.

जनमार्ग या नावाने प्रसिध्द असलेल्या या अहमदाबाद - बीआरटीएस प्रकल्पाची आखणी रिंग रुट पध्दतीने करण्यात आल्यामुळे हा प्रकल्प इतर शहरांपेक्षा वेगळा ठरतो. त्यामुळे वाहतूक व्यवस्थेचे भावी नियोजन करणे सोपे झाले आहे. बससाठी राखीव मार्ग ठेवल्यामुळे प्रवासाचा वेळ वाचत आहे. सर्व बस वातानुकूलित असल्यामुळे प्रवास सुसह्य होत आहे. बसमध्ये चढण्या उतरण्यासाठी सुरक्षित प्लॅटफॉर्म असून पिण्याच्या पाण्याचीही स्थानकात सोय आहे. मुख्य म्हणजे पाण्याच्या माठात स्वच्छ पिण्याचे पाणी उपलब्ध आहे. पर्यावरणातील एक मुख्य समस्या म्हणजे शहरातील वाहतूक कोंडी आणि त्यामुळे होणारा इंधनाचा अपव्यय ही आहे. त्यावर अत्यंत शिस्तबध्द नियोजन आणि त्याची काटेकोर अंमलबजावणी करुन उभारलेला हा वाहतूक प्रकल्प महाराष्ट्रातील पुणे, नाशिक, कोल्हापूर आणि कालांतराने विस्तारात जाणा-या सर्वच लहान मोठया शहरांसाठी आदर्शवत वाटला. सौ. सुप्रियाताईंबरोबर या अभ्यास दौ-यामध्ये वंदना चव्हाण, श्री. दत्ता बाळसराफ, श्री. विश्वास ठाकूर, श्री. प्रशांत शिंदे, श्री. अमेय जगताप, श्री. श्रीधर पाटील आणि श्री. आशिष दामले सहभागी झाले होते.

९.३ **इको - कॉलेज प्रकल्पांतर्गत भंडारदरा परिसर जैवविविधिता अभ्यास** : अकोले व राजूर तालुक्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सहभागाने व निसर्गप्रेमी श्रीमती निलिमा जोरवर यांच्या पुढाकाराने भंडारदरा परिसरातील जैवविविधतेचा अभ्यास करण्यास सुरुवात झाली आहे. इको कॉलेज प्रकल्पांतर्गत वसुंधरा अभियानातर्फे श्री. अमेय जगताप आणि श्री. प्रशांत शिंदे यांनी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबर सातत्याने बैठका घेऊन पूर्वतयारी केली. भंडारदरा येथील औषधी वनस्पती, रानभाज्या, सपुष्प वनस्पती, प्राणी-पक्षी आणि स्थानिक पिक प्रजातींमधील विविधतेचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केला असून यासाठी भंडारद-यातील कळसुबाई - हरिश्चंद्रगड अभयारण्यात अभ्यास भेटी आयोजित करण्यात आल्या. या अभ्यास भेटी दरम्यान विद्यार्थ्यांनी दिवसभर फिरुन परिसरातील वनस्पती व प्राणी जगताची माहिती करुन घेतली. या अभ्यासासाठी अगस्ती व रुपवते महाविद्यालयाचे वनस्पतीतज्ज्ञ, प्राध्यापक देशमुख, सृष्टीज्ञान संस्थेच्या वनस्पती तज्ज्ञ श्रीमती श्रेया भानप यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांनी संकलित केलेल्या माहितीचा ठेवा पुस्तकरुपाने प्रकाशित करण्याची योजना पुढील वर्षात हाती घेण्याचे ठरले आहे.

९.४ **टेकडया वाचवा अभियान** : वसुंधरा अभियानचे पुण्यातील समन्वयक, श्री. अमेय जगताप यांच्या नेतृत्याखाली युथ टू युथ या तरुणांच्या संस्थेने पुण्यातील चतु:श्रृंगी मंदिरामागची ओसाड टेकडी वृक्षारोपण आणि मृदासंधारणाच्या माध्यमातून हिरवीगार करुन टाकली आहे. सौ. सुप्रियाताईंनी या कामाची दखल घेत तरुणांच्याबरोबर जाऊन या ठिकाणी वृक्षारोपण केले.

मार्च २०१० मध्ये यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईतर्फे आयोजित करण्यात आलेल्या हवामान बदलविषयक राज्यव्यापी परिषदेपासून ते आजतागत सलग दोन वर्षे या समस्येविषयी साध्या सोप्या मराठी भाषेतून जनजागृती आणि शिक्षण करण्याचे कार्य सातत्याने सुरु आहे. मुंबई, पुणे, अहमदनगर, नाशिक, रत्नागिरी, रायगड अशा जिल्हयांतील अनेक महाविद्यालयांमध्ये शेकडो युवकांबरोबर या समस्येची जाणिव करुन देण्याच्या साठी कार्यक्रम घेण्यात आले. आता गरज आहे ती या युवाशक्तीला पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने प्रत्यक्ष कृतीच्या माध्यमातून विधायक दिशा देण्याची.

## ९.१० वाहतूक सुरक्षा अभियान :-

महाराष्ट्रात दरवर्षी होणारे रस्त्यावरील अपघात व त्यात होणारे हजारो मृत्यू, हजारोंना येणारे अपंगत्व आपल्या सर्वांच्याच चिंतेचा विषय झाला आहे. शासनाचे सार्वजनिक बांधकाम, वाहतूक पोलीस, रस्ते वाहतूक विभाग हे रस्त्यावरील अपघातांना प्रतिबंध घालण्यासाठी आपापल्यापरीने प्रयत्न करीत आहे. या विषयावर काम करण्यासाठी प्रतिष्ठानच्यावतीने 'वाहतूक सुरक्षा अभियान' हा विभाग कार्यरत आहे. या विभागाच्या निमंत्रक सौ. सुप्रिया सुळे या आहेत.

१०.१ यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, वाहतूक सुरक्षा अभियान आणि महाराष्ट्र महामार्ग पोलीस यांनी दि.११ मे २०११ रोजी आंतरराष्ट्रीय रस्ता सुरक्षा दिन, मुंबई वाहतूक पोलीस यांच्या मदतीने साजरा केला. वाहतूक सुरक्षा अभियान यांनी ही मोहीम सकाळी दादर येथील पोर्तुगीज चर्चच्या बाहेर महाराष्ट्र राज्य महामार्ग पोलीस अधिक्षक श्री. बी. जी. शेखर, डी. एस.पी. श्री. घाटकर आणि चर्चचे फादर मारिओ या सर्वांनी रस्ता सुरक्षेचे महत्त्व पटवून दिले. तसेच गुलाब व ग्रिटींग कार्ड वाहन चालकांना देण्यात आले. तसेच वरळी वाहतूक पोलीस मुख्यालयाला गुलाब व ग्रिटींग कार्ड देऊन रस्ता सुरक्षेसंबंधीचा संदेश देण्यात आला. ११ मे रोजी दुपारी मा. गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांच्या हस्ते मंत्रालयाच्या सर्व वाहन चालकांना ग्रिटींग कार्ड व गुलाब वाटप केले. यावेळी अतिरिक्त संचालक श्री. अशोक शर्मा, अधिक्षक पोलीस श्री. बी. जी. शेखर आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. मा. गृहमंत्री श्री. आर. आर. पाटील यांच्या हस्ते मंत्रालयाच्या बाहेर वाहनचालकांना ग्रिटींग कार्ड व गुलाब देऊन त्यांनी रस्ता सुरक्षा संबंधीचा संदेश दिला.

१०.२ दि. १४ जून २०११ रोजी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, राज्याचे गृहमंत्री आणि राज्य परिवहन मंत्री यांना वाहतूक सुरक्षा अभियानाचे निमंत्रिक सुप्रियाताई सुळे यांनी निवेदन दिले आणि कच्चा मसुदा दिला.

१०.३ दि. ३० जून २०११ रोजी वाहतूक सुरक्षा अभियान आणि महामार्ग पोलीस, महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी व आरोग्य तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. हे शिबीर लाईफलाईन हॉस्पिटल, मेडिकल आणि रिसर्च सेंटर या रुग्णालयांच्या मदतीने घेण्यात आले. त्यांनी आरोग्य संबंधीचे महत्त्व पटवून दिले.

## १०.१ पुणे विभागीय केंद्र :-

प्रतिष्ठानच्या पुणे विभागीय केंद्राचे कामकाज विश्वस्त श्री. अजित निंबाळकर यांचे अध्यक्षतेखाली चालते. दैनंदिन कामकाज केंद्राचे सचिव श्री. अंकुश काकडे व खजिनदार श्री. शांतीलाल सुरतवाला पाहतात. त्यांना श्री. सुनिल खताळ, श्री. सुनिल कदम व श्री. रवि सरनाईक यांचे सहाय्य असते.

१.१ **वरुणराज भिडे पारितोषिक वितरण** :- दरवर्षीप्रमाणे केंद्रातर्फे व पुणे विद्यापीठातर्फे पत्रकारिता परीक्षेमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांकाने पास होणा-या विद्यार्थ्यांना अनुक्रमे प्रत्येकी रु.५००/- वरुणराज भिडे पारितोषिक दि. ३०.४.२०११ रोजी देण्यात आले.

१.२ **वारक-यांसाठी अल्पोहार, औषधे व चष्मे वाटप** :- रविवार दि. २६.६.२०११ रोजी सालावादप्रमाणे श्री संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरु तुकाराम महाराज पालखी सोहळयात पुण्यनगरीत आलेल्या वारक-यांसाठी अल्पोपहार तसेच चष्मे व औषधे वाटप यांचा कार्यक्रम तिरंगा भवन, बेलबाग चौक या ठिकाणी श्री. शांतीलाल सुरतवाला व श्री. अंकुशराव काकडे यांचेमार्फत

केंद्रातर्फे आयोजण्यात आला होता. त्यांना याकामी सर्वश्री कुरेश घोडनदीवाला, अजगर गोद्रावाला, जगमोहन सुरतवाला, प्रल्हाद तापकीर, गणेश चव्हाण, सुनिल खताळ, डॉ. अस्मिता शेवाळे इत्यादींची मदत झाली. हजारो वारक-यांनी अल्पोपहार, औषधे व चप्पे वाटपाचा फायदा घेतला.

१.३ **दिवाळी पहाट :-** दि. २६ ऑक्टोबर २०११ रोजी दरवर्षीप्रमाणे सारसबाग पुणे येथे पहाटे ५ ते सकाळी १० वाजेपर्यंत दिवाळी पहाट हा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता. 'सा रे ग म' फेम कलाकार / वाद्यवृंद अभिषेक मोराटकर, धनश्री गणात्रा, बालगायिका आहेती सुभेदार (Little wonder fame) तसेच सौ. शुभांगी मुळये, जितेंद्र भुरुक हार्मोनियम वादक गोपाळ शिंगटे, की बोर्ड रसिक शेठ, ढोलकी - किरण एकबोटे, रिदम मशीन आनंद घोगरे, सेन्सो फोन श्रीपाद सोलापूरकर, तबला रोहित साने, प्रख्यात सूत्रसंचालन प्रकाश पायगुडे व आनंद शिवीर इ.च्या सहकार्याने दिवाळी पहाट हा कार्यक्रम आयोजिण्यात आला होता. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण विनोदवीर सदानंद चांदेकर यांनी कार्यक्रमास बहार आणली.

कार्यक्रमात शास्त्रीय संगीतावर आधारीत नाटयगीते, लावणी मराठी चित्रपटातील वन्स मोअर घेणारी गाणी आणि कथ्थक अशा कार्यक्रमांनी दिवाळी पहाटचा आनंद रसिकांनी लुटला. केंद्राचेवतीने दिवाळी पहाटचा पुरस्कार यंदा ज्येष्ठ गायिका कीर्ती शिलेदार यांना तर युवागायक पुरस्कार अलिहुसेन यांना प्रख्यात गायिका जयमाला शिलेदार यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. दिवाळी पहाटमध्ये कीर्ती शिलेदार यांनी नाटयगीते, सुखद व वसुधा डान्स अॅकॅडमीच्यावतीने भरतनाटयम नृत्य, जितेंद्र भुरुक यांचे गीतोंका सफर इ. कार्यक्रम घेण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रकाश पायगुडे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन श्री. सुनील खताळ व श्री. चंदन सुरतवाला यांनी केले.

१.४ **पर्वती चढणे / उतरणे स्पर्धा व पर्वतीभूषण पुरस्कार :** दरवर्षीप्रमाणे १४ नोव्हेंबर २०११ रोजी बालदिनी ही स्पर्धा आयोजित करणेत आली होती. गेली दहा वर्षे ही स्पर्धा विभागीय केंद्र पुणेचेवतीने घेण्यात येत असते. तरुण पिढीने मोकळया हवेत फिरण्याची व टेकडी चढणे / उतरणे यादृष्टीने व्यायाम करावा या उद्देशाने ज्येष्ठ नागरिकांनी तरुण पिढीपुढे आदर्श ठेवावा व आपली प्रकृतीही सुदृढ राखावी या दृष्टीकोनातून या स्पर्धा आयोजित करणेत येतात. या वर्षी ही दरवर्षीप्रमाणेच ५० ते ६० हा वयोगट असे तीन गट करण्यात आले होते. पुरुष व महिलांसाठी स्वतंत्र गट होते. प्रत्येक गटात प्रथम पारितोषिक रु.१००१/-, द्वितीय पारितोषिक रु.७५१/-, तृतीय पारितोषिक रु.५०१/-अशी तीन बक्षिसे गुणानुक्रमे देण्यात येतात. यावर्षी २०० हून अधिक स्पर्धकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. या वर्षीचा पर्वतीभूषण पुरस्कार श्री. नारायण मुचरीकर (वय ८० वर्षे) यांना रु.१०,०००/- रोख शाल व स्मृतीचिन्ह असा डॉ. प्र. ल. गावडे (माजी प्राचार्य विमलाबाई गरवारे हायस्कूल, पुणे) यांचे शुभहस्ते दि. १२.१२.२०११ रोजी वरदश्री सभागृहात प्रदान करणेत आला. स्पर्धकांना व कार्यकर्त्यांना बक्षिस वितरण कार्यक्रमानंतर भोजन आयोजित करणेत आले होते.

१.५ **पुणे आजी / माजी महापौर मेळावा :** गेली सतत ३० वर्षे पुणे महानगरपालिकेमध्ये निर्वाचित नगरसेवक, सभागृह नेते व पुणे महानगरपालिकेचे सन १९८२-८३ चे महापौर पद भूषविलेले श्री. विठ्ठलराव लडकत यांनी ७१ व्या वर्षात पदार्पण करीत असल्याच्या निमित्ताने सध्याचे पुणे महानगरपालिकेचे महापौर श्री. मोहनसिंग राजपाल यांचे अध्यक्षतेखाली १५ माजी महापौरांचा मेळावा पुणे केंद्रातर्फे महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या तोंडावर सन २०१२ च्या पूर्वसंध्येस शनिवार दि. ३१ डिसेंबर २०११ रोजी एस. एम. जोशी फौंडेशन सभागृहात आयोजित करण्यात आला होता. त्यानिमित्ताने श्री. विठ्ठलराव लडकत यांचे अभिष्ठचिंतन करणेसाठी व महानगरपालिकांच्या राजकारणात क्रियाशील असलेल्या माजी महापौरांना योग्य ते मार्गदर्शन करण्यासाठी ज्येष्ठ समाजवादी नेते व माजी महापौर (१९७३-७४) मा. श्री. भाई वैद्य हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्या हस्ते श्री. लडकत यांना शाल, श्रीफळ, पुणेरी पगडी देऊन त्यांचा सत्कार करयात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केंद्राचे सचिव श्री. अंकुश काकडे यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार कोषाध्यक्ष श्री. शांतीलाल सुरतवाला यांनी मानले.

१.६ **माहितीचा अधिकार कायदा २००५** : माहितीचा अधिकार ज्या सहकारी संस्थांनी शासकीय सहाय्य घेतले आहे त्यांनाच लागू होतो. मात्र गेल्या कांही वर्षामध्ये सहकारी पतसंस्था, नागरी बँका की ज्यांना असे शासकीय आर्थिक सहाय्य प्राप्त झालेले नाही, अशा संस्थांचेबाबतीत श्री. अण्णा हजारे यांनी या संस्थेतील गैरकारभाराचा मुद्दा उचलून धरुन त्यास सहकार खाते व महाराष्ट्र शासन जबाबदार आहे हा मुद्दा लावून धरला. त्या दृष्टीकोनातून जर माहितीचा अधिकार कायदा २००५ बिगर शासकीय आर्थिक सहाय्य नसलेल्या संस्थांनाही लागू केल्यास त्यांचे कारभारामध्ये गुणात्मक प्रगती होऊन सहकार खाते व शासन यांचेवरील ठपकाही कमी होण्यास हातभार लागू शकेल या उद्देशाने दि. ७.११.२०११ रोजी श्री. देवरा सचिव, सहकार यांना प्रस्ताव सादर करुन त्याची प्रत मा. सहकार आयुक्तांना सादर केली आहे. त्या संदर्भात शासनाने मा. सहकार आयुक्तांचे अभिप्राय मागविल्याचे दिसून येते. सदर बाबीचा पाठपुरावा शासनाकडे चालू आहे.

## १०.२ विभागीय केंद्र कराड :

२.१ **१ मे २०११ महाराष्ट्र दिन - कामगार दिन :-** 'विरंगुळा' मा. यशवंतराव चव्हाण यांचे निवासस्थान आणि सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट या दोन्ही ठिकाणी ध्वजारोहन श्री. विलासरावजी पाटील (वाठारकर) यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शिवाजी शिक्षण संस्थेच्या बॅन्ड पथकातील विद्यार्थ्यांनी तसेच केंद्राचे सर्व सेवक, सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे सर्व सेवक यांनी राष्ट्रध्वजाला सलामी दिली. सर्वांना खाऊ वाटण्यात आला.

२.२ **१ जून २०११ सौ. वेणूताई चव्हाण पुण्यतिथी** : सालाबादप्रमाणे सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुण्यतिथीला शास्त्रीय संगीत कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. १ जूनला सकाळी सौ. वेणूताई चव्हाण ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त आमदार श्री. बाळासाहेब पाटील यांनी सौ. वेणूताई स्मारकातील यशवंतराव चव्हाणसाहेब तथा सौ. वेणूताई चव्हाण यांच्या पुतळयास पुष्पहार घालून अभिवादन केले. १ जून २०११ ला सायंकाळी ६.३० वाजता सौ. वासंती टेंबे (कोल्हापूर) यांचे सुश्राव्य शास्त्रीय संगीताचा मंत्रमुग्ध कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमाला वाद्यांची साथ फारच चांगली होती. कराड परिसरातील गांवातल्या लोकानीही या कार्यक्रमाचा आस्वाद घेतला. सौ. वेणूताई चव्हाण कला वाणिज्य महाविद्यालय आणि यशवंतराव चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, शिवाजी शिक्षण संस्थेच्या विठामाता विद्यालय, शिवाजी हायस्कूलच्या महाराष्ट्र हायस्कूल यातील प्राचार्य व प्राध्यापक या सुश्राव्य कार्यक्रमासाठी पूर्ण वेळ हजर होते. सौ. वेणूताई ट्रस्टचे कार्यकारी विश्वस्त आमदार श्री. बाळासाहेब पाटील, श्री. अशोकराव चव्हाण (विश्वस्त) श्री. सुनिल पवार (विश्वस्त) हजर होते.

२.३ **१ जुलै, २०११ आदरणीय स्व. पी. डी. पाटील जयंती** : सौ. वेणुताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त व कराड शहर आणि कराड उत्तर मतदारसंघाचे शिल्पकार स्व. पी. डी. पाटील यांच्या फोटोस पुष्पहार सौ. वेणूताई स्मारक व विभागीय केंद्रामध्ये अर्पण करुन स्व. पी. डी. पाटील यांच्या निवासस्थानी (मंगळवार पेठ) सर्व कर्मचारी वर्गासह जाऊन त्यांच्या फोटोस पुष्पहार घालून आदरांजली वाहण्यात आली.

२.४ **१५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन २०११** : 'विरंगुळा' मान. यशवंतराव चव्हाण निवासस्थान आणि सौ. वेणूताई चव्हाण स्मारकात ध्वजवंदन करण्यात आले.

२.५ **१७ सप्टेंबर २०११ आदरणीय स्व. पी. डी. पाटील पुण्यतिथी** : स्व. पी. डी. पाटील कराड नगराचे शिल्पकार होते, कराड शहराचे भूषण होते. तसेच कराड केंद्र आणि सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त होते. या दोन्ही संस्थाचे

आधारस्तंभ, मार्गदर्शक होते. या पुण्यतिथीच्यानिमित्ताने विरंगुळयात त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून आदरांजली वाहण्यात आली. सहयाद्री सहकारी साखर कारखान्याच्या परिसरातील यशवंतनगर या ठिकाणी असलेल्या यशवंतराव चव्हाण हायस्कूलमध्ये केंद्राचे सचिव श्री. मोहनराव डकरे यांचे व्याख्यान झाले. शिवाजी हायस्कूल मसूर येथेही त्यांचे व्याख्यान झाले. यशवंतराव चव्हाण स्मृती सदन येथेही व्याख्यान आयोजित केले होते.

२.६ **२ ऑक्टोबर २०११ राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती** : सौ. वेणूताई सांस्कृतिक भवनात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून आदरांजली वाहिली.

२.७ **२५ नोव्हेंबर २०११ यशवंतरावजी चव्हाण पुण्यतिथी** : भारताचे महाननेते, महाराष्ट्राचे शिल्पकार, महाराष्ट्राचे भूषण, भारत सरकारमधील अत्यंत महत्वाची खाती समर्थपणे सांभाळणारे कराड निवासी मा. यशवंतरावजी चव्हाण यांची पुण्यतिथी अत्यंत भावपूर्ण अशा वातावरणात करण्यात आली. मा. मुख्यमंत्री, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी यशवंतरावजींच्या समाधीवर पुष्पचक्र वाहून आदरांजली वाहिली. स्व. पी. डी. पाटील प्रतिष्ठानच्यावतीने १२ हजारापेक्षा जास्त मुलांनी गीतसुमनांची आदरांजली वाहिली. सकाळी ९.४५ वा. सन्माननीय मुख्यमंत्री मा. पृथ्वीराज चव्हाण यांनी सौ. वेणूताई चव्हाण स्मारकातील यशवंतरावजी चव्हाणसाहेब यांच्या पुतळयास पुष्पहार घालून भावपूर्ण श्रध्दांजली वाहिली. मा. मुख्यमंत्री यांच्या समवेत नामदार जयंत पाटील, ना. पतंगराव कदम, ना. बाळासाहेब विखे पाटील, ना. सतेज पाटील, मा. माणिकराव ठाकरे, मा. कल्लाप्पाआण्णा आवाडे, मा. आनंदराव पाटील, मा. आमदार बाळासाहेब-पाटील, मा. खासदार श्रीनिवासजी पाटील, मा. आमदार विक्रमसिंह पाटणकर, सौ. वेणूताई ट्रस्टचे विश्वस्त श्री. अशोकराव चव्हाण, श्री. सुनिल पवार, श्री. मानसिंगराव पाटील, श्री. पी. एस. कुलकर्णी व श्री. शंकराप्पा संसुंद्री आदी मान्यवर हजर होते.

सकाळी १० वाजता श्री. विश्वासराव ताम्हणकर यांच्या 'महाराष्ट्र माझा' या यशवंतरावजी चव्हाण यांच्या जीवनावरील कार्यक्रम (संस्कृति फाऊंडेशन, कराड) झाला. वरील सर्व मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते. सायंकाळी ४ वाजता यशवंतरावजी चव्हाण कॉलेज ऑफ सायन्स, सौ. वेणूताई चव्हाण कला, वाणिज्य महाविद्यालय, विठामाता विद्यालय, शिवाजी हायस्कूल, महाराष्ट्र हायस्कूल (शिवाजी शिक्षण सर्व शैक्षणिक महाविद्यालये व विद्यालये) यातील प्राचार्य, मुख्याध्यापक प्रा. बंधुभगिनी, शिक्षण बंधुभगिनी यांच्यासह संस्थेचे सर्व विश्वस्त, ज्येष्ठ नागरिक मा. आमदार बाळासाहेब पाटील, श्री. प्रकाशराव (बापू) पाटील या सर्वांनी सौ. वेणूताई स्मारक ते यशवंतराव चव्हाण समाधी स्थळापर्यंत पदयात्रा काढली. या पदयात्रेत मा. यशवंतराव चव्हाण यांची भव्य प्रतिमा घोडयाच्या बग्गीत ठेवली होती.

२.८ **११ व १२ डिसेंबर २०११ सन्माननीय नामदार श्री. शरदराव पवार सौ. प्रतिभाताई पवार वाढदिवस** - यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष तसेच सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष सन्माननीय ना. श्री. शरद पवार यांचा तसेच सौ. प्रतिभाताई पवार (११.१२.२०११) वाढदिवस विरंगुळयात साजरा करण्यात आला. सर्वांनी त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

२.९ **२६ जानेवारी २०१२ प्रजासत्ताकदिन** - स्वतंत्र भारताचा प्रजासत्ताकदिन २६.१.२०१२ रोजी विभागीय केंद्र कराड। तसेच सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट या ठिकाणी ध्वजवंदन करण्यात आले.

२.१० **दि. २.२.२०१२ सौ. वेणूताई वाढदिवस** - सौ. वेणूताई चव्हाण यांचा वाढदिवस मोठया भावपूर्ण वातावरणात विरंगुळयात साजरा करण्यात आला.

२.११ **मा. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी महोत्सव कार्यक्रम दि. १२ मार्च २०१२ :** मा. यशवंतराव चव्हाण यांचे आजोळ देवराष्ट्र, (तालुका कडेगाव, जिल्हा सांगली) ते कराड 'यशवंत ज्योतीचे' आयोजन करण्यात आले. देवराष्ट्र ते कराड अंतर ४० किलो मिटर आहे. ना. श्री. जयंत पाटील, अध्यक्ष, विभागीय केंद्र, कराड यांच्या हस्ते खुद्द यशवंतरावजी चव्हाणसाहेबांच्या जन्म झालेल्या घरात 'यशवंत ज्योत' मान्यवरांच्या उपस्थितीत प्रज्वलित करण्यात आली. देवराष्ट्र हे संपूर्ण गांव पताक्यानी सुशोभित करण्यात आले होते. घराघरावर गुढया उभारल्या होत्या. ना. श्री. जयंत पाटील यांनी हातात 'यशवंत ज्योत' घेऊन अनवाणी पायाने नगरप्रदक्षिणा घातली. युनिफॉर्ममधील मुले, मुली झांजपताका, भजनी मंडळ, बॅन्ड वाद्ये यांच्या गजरात आणि 'यशवंतराव चव्हाण अमर रहे' या जयघोषात देवराष्ट्रातील सर्व परिसर दुमदुमून गेला. देवराष्ट्र गांव यशवंतमय झाले. मा. खासदार श्री. श्रीनिवास पाटील यांनी यशवंत ज्योत कार्यक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. मा. यशवंतराव चव्हाणांचे पुतणे श्री. अशोकरावजी चव्हाण, सोनहिरा कारखान्याचे चेअरमन श्री. मोहनरावजी कदम, सांगलीचे जिल्हाधिकारी, कडेपूरचे तहसिलदार, सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त श्री. सुनिल पवार तसेच जनता उद्योग समुहाचे शिल्पकार श्री. विलासराव पाटील (वाठारकर), राजाराम वापू सहकारी बँकेचे चेअरमन श्री. शामराव पाटील तसेच यशवंतराव चव्हाण उच्च माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक, त्यांचे सर्व सहकारी, श्री. वावासाहेब शिंदे, देवराष्ट्रे गांवचे सरपंच, त्यांचे सर्व सहकारी, ज्येष्ठ नागरिक परिसरातील गांवातील नागरिक यांनी फार मोठया आत्मियतेने मून. यशवंतरावाना अभिवादन केले. मा. खासदार श्री. श्रीनिवास पाटील, मा. ना. श्री. जयंत पाटील, मा. शामराव पाटील (पेठ), श्री. मोहनराव कदम, सोनसळ यांनी यशवंतरावांच्या हृदय आठवणी सांगितल्या. यशवंतरावजीनी ज्या प्राथमिक शाळेत श्रीगणेशा केला त्या शाळेतही यशवंत ज्योत नेण्यात आली. त्यानंतर कराडकडे ज्योतीचे प्रस्तान झाले. सागरेश्वरापर्यंत देवराष्ट्राच्या विद्यालयातील अनेक मुलामुलीनी यशवंत ज्योत आणली. कांही मुले त्यानंतर कराडपर्यंत आली. सागरेश्वर येथील सागरोबाच्या पवित्र मंदिरातील पिंडीवर ज्योतीचा स्पर्श झाल्यावर यशवंत ज्योत कराडकडे मार्गस्थ झाली. संतकृपा शिक्षण संस्थेचे श्री. अशोकराव भानके यांनी दोन मोठया स्कूल वस दिमतीला मोफत दिल्या होत्या. त्यामुळे अधूनमधून मुलांना थोडीफार विश्रांती मिळाली. तुपारी, ताकारी भवानीनगर, वडगांव, शेणोली, कार्वे या मार्गावरील यशवंतरावांचे भव्य बोर्ड आणि कमानी यामुळे अगदी कराडपर्यंत वातावरण यशवंतमय झाले होते. देवराष्ट्रे ते कराड या रस्त्याला जोडणारी ८ - १० किलोमिटर गांवातील लोकांनीही यशवंत ज्योतीचे भव्य स्वागत केले. सुहासिनीनी यशवंत ज्योतीला ओवाळले. ज्याच्या हातात ज्योत होती त्यांचा अनेक ठिकाणी सत्कार झाला. युनिफॉर्ममधील मुला-मुलींनी शाळांची वॅन्ड पथके, झांजपथके, लेझिम, ढोल ताशे यांनी परिसर दुमदुमून गेला होता. यशवंत ज्योत घेण्यात पोलीस अधिकारी याशिवाय स्त्रियाही होत्या. ना. श्री. पतंगरावजी कदम, कराड उत्तरचे आमदार श्री. बाळासाहेब पाटील, कृष्णा सहकारी कारखान्याचे चेअरमन श्री. अविनाश मोहिते, कृष्णा समूहाचे नेते डॉ. सुरेश भोसले मार्गावरील तसेच जवळपासच्या अनेक गांवातील सरपंच, त्यांचे सहकारी या सोहळयाला उपस्थित होते. स्वातंत्र्य सैनिक स्व. रामभाऊ पाटील (शेणोली) यांचे चिरंजीव श्री. प्रकाशराव पाटील यांनी कार्वे नाक्याच्या अलीकडे स्वतंत्र कमान उभारुन अनेक बंधूभगिनींसह यशवंत ज्योतीचे स्वागत केले. कराडात प्रवेश करतांना नगराध्यक्षा सौ. हिंगमारे, उपनगराध्यक्ष श्री. राजेंद्र यादव सर्व नगरसेवक, सर्व स्टाफ मुख्याधिका-यांसह स्वागतासाठी आवर्जून उपस्थित राहिला होता. यशवंत ज्योत कोल्हापूर नाक्यावरील महात्मा गांधींच्या पुतळयापासून पुढे अर्वन वँकेच्या स्वागत कमानी जवळ आल्यावर फार मोठा जल्लोष झाला. बँकेचे प्रमुख श्री. सुभाष जोशी, डॉ. एरम, श्री. दिलीपराव जाधव, अर्वन वँकेचा सर्व कर्मचारी वर्ग स्वागतासाठी हजर होता. प्रमुख मार्गाने ज्योत विजय चौकात आल्यावर महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार श्री. अजित पवार यांनी ज्योतीचे स्वागत पुष्पहारानी केले व मोठया आदराने यशवंत ज्योत 'विरंगुळा' येथे आणून स्थानापन्न केली. सगळया शिवाजी हौसिंग सोसायटीत दिवे, मेणबत्त्या लावण्यात आल्या. दि.१०, ११, १२ व १३ या दिवशी विरंगुळा विद्युत रोषणाईने सजविला होता. पूर्व नियोजित कार्यक्रमाप्रमाणे दि. ११ ला रात्री सद्गुरु भजनी मंडळाचे भजन झाले. दि. ११रोजी यशवंत ज्योत विरंगुळयात विसावली.

यशवंतराव चव्हाण जयंती, दि. १२ मार्च २०१२ रोजी सकाळी लवकर मा. उपमुख्यमंत्री मा. अजित पवार यांनी 'यशवंत

ज्योत' हाती घेतली व यशवंतरावांच्या समाधीस्थळी मार्गस्थ झाले. जनता बँकेचे भव्य कमान आणि यशवंतरावांचे भव्य कटाऊट उभे केले होते. बँकेचे चेअरमन श्री. राजेश पाटील, श्री. विलासराव पाटील (वाठारकर) सर्व कर्मचारी वर्ग यांनी यशवंत ज्योतीस आदरपूर्वक अभिवादन केले. महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, टिळक हायस्कूल, स्वर्गीय पी. डी. पाटील यांचे निवासस्थान, लाहोरी कन्याशाळा, सावरकर पुतळा, चावडी चौकातून मनो-यापासून बटाणे यांच्या शिवमंदिरापासून मान. यशवंतरावांच्या जुन्या घरात यशवंत ज्योत नेण्यात आली. तेथून सदाशिवराव पेंढारकर (थोर स्वातंत्र्य सैनिक) यांच्या पुतळयावरुन यशवंतरावांच्या समाधीच्या परिसरात यशवंत ज्योतीचे आगमन झाले.

आदरणीय पी. डी. पाटील प्रतिष्ठान, कराड मार्फत यशवंतरावांच्या जन्मदिनी १२ मार्चला १२ हजार पेक्षा जास्त विविध शाळांतील मुले-मुली गीत सुमनांची आदरांजली वाहतात हा उपक्रम गेली १५ वर्षे अव्याहतपणे चालू आहे. फार मोठया संख्येने नागरिक भाग घेतात. मोठया पावित्र्याच्या वातावरणात हा दिवस साजरा केला जातो. यशवंत ज्योत आगमन होताच फार मोठा जल्लोष झाला. मा. ना. श्री. अजित पवार, आमदार श्री. बाळासाहेब पाटील, ना. सतेज पाटील, नगराध्यक्षा सौ. हिंमगीरे, उपनगराध्यक्ष श्री. राजेंद्र यादव, आदरणीय पी. डी. पाटील प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व सचिव श्री. आनंदराव साळुंखे, प्रतिष्ठीत स्वातंत्र्य सैनिक, ज्येष्ठ नागरिक या कार्यक्रमासाठी उपस्थित होते. यशवंतराव जन्मशताब्दी वर्षातील यशवंत ज्योत व गीत सुमनांची आदरांजली हे संस्मरणीय कार्यक्रम प्रदीर्घकाल लोकांच्या मनात रहातील. समाधीस्थळावरील सर्व आबालवृध्दांच्या शर्टावर यशवंतरावजींचा फोटो असलेला बिल्ला (बॅच) सर्व कार्यक्रमाला संस्मरणीय रुप देऊन गेला.

२.१२ **यशवंतरावजी चव्हाणसाहेब जन्मशताब्दी निमित्त कार्यक्रम दि. २४.३.२०१२** - यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षाच्या निमित्ताने 'गीत यशवंत' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन संस्कृती मंच कराड आणि सौ. वेणूताई चव्हाण पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या संयुक्त विद्यमाने 'यशवंतराव चव्हाण स्मृतिसदन' या ठिकाणी शनिवार दि. २४.३.२०१२ रोजी सायंकाळी ६.३० ते ९ या वेळेत करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून श्री. सुधीर देवरे आणि सौ. हेमा देवरे (दिल्ली) होते. या कार्यक्रमाचे संकल्पना व लेखन श्री. विश्वासराव ताम्हणकर हिंदी अनुवाद डॉ. आशा मणियार यांनी केला. गायक कलाकार सौ. अपर्णा संत, जितेंद्र अभ्यंकर साथसंगत सिथेसायझर विवेक परांजपे, सचिन जांभेकर, तबला - राजेश हसबनीस या कलावंताचा संच होता. यशवंतरावजींच्या कार्यकर्तव्याचा आलेख काव्य स्वरुपात मांडणारा हा कार्यक्रम एक आगळावेगळा कार्यक्रम सादर करण्यात आला. मा. आमदार श्री. बाळासाहेब पाटील आणि त्यांचे सहकारी आवर्जून उपस्थित होते.

२.१३ **यशवंतरावजी चव्हाणसाहेब जन्मशताब्दी निमित्त कार्यक्रम दि. २५.३.२०१२** - इंडियन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स (दिल्ली) यांचे सचिव श्री. सुधीर देवरे यांच्या सहकार्याने 'भारताची संरक्षण व परराष्ट्र नितीमधील मान. यशवंतरावजी चव्हाण यांचे योगदान' या विषयावर राष्ट्रीय दर्जाचा परिसंवाद (इंग्रजीमध्ये) घेण्यात आला. या परिसंवादासाठी प्रवेश फी रु.३००/- होती. या कार्यक्रमासाठी मुंबईसह सर्व जिल्हयातील प्रतिनिधी उपस्थित होते. मा. श्री. मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी या विशेष कार्यक्रमाचे उद्घाटन केले. मा. आमदार श्री. बाळासाहेब पाटील दिवसभर कार्यक्रमात व्यस्त होते. मा. खासदार श्रीनिवासजी पाटील तसेच कराडमधील ज्येष्ठ नागरिक मोठया संख्येने उपस्थित होते. कांही प्राध्यापकांनी आपल्या पेपर्सचे वाचन केले. कांही पेपर्स सादर करण्यात आले. या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर आवर्जून उपस्थित होते.

## १०.३ विभागीय केंद्र नागपूर :-

३.१ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. ७ एप्रिल २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाटयवाचन व रंगचर्चा या उपक्रमांतर्गत दि. ७ एप्रिल, २०११ रोजी श्री. मोहन राकेश यांच्या 'शायद' या बीज नाटकाचे वाचन प्रा. संयुक्ता थोरात, ताहा मुनीब, प्रिती पटेल यांनी कले. कार्यक्रमाची सूत्रे धनंजय मांडवकर यांनी सांभाळली.

३.२ **ग्रंथ लोकार्पण सोहळा - दि. १५ एप्रिल २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने दि. १५ एप्रिल, २०११ रोजी डॉ. गणेश चव्हाण यांच्या 'पूर्व विदर्भातील संत परंपरा' या ग्रंथाच्या लोकार्पण सोहळयाचे आयोजन करण्यात आले. केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पालकमंत्री शिवाजीराम मोघे यांच्या हस्ते या ग्रंथाचे लोकार्पण करण्यात आले. डॉ. इलक इंदापवार, मोहन राठोड यांनी ग्रंथावर भाष्य केले. डॉ. गणेश चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक श्री. विनोद लोकरे यांनी केले. श्री. राजू लिपटे यांनी संचालन केले. श्री. विजय जिचकार यांनी आभार मानले.

३.३ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. १ मे २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाटयवाचन व रंगचर्चा या उपक्रमांतर्गत दि. १ मे कामगार दिनानिमित्त गिरणी कामगारांचे विश्व उलगडून दाखविणारे श्री. प्रभाकर पाटील लिखित 'बिंब प्रतिबिंब' या नाटकाचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाची सूत्रे श्री. धनंजय मांडवकर यांनी सांभाळली.

३.४ **गौरव ग्रंथ प्रकाशन - दि. ५ मे २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने दि. ५ मे २०११ रोजी 'सांप्रदायिक सद्भाव आणि सामाजिक शांतता' या डॉ. अक्षयकुमार काळे संपादित कुलगुरु डॉ. श. नू. पठाण गौरव ग्रंथ या ग्रंथाच्या प्रकाशन सोहळयाचे आयोजन करण्यात आले. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. विलास सपकाळ कुलगुरु, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ यांच्या शुभहस्ते डॉ. श. नू. पठाण यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. अक्षयकुमार काळे यांनी केले. संचालन डॉ. सुनील रामटेके यांनी केले. आभार डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी मानले.

३.५ **मातृदिनानिमित्त 'आई म्हणोनी कोणी' - दि. ७ मे २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने मातृदिनानिमित्त दि. ७ मे, २०११ रोजी या 'आई म्हणोनी कोणी' या कवितांचा नजराणा या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नगरसेविका श्रीमती प्रगतीताई पाटील होत्या. श्री. गिरीश गांधी आणि डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या प्रमुख आडिस्थितीत 'आई म्हणोनी कोणी' या कार्यक्रमात प्रा. शुभांगी रथकंठीवार, मनीषा साधू, विजया ब्राम्हणकर आणि विजया मारोतकर यांनी कथा कवितांचा नजराणा सादर केला. श्री. गिरीश गांधी यांनी 'आई' या शब्दाचा अर्थ सांगून त्याची महती पटवून दिली. श्री. धनंजय मांडवकर यांनी आभार मानले.

३.६ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. ८ मे २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नाटयवाचन व रंगचर्चा या उपक्रमांतर्गत दि. ८ मे २०११ रोजी युवालेखक श्री. अभय नवाथे यांच्या पहिल्याच 'चूक की बरोबर' या नाटकाचे वाचन करण्यात आले. कार्यक्रमाची सूत्रे सर्वश्री कुणाल मुळे, संजय काशीकर यांनी सांभाळली.

३.७ **विश्वशांती म्हणजे काय ? - चिंतनसत्र दि. १७ मे २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने तथागत भगवान गौत्तमबुध्दांच्या जयंतीनिमित्त विश्वशांती म्हणजे काय ? या चिंतनसत्राचे आयोजन दि. १७ मे, २०११ रोजी करण्यात आले. अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी होते. व्यासपीठावर प्रा. ज्ञानेश वाकुडकर, विजय जिचकार, डॉ. प्रमोद मुनघाटे आणि चिंतनसत्राचे वक्ते डॉ. म. ग. उपाख्य, भाऊसाहेब झिटे उपस्थित होते.

३.८ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. ३ जुलै २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाटयवाचन व रंगचर्चा' या उपक्रमांतर्गत दि. ३ जुलै २०११ रोजी श्री. नितीन ठाकरे लिखित 'स्टॉप' व श्री. धनंजय मांडवकर लिखित 'तीन त्रिक साडेसात' या दोन नाटयकृतींचे वाचन करण्यात आले. या रंगचर्चेत डॉ. विनोद इंदूरकर, प्रसिध्द लेखक श्री. पराग घोंगे आणि नाटयरसिक यांनी सहभाग घेतला. श्री. समीर तभाने यांनी या कार्यक्रमांची सूत्रे सांभाळली.

३.९ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. १० जुलै २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाटयवाचन व रंगचर्चा' या उपक्रमांतर्गत दि. १० जुलै २०११ रोजी श्री. रमेश पवार लिखित 'ब्रीज' व श्री. नितीन ठाकरे लिखित 'डोअर बेल' या नाटयकृतींचे वाचन करण्यात आले. सारंग मास्टे, जवाहर बढीये, विनय निजसुरे, श्रीपाद क्षिरे या नाटयरसिक, समीक्षकांनी या रंगचर्चेत सहभाग घेतला. या चर्चेत लेखक महोदयांशी रंगावृत्ती या संदर्भात विशेषत्त्वाने चर्चा करण्यात आली. श्री. धनंजय मांडवकर यांनी या कार्यक्रमांची सूत्रे सांभाळली.

३.१० **कालिदास दिन - दि. १५ जुलै २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व कविकुलगुरु संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दि. १५ जुलै २०११ रोजी कालिदास दिनाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्त संस्कृत नाटयस्पर्धेत महाराष्ट्रातून सर्वप्रथम आलेले 'बंडू अभिनय करोती' या नाटकाचा प्रयोग सादर करण्यात आला. तसेच संगीतसंस्थेमध्ये क्लासिकल आणि सेमीक्लासिकल गितांचा नजराणा डॉ. चित्रा मोडक, मंजिरी वैद्य यांच्या चमुने सादर केला. याप्रसंगी व्यासपीठावर संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. पंकज चांदे, श्री. गिरीश गांधी, डॉ. रुपा कुळकर्णी, डॉ. नंदा पुरी आदी मान्यवर उपस्थित होते.

३.११ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. १७ जुलै २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाटयवाचन व रंगचर्चा' या उपक्रमांतर्गत दि. १७ जुलै २०११ रोजी नवोदित लेखक श्री. प्रणव साकुळकर यांच्या 'अ डेन्जरस प्रँक' या हिंदी एकांकिकेचे वाचन करण्यात आले. या रंगचर्चेत सर्वश्री गजानन सगदेव, अतुल शेबे, विनय निजसुरे, जवाहर वढीये, अभिषेक काणे यांनी सहभाग घेतला. श्री. आशिष सोनटक्के यांनी या चर्चेची सूत्रे यशस्वीरित्या सांभाळली.

३.१२ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. २४ जुलै २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाटयवाचन व रंगचर्चा' या उपक्रमांतर्गत दि. २४ जुलै २०११ रोजी श्री. रत्नाकर भेलकर यांच्या कथेवर आधारित श्री. समीर तभाने लिखित 'कासरे' या नाटयकृतीचे वाचन करण्यात आले.

३.१३ **नाटयवाचन व रंगचर्चा - दि. ३१ जुलै २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व रंगमैत्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नाटयवाचन व रंगचर्चा' या उपक्रमांतर्गत दि. ३१ जुलै २०११ रोजी कोराडी येथील नवोदित लेखिका श्रीमती आसावरी इंगळे यांच्या 'सायंकाळचा पाऊस' या नाटयकृतीचे वाचन करण्यात आले. वृध्दाश्रमातील वृध्दांचे जीवनदर्शन यावर आधारलेल्या या नाटयकृतीवर सर्वश्री जवाहर बढीये, सुधाकर धाकतोड, विशाल कुकडे यांनी चर्चा केली. श्री. कुणाल मुळे यांनी या चर्चेची सूत्रे सांभाळली.

३.१४ **मैत्री दिन - दि. ६ ऑगस्ट २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर आणि आधार, नागपूर या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ज्ञानपीठ विजेते वि. वा. शिरवाडकर जन्मशताब्दी वर्षानिमित्त मैत्री दिनाच्या पूर्व संध्येला दि. ६ ऑगस्ट, २०११ रोजी 'तो प्रवास सुंदर होता' या कविता, ललित आणि नाटकांवर आधारित अभिवाचन गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. संकल्पना, बांधणी, निवेदन डॉ. अरुणा ढेरे, नाटयकृतींचे वाचन श्री. अजित दिवाडकर यांचे तर गायन श्रीमती अनुराधा मराठे यांचे होते. व्यासपीठावर श्री. गिरीश गांधी व आधार संस्थेचे अध्यक्ष डॉ. अविनाश रोडे उपस्थित होते.

३.१५ **मैत्री दिन - दि. ७ ऑगस्ट २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने दि. ७ ऑगस्ट, २०११ रोजी गझलकार क्रांती साडेकर यांच्या 'अग्निसखा' व 'असेही तसेही' या दोन गझल संग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. कवयित्री

डॉ. सुलभा हेर्लेकर यांच्या अध्यक्षतेखाली गझलकार श्री. भिमराव पांचाळे यांच्या शुभहस्ते श्री. गिरीश गांधी, श्रीमती वसुधा छत्रपती, डॉ. प्रमोद मुनघाटे, श्री. विजय जिचकार यांच्या विशेष उपस्थितीत हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

३.१६ **पुस्तक प्रकाशन समारंभ - दि. २४ ऑगस्ट २०११** :- विभागीय केंद्र, नागपूर आणि साधना प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. देवेंद्र गावंडे लिखित 'नक्षलवादाचे आव्हान : दंडकारण्यातील अस्वस्थ वर्तमान' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ दि. २४ ऑगस्ट, २०११ रोजी आयोजित करण्यात आला. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली सरदार पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी हैद्राबादचे अतिरिक्त संचालक श्री. शिरीष जैन यांच्या शुभहस्ते दै. लोकमतचे संपादक श्री. सुरेश द्वादशीवार, डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या विशेष उपस्थितीत संपन्न झाला. सूत्रसंचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले. आभार श्री. धनंजय मांडवकर यांनी मानले.

३.१७ **गौत्तम राजाध्यक्ष यांना भावपूर्ण श्रध्दांजली - दि. १५ सप्टेंबर २०११** :- विदर्भ साहित्य संघ, विभागीय केंद्र, नागपूर, ऑरेंज सिटी फोटोग्राफर्स असोसिएशन व पॅनकॅन या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ सप्टेंबर २०११ रोजी श्री. मनोहर म्हैसाळकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रसिध्द छायाचित्रकार श्री. गौत्तम राजाध्यक्ष यांना भावपूर्ण श्रध्दांजली देण्यात आली. सर्वश्री गिरीश गांधी, मनोहर म्हैसाळकर, प्रकाश एदलाबादकर, विवेक रानडे, सुनील इंदाने, राजाभाऊ वर्मा यांनी आपली मनोगते व्यक्त केली. श्री. बाळ कुळकर्णी यांनी संचालन केले. शेवटी सर्व उपस्थितांनी गौत्तम राजाध्यक्ष यांना मूक श्रध्दांजली अर्पण केली.

३.१८ **पुस्तक प्रकाशन समारंभ - दि. २२ सप्टेंबर २०११** :- विभागीय केंद्र, नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २२ सप्टेंबर २०११ रोजी श्रीमती अरुणा सबाने लिखित 'जीवाभावाचे' या आकांक्षा प्रकाशनच्या शंभराव्या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला.

३.१९ **नवीन कार्यकारिणी बैठक - दि. २४ सप्टेंबर २०११** :- विभागीय केंद्र, नागपूरच्या नवीन कार्यकारिणीच्या नव्याने सदस्य झालेल्या सदस्यांचा अभिनंदन सोहळा दि. २४ सप्टेंबर २०११ रोजी घेण्यात आला. तसेच प्रतिष्ठानच्या कामकाजाची माहिती नवीन सदस्यांना करुन देण्यात आली. यापुढील नवीन उपक्रम आणि कार्यक्रमाबद्दल चर्चा करण्यात आली.

३.२० **नाटय संहितेचा प्रकाशन समारंभ - दि. २५ सप्टेंबर २०११** :- विभागीय केंद्र, नागपूर व मराठी बोली साहित्य संघ, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ सप्टेंबर २०११ रोजी डॉ. ईश्वर नंदपूरे 'अशी पाखरे येती' आणि 'अेकटी' या दोन नाटय संहितेचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. हरिचंद्र बोरकर यांच्या शुभहस्ते, सर्वश्री सुभाष चांदूरकर, डॉ. राजन जयस्वाल, डॉ. सुनंदा देशपांडे, विजय चिजकार, रमेश बोरकुटे यांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. प्रा. विजया मारोतकर यांनी संचालन केले.

३.२१ **पत्र परिषद - दि. २९ सप्टेंबर २०११** :- विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. २९ सप्टेंबर २०११ रोजी सकाळी ९.०० वाजता राष्ट्रभाषा संकुलातील प्रेस कॉन्फरन्स सभागृहात खासदार सौ. सुप्रियाताई सुळे यांच्या पत्र परिषदेचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी स्त्री-भ्रूणहत्येच्या विरोधात विदर्भात घेण्यात येणा-या 'जागर हा जाणिवांचा तुमच्या माझ्या लेकीचा' स्त्री-भ्रूणहत्येच्या विरोधातील पदयात्रा व युवती परिषदेबद्दल या पत्रपरिषदेत त्यांनी माहिती दिली. यावेळी विदर्भातील मान्यवर मंडळी प्रामुख्याने उपस्थित होती. यावेळी श्री. गिरीश गांधी यांनी प्रास्ताविक केले.

३.२२ **कुसुमाग्रजांचे साहित्य - राष्ट्रीय चर्चासत्र दि. २९ सप्टेंबर २०११ :-** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, स्नातकोत्तर मराठी विभाग, विभागीय केंद्र, नागपूर, माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने 'कुसुमाग्रजांचे साहित्य' या द्विदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दि. २९ व ३० सप्टेंबर, २०११ रोजी आयोजित करण्यात आले. डॉ. निशिकांत मिरजकर यांच्या अध्यक्षतेखाली, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास सपकाळ यांच्या शुभहस्ते या चर्चासत्राचे उद्घाटन दुपारी १ वाजता करण्यात आले. याप्रसंगी श्री. गिरीश गांधी, डॉ. अक्षयकुमार काळे, श्री. रमेश बोरकुटे उपस्थित होते प्रास्ताविक डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी केले तर संचालन डॉ. कोमल ठाकरे यांनी केले. आभार श्री. प्रमोद लेंडे यांनी मानले. या दोन दिवसीय चर्चासत्रात विद्यार्थी, प्राध्यापक यांनी सहभाग नोंदविला.

३.२३ **आंबेडकरवादी साहित्य - चर्चासत्र दि. १४ व १५ ऑक्टोबर २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व स्नातकोत्तर मराठी विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर आणि स्नातकोत्तर मराठी विभाग माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आंबेडकरवादी साहित्य' या विषयावर द्विदिवसीय चर्चासत्राचे आयोजन दि. १४ व १५ ऑक्टोबर २०११ रोजी शंकरनगर, नागपूर येथे करण्यात आले. श्री. राजन गवस यांच्या हस्ते ज्येष्ठ विचारवंत व साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली चर्चासत्राचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, डॉ. अक्षयकुमार काळे, प्रा. अनिल नितनवरे, डॉ. शैलेंद्र लेंडे आदी मान्यवर उपस्थित होते. उद्घाटन सोहळयाचे संचालन प्रा. विनोद राऊत यांनी केले. डॉ. अरुणा देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली पहिल्या सत्रात 'आंबेडकरवाद : तत्त्वमीमांसा' या निबंधाचे प्रा. प्रदीप मेश्राम यांनी वाचन केले. तर 'आंबेडकरवादी निबंधाचे' डॉ. शैलेंद्र लेंडे यांनी वाचन केले. डॉ. अशोक पळवेकर यांच्या अध्यक्षतेखाली दुस-या सत्राला सुरुवात झाली. आंबेडकरवादी कविता, आंबेडकरवादी कवयित्रींची कविता, आंबेडकरवादी स्वकथने या विषयांवर डॉ. भूषण रामटेके, प्रा. अजय चिकाटे, डॉ. इसादास भडके यांनी निबंधवाचन व प्रा. तीर्थराज कापगते यांनी सूत्रसंचालन केले.

दि. १५ ऑक्टोबर रोजी तिस-या सत्रात डॉ. प्रमोद मुनघाटे यांच्या अध्यक्षतेखाली 'आंबेडकरवादी कथा, आंबेडकरवादी कविता' या विषयांवर प्रा. प्रमोद नारायणे, प्रा. रेणुकादास उबाळे यांनी निबंध वाचन केले. डॉ. समीधा चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले. चर्चासत्राच्या चौथ्या सत्राला डॉ. प्रकाश खरात यांच्या अध्यक्षतेखाली 'आंबेडकरवादी नाटयसृष्टी' या निबंधाने वाचन डॉ. सुनील रामटेके यांनी केले. तसेच आंबेडकरवादी साहित्य-समीक्षा या निबंधातून प्रा. अनिल नितनवरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. या सत्राचे संचालन डॉ. श्याम मोहरकर यांनी केले. पाचव्या सत्रात विविध अभ्यासक्रमांच्या शोधनिबंधाचे सारांश कथन करण्यात आले. डॉ. यशवंत मनोहर यांच्या भाषणाने या दोन दिवसीय चर्चासत्राचा समारोप करण्यात आला. विदर्भातील विविध भागांतून अभ्यासक, साहित्यिक, समीक्षक व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला हे विशेष.

३.२४ **प्रातःस्वर - दिवाळी पहाट २०११ - दि. २५ ऑक्टोबर २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दिपावलीच्या पर्वावर प्रातःस्वर २०११ चे आयोजन २५ ऑक्टोबर २०११ रोजी करण्यात आले. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली श्री. एन. एस. बालसुंदरम, ज्येष्ठ लेखिका श्रीमती आशा बगे यांच्या उपस्थितीत पहाटे ५.४५ वाजता उत्तर हिंदुस्थानी आणि दक्षिण कर्नाटकी शास्त्रीय संगीताचा अपूर्व मिलाफात सुरमणी साधना शिलेदार, रंजना कृष्णकुमार, मिलींद इंदूरकर, शिरीष भालेराव, श्रीकांत पिसे, रवी कटौजू, कांचन घाटोळे या कलावंतांनी नवचैतन्य निर्माण केले. कार्यक्रमाचे निवेदन प्रा. रजनी हुद्दा यांनी केले.

३.२५ **विभागीय कार्यकारिणीची बैठक - दि. १२ नोव्हेंबर २०१११ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने दि. १२ नोव्हेंबर २०११ रोजी बैठक घेण्यात आली. दि. १२ मार्च २०१२ ते १२ मार्च २०१३ हे मान. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष.

या वर्षभरात घेण्यात येणा-या कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यासाठी व कार्यक्रमाबाबत विचार-विमर्श करण्यासाठी दि. १२ नोव्हेंबर २०११ रोजी श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पदाधिकारी व सदस्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्यात आली.

३.२६ **अभंग जीवनाचे - प्रकाशन सोहळा - दि. १३ नोव्हेंबर २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व संवेदना प्रकाशन, खापरखेडा आणि शंकरराव चव्हाण विद्यालय, खापरखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १३ नोव्हेंबर २०११ रोजी कवी जीवन खोब्रागडे यांच्या 'अभंग जीवनाचे' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला.

३.२७ **ध्वनिफित लोकार्पण सोहळा - दि. १४ नोव्हेंबर २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर आणि गार्गी मुव्हीजच्या विद्यमाने दि. १४ नोव्हेंबर २०११ रोजी 'यमाच्या गावाला जाऊ या' आणि 'दे फुलांचे हात हाती' या ध्वनीफितीचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात आला. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली व सर्वश्री डॉ. अक्षयकुमार काळे, डॉ. प्रमोद मुनघाटे, प्रा. ज्ञानेश वाकुडकर, रोहित खंडेलवाल यांच्या उपस्थितीत हा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

३.२८ **मा. यशवंतराव चव्हाण यांची २७ वी पुण्यतिथी - दि. २५ नोव्हेंबर २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने दि. २५ नोव्हेंबर २०१३ रोजी मान. यशवंतराव चव्हाण यांच्या २७ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने 'यशवंतराव चव्हाण आणि आजचा महाराष्ट्र' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. श्री. श्रीपाद अपराजित यांच्या अध्यक्षतेखाली श्री. मधुकर भावे यांनी 'यशवंतराव चव्हाण आणि आजचा महाराष्ट्र' या संदर्भात आपले विचार व्यक्त केले. याप्रसंगी सर्वश्री गिरीश गांधी, किशोर कन्हेरे, रमेश बोरकुटे, संजय कोंडावार विभागीय केंद्राचे सदस्यगण आणि मान्यवर मंडळी उपस्थित होती. प्रास्ताविक श्री. गिरीश गांधी यांनी केले. संचालन डॉ. प्रमोद मुनघाटे यांनी केले तर रमेश बोरकुटे यांनी आभार मानले.

३.२९ **बहुभाषिक कविसंमेलन - दि. १७ डिसेंबर २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक, दि सारस्वत को. ऑप. बँक लि. (शेडयुल बँक) यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १७ डिसेंबर २०११ रोजी शंकरनगर येथे बहुभाषिक कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. श्री. दिलीप वळसे-पाटील यांच्या हस्ते, श्री. अरुणभाई गुजराथी यांच्या अध्यक्षतेखाली, श्री. हेमंत टकले यांच्या उपस्थितीत या संमेलनाचा उद्घाटन सोहळा संपन्न झाला. ज्येष्ठ कवयित्री श्रीमती आशा पांडे यांच्या अध्यक्षतेखाली संस्कृत, इंग्रजी, हिंदी, मराठी, बंगाली, उडिया, पंजाबी, उर्दू, तेलगू, गुजराती भाषेतील कवींनी आपल्या रचना या संमेलनात सादर केल्या. याप्रसंगी श्री. गिरीश गांधी, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिकचे श्री. श्याम पाडेकर उपस्थित होते. श्रीमती श्वेता शेलगांवकर यांनी सूत्रसंचालन केले.

३.३० **सुंदर हस्ताक्षर स्पर्धा - दि. २५ डिसेंबर २०११ :-** विभागीय केंद्र, नागपूर व शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर विभाग व नागपूर महानगरपालिका (शिक्षण विभाग) रायसोनी ग्रूप यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ डिसेंबर २०११ रोजी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा २०११ च्या पारितोषिक वितरण सोहळयाचे आयोजन करण्यात आले. खासदार श्री. दत्ता मेघे यांच्या हस्ते व आमदार श्री. दिनानाथ पडोळे यांच्या अध्यक्षतेखाली श्री. गिरीश गांधी, श्री. महेश साधवानी, श्री. पी. के. जैन, श्री. अजय खामनकर, श्री. महेश करजगांवकर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी आयोजित केली होती. या स्पर्धेत विदर्भातून जवळ जवळ पावणे दोन लाख विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३.३१ **कैद्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धा - दि. १ जानेवारी २०१२ :-** विभागीय केंद्र, नागपूर, मधुकर भाकरे प्रतिष्ठान आणि मध्यवर्ती कारागृह, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने कैद्यांसाठी सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन दि. १ जानेवारी २०१२ रोजी

करण्यात आले. या स्पर्धेत ७६ पुरुष कैदी आणि ३० महिला कैदी सहभागी झाल्या होत्या. 'गुरु शिष्य परंपरा' हा विषय त्यांना लिहिण्यासाठी देण्यात आला होता.

३.३२ **देशांतरीच्या कथा - प्रकाशन समारंभ - दि. २ जानेवारी २०१२ :-** विभागीय केंद्र, नागपूर व आकांक्षा प्रकाशन, नागपूर यांच्यावतीने दि. २ जानेवारी २०१२ रोजी श्रीमती निलीमा कुलकर्णी यांच्या 'देशांतरीच्या कथा' या कथासंग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. श्री. सुरेश द्वादशीवार यांच्या शुभहस्ते श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला. ज्येष्ठ कवी श्री. श्रीधर शनवारे यांनी या संग्रहावर भाष्य केले. सौ. माधवी पांडे यांनी सूत्रसंचालन केले व श्रीमती अरुणा सवाने यांनी आभार मानले.

३.३३ **प्रश्नांची गझल - प्रकाशन समारंभ - दि. २३ जानेवारी २०१२ :-** विभागीय केंद्र, नागपूर व यशवंत मनोहर प्रतिष्ठान, नागपूर यांच्यावतीने दि. २३ जानेवारी २०१२ रोजी शंकरनगर चौक, नागपूर येथे गझलकार श्री. प्रमोद वाळके यांच्या 'प्रश्नांची गझल' या संग्रहाचा प्रकाशन सोहळा आयोजित करण्यात आला. श्री. गिरीश गांधी यांच्या हस्ते डॉ. यशवंत मनोहर यांच्या अध्यक्षतेखाली हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

३.३४ **'आपुला चि वाद आपणासी' - विचारमंथन - दि. २७ जानेवारी २०१२ :-** विभागीय केंद्र, नागपूर आणि अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूरच्यावतीने शेतकरी आंदोलक आणि विचारक श्री. चंद्रकांत वानखडे यांच्या 'आपुला चि वाद आपणासी' आत्मकथनावर विचारमंथनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात दैनिक भास्करचे संपादक श्री. प्रकाशजी दुबे, दैनिक नवशक्ती, मुंबईचे संपादक श्री. सचिन परब व विभागीय केंद्र, नागपूरचे अध्यक्ष श्री. गिरीश गांधी, पुणे विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. मनोहर जाधव व दैनिक लोकमत, अकोला येथील संपादकीय प्रमुख श्री. अविनाश दुधे यांनी या आत्मकथनावर आपले विचार व्यक्त केले. या प्रसंगी सौ. माया आणि श्री. चंद्रकांत वानखडे यांचेशी दु. ३.३० वाजता श्रीपाद अपराजित, श्री. श्याम धोंड यांनी चर्चासत्रात संवाद साधला. तसेच डॉ. हेमंत खडके, श्री. विजय जावंधिया या चर्चासत्रात सहभागी झाले.

३.३५ **राम गणेश गडकरी यांच्या निवासस्थानी काव्यमैफल - विचारमंथन - दि. १ मार्च २०१२ :-** विभागीय केंद्र, नागपूरच्यावतीने 'नव्या जाणिवांचे कवी' या उपक्रमांतर्गत सावनेर येथे दि. १ मार्च २०१२ रोजी स्व. राम गणेश गडकरी यांच्या निवासस्थानी पुरातत्त्व वास्तु संग्रहालय विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने काव्य मैफलीचे आयोजन करण्यात आले.

३.३६ **सभेचे आयोजन - दि. १७ फेब्रुवारी २०१२ :-** यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी दि. १२ मार्च, २०१२ पासून सुरु होत आहे व त्याची सांगता दि. १२ मार्च २०१३ ला होत आहे. त्यानिमित्ताने वर्षभर नागपूर विभागीय केंद्राकडून दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन व्हावे या संदर्भात शुक्रवार दि. १७ फेब्रुवारी २०१२ ला विभागीय केंद्राचे कार्यालय, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे दु. ३ वाजता श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली सभेचे आयोजन करण्यात आले. या सभेत कुठले कार्यक्रम व्हावेत (चर्चासत्र, व्याख्यान, स्पर्धा, प्रदर्शने, सहकार, ग्रामीण समस्या, साहित्य, संगीत इत्यादी) त्याचे स्वरुप, रुपरेषा यावर विचारविमर्श करण्यात आला. एकूण वर्षभरातील कार्यक्रमांचे नियोजन व आखणी हा चर्चेचा मुख्य उद्देश होता.

३.३७ **युवा महोत्सव - दि. ५ मार्च २०१२ :-** विभागीय केंद्र, नागपूर व आकाशवाणी, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने

आयोजित 'युवा महोत्सव' दि. ५ मार्च, २०१२ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री साई सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे संपन्न झाला. याप्रसंगी विदर्भातून विविध जिल्हयांतून १०० युवा कलावंत सहभागी झाले.

३.३८ **यशवंतराव चव्हाण यांच्या रेखाचित्रांचे प्रदर्शन - दि. १२ मार्च २०१२** :- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मान. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने मान. यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीदिनी श्री. आचरेकर यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनादिनी दि. १ मे १९६० रोजी काढलेल्या रेखाचित्राचे प्रदर्शन दि. १२ मार्च २०१२ रोजी सकाळी १० वाजता श्रीमंत बाबूराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आले. या रेखाचित्र प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र शासन महसूल विभागाचे मुख्य सचिव श्री. स्वाधीन क्षत्रिय यांच्या शुभहस्ते व रा.का.पा. चे शहराध्यक्ष श्री. अजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

३.३९ **महाराष्ट्रातले यशवंतराव - दिल्लीतले यशवंतराव - दि. २९ मार्च २०१२** :- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मान. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने महाराष्ट्रातील ज्येष्ठ पत्रकार श्री. मधुकरराव भावे यांचे 'महाराष्ट्रातले यशवंतराव - दिल्लीतले यशवंतराव' या विषयावरील व्याख्यान गुरुवार दि. २९ मार्च २०१२ रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आले. श्री. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम संपन्न झाला.

३.४० **कथावाचन - दि. ३१ मार्च २०१२** :- आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व संयुक्त महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री मान. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त विभागीय केंद्र, नागपूरच्या वतीने 'कथावाचन' उपक्रमाचा शुभारंभ दि. ३१ मार्च २०१२ रोजी सायंकाळी ५.३० वाजता श्रीमंत बाबुराव धनवटे सभागृह, राष्ट्रभाषा संकुल, शंकरनगर चौक, नागपूर येथे आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिध्द लेखिका सौ. आशाताई बगे, प्रतिष्ठानच्या विभागीय केंद्राचे उपाध्यक्ष श्री. किशोर कन्हेरे व कवी प्रा. ज्ञानेश वाकुडकर यांच्या विशेष उपस्थितीत डॉ. नयना धवड आणि सौ. ज्योती पुजारी यांच्या कथेचे वाचन करण्यात आले.

## १०.४ विभागीय केंद्र कोंकण :-

१) **वसुंधरा दिन कार्यक्रम दि. २२ एप्रिल २०११** :- विभागीय केंद्र कोकण, जिल्हा समिती सिंधुदुर्ग व निसर्गसंवर्धन मंच माणगांव, सिंधुदूर्ग यांच्या संयुक्त विद्यमाने राधाकृष्ण सभागृह, माणगांव येथे दि.२२ एप्रिल,२०११ रोजी ' वसुंधरा दिन ' साजरा करण्यात आला. वनसंपत्तीचे रक्षण करणे हे वनकर्मचा-यांवरोबर नागरीकांचे कर्तव्य आहे. वसुंधरा ही आपली माता आहे. तिचे रक्षण करणे प्रत्येक भुमिपुत्राचे कर्तव्य आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी जास्तीत जास्त झाडे लावली पाहिजेत. झाड तोडण्याची परवानगी देताना शेतक-यांकडून एका झाडामागे पन्नास झाडे लावण्याचे प्रतिज्ञापत्र घेतले जाते. माणगांव खो-यात वसुंधरा दिनासारखे कार्यक्रम होणे हा संस्थेचा उपक्रम स्तुत्य आहे असे गौरउद्गार कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कुडाळचे वनक्षेत्रपाल श्री. विजय कदम यांनी काढले. यावेळी व्यासपीठावर सिंधुदूर्ग जिल्हा समितीचे अध्यक्ष ॲड. किशोर शिरोडकर, निसर्गसंवर्धन मंचच्या अध्यक्षा सौ. स्नेहल फणमळकर, प्राचार्य श्री. संतोष पवार आदी उपस्थित होते. यावेळी बालगटातुन चित्रकला स्पर्धा व माध्यमिक व खुल्या गटातून निबंध स्पर्धा घेण्यात आली.

**२) दि. ४ जून, २०११ :** कोकण विभागीय केंद्र रत्नागिरी व कृषि तंत्र विद्यालय सुकीवली, तालुका खेड यांचे संयुक्त विद्यमाने दि. १४ जून २०११ रोजी दुपारी २:०० वाजता केंद्रीय नारळ बोर्डाच्या योजना व यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे उद्देश व कार्य याविषयी माहिती तसेच शेतक-यांना नारळ रोप वाटप असा भरगच्च कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मान. यशवंतराव चव्हाणांचे स्नेही श्री. कोठारे साहेब होते.

यावेळी केंद्राच्या कार्यक्रमांचा आढावा व उद्देश जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी विषद केले. विभागीय केंद्र कोकणचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर यांनी शेतक-यांनी सुधारीत बियाण्यांचा वापर शेतीसाठी करावा तसेच युवकांनी नोकरीच्या मागे न लागता आपल्या गावातील शेती बागायतीकडे लक्ष द्यावे असे आवाहन केले. ॲड. बाळासाहेब वेलोसे यांनी आपल्या भाषणात श्री. राजाभाऊ लिमये यांची नारळ बोर्डावर निवड झाल्यामुळे आपल्याला केंद्रीय नारळ बोर्डाची ओळख झाली व विविध योजनांवरील अनुदान कोकणात आले, असे मत व्यक्त केले.

३) **कृषि दिन कार्यक्रम दि. १ जुलै २०११ :** कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि. १ जुलै २०११ रोजी कृषि दिन कार्यक्रम गोळप रत्नसगिरी येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाचे माजी शिक्षण संचालक डॉ. अशोक पोवार यांच्या उपस्थितीत झाले. जिल्हाध्यक्षा सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी प्रास्ताविक करताना मान. यशवंतराव चव्हाणांचे विचार, त्यांची कार्यपध्दती, प्रतिष्ठानची उद्दीष्टे याबाबत थोडक्यात माहिती सांगितली. केंद्राच्या कार्याचा आढावा घेताना त्या म्हणाल्या की, कोकणात वनौषधी भरपूर आहेत. त्यांच्या संवर्धनासाठी कोकण कृषि विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण शिबिरे घेण्याची गरज आहे. भाटये नारळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता डॉ. दिलीप नागवेकर यांनी नारळ लागवड, त्यांची निगा व त्यावर पडणारे रोग यांची माहिती दिली.

दापोलीच्या बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे माजी शिक्षण संचालक डॉ. अशोक पोवार यांनी मार्गदर्शन करताना, आज शेतीमध्ये हरीतक्रांती घडून आली आहे. हरीतक्रांतीमुळे शेतीमध्ये अधिक उत्पन्न मिळत असल्यामुळे शेतक-यांना दिलासा मिळाला आहे. आज कॉंक्रीटीकरण होत असल्यामुळे वृक्षतोड मोठया प्रमाणात होत आहे. कॉंक्रीटीकरणामुळे पाण्याचा निचरा होत नाही. त्यामुळे पाणी टंचाई जाणवते. शेतीसाठी पाणी व जमीन हे घटक महत्वाचे आहेत. त्यासाठी वृक्षलागवड केली पाहिजे. समृध्द कोकणासाठी सामान्य शेतक-यांनी आंबा, काजू सोबत भुईमूग, बांबू, कोकमची शेती करावी त्यातून प्रचंड पैसा मिळू शकतो. अलीकडे शेती करण्यासाठी माणसे मिळत नसल्याने जमिनी विकल्या जातात, असे न करता शेतीसाठी शेतक-यांनी यांत्रिकीकरण्यावर भर द्यावा तंत्रज्ञानाची माहिती घेऊन शेतीत लक्ष घातले पाहिजे. लावणी कापणीसाठी यंत्र उपलब्ध आहेत. त्यांचा वापर करावा असे आावाहन केले. यानंतर शेतक-यांना नारळाची व आवळयाची रोपे वाटप करण्यात आली. वाटप करण्यात आलेली नारळाची २०० रोपे रत्नागिरी तालुकाध्यक्ष श्री. नितीन कानविंदे यांनी व आवळयाची २५ रोपे जिल्हाध्यक्ष मान सौ. युगंधरा राजेशिर्के यांनी देणगी म्हणून दिली. शेवटी सचिव श्रीमती प्राची शिंदे यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपल्याचे जाहीर केले.

तसेच सिंधुदूर्ग जिल्हा समितीचे वतीने १ जुलै कृषी दिन कार्यक्रम गोगटे वाळके कॉलेज बांदा येथे साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला कोकण विभागीय समिती अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये उपस्थित होते. शेतीतील नवनवीन प्रयोग करुन महाराष्ट्राच्या कृषी विकासाला शेतक-यांनी हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी जिल्हा बँक संचालक श्री. डी.बी.वारंग यांनीही शेतक-यांना आधुनिक शेती पध्दतीचा वापर शेतक-यांनी करुन अधिकाअधिक उत्पन्न घ्यावे असे अवाहन केले. या कार्यक्रमाला विभागीय समिती कोषाध्यक्ष श्री. एम.के.गावडे, सदस्या सौ. प्रज्ञा परब बांदा परिसरातील उद्योजक व शेतकरी उपस्थित होते. सर्व शेतक-यांना यावेळी कल्पवृक्षाचे वाटप करण्यात आले.

४) **देशभक्तीपर समुहगीत गायन स्पर्धा १५ ऑगस्ट २०११ :** जिल्हा समिती सिंधुदूर्गचे वतीने जिल्हास्तरीय देशभक्तीपर समुहगीत गायन स्पर्धा दि. १५ ऑगस्ट २०११ रोजी कृषी महाविद्यालय, ओरोस येथे उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेसाठी बहूसंख्य स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. स्पर्धेत प्रथम - क्रमांक पंचम ग्रुप, ओरोस, व्दितीय क्रमांक - कृषी महाविद्यालय, ओरोस, तृतीय क्रमांक - न्यु इंग्लिश स्कूल, ओरोस तर जे.बी.सावंत अध्यापक विद्यालय, हुमरमळा आरोस येथील प्रथम वर्ष व व्दितीय वर्ष यांना उत्तेजनार्थ क्रमांक देण्यात आला. या कार्यक्रमाला कुडाळ तालूका अध्यक्ष श्री. रामचंद्र घोगळे, कार्यक्रम अध्यक्ष कृषी महाविद्यालयाच्या प्रा. डॉ.प्रगती परब, सिंधुदूर्ग युथ संस्थेचे अध्यक्ष श्री. श्रीनिवास गावडे, विभागीय समितीचे कोषाध्यक्ष श्री. एम.के.गावडे, सदस्या सौ. प्रज्ञा परब, श्री. प्रमोद धुरी, जिल्हाध्यक्ष ॲड. किशोर शिरोडकर तसेच कृषी महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थीवर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.

५) **आदर्श शिक्षक सन्मान सोहळा दि.१० सप्टेंबर २०११ :** कोकण विभागीय समिती रत्नागिरी व लोकशिक्षण मंडळ आबालोली ता. गुहागर यांचे संयुक्त विद्यमाने लोकशिक्षण मंडळ आबलोली यांचे सभागृहात दि. १० सप्टेबर २०११ रोजी 'आदर्श शिक्षक सन्मान सोहळा' संपन्न झाला. जिल्हा समिती सदस्य व लोकशिक्षण मंडळ आबलोलीचे कार्याध्यक्ष श्री. चंद्रकांत वाईत यांनी पाहुण्यांचे ओळख करुन दिली. जिल्हा समिती सदस्य श्री. महंमदशेठ रखांगी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. केंद्रामार्फत गेली सहा वर्षे राबविल्या गेलेल्या उपक्रमांची माहिती त्यांनी यावेळी दिली. यानंतर शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात विशेष कामगिरी केलेल्या प्राथमिक ४, माध्यमिक ४, कनिष्ठ महाविद्यालयीन १ व वरिष्ठ महाविद्यालयीन १ अशा दहा शिक्षकांना केंद्रातर्फे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देवून 'आदर्श शिक्षक' पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी पुरस्कारप्राप्त शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त करताना केंद्राने पुरस्कारामुळे आम्हाला अधिक काम करण्याची ऊर्जा मिळते अशा भावना व्यक्त केल्या.

शिक्षकांना उद्देशून विभागीय समिती उपाध्यक्ष डॉ. कद्रेकर यांनी सांगितले की, शिक्षक हे समाजाच्या बांधीलकीसाठी काम करतात, हे लक्षात घेवून त्यांच्या योगदानाची जाणीव ठेवूनच केंद्रा तर्फे शिक्षकांना 'आदर्श शिक्षक' पुरस्कार दिले जातात. ज्यांना पुरस्कार मिळाले आहेत त्यांच्याकडून आणखी चांगल्या कामाची अपेक्षा ठेवली जाते. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डाएटचे प्राचार्य डॉ.गजाननराव पाटील यांनी सांगितले की, शिक्षकांनी आपल्या अंगी संवेदनशीलता, समतोलपणा व समर्पणता हे तीन गुण अंगिकारणे आवश्यक आहे. उद्याचा भारत हा शिक्षकच घडवणार आहे. भारताच्या उज्वल भविष्यासाठी निस्वार्थीपणाने शिक्षकाने आदर्श विद्यार्थी घडविण्याचे भान जागृत ठेवणे गरजेचे आहे. शिक्षकांनी युवा शक्ती घडविण्याचे मनात आणले तर ते देशासाठी महाशक्ती बनवू शकतात. यशवंतराव चव्हाण व डॉ.राधाकृष्णन यांचे विचार विद्यार्थ्यांसमोर मांडण्याचे काम शिक्षकांनी करावे असे विचार विभागीय केंद्राचे अध्यक्ष मा. श्री.राजाभाऊ लिमये यांनी अध्यक्षीय भाषणात मांडले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी लोकशिक्षण मंडळ आलोलीचे शिक्षकवृंद व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

६) **ज्येष्ठ नागरीक दिन १ ऑक्टोबर २०११ :** विभागीय केंद्र कोकण रत्नागिरीचे वतीने दि.१ ऑक्टोबर २०११ रोजी जागतिक ज्येष्ठ नागरीक दिना निमित्त चिपळूणच्या ब्राम्हण सहाय्य संघाचे बेडेकर सभागृह येथे 'ज्येष्ठ नागरीक सन्मान सोहळा' संपन्न झाला. या कार्यक्रमाची सुरुवात सुप्रिध्द लेखक श्री. विश्वास मेहेंदळे आणि विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांच्या हस्ते दिपप्रज्वलनाने झाली.

जिल्हाध्यक्षा सौ.युगंधरा राजशिर्के यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना यशवंतराव चव्हाणांचे नांव, त्यांचे विचार हे केंद्राच्या कार्यामुळे जिल्हयातील तरुण पिढीला समजले. केंद्रामार्फत सर्व स्तरातील लोकासाठी विविध स्पर्धा घेतल्या जातात. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, वनौषधी, नाचणी लागवड स्पर्धा घेतल्या जातात. केंद्रातर्फे वक्तृत्व स्पर्धा घेतल्या त्यावेळी स्पर्धकांकडे

चव्हाणसाहेबांची पुस्तके उपलब्ध नव्हती. केंद्राकडून स्पर्धकांना पुस्तके दिल्यानंतर त्यांनीही चव्हाणसाहेबांच्या कतृत्वाचा खूप अभयास केला, असे सांगितले.

यावेळी ज्येष्ठ नागरीक श्रीमती शकुंतलाताई भिडे यांनी ज्येष्ठांवर लिहिलेल्या कवितेचे वाचन केले. यानंतर रत्नागिरी जिल्हयातील १४ ज्येष्ठ नागरीकांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देवून प्रमुख अतिथी श्री. विश्वास मेहेंदळे व विभागीय समिती अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांचे हस्ते सन्मान करण्यात आले. सत्कारमूर्तीपैकी स्वातंत्र्यसैनिका श्रीमती विद्याताई घाणेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना, परमेश्वराने आपल्याला अपेक्षेपेक्षा जास्त वय दिले आहे. मी लहान असल्यापासून स्वातंत्र्याचा लढा पहात आले आहे. स्वातंत्र्यासाठी स्वतः च्या छातीत गोळया झेलणा-या वीरांना पाहिल्यामुळे स्वातंत्र्याविषयी खूप प्रेम वाटत आहे. आत्ताचे जीवन हे धावपळीचे असल्यामुळे मुलांच्या मनात असूनही त्यांना आपल्यासाठी वेळ देता येत नाही. त्यामुळे आजचे तरुण आपल्याला बघत नाहीत असा समज कृपया ज्येष्ठांनी करुन घेवू नये. ज्येष्ठांनी आपले आयुष्य आनंदात घालवावे. केंद्राने केलेला सत्कार हा चव्हाणसाहेबांचा प्रसाद म्हणून स्विकारत आहोत, असे भावपूर्ण उद्‌गार काढले. 'माझे अनेक सत्कार झालेत परंतु यशवंतराव चव्हाणांसारख्या द्रष्टया नेत्याचे नावे असलेल्या संस्थेने माझा सत्कार करावा हे मला पुण्य लाभल्यासारखे आहे. त्याबद्दल मी प्रतिष्ठानला सर्वांच्यावतीने धन्यावद देतो. व संस्थेच्या कोणत्याही कामात सहभागी होण्याचे आश्वासन देतो.'

प्रमुख अतिथि श्री. विश्वास मेहेंदळे यांनी ओघवत्या शैलीत एक तास आपले व्याख्यान दिले. ते म्हणाले मधमाशी ज्याप्रमाणे मध गोळा करते त्याप्रमाणे माणसाने फक्त चांगल्याच गोष्टी टिपून घ्याव्यात. जे आपल्याकडे आहे त्याचा विचार करावा व आपले आयुष्य सुखी करावे. परमेश्वराने हसणे हे वरदान फक्त माणसालाच दिलेले आहे त्यामुळे नेहमी हसत रहावे. छान सुंदर हसत जगा. असा संदेश त्यांनी दिला यानंतर श्री. मेहेंदळे यांनी आपल्या खास भाषा शैलीत अनेक किस्से सांगितले. दारिद्रय हा शाप नाही त्याच्यावर मात करता येते. यशवंतराव चव्हाणांनी हे दाखवून दिले आहे. त्यांनी बजावलेली देशसेवा आजच्या तरुणांसाठी आदर्शवत असल्याचे ज्येष्ठ लेखक श्री. विश्वास मेहेंदळे यांनी सांगितले.

विभागीय समितीचे अध्यक्ष श्री. राजाभाऊ लिमये यांनी सांगितले की यशवंतराव चव्हाणसाहेबांचे विचार तळागळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रतिष्ठानमार्फत केले जाते. ज्येष्ठ नागरीक एकत्र येतात. ज्येष्ठांच्या सन्मान सोहळयासाठी वेगवेगळया सन्माननीय व्यक्तींना बोलावले जाते. त्यामुळे ज्येष्ठानां एक प्रकारचा दिलासा, आधार मिळतो. शेवटी जिल्हा समिती सदस्य श्री. बापू काणे यांनी सर्वांचे आभार मानले. या कार्यक्रमाला सर्व सदस्य व ज्येष्ठ नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते. सर्वांनी एकत्रित भोजन करुन कार्यक्रमाची सांगता झाली.

७) **मान. यशवंतराव चव्हाण पुण्यतिथी २५ नोव्हेंबर २०११ :** कोकण विभागीय केंद्र जिल्हा समिती रत्नागिरीचे वतीने दि. २५ नोव्हेंबर २०११ रोजी मान. यशवंतराव चव्हाण यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. त्यांच्या पुण्यतिथी निमित्त केंद्राच्या कार्यालयात चव्हाणसाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. त्या अनुषंगाने रत्नागिरी जिल्हयातील सर्व तालुक्यातून कनिष्ठ महाविद्यालयीन गटातुन 'माझ्या कल्पनेतील महाराष्ट्र' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यांचा बक्षिस वितरण समारंभ मान्यवरांचे हस्ते दि.२५ नोव्हेंबर २०११ रोजी सर्व तालुक्यांमध्ये करण्यात आला. सदर स्पर्धेला सर्व तालुक्यातून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. प्रत्येक तालुक्यातून निबंध स्पर्धेसाठी दोन विजयी क्रमांक काढण्यात आले. विजयी स्पर्धकांना प्रशस्तीपत्र व अनुक्रमे प्रथम क्र. रु.५००/- व व्दितीय क्रमांक रु.३००/- अशी पारितोषिके देण्यात आली.

राजापूर येथील ओणी पंचक्रोशी शिक्षण संस्थेचे कनिष्ठ महाविद्यालय येथे विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री.राजाभाऊ लिमये यांचे हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. यावेळी राजापूर तालुका समिती अध्यक्ष ॲड. वासुदेव तुळसणकर व सदस्य उपस्थित होते. लांजा येथील तू. पू. शेटये कनिष्ठ महाविद्यालय येथे न्यु. इंग्लिश स्कूल व ज्युनियर कॉलेजचे प्रा. श्री. विलास कांबळे यांचे हस्ते व जिल्हा समिती सदस्य श्री. महंमदशेठ रखांगी यांचे प्रमुख उपस्थितीत विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. रत्नागिरी येथील

नवनिर्माण महाविद्यालय येथे संस्थेचे अध्यक्ष श्री. अभिजीत हेगशेटये यांचे हस्ते व जिल्हा समिती सदस्य प्रा. प्रमोद गंधे यांचे उपस्थितीत बक्षिस वितरण करण्यात आले. चिपळूण येथे सावर्डा येथील सहयाद्री शिक्षण संस्थेचे गोविंदराव निकम माध्यमिक व उच्चमाध्यमिक विद्यालय येथे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती अनुराधाताई निकम यांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा समिती रत्नागिरीच्या सौ.युगंधरा राजशिर्के उपस्थित होत्या. दापोली येथील वराडकर बेलोसे महाविद्यालय येथे कोकण विभागीय समितीच्या सदस्या सौ.जानकीताई बेलोसे यांचे हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले. यावेळी जिल्हा समिती सदस्य श्री. विश्वंभर कमळकर उपस्थित होते.

८) **दि. ८ ते १२ मार्च २०१२ :** मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी कार्यक्रमाचे दिवशी विभागीय केंद्र कोकणचे अध्यक्ष श्री.राजाभाऊ लिमय व सिंधुदूर्ग जिल्ह्यांतील विभागीय समिती सदस्य कराड येथील कार्यक्रमास उपस्थित होते. दि. १३ मार्च २०१२ रोजी सकाळी ९:०० वाजता भारत शिक्षण मंडळाचे ठाकूर सभागृह, रत्नागिरी येथे इयत्ता ११ वीचे विद्यार्थ्यांसाठी व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेला अभिवादन करुन उपस्थित विद्यार्थी व प्राध्यापक, सदस्य यांना कराड केंद्राकडून आलेले चव्हाणसाहेबांचे बॅचेस वाटण्यात आले. आजच्या तरुणानी चव्हाणसाहेबांचे विचार समजून घ्यावेत. राजकारण, साहित्य आदि क्षेत्रात कार्यरत असताना सामाजिक बांधिलकीचे भान कसे ठेवावे हे त्यांचे चारित्र्यातून शिकावे. तसेच, शाळा, शिक्षक व पालक यांचे विषयी विद्यार्थ्यांची भुमिका या विषयावर सदस्य श्री.महंमदशेठ रखांगी यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान झाले. यावेळी विभागीय केंद्र कोकणचे उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, रत्नागिरी जिल्हाध्यक्ष, भारत शिक्षण मंडळाच्या पटवर्धन हायस्कुलचे मुख्याध्यापक श्री. वाघमारे, उपमुख्याध्यापक श्री. कदम व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

९) **दि. १४ मार्च २०१२ :** दि. १४ मार्च २०१२ रोजी दापोली येथे मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी सोहळया निमित्त समाजात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांचा सत्कार व महिलांसाठी विविध स्पर्धांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला विभागीय केंद्र कोकणचे अध्यक्ष श्री.राजाभाऊ लिमये उपस्थित होते. त्यांनी आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा देशाचा विचार करणारा नेता झाला नाही व यापुढे होणार नाही. चतुरस्त्र व्यक्तीमत्व असलेल्या चव्हाणसाहेबांनी पाच दशकाहून अधिक काळ विविध मंत्री पदे स्विकारुन नि:स्वार्थीपणे देशाची सेवा बजावली आणि तळागळातील लोकांचे हाती सत्ता कशी पोहोचेल यासाठी ठोस निर्णय घेतले. अशा चतुरस्त्र व्यक्तीमत्व असलेल्या नेत्याचे चारीत्र्याचा अभ्यास आजच्या तरुणानी करणे गरजेचे आहे असे विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाला रत्नागिरी जिल्हाध्यक्षा, ॲड. बाळासाहेब बेलोसे, विभागीय समिती सदस्या श्रीमती जानकी बेलोसे, जिल्हा समिती सदस्य श्री. विश्वंभर कळमळकर व इतर सदस्य तसेच आर.आर. वैद्य शिक्षण संस्थेचे पदाधिकारी उपस्थित होते.

१०) **महिला दिन कार्यक्रम १५ ते १८ मार्च २०१२ :** दि. १५ मार्च ते १८ मार्च २०१२ असे सलग चार दिवस विभागीय केंद्र कोकण रत्नागिरी व जे. एस. डब्ल्यु. ग्रुप, जयगड यांचे संयुक्त विद्यमाने बचत गटातील व इतर उद्योगिनी महिलांनी बनविलेल्या मालाचे प्रदर्शन व विक्री कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन जे. एस.डब्ल्यु. ग्रुप, जयगडचे उपाध्यक्ष श्री. राजीव लिमये यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री.राजाभाऊ लिमये, उपाध्यक्ष डॉ. श्रीरंग कद्रेकर, रत्नागिरी जिल्हा समितीच्या अध्यक्षा व सदस्य, कर्मचारी उपस्थित होते. या चार दिवसात महिलांसाठी विविध स्पर्धा, व्यवसाय मार्गदर्शन तसेच मत्स्य महाविद्यालयाच्या सहकार्याने मच्छी पासून विविध टिकावू व नाश्ताचे पदार्थ बनविण्याचे प्रशिक्षणही देण्यात आले. महिलांच्या विविध स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना मान्यवरांचे हस्ते बक्षिसे देण्यात आली. या चार दिवसात महिलांनी लावलेल्या स्टॉल्सना लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## १०.५ विभागीय केंद्र नाशिक :-

५.१ **बालवाचक मेळावा - दि. २३.४.२०११ :-** विभागीय केंद्र नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट तर्फे यशवंतराव चव्हाण ग्रंथालय व सार्वजनिक वाचनालय आयोजित 'जागतिक पुस्तक दिना' निमित्त आयोजित बालवाचक मेळाव्यात डॉ. आवलगावकर बोलत होते. जोपर्यंत भाषा आहे तोपर्यंत संस्कृती आहे. त्यासाठी वाचन संस्कृती ही प्रभावी गोष्ट आहे. भाषेविषयी नितांत श्रध्दा वाळगणे म्हणजेच भाषेची जोपासना करणे होय असेही ते म्हणाले. 'ग्रंथ तुमच्या दारी' या उपक्रमा अंतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. केंद्राच्या सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी ग्रंथपेटीचे देणगीदार डॉ. प्रितेश जुनागडे, डॉ. उमा वच्छाव, डॉ. अनिरुध्द धर्माधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी श्री. विश्वास ठाकूर यांनी या उपक्रमाची भूमिका मांडली. कामगार वर्गाच्या मुलांसाठी असलेल्या 'दिशा स्कूल' च्या विद्यार्थ्यांना ग्रंथपेटी प्रदान करण्यात आली. श्रीमती सुधा मेहता यांनी पेटीचा स्वीकार केला. या उपक्रमाचे समन्वयक श्री. विनायक रानडे यांनी 'ग्रंथ तुमच्या दारी' विषयी आपले विचार व्यक्त केले. या कार्यक्रमास बालवाचकांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. डॉ. आवलगावकर यांचा परिचय श्रीमती श्रृती जोशी यांनी केला तर आभार श्री. हरी विनायक कुलकर्णी यांनी मानले.

५.२ **अभिनव व व्यक्तिमत्व विकास शिबीर - दि. १६.५.२०११ ते दि. २१.५.२०११ :-** विभागीय केंद्र नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट तर्फे आयोजित 'अभिनव व व्यक्तिमत्व विकास' शिबीराचे आयोजन करण्यात आले त्याचा समारोप सुप्रसिध्द अभिनेते व दिग्दर्शक श्री. सचिन शिंदे यांच्या हस्ते झाला. कोल्हापूर येथील रंगकर्मी श्री. हळदीकर यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्राच्या सभागृहात हे शिवीर संपन्न झाले. ५ ते १७ वर्षे वयोगटातील मुला-मुलींचा शिबिरास उदंड प्रतिसाद लाभला. यावेळी केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी शिवीर आयोजनामागची भूमिका मांडली. लहान मुलांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ उपलब्ध करुन देणे हा या मागचा उद्देश आहे, त्यातून निश्चितच उद्याची कलागुण संपन्न पिढी निर्माण होईल. श्री. संजय हळदीकर म्हणाले की, मुला-मुलींच्या जडण-घडणीत शिक्षणाला जसे महत्त्व आहे तसेच आजच्या जगात सभाधीटपणा, संभाषण कला, निरीक्षण क्षमता, एकाग्रता, सुप्त गुणांचा विकास, स्वतःला सादर कसे करावे, वैचारिक सकसता, सादरीकरण, सांधिकता हया गुणांचा विकास होणे महत्त्वाचे आहे. यासाठी मुलांनी मनापासून प्रतिसाद दिला. यावेळी शिबिरार्थींच्या वतीने कु. ऋचा देशमुख व कु. पर्वा चिंचोलीकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तसेच शिबिरार्थींनी एकपात्री प्रयोगाचे व दीर्घांकाचे सादरीकरण केले. सहभागी शिबिरार्थींना प्रमाणपत्राचे वाटप श्री. सचिन शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. समारंभाचे स्वागत, प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री. हरी विनायक कुलकर्णी यांनी केले.

५.३ **'जागर मनाचा' - व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा - दि. १०.६.२०११ ते दि. १२.६.२०११ :-** विभागीय केंद्र नाशिक, विश्वास ज्ञान प्रबोधिनी ॲन्ड रिसर्च इन्स्टिटयूट व सृजन यांच्या संयुक्त विद्यमाने 'जागर मनाचा' या व्यक्तिमत्व विकास कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी सुप्रसिध्द समुपदेशक व व्यवस्थापन तज्ज्ञ श्री. शंतनु गुणे बोलत होते. कार्यशाळेचे उद्घाटन करताना केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर म्हणाले की, समाजात आज वाढत चाललेली नकारात्मक मानसिकता व बदलती कुटुंब व्यवस्था, ताणतणाव यांचा शोध घेऊन यावर उपाय म्हणजे अशा कार्यक्रमांचे आयोजन होय. यातून निश्चितच स्वतःच्या जीवनाचे नेतृत्व करणारी चारित्र्यसंपन्न पिढी निर्माण होईल. तसेच कर्तृत्वसंपन्न आनंदी जीवन जगण्यासाठी मानसिकतेमध्ये परिवर्तन करण्यासाठी, यशस्वी व्यक्तिमत्वासाठी या मार्गदर्शन कार्यशाळेचा निश्चितच उपयोग होईल असा विश्वासही श्री. ठाकूर यांनी व्यक्त केला. या कार्यशाळेला शिबिरार्थींचा उत्साहवर्धक प्रतिसाद लाभला.

५.४ **स्टोरी ऑफ मारवाडी : डॉ. गिरीश जाखोटिया - दि. २५.६.२०११ :-** विभागीय केंद्र नाशिक व गौत्तमी प्रकाशन, नाशिक यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. जाखोटिया यांच्या 'स्टोरी ऑफ मारवाडी' या पुस्तकाचे प्रकाशन संपन्न झाले.

'बदलती परिस्थिती आणि लोकांसमोरील आव्हाने' या विषयावरील डॉ. जाखोटीया यांचे व्याख्यान झाले. पुस्तकाचे प्रकाशन केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून श्री. अतुल चांडक हे उपस्थित होते. यावेळी श्री. संजय पेठे यांच्या माय विश्व वेबसाईटतर्फे 'स्टोरी ऑफ मारवाडी' च्या ई-बुकचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी साहित्य व कलाक्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. संजय लोळगे यांनी केले तर आभार गौतमी प्रकाशनाच्या संचालिका श्रीमती सारिका देशमुख यांनी मानले.

५.५ **रंगवर्षा कला उत्सव - २०११ - दि. २९ व ३०.७.२०११ :-** श्रावणात रंगणारा ऊन पावसाचा खेळ कागदावर उतरवण्यासाठी जलरंग माध्यम अनुकूल आहे. हिरव्या, निळया, जांभळया रंगछटांमधून पावसाळी तरल वातावरण रसिकाला आनंद देत असे प्रतिपादन ज्येष्ठ निसर्गचित्रकार श्री. शिवाजीराव तुपे यांनी केले. विभागीय केंद्र नाशिकतर्फे 'रंगवर्षा कला उत्सवाचे' उद्घाटन ज्येष्ठ निसर्गचित्रकार श्री. शिवाजीराव तुपे यांच्या हस्ते झाले. या रंगवर्षा कला उत्सवात नाशिक कलानिकेतन संचलित चित्रकला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी रंगवलेल्या 'पाऊस आणि वर्षाऋतु' या विषयावरील चित्रकृतींचे प्रदर्शन मांडण्यात आले होते. स्वागत व प्रास्ताविक केंद्राच्या कोषाध्यक्षांनी केले. यावेळी चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. दिनकर जानमाळी उपस्थित होते. या कला उत्सवाच्या निमित्ताने चित्रकार प्रा. संजय बागूल यांचे 'पोट्रेट' या विषयावर तर चित्रकार श्री. अशोक ढिवरे यांचे 'निसर्ग चित्रण' या विषयावर प्रात्यक्षिक झाले. प्रा. संजय बागुल यांनी विद्यार्थ्यांला समोर मॉडेल बसवून कॅन्व्हॉसवर बाहयरेषा रेखाटली. ग्रे रंग छटेने पार्श्वभूमी रंगवली. शॅडो टू रंगकाम करुन दोन तासात कृष्णवर्णी मॉडेलचे व्यक्तिमत्व साकारले व विद्यार्थ्यांशी संवाद साधला. चित्रकार श्री. अशोक ढिवरे यांनी 'निसर्ग चित्रण' या विषयावरील प्रात्यक्षिक सादर केले. रंगलेपन, शैली, चित्राचा विषय समजून घेऊन त्यावर विचार करणे, आवश्यक रंगाचा वापर करुन चित्ररुप साकारणे अशा विविध विषयांवर श्री. ढिवरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कला उत्सवाच्या समारोप प्रसंगी प्रख्यात शिल्पकार श्री. राम थत्ते उपस्थित होते. चित्रकलेतील विविध माध्यमांचाही कलाकारांनी चित्रनिर्मितीच्या आविष्कारासाठी उपयोग केला. रंगवर्षा कला उत्सवात उत्कृष्ट कलाकृतींना गौरविण्यात आले. यात 'अ' गटात स्नेहल गौल, कल्याणी गोडसे, समीर निंबेकर तर 'ब' गटात हर्षद पाचोरकर, आशिष चौधरी, जयेश बोरसे यांचा समावेश होता. कला उत्सवासाठी चित्रकार सर्वश्री बाळ नगरकर, प्रफुल्ल सावंत, संजय सावळे, नंदू गवांदे, विनायक रानडे, मुक्ता बालिगा तसेच कलाक्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. रंगवर्षा कला उत्सवात शंभराहून अधिक युवा चित्रकारांनी आपला सहभाग नोंदविला.

५.६ **बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशनचे संस्थापक श्री. अधिक कदम यांच्याशी संवाद - दि. ७ ऑगस्ट, २०११ :-** विभागीय केंद्र, नाशिकतर्फे झालेल्या कार्यक्रमात 'बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशनच्या बसेरा-ए-तबस्सुम' याविषयी श्री. अधिक कदम यांनी संवाद साधला. यावेळी त्यांच्या कार्याची माहिती देणारी ध्वनिचित्रफीतही दाखविण्यात आली. सध्या बॉर्डरलेस वर्ल्ड फाऊंडेशनकडे जम्मू काश्मीरसह इतर सीमावर्ती भागातील १९० मुली आहेत. या मुलींना आता विविध संस्थांची मदत होत आहे. आम्ही त्यांना आधार देण्यावरोबरच त्यांना सर्व सुविधा, शिक्षण देण्यासाठी कार्यरत आहोत. या मुलींच्या मनातील दहशत कमी होण्यासाठी देशातील विविध शहरात चांगल्या कुटुंबांमध्ये कांही दिवस त्यांना ठेवण्याचा उपक्रम राबवून त्यांना प्रेमाचा ओलावा देण्याचा प्रयत्न करीत आहोत. विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून कुपवाडा, अनंतनाग तसेच इतर कांही ठिकाणी सुसज्ज वसतिगृह व शाळा उभारण्याचे कार्य चालू आहे. यावेळी केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर व अनेक मान्यवर उपस्थित होते.

५.७ **कवी कुसुमाग्रज जन्मशताब्दी वर्षानिमित्त कविता सादरीकरण स्पर्धा - दि. १४ ऑगस्ट, २०११ :-** विभागीय केंद्र, नाशिकतर्फे आयोजित कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'कविता सादरीकरण' स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ आयोजित केला. यावेळी सुप्रसिध्द कवी श्री. किशोर पाठक यांनी कुसुमाग्रजांच्या कवितेचे आशय सौंदर्य, भावगर्भता, सामाजिक भान याविषयी भाष्य केले. कुसुमाग्रजांची कविता चिरंतन जगण्याचा शोध घेते आणि जगण्याला बळ देते

असेही ते म्हणाले. याप्रसंगी बोलताना नाटय कलावंत श्री. सदानंद जोशी म्हणाले की, कवितेचे सादरीकरण करणे म्हणजे कवितेची लय पकडणे होय. शब्दांमधली नादमयता आणि नाटयमयता यांची सांगड म्हणजे आशय संपन्न कविता होय. स्वागत व प्रास्ताविक करताना कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर म्हणाले की, कवी कुसुमाग्रजांच्या कवितेची थोरवी आणि समृध्दी नव्या पिढीला व्हावी व मानवतावादाचा विचार साहित्यातून मांडणा-या कुसुमाग्रजांना अभिवादन करण्यासाठी अशा प्रकारच्या कार्यक्रमाचे आयोजन केंद्रातर्फे करण्यात येत आहे. यावेळी कवयित्री श्रीमती संजीवनी पाटील यांनी स्पर्धेत सहभागी झालेल्या कवितांवर विश्लेषणात्मक भाष्य केले. 'हसरा नाचरा जरासा लाजरा श्रावण आला' अशा श्रावणाच्या नवेपणाची चाहूल घेणारी कविता तसेच जगण्यासाठी बळ देणारी 'कणा' कविता 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा' अशा कविता रसिकांनी सादर केल्या. 'दूर देशी राहिलेले दीन त्याचे झोपडे बापुडा आज येथे पायवाटेला पडे' अशी आर्तता शब्दातून मांडत होते. 'एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार होता पायतळी अंगार, गर्जा जयजयकार, क्रांतीचा गर्जा जयजयकार' असा क्रांतीचा उद्‌घोष कवींनी शब्दातून मांडला.

कविता सादरीकरण स्पर्धेत खुल्या गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक श्रीमती प्रांजली विरारी यांना तर द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक श्री. अरुण सोनवणे व तृतीय क्रमांकाचे पारितोषिक श्रीमती सुखदा वेहेरे यांना मिळाले. उत्तेजनार्थ पारितोषिक श्री. वसंत मुळे व श्री. विजय वराडे यांना देण्यात आले. इयत्ता ९वी ते १२वी गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कु. अश्विनी केळकर यांना, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक कु. प्रफुल्ल लेले यांना तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक कु. प्रथमेश कुलकर्णी यांना देण्यात आले. इयत्ता ५वी ते ८वी गटात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक कु.समृध्दी शुक्ल यांना, द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक कु.श्रावणी शिंदे यांना तर तृतीय क्रमांकाचे पारितोषिक कु.ज्ञानदा कुलकर्णी यांना देण्यात आले. उत्तेजनार्थ म्हणून दोन विशेष पुरस्कार मृण्मयी केंगे व ओमकार टिल्लू यांना देण्यात आले. स्पर्धेसाठी शंभरहून अधिक स्पर्धकांनी सहभाग नोंदवला व जोरदार प्रतिसाद दिला. संपूर्ण स्पर्धेचे सूत्रसंचालन समन्वयक श्री. विनायक रानडे यांनी केले.

५.८ **'रंग भावनांचे' व्याख्यान - वक्ते डॉ. आनंद नाडकर्णी - दि.५ ऑक्टोबर २०११ :-** विभागीय केंद्र, नाशिक व कुसुमाग्रज प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात डॉ. आनंद कुलकर्णी म्हणाले की, पश्चातापाची भावना चांगली असते, कारण व्यक्ती आपली चूक कबूल करुन पुढे मार्गक्रमण करते. परंतु मनात सलत असलेली भावना मात्र प्रदीर्घ काळापर्यंत त्रास देते. याकरिता भावनिक विवेचन झाले पाहिजे. भावनिक संतुलन कसे राखावे याविषयीही त्यांनी मार्गदर्शन केले. ९ ऑक्टोबर हा जागतिक मानसशास्त्र दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्त विविध ठिकाणी मानसशास्त्र सप्ताहानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. गेल्या दहा वर्षांचा आढावा घेतला असता मानसिक असंतुलनाचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. त्याचबरोबर नैराश्य व अस्वस्थतेमुळे प्रवृत्त झालेल्याचे प्रमाण देखील वाढले आहे.

विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील यांनी स्वागत केले. यावेळी श्री. हेमंत टकले, ॲड. विलास लोणारी, श्रीमती नीलमताई किर्लोस्कर, डॉ. श्याम आष्टेकर, श्री. रत्नाकर पटवर्धन, श्रीमती वंदना अत्रे, श्री. अरविंद ओढेकर, श्री. अरुण ठाकूर आदी उपस्थित होते. श्री. लोकेश शेवडे यांनी प्रास्ताविक केले.

५.९ **'कविता सखी' सादरकर्ते कवी सुधीर मोघे - दि. २२ ऑक्टोबर २०११ :-** विभागीय केंद्र, नाशिक यांच्यावतीने प्रसिध्द कवी व गीतकार श्री. सुधीर मोघे यांच्या 'कविता सखी' या स्वतःच्या कवितेचा प्रवास उलगडून सांगणा-या नव्या रंगतदार मैफलीचा शुभारंभाचा प्रयोग स्वा. सावरकर नगर येथील केंद्राच्या सभागृहात करण्यात आला होता. यावेळी श्री. मोघे यांनी आपल्या कविता आणि गीत निर्मितीचा प्रवास सहज सुंदर निवेदन शैलीत कथन केला. तसेच अप्रतिम कविता सादर करीत रसिकांची उत्स्फूर्त दाद मिळविली. कार्यक्रमाच्या प्रारंभी केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर यांनी प्रास्ताविक केले. ज्येष्ठ पत्रकार श्री. सराफ यांच्या हस्ते श्री. मोघे यांचा सत्कार करण्यात आला. श्री. राजा पुंडलिक यांनी परिचय करुन दिला.

५.१० **बालदिन - दि. १४ नोव्हेंबर २०११ :-** विभागीय केंद्र नाशिक, नवमहाराष्ट्र युवा अभियान, मॉडर्न एज्युकेशन सोसायटी, विश्वास ज्ञान प्रबोधिनी अॅन्ड रिसर्च इन्स्टिटयूट व सृजन यांच्या संयुक्त विद्यमाने बालवर्गाच्या विविध कलागुणांना व्यासपीठ मिळण्यासाठी सृजन उपक्रम सुरु करण्यात आला आहे. सौ. सुप्रिया सुळे या संकल्पनेच्या प्रमुख आहेत. बालदिनाचे औचित्य साधून बालमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ सर्वोदयी कार्यकर्त्या श्रीमती वासंती सोर उपस्थित होत्या. त्यांच्या हस्ते प्राथमिक विद्यालयाला बालसाहित्याची ग्रंथपेटी भेट देण्यात आली. बालकांमध्ये वाचनसंस्कृती रुजविण्यासाठी सदर उपक्रम सुरु करण्यात आला आहे. केंद्राचे कोषाध्यक्षांनी उपस्थितांचे स्वागत केले व केंद्रातर्फे राबविण्यात येणा-या विविध उपक्रमांची माहिती दिली. याप्रसंगी मुख्याध्यापिका सौ. केकाण, सौ. गायधनी, डॉ. अमित नागरे व पालक उपस्थित होते.

५.११ **'सिनेमा आणि साहित्य' सुप्रसिध्द चित्रपट समीक्षक श्री. विजय पाडळकर - दि. २४ नोव्हेंबर २०११ :-** विभागीय केंद्र नाशिकच्यावतीने यशवंतराव चव्हाण यांच्या २७ व्या पुण्यतिथीच्या पूर्वसंध्येला केंद्राच्या सभागृहात 'सिनेमा आणि साहित्य' या विषयावर सुप्रसिध्द चित्रपट समीक्षक श्री. विजय पाडळकर यांनी व्याख्यान दिले. कार्यक्रमात सुप्रसिध्द लेखक व्यंकटेश माडगुळकर यांच्या 'पिंजरा' कथेवर आधारीत श्रीमती क्षमा पाडळकर यांनी दिग्दर्शित केलेला चित्रपट दाखविण्यात आला. त्या अनुषंगाने 'सिनेमा आणि साहित्य' या विषयावर चर्चा झाली. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक केंद्राच्या कोषाध्यक्षांनी तर परिचय श्री. विनाय रानडे यांनी करुन दिला.

५.१२ **यशवंत रंगोत्सव - दि. २५ ते २७ नोव्हेंबर २०११ :-** विभागीय केंद्र नाशिक व यशवंतराव चव्हाण सोशल फोरम यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण यांच्या २७ व्या पुण्यतिथीनिमित्त 'यशवंत रंगोत्सव' या चित्रप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. चित्रकार एम.एम. आचरेकर यांनी रेखाटलेल्या ऐतिहासिक कलाकृतींचे हे प्रदर्शन होते. प्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ चित्रकार श्री. शिवाजी तुपे यांच्या हस्ते झाले. महाराष्ट्र राज्य निर्मितीनंतर पाच दिवस चाललेल्या उत्सवातील ७२ चित्रांचा या प्रदर्शनामध्ये समावेश करण्यात आला होता.

५.१३ **'वेध' स्वप्न उद्याचे - प्रबोधन परिषद मार्गदर्शक - डॉ. आनंद नाडकर्णी - दि. १८ डिसेंबर २०११ :-** करिअरकडे बघण्याचा एक वेगळा व सकारात्मक दृष्टीकोन देणा-या 'वेध' या व्यवसाय प्रबोधन परिषदेत 'स्वप्न उद्याचे' या रचनेवर आधारित कार्यक्रमात पाच आदर्श व्यक्तिमत्त्वांचा जीवनातील अविस्मरणीय व प्रेरणादायक अनुभवांचे विविध पैलू डॉ. आनंद नाडकर्णी यांनी उपस्थितांसमोर उलगडले. निमित्त होते येथील मानसिक आरोग्यासाठी विविध उपक्रम राबविणा-या 'संवेद' या संस्थेच्यावतीने व ठाणे येथील आयपीएच संस्थेच्या सहकार्याने दादासाहेब गायकवाड सभागृह येथे आयोजित नाशिकमधील पहिल्या 'वेध' या व्यवसाय प्रबोधन परिषदेचे. यावेळी सुप्रसिध्द मनोविकासतज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांनी मान्यवरांच्या मुलाखती घेऊन त्यांच्या यशाचे रहस्य उलगडण्याचा प्रयत्न केला. आयटी क्षेत्रातील तज्ज्ञ श्री. दीपक घैसास यांच्या मुलाखतीने कार्यक्रमास प्रारंभ झाला. श्री. शंतनु गुणे यांनी लिहिलेले व श्रीमती कन्याकुमारी गुणे यांनी संगीतबध्द केलेले वेधचे थीमसाँग यावेळी सादर करण्यात आले. डॉ. जयंत ढाके यांनी स्वागत तर डॉ. सविता पगारे यांनी प्रास्ताविक केले. श्रीमती वैशाली वालाजीवाले व श्रीमती वंदना अत्रे यांनी परिचय करुन दिला.

५.१४ **'जागर मनाचा' कार्यशाळा मार्गदर्शक - सुप्रसिध्द समुपदेशक शंतनु गुणे - दि. २५ डिसेंबर २०११ :-** आजच्या युवा पिढीला कर्तबगार व आनंदी जीवनाची दिशा देण्यासाठी विभागीय केंद्र नाशिकतर्फे 'जागर मनाचा' या एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते त्याप्रसंगी मार्गदर्शन श्री. शंतनु गुणे यांनी केले. आजच्या युवांच्या मानसिकतेमधील दोन प्रमुख दोष

'यशाची चुकीची व्याख्या' आणि 'वाढती नकारात्मक मानसिकता' दूर करुन स्वतःच्या जीवनाचे नेतृत्व करु शकणारे चारित्र्य, संपन्न, समर्थ, जबाबदार, कर्तबगार आणि आनंदी व्यक्तिमत्व घडविण्यास सहाय्यभूत होणे व त्यातून उद्याच्या चारित्र्य संपन्न नेतृत्वाची बीजे रुजवणे या विचारातून सदर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेला युवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

५.१५ **कवी कुसुमाग्रज जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'शतकाव्यधारा' कवी संमेलन - दि. २५ डिसेंबर २०११** :- कवी कुसुमाग्रज यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त अभिवादन करण्यासाठी नाशिक जिल्हयातील कवींच्यावतीने 'शतकाव्यधारा' या कवी संमेलनाचे विभागीय केंद्र नाशिकतर्फे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिध्द साहित्यिक श्री. बाळासाहेब सराफ होते. यावेळी केंद्राचे अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील, कोषाध्यक्ष श्री. विश्वास ठाकूर उपस्थित होते. याप्रसंगी रघुनाथ सावे, जयश्री तलवारे, शशिकला देशमाने यांनी विवध रचना सादर केल्या. तसेच सर्वश्री दिलीप पाटील, विलास पगार, सुरेश मेणे, सुभाष सबनीस, सोमनाथ साखरे, प्रा. गिरीष पाटील, भास्कर म्हरसाळे, जयश्री तलवारे यांच्यासह चाळीस कवींनी आपल्या कविता सादर केल्या. सर्व कवींना अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. कवी श्री. रविंद्र मालुंजकर यांनी सूत्रसंचालन केले.

५.१६ **'मराठी सिनेमा आणि जागतिक सिनेमा' व्याख्याते : सुप्रसिध्द चित्रपट समीक्षक श्री. समर नखाते-दि. २५.०२.२०१२** :- विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने 'मराठी सिनेमा आणि जागतिक सिनेमा' या विषयावर दृकश्राव्य व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याचे व्याख्याते सुप्रसिध्द चित्रपट समीक्षक श्री. समर नखाते होते. त्यांनी 'सामना', 'वनगरवाडी', 'दहावी फ', 'श्वास' अशा विविध चित्रपटांच्या मदतीने त्यांनी मराठी चित्रपटाचा प्रवास उलगडून दाखवून चित्रपटातील बदलती भाषा, चित्रमुद्रण, व्यक्तिरेखा याचा आढावा घेतला. प्रास्ताविक केंद्राच्या कोषाध्यक्षांनी केले. श्री. समर नखाते यांचा परिचय श्री. रघुनाथ फडणीस यांनी करुन दिला. अध्यक्ष श्री. विनायकदादा पाटील यांनी श्री. नखाते यांचा सत्कार केला. यावेळी साहित्य व कलाक्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

५.१७ **सुप्रसिध्द अभिनेते विनय आपटे यांची मुलाखत - मुलाखतकार : सदानंद जोशी - दि. ११.०३.२०१२** :- विभागीय केंद्र नाशिकच्या वतीने महाराष्ट्राचे थोर शिल्पकार मान. यशवंतरावजी चव्हाण यांच्या '९९ व्या जयंतीनिमित्त' व 'जन्मशताब्दी वर्षाच्या' पूर्वसंध्येला आयोजित मुलाखतीत श्री. विनय आपटे यांनी मनसोक्त गप्पा मारल्या. दररोज नव्याने जन्माला येणा-या कलावंतांची संख्या कमी नाही. स्पर्धेत टिकायचे असेल तर स्वतःतल्या अस्सल गुणांची पारख करण्याचे कसब होते. त्यासाठी मेहनत घेण्याची तयारी हवी असा सल्ला देत सुप्रसिध्द अभिनेते श्री. विनय आपटे यांनी उभरत्या कलावंतांना यशस्वी होण्याचा कानमंत्र दिला. रिॲलिटी शोबद्दलही विनय आपटे भरभरुन बोलले. सहा महिन्यात जर १५० गायक तयार होत असतील, तर भीमसेनजी, लतादीदी यांच्याबद्दल काय म्हणायचे असा सवाल करीत डोक्यात हवा न घुसू देण्याचा सल्ला त्यांनी रिॲलिटी शोच्या माध्यमातून प्रसिध्दीच्या झोतात येणा-या गायकांना दिला. यावेळी प्रेक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.

५.१८ **महाराष्ट्र स्थापना दिन सोहळयाचे चित्रकार एम. आर. आचरेकर यांचे चित्रप्रदर्शन - दि. १२.०३.२०१२** :- विभागीय केंद्र नाशिकतर्फे मा. चव्हाणसाहेबांच्या 'जन्मशताब्दी वर्षानिमित्त' विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचाच एक भाग म्हणून चित्रकार एम.आर. आचरेकर यांनी महाराष्ट्र स्थापना दिनाच्या सोहळयाचे काढलेल्या चित्रांचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. प्रदर्शनास रसिकांनी उदंड प्रतिसाद दिला. सदर चित्रे केंद्राच्या सभागृहातील गॅलरीत लावण्यात आली आहेत.

## १०.६ विभागीय केंद्र औरंगाबाद :

६.१ **व्हिजन करिअर फेअर दि. २० ते २२ मे २०११ :** नवमहाराष्ट्र युवा अभियान, विभागीय केंद्र - औरंगाबाद, पवार पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट व अभ्युदय फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबाद येथे दि. २० ते २२ मे २०११ दरम्यान व्हिजन करिअर फेअर शैक्षणिक प्रदर्शन व करिअर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. करिअर फेअरचे उद्‌घाटन प्रसिध्द दिग्दर्शक श्री. चंद्रकांत कुलकर्णी यांच्या हस्ते झाले. प्रदर्शनामध्ये भारतीय भुदल, नौदल, हवाईदलांचे स्टॉल्स सहभागी झाले होते. ॲनिमेशन, फॅशन डिझायनिंग, कॉम्प्युटर सायन्स, बायोटेक्नॉलॉजी, स्वयंरोजगारासंदर्भात प्रशिक्षण देणा-या संस्था, नृत्य-नाटय-संगीत, एम.बी.ए., जॉब कन्सल्टन्सी, व्यवसायिक शिक्षणासाठी संबंधित संस्था, शासकीय विभाग, समुपदेशन केंद्र, परकीय भाषांचे शिक्षण देणा-या संस्था, पर्यटन कृषिविषयक संस्थांचा सहभाग होता. या प्रदर्शनामध्ये एकूण ५६ संस्था सहभागी झाल्या होत्या. प्रदर्शन व व्याख्यानमालेला विद्यार्थी-विद्यार्थीनींनी व पालकांनी मोठया प्रमाणात गर्दी केली होती. येथे आयोजित व्हिजन करिअर फेअरमध्ये सुमारे २० हजारांवर विद्यार्थी-पालकांनी भेट दिली.

६.२ **'जागो औरंगाबाद' निर्धार फेरीत सहभाग दि. २४ जुलै २०११ :** वेगाने वाढणा-या औरंगाबाद शहरात सर्व पायाभूत सुविधांची पध्दतशीर अंमलबजावणी व्हावी, याकरीता सर्वच विकासयंत्रणांवर दबाव निर्माण होण्याकरीता सकाळ माध्यम समूहातर्फे 'जागो औरंगाबाद' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाची औरंगाबादसारख्या झपाटयाने विकसित होणा-या शहरामध्ये अत्यंत गरज आहे. या उपक्रमांतर्गत दि. २४ जुलै २०११ रोजी 'निर्धार फेरी' आयोजित करण्यात आली. युवा विकास व कल्याणात्मक कार्याचा वसा घेतलेली विभागीय केंद्र, औरंगाबाद ही संस्था विकासात्मक प्रश्नांवर उपाय व पाठपुरावा करण्यास तत्पर राहते. 'जागो औरंगाबाद' निर्धार फेरीतही विभागीय केंद्रातर्फे सहभाग नोंदवून पाठिंबा दर्शविण्यात आला.

६.३ **'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...' आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा दि. ८ऑगस्ट २०११ :** विभागीय केंद्र - औरंगाबाद, नवमहाराष्ट्र युवा अभियान, अभ्युदय फाउंडेशन विद्यार्थी कल्याण विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने देवगिरी महाविद्यालय येथे आयोजित 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...' आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा संपन्न झाली. विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाचे संचालक डॉ. वाल्मीक सरोदे यांच्या हस्ते उद्‌घाटन झाले. यावेळी देवगिरी महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. प्रदीप जब्दे, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक श्री. निलेश राऊत यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्यात मुलींचा कमी होणारा जन्मदर ही गंभीर समस्या लक्षात घेता सौ. सुप्रिया सुळे यांनी 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...' हा उपक्रम हाती घेतला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून जागर हा जाणिवांचा आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे, असे संघटकांनी स्पष्ट केले.

वक्तृत्व स्पर्धेसाठी 'कथा स्त्री जन्माचे स्वागत' 'स्त्री भ्रुण हत्या : एक अक्षम्य चूक' : 'हुंडा बळी व स्त्री अत्याचार : समाज व्यवस्थेला लागलेले ग्रहण' हे विषय ठेवण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये जयप्रकाश नारायण महाविद्यालयाचा श्री. निकेश मदारे याने प्रथम (रुपये ३,०००/- व प्रमाणपत्र), पी.ई.एस. इंजिनिअरींग कॉलेजच्या कु. पुजा काल्नेश्वरकर हिने व्दितीय (रुपये २,०००/- व प्रमाणपत्र), व कॉलेज ऑफ एज्युकेशन, उस्मानाबादचा श्री. वेदांत कुलकर्णी याने तृतीय क्रमांक (रुपये १,०००/- व प्रमाणपत्र) पटकावला. तर विवेकानंद महाविद्यालयाचा श्री. मनीष पाटील व एम.पी.लॉ. कॉलेजची कु. सायली सेवेकर यांना उत्तेजनार्थ प्रत्येकी पारितोषिक (रुपये ५००/- व प्रमाणपत्र) प्राप्त झाले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण दि. ७ सप्टेंबर रोजी बी. रघुनाथ काव्यसंध्या या कार्क्रमात करण्यात येणार आहे. स्पर्धेकरीता श्री. सुशिल रेणापूरकर, प्रा. महेश अचिंतलवार, वाय. एच. वन्नूर, प्रा. शिवानंद भानुसे, रेणुका कड, हे परीक्षक म्हणून उपस्थित होते. प्रास्ताविक श्री. अभिजीत विटोरे यांनी केले. श्री. सुबोध जाधव यांनी आभार मानले. स्पर्धकांना सहभागी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

६.४ **'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...' खुली पथनाटय स्पर्धा दि. १०ऑगस्ट २०११ :-** विभागीय केंद्र - औरंगाबाद, नवमहाराष्ट्र युवा अभियान, अभ्युदय फाउंडेशन, नाटयरंग व इन्स्टिटयुट ऑफ इंजिनिअर्स यांच्या संयुक्त विद्यमाने

देवगिरी महाविद्यालय येथे आयोजित 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...' खुली पथनाटय स्पर्धा संपन्न झाली. यावेळी प्रा. अनुया दळवी, प्राचार्य रेखा शेळके, प्रा. महेश अचिंतलवार, नवमहाराष्ट्र युवा अभियानाचे संघटक यांची उपस्थिती होती. संघटकांनी स्पर्धेची भूमिका विषद करुन महाराष्ट्र राज्यात मुलींचा कमी होणारा जन्मदर ही गंभीर समस्या लक्षात घेता सौ. सुप्रिया सुळे यांनी 'जागर हा जाणिवांचा, तुमच्या माझ्या लेकींचा...' हा उपक्रम हाती घेतला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून जागर हा जाणिवांचा खुली पथनाटय स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे असे स्पष्ट केले. श्रीमती रेणुका कड यांनी सुत्रसंचालन केले. स्पर्धेसाठी 'स्त्री भ्रुण हत्या' हा विषय ठेवण्यात आला होता. या स्पर्धेमध्ये श्रेयनगर महिला मंडळाने प्रथम पारीतोषिक (रुपये ५,०००/- व प्रमाणपत्र), ओम अभिनय थिएटर्सला व्दितीय पारितोषिक (रुपये ३,०००/- व प्रमाणपत्र), मिलिंद कला समाज महाविद्यालयास तृतीय पारितोषिक (रुपये २,०००/- व प्रमाणपत्र), मिळाले. स्पर्धेचे पारितोषिक वितरण दि. ७ सप्टेंबर २०११ रोजी आयोजित बी. रघुनाथ काव्यसंध्या या कार्यक्रमात करण्यात आले. स्पधेकरीता प्रा. अनुया दळवी. प्राचार्य रेखा शेळके, प्रा. महेश अचिंतलवार हे परीक्षक म्हणून उपस्थित होते. स्पधेमध्ये २० संघांनी सहभाग नोंदविला. सर्व संघातील स्पर्धकांना सहभागी प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

६.५ **युवा स्वातंत्र्य ज्योत रॅली दि. १४ ऑगस्ट २०११ :-** नवमहाराष्ट्र युवा अभियान, विभागीय केंद्र-औरंगाबाद यांच्यातर्फे रविवार दि. १४ ऑगस्ट २०११ रोजी औरंगाबाद येथे युवा स्वातंत्र्यज्योत रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. क्रांती चौक ते पैठण गेट या दरम्यान ही रॅली आयोजित करण्यात आली होती. पोलिस उपायुक्त श्री. सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते क्रांती चौक येथे रात्री ११:०० वाजता मशाल पेटवून या रॅलीची सुरुवात झाली. यावेळी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. नंदकिशोर कागलीवाल, निलेश राऊत, अण्णा वैद्य, सुबोध जाधव, उमर फारुखी यांची प्रमुख उपस्थिती होती. पैठण गेट येथे मध्यरात्री १२.०० वाजता भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्याचे वाचन कण्यात आले अणि राट्रगीत रॅलीचा समारोप करण्यात आला. रॅलीमध्ये विविध संस्था-संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरीक, युवा व विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते.

६.६ **बी. रघुनाथ काव्यसंध्या दि. ७ सप्टेंबर २०११ :-** विभागीय केंद्र, औरंगाबाद व नाथ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि. ७ सप्टेंबर २०११ रोजी रात्री ८:०० वाजता संत एकनाथ रंगमंदिर येथे बी. रघुनाथ काव्यसंध्येचे आयोजन करण्यात आले. व खुली पथनाटय स्पर्धेतील विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले.

६.७ **युवती स्वयंरोजगार कार्यशाळा दि. १० सप्टेंबर २०११ :-** विभागीय केंद्र औरंगाबाद व सीएफएल-कोरो यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार दि.१० सप्टेंवर २०११ रोजी औरंगाबाद नर्सिंग महाविद्यालयात 'युवती स्वयंरोजगार' कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री. बाळासाहेब पवार, रेणुका कड, सीएफएल-कोरोच्या श्रीमती कल्पना त्रिभुवन, श्री. सुबोध जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेमध्ये प्रा. महेश अचिंतलवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी गंगा-जमुना हा महिला स्वयंरोजगारावर आधारीत माहितीपट दाखविण्यात आला. या कार्यशाळेमध्ये उपस्थित युवतींकडून प्रश्नावली भरुन घेण्यात आली.

६.८ **मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त अभिवादन दि.१६ सप्टेंबर २०११ :** विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्यातर्फे प्रतिष्ठानच्या विश्वस्त सौ. सुप्रिया सुळे यांच्या हस्ते दि. १६ सप्टेबर २०११ रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या पूर्वदिनी हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना. राजेश टोपे, श्री. मनमोहनसिंग ओबेरॉय, उल्हास उढाण, मनपा उपायुक्त श्री. निकम आदी उपस्थित होते.

६.९ **स्त्रीभ्रूण हत्येसंदर्भात मराठवाडयातील डॉक्टर्स व सामाजिक संस्था प्रतिनिधींची बैठक आणि पत्रकार परिषद दि. १६ सप्टेंबर २०११ :** विभागीय केंद्र औरंगाबाद यांच्यातर्फे दि. १६ सप्टेंवर २०११ रोजी प्रतिष्ठानच्या विश्वस्त मा. सौ. सुप्रिया सुळे यांच्या अध्यक्षतेखाली व उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना. राजेश टोपे, यांच्या उपस्थितीत मराठवाडयातील डॉक्टर्स व स्त्रीसक्षमीकरणाचे कार्य करणा-या सामाजिक संस्था, संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक देवगिरी महाविद्यालयात आयोजित करण्यात

आली होती. ढासळते लिंग संतुलन ही चिंतेची बाब आहे. स्त्रीभ्रुणहत्या हा नाजूक विषय असून या संदर्भात विचार परिवर्तन होण्यास वेळ लागेल. शासन, सामाजिक संस्था व डॉक्टर्स यांच्या समन्वयाने राज्यातील य संदर्भात निर्माण झालेले चित्र पालटेल, असा विश्वास बैठकीमध्ये व्यक्त करण्यात आला.

यावेळी सर्वश्री आ. सतीश चव्हाण , मधुकरअण्णा मुळे, अंकुशराव कदम, नंदकिशोर कागलीवाल, विजय कान्हेकर, निलेश राऊत, सुहास तेंडुलकर, सुबोध जाधव आदींची उपस्थिती होती. सौ. सुप्रिया सुळे म्हणाल्या की, सोनोग्राफी तंत्राचा वापर लिंगनिदानासाठी होऊ नये. फक्त कायद्याव्दारे हा प्रश्न सुटू शकेल का? कायद्याची कठोर अंमलबजावणी तर झालीच पाहिजे. परंतु समाजाची मानसिकता बदलणे हा यावरील कायमस्वरुपी उपाय आहे. म्हणूनच यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईच्या वतीने समन्वयाचे कार्य सुरु करण्यात आलेले आहे. महाराष्ट्र राज्याला कायम अग्रेसर रहावयाचे असेल तर स्त्री-पुरुष समानता होणे गरजेचे आहे. ना. राजेश टोपे म्हणाले की, राज्यशासनातर्फे या विषयासंदर्भात जागृती करण्यासाठी पोस्टर्स, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात येणार आहे. प्रत्येक महाविद्यालयांमधून 'विशाखा वूमन' सेलची स्थापना करणे बंधनकार करण्यात येणार आहे. तसेच महिलांसाठी स्वतंत्र हेल्पलाईन राज्यभरात सुरु करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

६.१० **जागर महाविद्यालयीन संवाद कार्यक्रम व पोस्टर प्रदर्शन ऑक्टोबर २०११ :** या कार्यक्रमांतर्गत स्त्रीभ्रुणहत्येविरोधी झालेल्या पदयात्रेची माहिती सांगून 'जागर' चित्रपट शहरातील माणिकचंद पहाडे महाविद्यालय औरंगाबाद, देवगिरी महाविद्यालय औरंगावाद, एम.जी.एम. महाविद्यालय औरंगाबाद, देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालय औरंगाबाद, एम. जी. एम. नर्सिंग महाविद्यालय औरंगाबाद या महाविद्यालयांमध्ये दाखवून विद्यार्थ्यांशी विशेषतः युवतींशी स्त्रीभ्रुणहत्या या विषयावर संवाद माधण्यात आला.

६.११ **सृजन कथामाला कार्यक्रम नोव्हेंबर २०११ :-** औरंगाबाद शहरात मुलांसाठी शालेय पातळीवर घेण्यात येणा-या कार्यक्रमांची संख्या तुलनेत कमीच आहे. या अनुषंगाने शालेय विद्यार्थ्यांमध्ये कथाकथन या कलाप्रकाराविषयी आवड निर्माण होऊन सुसंस्कारीत पिढी निर्माण व्हावी, मनोरंजनातून मूल्यशिक्षण रुजावे या करिता शहरातील म.न.पा. शाळा बायजीपुरा औरंगाबाद, म.न.पा. शाळा, एन-६, सिडको औरंगाबाद, निरीक्षणगृह, हडको, औरंगाबाद, आ. कृ. वाघमारे माध्यमिक शाळा औरंगाबाद, ज्ञानेश विद्यामंदिर औरंगाबाद शाळांमध्ये सृजन कथामाला कार्यक्रमाचा पंधरवडा साजरा करण्यात आला.

६.१२ **मान. यशवंतराव चव्हाण स्मृतिदिन २५ नोव्हेंबर २०११ :-** मा. यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त सिडको एन-८, औरंगाबाद येथील वेणूताई चव्हाण माध्यमिक शाळेत सृजनचा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

६.१३ **तीन दिवसीय रांगोळी प्रदर्शन दि. ११,१२ व १३ डिसेंबर २०११ :-** स्त्रीभ्रुणहत्या या विषयावर सतत चर्चा व्हावी व या विषयाच्या अनुषंगाने वातावरण तयार व्हावे याकरिता शहरात सातत्याने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमांचाच एक भाग म्हणून शहरातील वेणूताई चव्हाण शाळेतील कलाशिक्षक श्री. राजेंद्र वाळवे यांच्या 'स्त्रीभ्रुण हत्या व पर्यावरण' या विषयावर रांगोळी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. हे प्रदर्शन गजानन महाराज सभागृह येथे घेण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्‌घाटन औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त श्री. पुरुषोत्तम भापकर यांच्या हस्ते झाले.

६.१४ **राष्ट्रीय बालिकादिन दि. २४ जानेवारी २०१२ :-** दि. २४ जानेवारी २०१२ रोजी राष्ट्रीय बालिकादिनानिमित्त शहरातील दोन शाळांमध्ये युनिसेफने तयार केलेल्या 'स्त्री शिक्षण, स्त्री-आरोग्य, महिला सबलीकरण' या विषयांवरील लघुपट दाखविण्यात आले. लघुपटांमध्ये 'मीना' नावाचे कार्टुन चरित्र वरील विषयावर माहिती सांगते. दि २४ जानेवारी रोजी शिशुविहार माध्यमिक शाळा, औरंगाबाद येथे सदर कार्यक्रम सादर करण्यात आला.

६.१५ **प्रजासत्ताक दिन दि. २६ जानेवारी २०१२ :-** दि. २६ जानेवारी २०१२ रोजी प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधुन बालिकादिनाच्या पार्श्वभूमीवर सदर कार्यक्रम विद्यादीप बालिका सदन, छावणी परिसर, औरंगाबाद येथे सादर करण्यात आला.

६.१६ **मा. यशवंतराव चव्हाण यांचा जन्मशताब्दी कार्यक्रम** :- मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त औरंगाबाद केंद्राच्या वतीने वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. याची सुरुवात रसिकाग्रणी संगीत व कला महोत्सव २०१२ ने करण्यात आली. दि. १०,११ व १२ फेब्रुवारी २०१२ या तीन दिवसीय संगीत व कला महोत्सवाने करण्यात आली. नवोदित व प्रस्थापित कलावंतांच्या सादरीकरणाने शहरात एक नवीन सांस्कृतिक परंपरा सुरु होऊन शहरातील रसिकांसाठी ही उत्तम पर्वणी होती.

६.१७ **दि. १० फेब्रुवारी २०१२** :- दि. १० फेब्रुवारी २०१२ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाचे उद्घाटन सुप्रसिध्द शायर बशर नवाझ, प्रसिध्द संगीत तज्ञ पं. नाथराव नेरळकर यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे सल्लागार श्री. मधुकरअण्णा मुळे, संयोजक श्री. दत्ता बाळसराफ, विभागीय केंद्राचे कोषाध्यक्ष श्री. सचिन मुळे, श्री. निलेश राऊत, श्री. सुबोध जाधव यांची उपस्थिती होती. उद्घाटनानंतर लगेच नांदेडचे तरुण गझल गायक श्री. अमोल देशमुख यांचा दिवे अक्षरांचे चांदणे हा मराठी -उर्दु गझल कार्यक्रम सादर करण्यात आला. या कार्यक्रमास ३५० रसिकांची उपस्थिती होती. महोत्सवाच्या दुस-या दिवशी शनिवार दि. ११ फेब्रुवारी २०१२ रोजी श्री. प्रशात अग्निहोत्री (अकोला) व श्री. सतीश खानविलकर (इंदूर) यांच्या 'मनमोहिनी' या वाद्यसंगीताचा कार्यक्रम सादर करण्यात आला. या प्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून श्री. विश्वनाथ ओक यांची उपस्थिती होती. सुप्रसिध्द संगीतकार एस.डी. बर्मन, सलील चौधरी, शंकर जयकीशन व मदन -मोहन यांच्या गीतावर आधारीत हा वाद्यसंगीताचा कार्यक्रम प्रेक्षकांच्या उदंड प्रतिसादात सादर झाला. महोत्सवाच्या समारोपाच्या दिवशी रविवार, दि.१२ फेब्रुवारी २०१२ रोजी गोव्याच्या सुप्रसिध्द गायिका श्रीमती निशा पारसनीस यांनी पं. जितेंद्र अभिषेकी यांच्या गाजलेल्या पण ध्वनीमुद्रीत नसलेल्या गीतांचे सादरीकरण आपल्या 'अमृताभिषेक' या कार्यक्रमाव्दारे केले. सदर कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थिती होती. याच महोत्सवांतर्गत गुरुवार दि. ९ फेब्रुवारी २०१२ रोजी डॉ. माधवी मेहेंदळे (पुणे) यांनी मायकेल एंजेलो यांच्या जीवनचरित्रावर आधारीत जगप्रसिध्द चित्रकार शिल्पकार मायकेल एंजेलो : अद्भुत प्रतिभेचा कलावंत विशेष सादरीकरण यशवंत कला महाविद्यालय व शासकीय कला महाविद्यालय, औरंगाबाद या दोन महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत सादर करण्यात आला. सदर कार्यक्रमास एकूण ३०० विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

६.१८ **दि. १२ फेब्रुवारी २०१२** :- दि. १२ फेब्रुवारी २०१२ रोजी सकाळी १०:०० वाजता बाल निरीक्षण गृह, औरंगाबाद येथे कथाकथनाचा कार्यक्रम घेण्यात आला. पुणे योथील श्री. धनंजय सरदेशपांडे व दिपा देशमुख यांनी यंथील विद्यार्थ्यांना कथा सांगून विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त व सभिनय सहभाग मिळविला. या कार्यक्रम प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करुन कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला.

६.१९ **दि. १४ फेब्रुवारी २०१२** :- दि. १४ फेब्रुवारी २०१२ रोजी केंद्राच्या वतीने शहरातील एम.जी.एम. महाविद्यालयात सायबर क्राईम व युवती या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सायबर गुन्हे अन्वेषणचे पोलीस निरीक्षक श्री. अविनाश आघाव यांनी सदर विषय ३५० विद्यार्थ्यांसमोर अतिशय प्रभावीपणे मांडला.

६.२० **दि. ५ मार्च २०१२** :- दि. ५ मार्च २०१२ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन रा. से. योजना. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने व शहरातील विविध महाविद्यालयांच्या सहकार्याने भव्य युवती रॅली व परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीचे उद्घाटन छत्रपती शाहू महाराजांच्या पुतळयाला पुष्पार्पण करुन महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री मा. ना. राजेश टोपे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी विभागीय केंद्राचे अध्यक्ष श्री. नंदकिशोर कागलीवाल यांची उपस्थिती होती. यशवंतराव चव्हाण नाटयगृहात रॅलीचा समारोप युवती परिषदेने मा. आ. उषाताई दराडे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. उपस्थित सर्व युवतींना अल्पोपहार देऊन कार्यक्रमाची सांगता झाली. सदर कार्यक्रमास शहरातील ८५० युवतींनी सहभाग नोंदविला, सर्व युवतींना सहभागाचे प्रमाणपत्र देण्यात आले.

६.२१ **दि. १२ मार्च २०१२** :- दि. १२ मार्च २०१२ रोजी मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या पहिल्या दिवशी त्यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. देवगिरी महाविद्यालयाच्या रविंद्रनाथ टागोर सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमास विभागीय केंद्राचे मार्गदर्शक श्री. मधुकरअण्णा मुळे, कोषाध्यक्ष श्री. सचिन मुळे, प्राचार्य प्रदिप जब्दे, श्री. अजित मुळे, श्रीमती सुजाता जैस्वाल आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. सदर कार्यमात श्री. मधुकरअण्णा मुळे यांनी मनोगत व्यक्त केले तर श्री. सचिन मुळे यांनी वर्षभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याचे घोषित केले. सूत्रसंचालन प्रा. महेश अचिंतलवार यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. सुबोध जाधव यांनी केले.

६.२२ **दि. १८ मार्च २०१२** :- दि. १८ मार्च २०१२ रोजी विभागीय केंद्र औरंगाबाद व एम.जी. एम. चे क्लोव्हडेल स्कूल यांच्या संयुक्त विद्यमाने एम.जी.एम. रुक्मिणी सभागृहात श्री. अच्युत गोडबोले यांचा 'नादवेध' हा संगीतमय कार्यक्रम सादर करण्यात आला. याप्रसंगी श्रीमती सुलभा पिशवीकर, श्रीमती भाग्यश्री मुळे, श्री. प्रशांत देशपांडे यांनी विविध रागांवर आधरीत गाणी सादर करुन रसिकांना मंत्रमुगध केले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रसिध्द गायिका श्रीमती आशालता करलगीकर यांच्या हस्ते झाले.

## १०.७ विभागीय केंद्र, लातूर :-

७.१ **गुढीपाडवा सोवार दि. ४.४.२०११** :- गुढीपाडवा हा ग्रामीण भागातील शेतक-यांचा अत्यंत महत्त्वाचा जिव्हाळयाचा सण असून या सणापासून शेतकरी आपल्या शेतीवर करावयाच्या कामाचे वर्षभराचे नियोजन ठरवतो. याच दिवशी शेतीवर काम करणा-या सालगडयांचे वर्ष ठरवले जाते. हा सण अत्यंत उत्साहात आनंदात साजरा करुन या सणापासून काळया मायभूमीची सेवा करण्याची जणू शेतकरी प्रतिज्ञाच करतात. या सणाला अनन्य साधारण महत्व ग्रामीण भागात आहे. या सणानिमित्त विभागीय केद्र लातूरच्या वतीने शेतक-यांच्या आनंदोत्सवात सहभाग घेतला.

७.२ **दि. ५.४.२०११** :- महावीर जयंतीनिमित्त विभागीय केंद्रातर्फे महाविरांना अभिवादन व याप्रसंगी लातूर शहरातील जैन बांधवाशी सुसंवाद साधून त्यांना विभागीय केंद्र करीत असलेल्या कामाची सविस्तर माहिती देण्यात आली.

७.३ **गुरुवार दि. १४.४.२०११** :- भारत देशाच्या घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हिंगोली येथे प्रा. डॉ. एस. बी. भाकरे यांचे 'भारताच्या नवनिर्मितीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान' या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. उत्तमराव सूर्यवंशी होते. कार्यक्रमाच्या शेवटी विभागीय केंद्राचे सचिव यांनी या कार्यक्रमाला सहकार्य करणा-या सर्व कार्यकर्त्यांचे व उपस्थितांचे आभार मानले.

७.४ **भारतीय राज्यघटना व सद्यस्थिती** :- बुधवार दि. २०.४.२०११ खानापूर, जिल्हा हिंगोली येथे प्रा. डॉ. व्ही. एन. इंगोले यांचे वरील विषयावर व्याख्यान झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे सचिव होते. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री. संजय टाकळगव्हाणकर व प्रा. उत्तमराव सूर्यवंशी यांनी आपले मौलिक विचार मांडले.

७.५ **रविवार दि. १ मे २०११ महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन** :- १ मे २०११ रोजी महाराष्ट्र दिन व जागतिक कामगार दिन साजरा करण्यात आला. यादिवशी सकाळच्या सत्रात महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवाच्या सांगता समारंभात गेल्या वर्षभरात महाराष्ट्र राज्य सुवर्ण महोत्सवानिमित्त विभागीय केंद्राच्यावतीने घेतलेल्या कार्यक्रमाचा आढावा विभागीय केंद्राच्या सचिवांनी घेतला. महाराष्ट्र दिनाबद्दल प्रा. ए. डी. जाधव, प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी आपले विचार मांडले. दुपारच्या सत्रात थोर स्वातंत्र्यसेनानी व कामगार नेते श्री. मुरगप्पा खुमसे यांनी व इतर मान्यवरांनी मौलिक मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी थोर स्वातंत्र्यसेनानी श्री. एस. टी. लोखंडे हे होते. विभागीय केंद्राचे सदस्य प्राचार्य डॉ. रमेशराव दापके यांनी सर्वांचे आभार मानले.

७.६ **रविवार दि. ८.५.२०११ सामूहिक विवाह सोहळा :-** शिरुर, ता. व जिल्हा लातूर येथे पार पडणा-या सामुदायिक विवाह सोहळयाबद्दल तेथील गावक-यांबरोबर विभागीय केंद्राच्यावतीने चर्चा करुन या सामूहिक विवाह सोहळयात सहभागी होण्याचे ठरविण्यात आले.

७.७ **बौध्द पौर्णिमा : मंगळवार दि. १७.५.२०११ :-** बौध्द पौर्णिमेनिमित्त विभागीय केंद्राच्या वतीने 'गौत्तम बुध्दांचे विचार' या विषयावर लातूर येथे परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादात सर्वश्री प्रा. डॉ. एस. बी. कुलकर्णी, जे. डी. देऊळगावकर, राजू गायकवाड इ. मान्यवरांनी गौत्तम बुध्दाबद्दलचे विचार मांडले. गौत्तम बुध्दांचे प्रेमाने जग जिंकण्याचे विचार या परिसंवादातून सर्वांच्या तोडून ऐकावयास मिळाले.

७.८ **बैठका** :- दि. ११.६.२०११ साने गुरुजी पुण्यतिथी, दि. १२.६.२०११ नांदेड येथील कार्यक्रम योगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण यांचे शेती व सहकारविषय विचार, दि. १७.६.२०११ राजमाता जिजाऊ स्मृतीदिन निमित्त कार्यक्रम, दि. २६.६.२०११ राजर्षी शहू महाराज जयंतीनिमित्त त्यांना विभागीय केंद्राच्या वतीने अभिवादन, दि. ३०.६.२०११ राजर्षी शाहू महाराज यांच्या जीवनावर व्याख्यान याबाबत बैठका आयोजित करण्यात आल्या.

७.९ **रविवार दि. १२.६.२०११ : यशवंतराव चव्हाण योगप्रवर्तक या विषयावर व्याख्यानमाला :-** दि. १२.६.२०११ रोजी यशवंतराव चव्हाण यांच्या विचाराच्या प्रचार प्रसार म्हणून नांदेड येथील लालबहादूर शास्त्री सभागृहात 'योगप्रवर्तक यशवंतराव चव्हाण' या विषयावर व्याख्यान आयोजित केले. त्यामध्ये अनेक वक्त्यांनी आपले विचार मांडले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. इंगोले हे होते तर श्री. उत्तमराव सूर्यवंशी, प्रा. एस. जी. कुलकर्णी इ. ची उपस्थिती लाभली होती.

७.१० **शुक्रवार दि. १७.६.२०११ राजमाता जिजाऊ स्मृतिदिन** :- विभागीय केंद्राच्या वतीने लातूर येथे विभागीय केंद्र कार्यालयात 'आजचे स्त्रीजीवन' या विषयावर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्रात प्राध्यापिका एस. जी. हरासकर, प्राध्यापिक पी. टी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. कुसुमताई पवार इ. नी आपला सहभाग नोंदवला.

७.११ **रविवार दि. २६.६.२०११** :- लातूर येथील राजर्षी शाहू महाराज यांच्यापुतळयास विभागीय केंद्राच्या वतीने विनम्र अभिवादन करुन तेथील उपस्थितांना दि. ३०.६.२०११ रोजी लोकराजा शाहू महाराज यांच्या जीवनावर विभागीय केंद्राच्यावतीने महाराष्ट्रातील प्रसिध्द व्याख्याते प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आल्याचे सांगण्यात आले. ही बातमी सर्व वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आली.

७.१२ **दि. ३०.६.२०११ रोजी राजर्षी शाहू महाराज व्याख्यानमाला** :- राजर्षी शाहू यांच्या जयंतीनिमित्त प्राचार्य डॉ. सोमनाथ रोड यांचे व्याख्यान आयोजित केले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागीय केंद्राचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राच्या सचिवानी केले.

७.१३ **डॉक्टर्स डे** :- शुक्रवार दि. १ जुलै २०११ रोजी औसा, जिल्हा लातूर येथील प्रसिध्द डॉ. असलम अरब हे गरीबाचे डॉक्टर म्हणून ओळखले जातात. या डॉक्टरचा सत्कार विभागीय केंद्राच्या वतीने १ जूलै या दिवशी त्यांचा सत्कार औसा येथे त्यांच्या निवासस्थानी जावून विभागीय केद्राच्या सचिवांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी डॉ. अरब यांचे जीवाभावाचे मित्र व औसा तालुक्याला एक निश्पृह व्यक्तीमत्व म्हणून परिचित असलेले माजी आमदार श्री. शिवशरणप्पा उटगे हे या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. भगीरथराव पाटील व श्री. कुमारजी देशमुख इ. मान्यवर मंडळी उपस्थित होते.

७.१४ **१५ जुलै गुरुवार गुरुपौर्णिमा** :- सकाळी गुरुपौर्णिमेनिमित्त आजच्या जीवनात आदर्श शिक्षक म्हणून ज्या मान्यवर मंडळींनी आपल्या व्यवसायात नावलौकिक मिळवला आहे अशा शिक्षक बांधवाचा विभागीय केंद्राच्या वतीने सत्कार करण्यात आला. या सत्कार प्रसंगी दयानंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बामनराव पाटील यांनी आपले मौलिक विचार मांडले.

७.१५ **१५ जुलै २०११ सायंकाळी श्रीमती साधनाताई आमटे यांना भावपूर्ण श्रध्दांजली** :- देशविदेशातील हजारो कुष्ठरोग्यांची मनोमन आपल्या हातून सेवा करणारे थोर समाजसेवक बाबा आमटे यांच्या पत्नी श्रीमती साधनाताई आमटे यांचे वृध्दापकाळाने आनंदवन जिल्हा चंद्रपूर येथे निधन झाले. आमटे कुटुंबियांचे लातूरशी फार जवळचे संबंध होते ते आजही आहेत. या दुःखद प्रसंगी विभागीय केंद्र आणि अंनिस, जिल्हा लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने त्यांना लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालयात श्रध्दांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

७.१६ **२४ जुलै २०११ शेळगाव (गौरी), तालुका नायगाव, जिल्हा नांदेड येथे ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत शेतकरी मेळावा** :- ग्रामस्वच्छता अभियानात शेळगाव (गौरी) या गावाने राष्ट्रपती व राज्य सरकारचे अनेक पारितोषिके पटकावली आहेत. गावात सिमेंट रस्ते, शाळा, सभागृह, नळ योजना, जातीभेदाच्या भिंती पार करुन उभी राहिलेली आंतरजातीय घरे, प्रत्येक घरी स्वच्छतागृह, महिलांसाठी स्वतंत्र कपडे धुण्याची सोय, व्यायामशाळा, वृक्ष व सार्वजनिक बाग आहेत. शेळगाव येथे शेतकरी मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रमुख वक्ते म्हणून खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. प्रमुख पाहुणे प्रा. उत्तमराव सूर्यवंशी हे होते. अध्यक्षस्थानी श्री. माधवराव पाटील शेळगावकर होते.

७.१७ **२ ऑगस्ट २०११ रक्षाबंधन** :- विभागीय केंद्रातर्फे यशवंतप्रेमी भगिनींच्या विनंतीवरुन रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

६.२५ २ **ऑक्टोबर ज्येष्ठ नागरिक दिन** :- विभागीय केंद्राच्या वतीने 'ज्येष्ठ नागरिक आनंद महोत्सव' साजरा करण्यात आला. याप्रसंगी ॲड. नारायणराव पाटील, ॲड. कमलाकररावजी कुलकर्णी, डॉ. एस. जी. साबदे, श्रीमती मिनाताई जाधव इ. ज्येष्ठ नागरिकांचा या आनंदोत्सवात सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड. कमलाकार कुलकर्णी, प्रमुख पाहुणे म्हणून ॲड. नारायणराव पाटील यांची उपस्थिती होती. याप्रसंगी ॲड. नारायण पाटील यांनी ज्येष्ठांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सदस्य लातूरातील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. मनोहरराव गोमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन केंद्राच्या सचिवांनी मानले.

६.२६ **दि. ११.१०.२०११** :- विभागीय केंद्राच्या वतीने रामकृष्ण परमहंस महाविद्यालय, उस्मानाबाद येथे 'लोकपाल व जनलोकपाल विधेयक - अपेक्षा व वस्तुस्थिती' या विषयावर कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते ज्येष्ठ पत्रकार श्री. निळू दामले, मुंबई हे होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उस्मानाबादचे माजी नगराध्यक्ष श्री. नानासाहेब पाटील हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून विभागीय केंद्राचे सचिव यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक विभागीय केंद्राचे उस्मानाबाद जिल्हा सदस्य प्राचार्य रमेशराव दापके यांनी केले.

६.२७ **विभागीय केंद्राची महत्त्वाची बैठक** - दि. १६.१०.२०११ :- दि. ११ सप्टेंबर २०११ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष, भारताचे कृषीमंत्री मा. ना. शरदचंराव पवार यांच्या उपस्थितीत मुंबई येथील मुख्य कार्यालयात २०१२-१३ या वर्षात लोकनेते मा. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीनिमित्त विभागीय केंद्रामार्फत घ्यावयाच्या वर्षभरातील कार्यक्रमाच्या नियोजनाची सविस्तर चर्चा झाली. या बैठकीस लातूर विभागीय केंद्राचे सचिव उपस्थित होते.

६.२८ **१४ नोव्हेंबर २०११ बालकदिन साजरा** :- विभागीय केंद्राच्या वतीने लातूर शहरातील नगर परिषदेच्या इ. चौथीच्या शाळांना भेटी देवून गरीब मुलामुलींच्या आरोग्याची चौकशी करण्यात आली व याच शाळेत बालकदिन साजरा करण्यात आला.

६.२९ २५ **नोव्हेंबर २०११ ची पूर्वतयारी बैठक** :- या बैठकीत कार्यक्रमाचे पाहुणे, ठिकाण, बॅनर, कामाची विभागणी, वेळापत्रक, पेपर बातमी, जाहीरात, कार्यक्रमपत्रिका तयार करणे, खर्चाचे अंदाजपत्रक इ. ठरविण्यात आले.

६.३० २५ **नोव्हेंबर मा. यशवंतराव चव्हाणसाहेबांचा २७ वा स्मृतिदिन** :- मा. चव्हाणसाहेबांच्या स्मृतिदिनी प्रसिध्द साहित्यिक प्रा. दत्ता भगत यांचे व्याख्यान झाले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. खा. डॉ. गोपाळराव पाटील तर कार्यक्रमाचे अध्यक्ष खा. डॉ. जनार्दन वाघमारे हे होते. प्रास्ताविक विभागीय केंद्राचे सचिव यांनी केले. आभार सदस्य ॲड. मनोहरराव गोमारे यांनी मानले.

६.३१ १२ **डिसेंबर २०११ मा. शरदचंराव पवार यांचा वाढदिवस** :- शरद कृषि वाचनालय फाऊंडेशन, लातूर आणि विभागीय केंद्र. लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबईचे अध्यक्ष, भारताचे कृषिमंत्री मा. ना. शरदराव पवार यांचा ७० वा वाढदिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वाचनालयाचे अध्यक्ष ॲड. श्रीधरराव जाधव होते तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्राच्या सचिवांनी आपले विचार मांडले. यावेळी गरजू शेतक-यांना कृषिविषयक पुस्तके वाटप करण्यात आली.

६.३२ **२० डिसेंबर २०११ चा कार्यक्रम** :- विभागीय केंद्र लातूर आणि महाराष्ट्र राज्य परीट धोबी संघटना, लातूर यांच्यावतीने राष्ट्रोध्दारक संत गाडगेबाबा यांच्या स्मृतिदिनानिमित्त जाहीर अभिवादन व परिवर्तन मेळावा घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्‌घाटक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार, प्रमुख पाहुणे श्री. रामकुमार रायवाडीकर, प्रा. सुशिला पिंगळे, श्री. सुधाकरराव देशमुख, श्रीमती संजीवनीताई चिकाटे, श्री. प्रकाश सुरवसे, स्वागताध्यक्ष श्री. रंगनाथ घोडके, श्री. गणपतराव तेलंग उपस्थित होते.

६.३३ **२२ डिसेंबर २०११ चा कार्यक्रम** :- विभागीय केंद्र लातूर आणि दिवंगत सुनिल देशमुख जनसेवा प्रतिष्ठानच्या वतीने दारु विरुध्द जाहीर व्याख्यान व आदर्श गुणवंताचा गौरव कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी 'वाढत्या व्यसनाचा समाज व राष्ट्रावरील दुष्परिणाम आणि शासनाचे कर्तव्य' या विषयावर मान्यवरांनी आपले विचार मांडले. प्रास्ताविक प्राचार्य दापकेसर यांनी केले तर आभार श्री. ज्योतीराम काटे यांनी केले.

६.३४ **२८ डिसेंबर २०११ कार्यक्रमाची बैठक** :- दि. ३१ डिसेंबर २०११ महाराष्ट्र अंधश्रध्दा निर्मूलन समिती लातूर व केंद्राच्या वतीने कार्यक्रमाच्या रॅलीची पूर्वतयारी बैठक घेण्यात आली.

६.३५ **३१ डिसेंबर २०११** :- विभागीय केंद्र लातूर व अंधश्रध्दा निर्मूलन समिती, लातूर जिल्हा शाखा यांच्यावतीने २०११ च्या वर्षाला निरोप व २०१२ या वर्षाचे स्वागत या निमित्ताने लातूर शहरातील अनेक शाळा महाविद्यालये वरील संस्थाने काढलेल्या फेरीत सहभाग घेतला. ही रॅली सर्व तरुणांना व्यसना विरोधी उद्‌बोधक ठरली.

६.३६ **१२ जानेवारी २०१२ : स्वामी विवेकानंद जयंती** :- नवजीवन बहुदेशीय संस्था मंगरुळ व विभागीय केंद्र लातूरच्या वतीने मंगरुळ येथे स्वामी विवेकानंद जयंती आणि राष्ट्रमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष मंगरुळ गावचे सरपंच श्री. ईश्वर कुलकर्णी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून नवजीवन विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. बागलसर उपस्थित होते.

६.३७ **२६ जानेवारी २०१२ : भारतीय प्रजासत्ताक दिन** :- विभागीय केंद्र लातूर व नवजीवन बहुदेशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भारतीय प्रजासत्तक दिन नवजीवन विद्यालयात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शालेयस्तरावर विविध सांस्कृतिक कार्यक्रम, वक्तृत्व, वादविवाद, रांगोळी, प्रश्नमंजूषा व मैदानी स्पर्धा घेण्यात आल्या व विजेत्यांना बक्षिस देवून सन्मानित करण्यात आले.

६.३८ **५ फेब्रुवारी २०१२ : ईद ए मिलाद निमित्त विभागीय केंद्रातर्फे मुस्लिम बांधवाना शुभेच्छा** - या कार्यक्रमात मुस्लिम बांधवांकडून त्यांच्या सुखदुखावद्दल, मुलांच्या शिक्षणावद्दल माहिती करुन घेण्यात आली.

६.३९ **१९ फेब्रुवारी २०१२ - शिवजयंती** :- सर्व जातीपंथातील विशेषत: तळागाळातील जनसामान्यांना आधार उभारी देणारे जागतिक किर्तीचे जाणते राजे शिवछत्रपती यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

६.४० **८ मार्च २०१२ : जागतिक महिला दिन** :- जागतिक महिला दिनानिमित्त 'स्त्री-भ्रूणहत्या' या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्रात लातूर येथील सुप्रसिध्द डॉ. कुकडे यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर स्त्रीयांच्या इतर समस्याबद्दल चर्चा झाली. कार्यक्रमास मोठया संख्येने महिला उपस्थित होत्या.

६.४१ **१२ मार्च २०१२ :- यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीनिमित्त कार्यक्रम** : - विभागीय केंद्र लातूरच्या वतीने मान. यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी शुभारंभ प्रसंगी 'यशवंतराव चव्हाण आणि सहकारी चळवळ' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख वक्ते म्हणून ज्येष्ठ विचारवंत श्री. आनंदराव जाधव होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी खासदार डॉ. गोपाळराव पाटील हे होते. याप्रसंगी प्रा. डॉ. शिवाजीराव देशमुख यांनी मा. चव्हाणसाहेब यांच्या साहित्यावर विचार मांडले तर प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी मान. यशवंतराव चव्हाण यांचे जीवन तत्वज्ञानाचे कसे वेढले होते याबद्दल चर्चा केली. प्राचार्य डॉ. संदीपान जाधव यांनी मान. चव्हाणांच्या राजकीय जीवनाबद्दल विचार मांडले. या कार्यक्रमाचे वेळी विभागीय केंद्रात नुकतेच कार्यकारिणी सदस्य म्हणून विराजमान झालेले दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी व विभागीय केंद्राचे सचिव यांच्या हस्ते खा. डॉ. गोपाळरावजी पाटील व इतरांचे यथोचित सत्कार करण्यात आले. कार्यक्रमाचे आभार विभागीय केंद्राचे कार्यकारिणी सदस्य अॅड. मनोहरराव गोमारे यांनी मानले.

- - - - - - - - - -

## यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई

प्रतिष्ठानची प्रकाशने

| | | किंमत रुपये |
|---|---|---|
| ०१ | यशवंतराव चव्हाण : विधी मंडळातील निवडक मराठी भाषणे भाग-१ संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २००.०० |
| ०२ | वाय.बी.चव्हाण : सिलेक्टेड स्पीचेस-विधीमंडळे भाग-२ संकलन : डॉ. व्ही. जी. खोबरेकर | २५०.०० |
| ०३ | सिलेक्टेड स्पीचेस इन पार्लमेंट-वाय.बी.चव्हाण भाग-१ ते ४ संकलन : राम प्रधान प्रत्येकी | २५०.०० |
| ०४ | यशवंतराव चव्हाण यांचे मौलीक विचार संकलन : ना. धों. महानोर | ३.५० |
| ०५ | सह्याद्रीचे वारे-यशवंतराव चव्हाण | ३०.०० |
| ०६ | म. ज्योतीबा फुले यांचे निवडक विचार संकलन : प्रा. गजमल माळी | १२.०० |
| ०७ | बेकारी निर्मूलनातून ग्रामीण विकास : संपादक : वि. स. पागे | ३५.०० |
| ०८ | महाराष्ट्रातील दुष्काळ आणि जलसंपत्तीचे नियोजन-संपादन : अण्णासाहेब शिंदे | १६०.०० |
| ०९ | महाराष्ट्र : एक दृष्टिकोन-शरदराव पवार- भाषणसंग्रह-संपादन : दादासाहेब रुपवते | ७५.०० |
| १० | पंचायत राज, जिल्हा नियोजन आणि ग्रामीण विकास संपादन : पी. बी पाटील | १००.०० |
| ११ | नवभारत : परिवर्तनाची दिशा-संपादन : पी. बी. पाटील | १००.०० |
| १२ | विमुक्तायन : महाराष्ट्रातील विमुक्त जमाती : चिकित्सक अभ्यास-संशोधक/लेखक : लक्ष्मण माने | २५०.०० |
| १३ | यशवंतराव चव्हाण-चरित्रलेखन : अनंतराव पाटील | ८०.०० |
| १४ | शब्दांचे सामर्थ्य-संपादन : राम प्रधान | ३७५.०० |
| १५ | महाराष्ट्राची चार दशकांतील वाटचाल : एक आढावा (इंग्रजी) (यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई व महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळ यांचे संयुक्त प्रकाशन) | २५०.०० |
| १६ | बाऊंटीफूल बनियन -डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील चरित्र खंड - १ ते ४ (इंग्रजी)-बॅ. पी. जी. पाटील | ८००.०० |
| १७ | ज्येष्ठ नागरीकांसाठी पुस्तिका | ३५.०० |
| १८ | अजिंठा-(काव्यसंग्रह) लेखक : ना. धों. महानोर (इंग्रजी) | १५०.०० |
| १९ | ई-बुक (मराठी / इंग्रजी) यशवंत साहित्य/फोटो भाग -१ | १५०.०० |
| २० | न्यायालयीन व्यवहार आणि मराठी भाषा | ४००.०० |
| २१ | ई-बुक (मराठी / इंग्रजी) पुस्तके भाग - २ | १५०.०० |
| २२ | यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तत्व | ५००.०० |
| २३ | कृष्णाकांठ - मराठी | ३००.०० |
| २४ | कृष्णाकांठ - इंग्रजी | ३९५.०० |

## व्हिडीयो कॅसेट

२५ मी एस. एम : एस. एम. जोशी यांचा जीवनपट

२६ तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी : तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचा जीवनपट

२७ प्रवासी पक्षी : सुप्रसिध्द साहित्यिक कुसुमाग्रज यांचा जीवनपट

२८ पु. ल. वृतांत : पु. ल. देशपांडे यांचा जीवनपट
या चारही व्हिडओ कॅसेटची निर्मिती यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानने केली असून दिग्दर्शनाची जबाबदारी सुप्रसिध्द दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी पार पाडली.

२९ कॉ. केशवराव जेधे : कॉ. केशवराव जेधे यांचा जीवनपट, दिग्दर्शक -श्री. राम गबाले.

३० येस्. आय एम कम्युनिस्ट - कॉ.श्रीपाद अमृत डांगे यांच्या जीवनावरील अनुबोधपट दिग्दर्शन-विनय नेवाळकर




यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षाच्या शुभारंभ प्रसंगी गेटवे ऑफ इंडिया येथील कार्यक्रमातील व्यासपीठावर डावीकडून केंद्रीय मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल, श्री. विलासराव देशमुख, श्री. देवीसिंह शेखावत, महाराष्ट्राचे राज्यपाल के. शंकरनारायणन, भारताच्या राष्ट्रपती महामहिम श्रीमती प्रतिभाताई पाटील, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण, केंद्रीय कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शरद पवार, केंद्रीय मंत्री श्री. सुशिलकुमार शिंदे व राष्ट्रीय पुरस्कार विजेते मार्शल ऑफ दि एअरफोर्स श्री. अर्जन सिंग.




यशवंतराव चव्हाण सामाजिक एकात्मता / विज्ञान तंत्रज्ञान राज्यस्तरीय पारितोषिक २०११ हे मराठी विज्ञान परिषद, मुंबई यांना वितरित करतांना केंद्रीय कृषीमंत्री व प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शरदराव पवार सोबत अणुऊर्जा शास्त्रज्ञ व यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. अनिल काकोडकर व विधानसभेचे अध्यक्ष श्री. दिलीप वळसे-पाटील.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai